म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३४८५



दलित साहित्य समीक्षा

REFBK-0026674

डॉ. ज्योती लांजेवार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे ादा वर्गणी भरावी लागले.

15 MAR 1995

15 MAR 1995

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

निबंध
संदर्भ
निबंध
३४८५
२६६७६
१०।९।९२

ज त स -

दलित साहित्य समीक्षा

डॉ. ज्योती लांजेवार


REFBK-0026674

सुगावा प्रकाशन, पुणे

दलित साहित्य समीक्षा

डॉ. ज्योती लांजेवार

© डॉ. ज्योती लांजेवार
बी १७/२ रविनगर
नागपूर ४४० ००१

प्रकाशक :

उषा वाघ,
सुगावा प्रकाशन
८६१/१, सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०.

मुद्रक :

पद्मजा प्रिंटर्स,
१२०२, शिवाजीनगर,
पुणे – ४११ ००४.

मुखपृष्ठ :

अनिल उपळेकर, पुणे

मुद्रणस्थळ :

इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१००५, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

प्रथमावृत्ती :

१४ एप्रिल १९९२

मूल्य रुपये – ३५

अस्पृश्यतेचा अंत करणाऱ्या व नवा माणूस घडविणाऱ्या

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

नावाच्या वादळास

मनोगत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणा म्हणजे माझ्या लेखणीचा आत्मा होय. माझ्या लेखनाला सुरूवात होण्यापूर्वीचा काळ माझ्या चौकसपणाचा कळस गाठणारा होता. बालपणी प्रश्न विचारून भंडावून सोडण्याच्या माझ्या प्रवृत्तीला जोपासण्याचे उत्तम कार्य आई, आजी-आजोबा यांनी केले. त्यामुळेच आज दलित साहित्य समीक्षेच्या निमित्ताने चर्चा करण्याचे बळ मला मिळाले असावे.

एक प्रसंग मला अजूनही आठवतो. मी 'संत तुकाराम' हा चित्रपट आई-बरोबर पाहिला. त्यात तुकारामाला स्वर्गात घेऊन जाणारे विमान स्वर्गातून खाली येते व तुकाराम त्यात बसून सदेह वैकुंठाला जातो असा प्रसंग असतो. माझ्या बाल-मनाला तेव्हापासून पडलेले प्रश्न सतत पिच्छा पुरवीत होते...स्वर्ग आकाशात वर असेल का ? मग तो तरंगणारा असेल. स्वर्गातून विमान असे संतांना नेण्यासाठी येत होते का ? मग संत रामदासालाही त्याने नेले असेल ? त्याची नोंद आहे का ? नामदेव-ज्ञानदेव-चोखामेळासाठी विमान नव्हते का ? की त्यांना संतपणच नव्हते ? असे नाना प्रश्न या चित्रपटाने निर्माण केले होते. या प्रश्नांची उत्तरे मी माझ्या बालसुलभ जिज्ञासेतून याच्या-त्याच्याकडून मिळविण्याचा प्रयत्न करीत असे. लहान-पणापासून जडलेल्या चौकसवृत्तीचा परिपाक आज या लेखनरूपाने झाला आहे. या बाबतीत मला समाधान वाटते. माझ्याकडून काही त्रुटी राहिल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण मार्गदर्शक म्हणून मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक द. भि. कुळकर्णी यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे या लेखनासंबंधीच्या एकूण प्रतिक्रियांविषयी मी निर्धास्त असणेच योग्य.

साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळविणाऱ्या व सतत सहा वर्षे ज्यांची शिष्या म्हणून त्यांच्या ज्ञानगंगेत न्हाऊन निघण्याचे भाग्य मला लाभले त्या माझ्या गुरूंविषयी-प्रा. शरदचंद्र मुक्तिबोधांविषयी कृतज्ञता व्यक्त करणें मी माझे कर्तव्य समजते. त्यांची मार्क्सवादी भूमिका माझ्यातील संस्कारांना बळकट करू शकली नसली तरी माझ्या लेखणीला मात्र बळ देऊन गेली हे मान्य करावेच लागणार.

प्रस्तुत प्रबंधात दलित साहित्यावरील समीक्षा लेखनाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. आजची मराठी समीक्षा, त्यातील ठळक प्रवाह, समकालीन दलित साहित्य व दलित समीक्षा, दलित समीक्षकांची दलित साहित्य समीक्षा, तसेच दलितेतर समीक्षकांची दलित साहित्य समीक्षा यांचा चिकित्सक परिचय करून देण्याचा यात प्रयत्न आहे. बाळकृष्ण कवठेकरांच्या 'दलित साहित्य: एक आकलन' यामध्ये उपस्थित झालेल्या समीक्षेवरील व्याजप्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न परिशिष्टामध्ये आहे. तसेच विजय सोनवणे यांच्या 'दलित साहित्य का नको ?' याचाही परामर्श घेतला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला मार्क्सवादी किंवा पुरोगामी विचारांच्या कुबड्या लावणे इष्ट ठरणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे स्वतंत्र तत्त्वज्ञान असल्यामुळे मार्क्सवादी, पुरोगामी विचारवंतांना आंबेडकरांच्या विचारांचे बोट धरून चालण्याखेरीज गत्यंतर नाही. त्यामुळे एका डोळ्यात मार्क्स, दुसऱ्या डोळ्यात आंबेडकर व तिसऱ्या डोळ्यात चार्वाकाचे तत्त्वज्ञान घेऊन साहित्याच्या क्षेत्रात वाटचाल करता येणे शक्य नाही, असे मला वाटते. दलित लेखकांनी किंवा समीक्षकांनीही याची खुणगाठ मनाशी पक्की बांधून लेखणी चालवावी असे वाटते.

दलितेतर वा दलित समीक्षकांनी दलित साहित्यावर जर बुद्धिप्रामाण्यवादातून तर्कशुद्ध आक्षेप घेतले तर त्यांचे उत्तरही बुद्धिप्रामाण्यवादातून तर्कशुद्धच द्यावे लागणार आहे. त्यासाठी समीक्षकाला कोता ठरविण्याची गरज नाही. पण कोणी जर खरोखर जातीयवादी भूमिकेतून समीक्षा केली असेल तर त्याचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. दलितसाहित्यकृतीवरील दलितेतरांची खोटी प्रशंसा व खोटीच दखल घेणे आणि दलितांची स्नेहापोटी केलेली सत्य समीक्षा दलित-साहित्यिकांनी नाकारणे हे दलित साहित्य चळवळीला मारक ठरणारे आहे. आज दलित साहित्याची समीक्षा होते आहे. तिचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. ह्यादृष्टीने केलेला हा अल्पसा प्रयत्न.

आभार मानणे हे खरे तर विकट काम असते. औपचारिकपणे आभार मानून मोकळे होणे सोयीचे, पण जेव्हा मनापासून आभार मानावेसे वाटतात तेव्हा शब्दच हरवून जातात.

डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे व कौटुंबिक जिव्हाळ्यामुळेच प्रस्तुत पुस्तक आज उजागर होत आहे.

सिटी विज्ञाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गो. मा. कुळकर्णी, उपप्राचार्य डॉ. श्री. मा. कुळकर्णी यांच्या प्रोत्साहनालाही माझ्या ठायी मोल आहे.

माझे पती बाबुराव, मुलं रीना, अपर्णा, निखिल, अखिल यांनी माझा मूड जोपासला नसता तर मी आज काहीच नसते हे त्रिवार सत्य.

डॉ. भालचंद्र फडके, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. केशव मेश्राम, नामदेव ढसाळ अशीच आणखी काही नावं आज डोळ्यांपुढे येतात. त्या साऱ्यांचेच आभार.

प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करून वाचकांसमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या 'सुगावा'चे विलास वाघ व उषा वाघ यांचे आभार मानणे म्हणजे औपचारिकपणा ठरेल.

—ज्योती लांजेवार

अनुक्रमणिका

	मनोगत	एक
प्रकरण पहिले :	आजची मराठी समीक्षा : ठळक प्रवाह	१
प्रकरण दुसरे :	समकालीन दलित साहित्य व दलित समीक्षा	९
प्रकरण तिसरे :	दलित समीक्षकांची दलित साहित्य समीक्षा	१७
प्रकरण चवथे :	दलितेतर समीक्षकांची दलित साहित्य समीक्षा	५४
प्रकरण पाचवे :	समारोप	८३
	परिशिष्ट–१	
	परिशिष्ट–२	
	संदर्भटीपा	
	सदर्भग्रंथ	



१ : आजची मराठी समीक्षा : ठळक प्रवाह

प्रस्थापित साहित्याचे गंभीरतेने पुनर्मूल्यांकन करणे, अधिक विस्तृत पण समर्पक वाटणाऱ्या नव्या साहित्य-संकल्पनांचा शोध घेणे, नवसाहित्याशी सुसंगत अशा स्फुट समीक्षा-विचारांची सूत्रबद्ध मांडणी करणे आणि त्याच्या आधारे जुन्या किंवा नव्या साहित्यकृतीच्या जाणिवा-उणिवांची, सामर्थ्यांची अथवा मर्यादांची उकल करणे ही आजच्या समीक्षेची महत्त्वाची दिशा होय.

साहित्यकृती, साहित्यसमस्या व साहित्यव्यवहार यांचे आकलन, आस्वादन व मूल्यमापन म्हणजे समीक्षा होय. ज्ञानदृष्टया कलेचे क्षेत्र जसजसे विस्तारत जाईल तसतसे समीक्षेचे स्वरुपही व्यापक आणि विस्तृत होत जाईल. मानवी जीवनाचे संदर्भ उलगडण्यासाठी माणसाला आजवर निरनिराळे उपक्रम करावे लागलेत. आजदेखील करावे लागतात. या उपक्रमांचा एक भाग म्हणजे साहित्य-निर्मिती होय. या साहित्यनिर्मितीची सर्वांगाने तपासणी करणे आणि निरनिराळ्या प्रकाराने व पद्धतीने तिचे सामर्थ्य अजमावणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य होय.

दुसऱ्या महायुद्धानंतर मराठी साहित्यात फार मोठा बदल झालेला दिसून येतो. नव्या जाणिवांनी आणि नव्या प्रकाराने मराठी साहित्य समृद्ध झालेले दिसते. दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम जसा जनजीवनावर झाला तसाच तो साहित्यावर-देखील झाला. अशा या महायुद्धोत्तर साहित्याला 'समकालीन साहित्य' हे नाव दिले गेले व या साहित्याची समीक्षा 'समकालीन समीक्षा' ठरली.

स्वतःचे मूल्य घेऊन जन्माला आलेल्या साहित्यकृतीचे स्वतःचे काही नियम असतात. त्या नियमानुसार तिचे समीक्षण करावे अथवा व्हावे अशा भावनेला या काळातच दृढता मिळाली. साहित्यविचारात लेखकाच्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान मिळाले आणि या भूमिकेनेच लेखकाच्या साहित्यकृतीचा आशय घडत गेला. हा आशय परिवहन मार्गातील लाल-हिरव्या-पिवळ्या नियंत्रक दिव्यांप्रमाणे साहित्य-कृतीचा रूपनियंत्रक घटक होऊ लागला. त्यामुळे साहित्यात लेखकाची भूमिकाच प्राण ओतून सौंदर्य निर्माण करू लागली. या भूमिकेला अनुसरुनच आजच्या मराठी समीक्षेत दोन ठळक प्रवास दिसून येतात.

(अ) सौंदर्यवादी समीक्षा किंवा कलावादी समीक्षा.

(आ) जीवनवादी समीक्षा.

(अ) सौंदर्यवादी समीक्षा

मराठी समीक्षेचा प्रांत तसा फार मोठा आहे. त्यात अनेक प्रवाह-उपप्रवाह आहेत. त्यापैकी सौंदर्यवादी समीक्षा ही समकालीन समीक्षेत विशेष प्रभाव गाज-वलेली समीक्षा होय. या समीक्षेचा आजच्या केंद्रवर्ती साहित्यनिर्मितीशी आणि

आस्वादनाशी जवळचा संबंध आहे. मर्ढेकर युगाने मराठी साहित्यात कलावादी भूमिकेला एक वेगळे वैशिष्ट्य प्राप्त करून दिले आहे. या वेगळ्या वैशिष्ट्यांमुळेच समकालीन मराठी समीक्षालेखनात मर्ढेकरांच्या समीक्षालेखनाला एक क्रांतिकारक स्थान प्राप्त झाले आहे.

सौंदर्यवादी किंवा कलावादी समीक्षा करणारे समीक्षक खूप आहेत. त्यापैकी काहींचा विचार येथे केला आहे.

१) बा. सी. मर्ढेकर

मर्ढेकरांचे क्रांतिकारक युग सौंदर्यवादी समीक्षेला एक वेगळे परिमाण प्राप्त करून देते. त्यांच्या आकृतिक सौंदर्यवादाने मराठीत प्रथमच एक वेगळा व नवा विचार दिला आहे. मर्ढेकर एकीकडे सामान्य जीवनातील अनुभव व त्याचा परिणाम आणि दुसरीकडे कलावंताचा अनुभव व त्याचा परिणाम या दोहोंमधील भेद विशद करीत आकृतिक सौंदर्यवादाचे विश्लेषण करतात. ते म्हणतात, 'कलात्मक अनुभव हा इंद्रियसंवेदनात्मक असतो, कलात्मक घटकातील विविध घटकांची परस्परातील सुसंगती किंवा विसंगती, अन्योन्य परिपोषकता, साम्य किंवा विरोध, त्यांची लयबद्ध प्रमाणबद्धता निर्माण करणें हे कलावंत लेखकाचे वैशिष्ट्य आहे.'[१] अशी आकृतिक सौंदर्यवादाची ते मांडणी करतात. साहित्य-कृतीकडे एक कलाकृती म्हणूनही ते पहातात, व मराठी समीक्षेने तसेच साहित्याच्या आस्वादकाने देखील याच दृष्टीने कलाकृती म्हणून साहित्यकलाकृतीकडे पहावे असे सुचवितात. त्यांच्या संदर्भात प्रा. वसंत दावतर म्हणतात, 'यक्षिणीने कांडी फिरवावी आणि आपल्या प्रभावाने विश्व जिंकून घ्यावे तसे त्यांनी मराठी टीकाक्षेत्र जिंकून घेतले आहे. कलाकृती म्हणून साहित्यकृतीकडे पाहण्याची दृष्टी मराठी टीकेला व साहित्यास्वादकाला मर्ढेकरांनी दिली.'[२]

२) पु. शि. रेगे

आपल्या सर्जनशील लेखणीने कला व कलावंत यांच्याशी इमान राखून कला व कलावंताच्या अतूट संबंधाची सतत जपणूक करतात. या संबंधाशी ते कधीही प्रतारणा करीत नाही तर इमान राखतात. आनंद हा एकरूपी असतो. सोयीसाठी आपण त्याचे विभाजन करत असतो. पण त्या बाह्य व्यावहारिक परिस्थितीच्या नियमातूनच कमी आत्मनिष्ठ असतो तो कलावंत. म्हणूनच तो कलावंताखेरीज कोणालाही साथ वा साद देत नसतो. त्याच्याजवळ कला आणि जीवन हे दोनच भेद असतात, अशी रेग्यांची स्वच्छ भूमिका आहे. ते कलाकृतीतील आकृतिक संघटना व लय यांची निर्मिती व प्रक्रिया यांचा उहापोह आपल्या साहित्यविवेचनात करतात. त्यांची ही भुमिका आकृतिक सौंदर्यवादीच असली तरी प्रा. वसंत दावतर म्हणतात त्याप्रमाणे 'तिच्यात संस्कारवादाच्या छटा मिसळलेल्या आहेत.'[३] कलानिर्मितीकडे व कलेच्या आस्वादाकडे रेगे सारख्याच विचारातून वळतात.

३) प्रा. गंगाधर गाडगीळ

'अनुभववाद आणि सौंदर्यवाद यांचा सुंदर मिलाफ प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या समीक्षेत आहे. साहित्यकृतीचे सौंदर्य विशद करताना, तिचे धागे न् धागे उकलताना, तिच्यातील यशाची गमके सांगताना ज्या जीवनप्रवाहातून ती साहित्यकृती जन्मते त्या प्रवाहाचे वास्तवरूप आणि साहित्यकृतीमध्ये त्याचे उमटणारे पडसाद, तसेच लेखकाला आकलन झालेले त्यातले सत्य, मर्म याचे संपूर्ण विवरण आणि वेगळेपण सांगणाऱ्या समीक्षकांपैकी गंगाधर गाडगीळ एक होत. वा. ल. कुळकर्णी, कुसुमावतीबाई यांचे लेखनही याच प्रकारातले आहे.

गंगाधर गाडगीळांच्या मते, 'साहित्यातून व्यक्त होणाऱ्या लेखकाच्या अनुभवाला तीन अंगे आहेत– सौंदर्य, भावना, विचार'[४] या अनुभवात संगीत, आकार, अर्थ असतो, कलाकृती मूल्यनिरपेक्ष असते. 'कलाकृतीचा अनुभव घेण्यापलीकडे अधिक कसलाच हेतू न ठेवता वाचक तिचा आस्वाद घेऊ लागला तरच ती आपले सारे रहस्य व सौंदर्य उघडे करील'[५] अशी त्यांची विचारसरणी आहे. ती आकृतिक सौंदर्यवादाची साक्ष देते.

४) माधव आचवल

हेही आकृतिक सौंदर्यवादाचा विचार आपल्या कलासमीक्षेत करतात. कलावस्तूंची हुबेहूब नक्कल करून समीक्षा लिहिणे त्यांना सौंदर्यदायी वाटत नाही. कलाकृतीच्या आणि आपल्या मनाच्या तारा जुळणे म्हणजे कलाकृतीकडे पाहणे होय असे त्यांना वाटते. कलाकृतीच्या आणि आपल्या मनाच्या तारा जुळण्यासाठी ती अगदी घाईगर्दीत न वाचता पुन्हा–पुन्हा तिच्याशी मैत्री जोडीत वाचावी यावर त्यांचा कटाक्ष आहे. कोणतीही कलाकृती डोळ्यापुढे असली की तिचे अस्तित्व एवढेच एक सत्य समजावे, त्यामागे कोणतीही पूर्वभावना, उद्देश नसावा. त्यासाठी संवेदनांना प्रथम सौंदर्य जाणवावे लागते, त्याशिवाय कलाकृतीची समीक्षा करता येत नाही अशी त्यांची भूमिका दिसते. ते म्हणतात, 'कलाकृतीत जाणवणारे चैतन्यतत्त्व हे प्रत्यक्ष जीवनातील प्रत्यक्ष चैतन्यतत्त्वाहून निराळे असते. कलास्वादाचा अनुभव जीवनचैतन्याच्या ओघापासून मुक्त असल्यामुळे कालातीत असतो'[६] असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

५) डॉ. द. भि. कुळकर्णी

'समीक्षा केवळ साहित्यकृतीसंबंधी बोलत नाही तर ती सर्व कलाकृतीसंबंधी बोलत असते. तिने स्वतः एक कलाकृती होण्याऐवजी विशिष्ट कलाकृतीतील सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील, दूरस्थ आणि अंतस्थ सौंदर्यनगरे दाखवावयाची असतात' असे आजच्या मराठी समीक्षेविषयी 'तिसऱ्यांदा रणांगणातून' लिहिणारे डॉ. द. भि. कुळकर्णी साहित्याच्या नव्या जाणिवांचा व स्वरूपाचाही शोध घेतात. ते मुळात कलावादी समीक्षक असले तरीही निरनिराळ्या समीक्षाविचारांचा व प्रवाहाचा अधिक आस्थेने व व्यापक दृष्टीने विचार आपल्या लेखना-

तून करीत असतात. ललित कलांकडेच नव्हे तर विविध जीवनरूपांकडे समीक्षेने जावे असे त्यांचे मत आहे.

(आ) जीवनवादी समीक्षा

आजच्या मराठी समीक्षेतला दुसरा प्रवाह जीवनवादी समीक्षेचा होय. साहित्यनिर्मिती करणाऱ्या कलावंताचा संबंध लोकजीवनाशी व सर्वसामान्य जीवनाशी असावा लागतो. साहित्य हे समाजजीवनापासून, समाजवास्तवापासून दूर राहू शकत नाही व समीक्षेलाही साहित्याचे सामाजिक स्वरूप लक्षात घेतल्यावाचून पूर्तता येऊ शकत नाही. परंतु एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन कलेच्या नियमानुसार करता येते. कारण कलानिर्मितीची प्रेरणा व्यक्तिगत अशी मानता येईल, पण तिच्यातून जन्माला येणारी कलाकृती मात्र सामाजिक असते. जीवनदर्शनाच्या किंवा जीवनजाणिवेच्या अंगाने कलाकृती तयार होत असताना मानसिक संघर्षासहित शब्दरूप होणारी कलाकृती समाजाशी असलेल्या नात्याचे दर्शन घडविते व अशा दर्शनाचा शोध जीवनवादी समीक्षा घेते. अशी जीवनवादी समीक्षा लिहिणारे समीक्षक वेगवेगळ्या वादांचा परिणाम समीक्षेवर झाला असला तरी (उदा. मार्क्सवादाचा, साम्यवादाचा, अस्तित्ववादाचा) यांची समीक्षा ही जीवननिष्ठच राहिली. त्यापैकी काहींचा येथे परिचय दिला आहे.

१) कुसुमावती देशपांडे

कुसुमावतीबाईंनी 'जीवनवादी समीक्षा' लिहिली. तिलाच आजच्या भाषेत आपण 'आशयवादी समीक्षा' म्हणू शकतो. साहित्यात 'काय असावे' आणि 'कसे असावे' या दोन प्रश्नांचा विचार करणाऱ्या पद्धतींपैकी 'काय असावे' अशा मताच्या त्या आहेत. त्यांच्या समीक्षेची दिशा एका प्रकारच्या निश्चित आणि निःसंदिग्ध मतांवर स्थिरावली आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात एकप्रकारची निश्चितता व मतांचा ठामपणा आला आहे. त्यांची समीक्षा मानवतावादी आहे. डॉ. वि. स. जोग यांच्या मते, 'कुसुमावतीबाई समीक्षक या नात्याने कॉडवेल संस्कारापासून अलिप्त नाहीत. साम्यवादी समीक्षेच्या मूल्यांचा त्यांच्या साहित्यसमीक्षेवर परिणाम झाला आहे.' कॉडवेलने वापरलेले 'Subject–Object' या शब्दांचे जणू अनुवादन म्हणजेच त्यांनी योजलेले 'व्यक्ति–वस्तू–संबंध होय'[७] तर कुसुमावतीबाई म्हणतात, 'सौंदर्याची प्रतीती हा जसा एक व्यक्ति–वस्तु–संबंध आहे, तसेच तिचे स्वरूप व्यक्ति–समष्टि–संबंधावर अवलंबून असते.' सौंदर्याच्या नवप्रतीतीमध्ये कलेचे मूळ असते. ही प्रतीती व्यक्तिगत असते, पण अखेर समष्टि–जीवनात ती समाविष्ट होते. परंतु अखेर त्या संचिताच्या विकासाला कारण होते. सौंदर्याच्या कल्पनेचा विकास या तऱ्हेने व्यक्ती व समष्टी, सांस्कृतिक संचित व नवानुभूती यांच्या आंदोलनातून झालेला दिसतो. आणि हा विकास मानवी जीवनाच्या विकासाला समांतर ठरतो. तो जीवनसापेक्ष असतो.'[८] असा सौंदर्यविचार त्यांनी मांडला. मर्ढेकरांची इंद्रियनिष्ठ सौंदर्यकल्पना त्यांना मान्य नाही. जीवन

जगण्यासाठी माणसाची अविरत धडपड चाललेली आहे, माणसाच्या सौंदर्यकल्पनेनुसार निर्माण झालेल्या त्याच्या जीवनाकांक्षा या धडपडीशी निगडीत असतात, असे त्या प्रतिपादन करतात. त्या पुढे म्हणतात, 'सत्य, सौंदर्य व शिव ही जीवनाची त्रिगुणात्मक अंगे आहेत व ती सर्व जीवनसापेक्ष आहेत. मानवाच्या अखंड व अनंत अशा जीवनप्रयोगातून ती उदयास आलेली आहेत. यापैकी प्रत्येकाची प्रतीती व्यक्तीव्यक्तीला स्वतःच्या अंतरंगाच्या खोल गाभाऱ्यातून येऊ शकते, परंतु ही व्यक्तिगत प्रतीती त्या त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक संचिताने रंगलेली असते.'[९]

व्यक्तिवादाला त्या विरोध करतात. कलानिर्मितीच्या गूढवादी उपपत्तीस त्या मान्यता देत नाहीत. 'कलेच्या स्वरूपाची आणि कलेच्या विकासाची समाजसापेक्षता व त्या समाजाची वर्गसापेक्षता म्हणजेच कुसुमावतीबाईंच्या समीक्षालेखनाची वैशिष्ट्ये ठरतात. ती साम्यवादी समीक्षातत्त्वांशी त्यांची जवळीक स्पष्ट करतात'[१०] असे डॉ. वि. स. जोग म्हणतात.

प्रगतीकडे, पूर्णतेकडे जाणाऱ्या जगावर त्या विश्वास ठेवतात. निराशावादाचा त्यांना तिटकारा आहे. साहित्यात आशावाद व्यक्त झालेला असावा असे त्यांचे आग्रही मत आहे. या अर्थाने त्या समाजवादी वास्तववादाशी जवळचे नाते स्वीकारतात.

२) प्रा. दि. के. बेडेकर

साहित्यकृती आणि जीवन यांच्या संबंधाचे आकलन करून समीक्षा करणाऱ्यांपैकी दि. के. बेडेकर एक होत. ते मर्ढेकरी संप्रदायातले नाहीत किंवा मर्ढेकरी विचारसरणीला अनुसरणारेही नाहीत. एवढेच काय पण मर्ढेकरी कलातत्त्वज्ञानातून पुढे जाणारे ही समीक्षक नाहीत. 'कलेची मूल्ये सामाजिक आहेत, म्हणजे मानवसमाजसापेक्ष मूल्यांचाच विचार कलावंतालाही केला पाहिजे'[११] असे बेडेकर म्हणतात.

बेडेकरांची वाङ्मयीन समीक्षा केवळ मार्क्सवादीच आहे असे नाही तर तिला जीवशास्त्रीय बैठकही आहे. मनुष्याचा कलाव्यापार किंवा सगळाच व्यापार वास्तवाला आपल्या इच्छेप्रमाणे आकार देऊन स्वतःचे जीवन सुखकर बनविण्याच्या हेतूने चालत असतो. ह्या कलाव्यापाराचे विश्लेषण ते तीन प्रश्नांच्या आधारे करतात. (१) कलाकृती म्हणजे काय? (२) ज्या व्यापारामुळे कलाकृती निर्माण होते त्याचे स्वरूप काय? (३) कलावंत व वास्तव यांचे नाते कोणते? या प्रश्नांमधून ते आपले विचार मांडतात. 'कलानिर्मितीमध्ये व्यक्तित्व व वास्तव यांचे द्वंद्व असते असे मानले पाहिजे. व्यक्तित्व व वास्तव हे कलानिर्मितीचे दोन क्रियाशील व सृजनशील घटक आहेत व यांचा परस्परसंबंध आहे तसाच परस्परविरोधही, हे लक्षात घेतल्याशिवाय कलानिर्मितीचे मूळ स्वरूप स्पष्ट होणार नाही.'[१२] असे बेडेकरांचे मत आहे.

समाजशास्त्रीय भूमिकेवरून साहित्यसमीक्षा व्हावी असा त्यांचा आग्रह आहे.

मनोरंजन करणे व जगण्यातला अर्थ पाहण्याची शक्ती देणे ही त्यांची साहित्याकडून अपेक्षा आहे.

३) शरच्चंद्र मुक्तिबोध

शरच्चंद्र मुक्तिबोध मर्ढेकरांच्या विचारप्रणालीवरून प्रतिवाद करीत असले तरी कलावादी समीक्षेला सामोरे जात जीवनवादी भूमिका खंबीरपणे मांडतात. त्यांची संपूर्ण कलामीमांसा प्रामुख्याने परिस्थितीवर आधारलेली असल्याचे दिसून येते. अभिव्यक्तीपेक्षा आशयाला ते जास्त महत्त्व देतात. संगीतापेक्षा साहित्य हीच सर्वश्रेष्ठ कला असे ते मानतात. समाज हा परिवर्तनशील आहे. या परिवर्तनामुळे समाजाची होणारी प्रगती आणि या प्रगतीमुळे मानवी मनाचे बदलते विकार यांच्याशी कलावंत संवाद साधीत असतो, आणि या संवादातून त्याला येणारे अनुभव, अनुभवाची प्रतीती तो आपल्या साहित्यात चित्रित करीत असतो. ही प्रतीती जेवढी सखोल, जेवढी व्यापक, तितकीच कलाकृती श्रेष्ठ आहे, असे मुक्तिबोधांचे मत आहे. मर्ढेकरी कवितेतील 'नडलेल्या आशा चुलीत फेका' किंवा 'सरणावरती सरण लागते, जिवंत आशा पडे उताणी' ह्या कवितेतील 'स्वप्नस्थ वास्तव' म्हणजे वास्तवाच्या आधारे स्वप्न पहाणे या आविष्कृतीला मुक्तिबोध अपरिहार्य मानतात.[३]

जीवनातील वर्गसत्याचे आकलन नीट प्रकारे करून तदनुसार कलाकृतीतील पात्रांचे स्वभाववर्णन करणारा, तसेच मध्यमवर्गीय किंवा उच्चवर्गीय जाणिवांशी अविरत संघर्ष करून वर्गविहीन समाजरचना निर्माण करू पाहणाऱ्या बंडखोर शक्तीशी समरस होणारा कलावंत श्रेष्ठ आहे, असे मुक्तिबोध म्हणतात. ते विरोधात्मक एकता आकृती आणि आशयाद्वारे स्पष्ट करतात. आकृती आशयाशिवाय अस्तित्वातच येत नाही. आशय हादेखील आकृतीस्वरूपच असतो. या संदर्भात ते महत्त्वाचे विधान करतात–'कलावंताचा आशय हा कारागिराच्या सामग्रीप्रमाणे केवळ जडवस्तू नसतो, ते केवळ एक उपादान कारण नसते, तर स्वतःच्या संघटनेचे नियम असलेली ती एक चैतन्यशाली वस्तू असते.'[४]

४) द. ग. गोडसे

कोणत्याही साहित्यकृतीला जीवनमूल्ये असतातच. या जीवनमूल्यांचा संबंध साहित्यस्वरूपाशी राखून त्या साहित्यस्वरूपाचा व मूल्यांचा विचार द. ग. गोडसे आपल्या समीक्षेतून करतात. यासाठी 'साहित्यकृतीचा पोत' हा सिद्धांत कलाकृतीच्या वा साहित्यकृतीच्या मूल्यमापनासाठी ते वापरतात. पोताचे स्वरूप आणि कलेचे स्वरूप यांमधील साधर्म्य स्पष्ट करताना ते लिहितात, 'पोत म्हणजे ताणा व बाणा यांची विशिष्ट जागेत करण्यात आलेली वीण. या विणीतील धाग्यांच्या संख्येवरून, त्यांच्या घट्ट-तुरळक विणीवरून पोताची प्रतवारी ठरते. धाग्यांच्या संख्येप्रमाणेच धाग्यांचा बारीकपणा व त्याला देण्यात आलेला पोत या गोष्टीही पोताचे स्वरूप ठरविण्यात महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर धागा ज्या पदार्थाचा असेल त्या

पदार्थाच्या विविध गुणधर्मांवरही पोताचे स्वरूप अवलूबंन राहील. रेशीम, कापूस, लोकर व ताग यांच्या कापडाचे धागे सारख्या पिळाचे व सारख्या बारकाईचे असले तरी विणीच्या पोतात पदार्थाच्या स्वाभाविक प्रकृतिभेदामुळे फरक दिसून येतो.[१३] त्यासाठी ते एक समीकरण देतात. 'मूळ पदार्थ=जीवनविषयक तत्त्व. धागा= तत्त्व विशद करणारी जाणीव. ताणा-वाणा=त्या जाणिवांची आडवी-उभी वीण. यंत्रणा=जाणिवांचा आविष्कार घडवून आणणारे माध्यम, ते भाषेचे अथवा चित्राचे, शिल्पांचे असो.' यावरून हे स्पष्ट जाणवते की गोडश्यांना कलाकृतीच्या आकलनात केवळ आशयावर वा अभिव्यक्तीवर भर द्यावयाचा नाही, तर 'या दोहोंचे स्वरूप काळाप्रमाणे बदलणारे असले तरी ते संपूर्ण समाजसापेक्ष आहे'[१५] असे यांचे मत आहे.

आकृतीचा किंवा माध्यमाचा विचार कलाकृतीच्या विचारासाठी पुरेसा नाही. त्यात जाणिवांचा विचारही प्रामुख्याने व्हावा असे गोडश्यांना वाटते. त्यांच्या समीक्षेचे महत्त्वाचे सूत्र विशद करताना व. दि. कुलकर्णी म्हणतात, 'प्रत्येक आविष्काराच्या निर्मितीची प्रेरणा कलावंताला त्या त्या कालखंडातील जीवनविषयक निष्ठांतूनच मिळते.'[१६] जेव्हा जीवनविषयक निष्ठांना मूर्त स्वरूप दिले जाते तेव्हा ती 'आविष्काराची नवी यंत्रणाच ठरतें हे गोडश्यांचे विधान महत्त्वपूर्ण आहे.'[१७] एखाद्या चित्राचा लहानसा भाग पाहिला तरी संपूर्ण चित्रातील रंग-रेषा-शैलीचा 'पोत' जाणता येतो, त्यावरून त्या चित्राचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरविता येते. परंतु कलाकृतीचे आकलन मात्र सलगपणे करावयास हवे असे ते सुचवितात. द. ग. गोडश्यांना 'ते मार्क्सवादी समीक्षकाच्या जवळचे आहेत' असे म्हणणाऱ्यांना प्रा. वसंत दावतर उत्तर देतात. ते म्हणतात, 'पोत या सिद्धान्ताला मार्क्सवादी विचार-धारेचा आधार असला तरी कलानिर्मिती हा वर्गसमहांच्या निष्ठांचे प्रचारयंत्र मानणारा हा मार्क्सवाद नव्हे.'[१८] जीवनविषयक जाणिवांना आविष्काराची यंत्रणा देणारा गोडश्यांचा विचार आहे.

अशाप्रकारे जीवनमूल्यांशी, जीवनविषयक जाणिवांशी घनिष्ठ संबंध राखून साहित्याच्या स्वरूपाचा आणि मूल्यांचा शोध द. ग. गोडसे घेताना दिसतात. सौंदर्य-निष्पत्ती 'लोकधाटी'तून होते असे त्यांना सांगायचे आहे. 'लोकधाटी' हा खास गोडश्यांचा शब्द आहे.

५) नरहर कुरुंदकर

कुरुंदकर हे जीवनवादी समीक्षक, त्यातही ते समाजवादी विचारांची भूमिका स्वीकारणारे असल्यामुळे दलित साहित्यावर देखील ते प्रभावीपणे लिहू-बोलू लागले. ना. सी. फडक्यांचा तंत्रवाद व मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र हे कुरुंदकरांच्या टीकेचा विषय झाले. गोडश्यांप्रमाणे कुरुंदकरसुद्धा सौंदर्यनिष्पत्ती लोकधाटीतून होते असे मत प्रतिपादन करतात. कोणत्याही कलाकृतीला जीवनमूल्यांशिवाय अस्तित्व लाभत नाही व या जीवनमूल्यांशिवाय कलेचा आस्वाद घेता येत नाही.

तो कसा घ्यावा यासाठी ते रामायणाचे उदाहरण देतात व या उदाहरणाद्वारे श्रेष्ठ कलेचा आस्वाद जीवनमूल्यांच्या आधारे घेता येतो हे सिद्ध करून दाखवितात. त्यांना कलाकृतीचा जीवनार्थाशी असलेला संबंध मान्य आहे. जीवनवादी समीक्षा तसेच कलावादी समीक्षा या दोहोंचे स्वरूप व्यापक व्हावे असे त्यांना वाटत होते. या संदर्भात ते लिहितात, 'जीवनवादी समीक्षेला आपल्या समोरील मूलभूत प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत असे जाणवतच नाही, कलावादी समीक्षेला आपल्या भूमिकांचे आधार नीटसे सिद्ध करता येत नाहीत, अशा चक्रव्यूहात वाङ्मयीन समीक्षा सापडलेली आहे. ही तिची अवस्था या दशकातली नसून जुनीच आहे' असे आपले स्पष्ट मत ते प्रतिपादतात.

अशा या समकालीन समीक्षेच्या वाटचालीत या समीक्षकांनी आपल्या समीक्षालेखनाची मोलाची भर टाकलेली आहे. साहित्यसमीक्षेतील मूलभूत सिद्धांताचा कसोशीने विचार करणे चालू आहे. नवे मूल्यसंकेत कोणते ? ते जुन्याहून वेगळे आणि उपयुक्त का व कसे ? त्याचे निश्चित स्वरूप काय ? याविषयीचा विचार मराठी समीक्षक करीत आहेत.

साहित्याचा विचार करीत असताना कलावादी किंवा सौंदर्यवादी समीक्षक हा आकृतिवादी होण्याची शक्यता दिसते, तर जीवनवादी लेखक हा प्रचारकी होऊ शकतो. सौंदर्यवादी समीक्षा कलाकृतीची अनन्यता सांगते व कलाकृतीचे नाते कलावंताच्या लौकिक व्यक्तित्वाशी आहे की भौतिक समाजाशी आहे याचा शोध घेते, तर जीवनवादी समीक्षा कलाकृतीचा समाजजीवनाशी असलेला संबंध शोधते. अशा या दोन वैशिष्ट्यपूर्ण प्रवाहांबरोबरच आज मराठीत अनेक प्रवाह–उपप्रवाह विकसित होताना दिसतात.

सौंदर्यवादी व जीवनवादी या दोन ठळक समीक्षांचा प्रवाह–उपप्रवाहासहित परामर्श घेतला जातो, परंतु त्यात दलित साहित्याचा विचार होत नाही. तो या विवेचनात अपेक्षित आहे. दलित समीक्षा जीवनवादी समीक्षेचे प्रवाहरूप असूनही ती इतक्या वेगळ्या रूपाने व वैशिष्ट्यांनी अवतरली आहे की तिचा विचार स्वतंत्रपणे करणेच भाग पडते.

सारांशरूपाने खालीलप्रमाणे म्हणता येईल–

समकालीन मराठी समीक्षेत ठळक असे दोन प्रवाह दिसून येतात–

(१) सौंदर्यवादी किंवा कलावादी समीक्षा.

(२) जीवनवादी समीक्षा.

मर्ढेकर, पु. शि., रेगे, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल, द. भि. कुळकर्णी आदी समीक्षकांनी सौंदर्यमूल्यांचा पुरस्कार केला, तर दि. के. बेडेकर, मुक्तिबोध इत्यादी समीक्षकांच्या जीवनवादी समीक्षेनें मराठी समीक्षेला साहित्याकडे समाज-निष्ठ दृष्टीने का व कसे बघायचे ते शिकविले.

सौंदर्यवादी व जीवनवादी समीक्षा अनेक प्रवाह-उपप्रवाहांनी विकसित झालेली दिसते.

समकालीन समीक्षेत याच काळात एका नव्या प्रवाहाची भर पडली व तो प्रवाह म्हणजे दलित समीक्षेचा प्रवाह होय.

०००

२ : समकालीन दलित साहित्य व दलित समीक्षा

दलित समीक्षा ही जीवनवादीच समीक्षा आहे, पण ती इतके वेगळे रूप घेतें की तिच्या या वेगळ्या स्वरूपाचा स्वतंत्र विचार करावा लागतो. लेखनकृतीचा समाजाशी असलेला संबंधच ही समीक्षा शोधते असे नाही, तर ती कलाकृतीत अवतरलेल्या जीवनमूल्यांचेही विश्लेषण करते. जीवनमूल्यांच्या काचातून कलेला सोडविण्याचा प्रयत्न कलावादी समीक्षक करतात, तर कलामूल्यांना जीवनवादाशी जोडण्याचा प्रयत्न जीवनवादी समीक्षकांचा असतो.

कोणत्याही साहित्यकृतीमागे काही जीवनमूल्ये असतातच. जीवनमूल्यांशिवाय कलाकृती अशक्य व आस्वाद घेणेही जीवनमूल्यांशिवाय अशक्यच. या संदर्भात दलित साहित्यात एक अनोखे अनुभवविश्व साकारलेले असते. त्यातून दलित जाणिवांचे दर्शन घडत असते. शतकानुशतकांच्या वेदना शब्दरूप होऊन अवतरत असतात. या शब्दरूप वेदना विद्रोह पेटवीत असतात व या विद्रोही ठिणग्यांचे मूल्यमापन समीक्षा करते.

कालपर्यंत ज्यांची दुःखे वेशीवर टांगली गेली नव्हती, कालपर्यंत ज्यांना 'माणूस' म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता, जे दडपले गेले होते, पिळले गेले होते, चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेमुळे जनावरांपेक्षाही हीन जिणे जगत होते त्यांचा हा दबलेला स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह आज त्यांच्याच लेखनातून व्यक्त होत आहे. असे हे दलित साहित्य मराठी साहित्यातला एक नवा, स्वतंत्र प्रवाह आहे. या दलित साहित्याबरोबर या साहित्याचे मूल्यमापन करणारी दलित समीक्षाही निर्माण झाली.

दलित साहित्याचे स्वरूप

अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म हे दलित साहित्याचे स्वप्न आहे. 'दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा एक मूल्यवान अनुभव आहे. त्या अनुभवाची आदिप्रेरणा आहे 'स्वतंत्रता'. या स्वतंत्रतेचा अनुभव दलितांना आला तो बाबासाहेबांच्या धर्मातरानंतर.'[१] हा स्वतंत्रतेचा मूल्यवान अनुभवच दलित साहित्याचा गाभा होय. शतकानुशतके त्यांनी भोगलेल्या दुःखाची, त्यांच्यावर केल्या गेलेल्या अन्यायाची ही गाथाच होय. अन्याय, छळ, अपमान, शोषण याविरुद्ध संताप ते व्यक्त करतात. अशा या दलित साहित्याने मराठी समीक्षेला आव्हान दिले आहे. आशेची समृद्ध जाणीव आणि प्रकाशाला सामोरे जाण्याची जिद्द घेऊन हे साहित्य नव्या रूपाने पुढे आले आहे. लेखकाला आलेला अनुभव कलारूप घेऊन जेव्हा प्रकट होतो तेव्हा तो कोणत्या कक्षांना ओलांडून जाऊ शकतो, तो अनन्य-

साधारण असतो की नाही, तो सर्वांना स्पर्शून जाणारा आहे की नाही, यावर या साहित्याचे मूल्यमापन अवलंबून असते. मध्यमवर्गीयांच्या सुखदुःखाचे मध्यमवर्गीयांसाठीच निर्माण झालेल्या कलाकृतीतून दर्शन घडते. पण दलित वर्गीयांच्या जीवनाचे, सुखदुःखाचे चित्रण जे काही मराठी साहित्यात झाले ते अगदीच तुटपुंजे आहे असे दिसून येते. या संदर्भात डॉ. म. ना. वानखडे म्हणतात, 'दलितांचे जीवन व दलित व्यक्तींचे चित्रण मराठी साहित्यात झाले ते अतिशय केविलवाणे असून त्यात दलित जीवनाचे सत्यदर्शन घडत नाही.'[२] दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांच्या अनुभवशक्तीत महदंतर आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक आहे, तर दलित लेखकाचा अनुभव संवेदनात्मक असतो. त्याचे लेखन हा एक जिवंत अनुभव आहे.' अशा दलित साहित्याची व्याख्या करताना बाबुराव बागुल म्हणतात, 'दलित म्हणजे वर्गव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी शस्त्रे आणि 'शास्त्रे' उपलब्ध करून दिलेली आहेत. अशा दलितांच्या साहित्यनिर्मितीला दलित साहित्य म्हणावे.'[३] (नागपूर, उद्घाटनपर भाषण, दलित साहित्य संमेलन १७, १८ जानेवारी १९७६) १९५८ च्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना शाहीर अण्णाभाऊ साठे म्हणाले, 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे.' दलित साहित्याची व्याख्या व महत्त्व विशद करताना 'जातक' या नियतकालिकाच्या पहिल्या अंकात राजा ढाले म्हणतात, 'एका बंदिस्त समाजरचनेतून आणि एका सांस्कृतिक व्यूहातून ती समाजरचना व तो सांस्कृतिक बंध तोडून फोडून बाहेर पडणारा समाज आणि त्याआधीच ते बंध झुगारून बाहेर पडलेला समाज यांच्यात एकवाक्यता असेल. कारण केवळ त्यांची दुःखेच समान नसतील तर ईप्सितेही समान असतील. म्हणून जो जो या समाजरचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरुद्ध लढणारा दृष्टिकोण घेऊन साहित्यनिर्मिती करेल आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणील तो तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोनातून लिहिलेले दलित साहित्य असेल.'[४] यावरून असे दिसते की दलित साहित्यामागे असलेली त्यांची जीवनदृष्टी हीच महत्त्वाची आहे. दलित साहित्याची चिकित्सा करणाऱ्या किंवा दलित साहित्याला नवा अर्थ देऊ पाहाणाऱ्या दोन प्रमुख धारा आहेत– मार्क्सवाद व आंबेडकरवाद. या दोहोंच्या तत्त्वज्ञानाचा मेळ घालून दलित साहित्यामागे तत्त्वज्ञान उभे केले पाहिजे असेही म्हटले जात असले तरी सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान इत्यादींनी ग्रासलेल्या दलित वर्गाने रानटी, दुष्ट परंपरा, अंधश्रद्धा, दैववाद, भोळेपणा, गुलामगिरी याविरुद्ध बंड उभारायला, लढा देण्याला, माणूसपण मिळविण्यासाठी जुने जग जाळायला सिद्ध करणारी जाणीव म्हणजे दलित जाणीव. आणि या जाणिवेतून दलित जीवनाचे घडणारे दाहक, भेदक दर्शन म्हणजे दलित साहित्य होय. ते केवळ दलितांसाठीच आहे असे

नाही; तर 'माणूस' म्हणून माणसाला वागवितात, मोठा मानतात, माणूस म्हणून जगू देतात अशा सर्वांसाठी अवतरलेलं आहे. १९७६ सालच्या नागपूरच्या दलित साहित्य संमेलनात प्रास्ताविक भाषणात शंकरराव खरडकर म्हणतात, 'दुःख भोगणाऱ्यांना वर्गव्यवस्था तोडण्यासाठी आवाज उठवावा लागला. हा आवाज म्हणजे दलित साहित्य. वास्तवातील दुःख सांगण्याचा दलित साहित्याचा प्रयत्न आहे.'[५]

अंधारवाटा दूर सारून नव्या प्रकाशझोताकडे ज्यांनी दलितांना वळविले, दलितांचे भविष्य घडविले, आंधळ्यांना नवी दृष्टी दिली व मुक्यांना वाचा दिली ते दलितांचे भविष्यकार, दलितांचे प्रेरक डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या साहित्याला दलित साहित्य म्हणावे. या दलितांचा विद्रोह, नकार एका विशिष्ट व्यक्तीविरोधातला वा जमातीविरोधातला नाही, तर हा विद्रोह स्वत्वासाठी, स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधासाठी आहे. दलित लेखक विद्रोहाच्या वाटेने जातो तो जाणीवपूर्वकच. 'माणूस' हाच साहित्याच्या केंद्रस्थानी मानून दलित लेखकाला वाटतें की, माणूस म्हणून जगता आले पाहिजे, त्याच्यातल्या महानतेच्या विकासाला सर्व दिशा मोकळ्या झाल्या पाहिजेत. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली वर्णरहित समाजरचना लक्षात घेऊनच दलित लेखक विद्रोह व्यक्त करतात. 'क्रांतीसाठी काही तत्त्वज्ञान असावे लागते. अशा तत्त्वज्ञानावाचून ती क्रांती परिपूर्ण होत नाही. असे डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान साहित्य, वृत्तपत्रे, रंगभूमी, सभा, मेळावे इत्यादीतून दलित लेखक रुजवीत राहणार आहेत.'[६] असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात.

सामाजिक जाणीव कलात्मक रूप घेऊ शकत नाही, असे म्हणणे चुकीचे आहे. साहित्यकृतीचे 'साहित्यकृती' म्हणून मूल्य नाकारणे अशक्यच. कोणतीही साहित्यकृती आपली जाणीव संपन्न करते तेव्हा साहित्यकृतीतून सामाजिक आशय व्यक्त होतोच व तो कलात्मकतेला कुठेच आड येत नाही. या संदर्भात प्रा. म. ना. वानखडे म्हणतात, 'सामाजिक अंतःप्रवाहाचे ज्ञान फक्त लेखकालाच होते. तोच समाजातील घडामोडींचे आकलन आणि मूल्यमापन करीत असतो.'[७] कारण 'तो समाजाचा 'ॲन्टिना' असतो. सामाजिक जाणिवेने लिहिणे ही केवळ सामाजिक जबाबदारीच नाही तर लेखकाचे कर्तव्य आहे.'[८] दलित साहित्याला ते उथळ आहे, प्राथमिक अवस्थेतील आहे, ते साहित्य या पदवीला पोचत नाही, इ. अभिप्राय व्यक्त करून डावलता येणार नाही. तसेच या साहित्याकडे आकृतिवादी भूमिकेतून पहाणे योग्य ठरणार नाही. डॉ. वानखडे म्हणतात त्याप्रमाणे, 'जीवनाचा आणि कलाकृतीचा काही संबंध नाही असे प्रतिपादन करणाऱ्या आकृतिवादी भूमिका घेणाऱ्या टीकाकाराला दलित साहित्याचे मूल्यमापन करताना आपली भूमिका बदलणे भाग पडते. एखादी कथा वा कादंबरी, कविता वा नाटक यांचा विचार करताना कलाकृती ही एक 'संबंध-सेंद्रिय वस्तू' आहे असे आकृतिवादी समीक्षक मानतात. कलाकृती ही 'केवळ' आहे, तिच्या घडणीत अन्य काही घटक असतील

याचा विचार न करता केवळ आकृतिबंधाचाच विचार करावा, अशी आकृतिवादी समीक्षकाची भूमिका असल्यामुळे व्यक्त होणाऱ्या भावानुभवाचे रूप न्याहाळणे एवढेच या समीक्षेचे कार्य उरते. उदा. 'खेड्यातील एक रात्र' या बालकवींच्या कवितेचे मर्ढेकरांनी केलेले समीक्षण त्या कवितेचे सौंदर्य उलगडण्याच्या दृष्टीने अपुरे आहे असेच म्हणावे लागेल.'

दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव सामाजिक असतो. (Socio–anthropological approach) म्हणून सामाजिक दृष्टिकोनातून या अनुभवाचे रूप तपासायला हवे. त्याशिवाय त्यांच्या अनुभवाची नीटशी कल्पना करता येणार नाही. कारण हे अनुभवविश्व अगदी स्वतंत्र आहे. तसेच प्रा. म. भि. चिटणीस म्हणतात त्याप्रमाणे, 'अस्पृश्यतेच्या रूढीमुळे दलितांना शतकानुशतके आलेले, आजही येणारे, त्यांची माणुसकीच प्रश्नांकित करणारे कटु अनुभव, त्यांच्या भावनिक प्रतिक्रियेची तीव्रता ही आर्थिकदृष्ट्या दलित असणाऱ्यांच्याही कधीच वाट्याला येणार नाही. म्हणून दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे, नकाराचे, विद्रोहाचे रूप सर्व बाजूंनी नीट समजावून घेतल्याशिवाय ते 'कलात्मक कसोट्यांना उतरत नाही' असा निर्णय देणे हे त्या साहित्यावर अन्याय करणारे ठरेल.'[९]

डॉ. आंबेडकरांनी मराठी दलित लेखकाला नवे 'मन' दिले आणि स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या कालखंडाने दलित लेखकाला आवाहन केले आणि आव्हानही दिले हे नीट समजावून घेतले पाहिजे. 'दलित साहित्याचा आस्वाद वा आकलन मराठी समीक्षेला पुरेसे करता आले नाही. आणि दलित साहित्याचे मूल्यमापनही मराठी समीक्षेने आकृतिवादी मानदंडाने केले आहे,[१०] असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात.

स्वप्नरंजनात्मक लेखनाचा जमाना गेला आहे. आता नव्या जमान्याप्रमाणे मर्ढेकरोत्तर साहित्यात माणसाच्या जीवनाला आलेली क्षुद्रता व क्षणभंगुरता, निरर्थकता व निरुद्देशता यांचे दर्शन घडू लागले. उद्योगीकरणामुळे व यांत्रिक युगामुळे माणूस यंत्रवत झाला तितकाच तो एकाकी झालेला आहे. त्याच्या जीवनात स्वारस्य उरलेले नाही. आणि हेच नेमके त्यांच्या साहित्यातून चित्रित होत गेले, होत आहे. दलित लेखकांनी सामाजिक जाणिवेतून केलेले लेखन लेखनच नव्हे असा सौंदर्यवादी समीक्षकाचा ताशेरा संपूर्ण चुकीचा आहे. वाङ्मयीन परंपरेला, पारंपरिक वाङ्मयीन मूल्यांना आणि रूढ वाङ्मयीन आदर्शांना दलित लेखकांनी नाकारले आहे.

नागपूर येथील १९७६ च्या दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. म. ना. वानखडे म्हणतात, 'पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरविलेली मूल्ये, सिद्धान्त, कार्य आणि सौंदर्याची साक्षेपी मूल्ये दलित लेखकांनी झुगारून द्यावीत.' त्यांच्या या भूमिकेला अनुसरून दलितांनी प्रस्थापितांचे लेखनादर्श स्वीकारून त्यांच्या गोटात स्थान मिळावे यासाठी धडपडू नये. तसे झाले तर दलित लेखक प्रस्थापितांचे आश्रित होतील आणि हेच नेमके दलित साहित्याच्या व मोक्षेच्या उत्कर्षाला बाधक ठरेल. डॉ. बाबासाहेबांची विचारदिशा आश्रय वा

आश्रित निर्माण करण्याची नाही, तर मानसिक गुलामगिरीतून मुक्त झालेल्या 'मनाची' निर्मिती हवी असा उद्घोष करणारी आहे.'[११] मनाच्या बंधनातून, गुलामीतून जो मुक्त नाही तो स्वतंत्र असूनही बंदिस्त आहे, असे त्यांचे मत होते. दलित लेखक हा अनुकरणप्रिय नाही. त्याला कुणाचेही अनुकरण नको आहे. त्याचा अनुभव जसा आहे तसाच, ज्या ओबडधोबड भाषेत आहे त्याच आपल्या भाषेत तो मांडतो आहे. हा त्याचा अनुभव, त्याच्या लेखनामागची जाणीव, त्याची भूमिका, लेखनाचा विषय, मांडावयाचा आशय, त्याचा दृष्टिकोण हा या मराठी साहित्यात प्रथमच अवतरला आहे, अवतरतो आहे. त्याचे स्वागत करावयास मराठी समीक्षकांनी पूर्वग्रहदूषितता टाकून देऊन पुढे सरसावले पाहिजे.

व्यक्तिमत्व नाकारल्या गेलेल्या, बौद्धिक, सांस्कृतिक, साहित्यिक जीवनापासून दूर ठेवल्या गेलेल्या, अनुभवांना दातखीळ बसलेल्या दलित लेखकाला अस्मिता मिळाली ती डॉ. आंबेडकरांपासून. म्हणून दलित लेखकाच्या अनुभवमूल्यांचा शोध घेताना त्यातील विविधतेचा शोध घ्यावा लागेल. 'स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नाव' असे जेव्हा नामदेव ढसाळ विचारतात, तेव्हा त्यामागच्या अनुभवमूल्यांचा शोध घ्यावा लागेल. केवळ विधानात्मक आहे म्हणून ती खरी कविताच नव्हे असे समीक्षक म्हणू लागले तर त्या कवितेवरच नव्हे तर पर्यायाने दलित साहित्यावरही अन्याय केल्यासारखे होईल.

दलित साहित्याला परिवर्तन हवे आहे, कारण परिवर्तन हाच या साहित्याचा धर्म आहे. ज्या युगात हे साहित्य अवतरले त्या युगात बदल आवश्यक आहे. विविध उद्देशांनी अशा कितीतरी चळवळींचा जन्म या देशात झाला, पण त्या चळवळींचा बालमृत्यूच झाला. दलित मुक्तिलढ्याचे नेतृत्व प्रथमतःच दलित साहित्य करीत आहे. या मुक्तिलढ्यानेच माणूस जागृत झाला, नवी जाणीव त्याच्यात निर्माण झाली आणि या जाणिवेतून हे साहित्य जन्माला आले आहे. ते काळाच्या ओघात टिकलेलं आहे, टिकणार आहे व त्याची समीक्षाही होणार आहे. It is really the experience that decides the expression असे दलित साहित्याच्या संदर्भात म्हणावे लागेल. भालचंद्र फडके म्हणतात, 'दलित लेखकाचे अनुभव स्वतःचे वेगळेपण, अस्तित्व व स्वतःचा 'घाट' घेऊन येणार. नव्या लेखकांनी 'घाटा'ची पर्वा करू नये, आपल्याला जे सांगायचं आहे ते जर 'अर्थपूर्ण' असेल तर ते स्वतःचा 'घाट' घेऊन येईल. मर्ढेकरांच्या कवितेने किंवा गाडगीळांच्या कथेने पारंपरिक 'घाट' टाकून नवे 'घाट' नवी 'रूपे' शोधलीच. दलित लेखक तर हिंदू समाजाच्या 'मिथ्स्' नाकारीत आहे.'[१२] या संदर्भात वा. ल. कुळकर्णी म्हणतात, 'दलित समाजातील नवीन लेखकाने आपण काय लिहितो, म्हणजे आपण जे लिहितो ते कथा, कादंबरी किंवा इतर फॉर्मचे रूप घेते की नाही याचा विचारच करू नये. त्याचा जो काही raw experience आहे तो इतका अर्थपूर्ण आहे की, तो कुठला फॉर्म घेतो याला माझ्या दृष्टीने महत्त्व नाही. त्याला फॉर्म येणारच आहे.'[१३]

म्हणजेच दलित साहित्याला स्वतःचा फॉर्म आहे तर त्याचे मूल्यमापनही त्याचा 'फॉर्म' घेऊनच केले पाहिजे. अण्णा भाऊ साठे यांची किंवा बाबूराव बागुलांची कथा मराठी पारंपरिक कथेच्या 'फॉर्म' पेक्षा वेगळा 'फॉर्म' घेऊन आलेली आहे. म्हणून त्यांच्या कथांचा विचार त्या संदर्भातूनच करावा लागेल.

दलित लेखकाने पांढरपेशा साहित्यपरंपरा टाकून दिल्या आहेत. ज्या सामाजिक मूल्यांवर या साहित्याच्या परंपरा आधारित आहेत त्या मूल्यांनाच नकार नोंदविला आहे, व स्वतःच्या परंपरा नव्यानें निर्मिलेल्या आहेत. हे खरे असले तरी भालचंद्र फडक्यांनी अशी तक्रार नोंदविली आहे की, 'दलित लेखक प्रस्थापित लेखनादर्श स्वीकारून लेखन करीत आहेत. त्यांनी या अनुकरणाच्या वाटेने न जाता आपला स्वतंत्र मार्ग चोखाळला पाहिजे.'[१४] नव्या प्रेरणेतून लिहिल्या जाणाऱ्या साहित्याला समीक्षेच्या पारंपरिक चौकटीत बंदिस्त करू पाहणारे समीक्षक त्या साहित्यकृतीचे सौंदर्यच झाकोळून टाकीत आहेत. प्राण निघून गेलेल्या निःसत्त्व देहाची चिरफाड करणें व निष्कर्ष काढणे, विधानात्मक चर्चा करणें एवढेच जर समीक्षा करू बघत असेल तर प्रस्थापित मूल्यांच्या संदर्भात दलित साहित्याचे मूल्यमापन चुकीचे होईल.

समीक्षा करताना दलित साहित्यात व्यक्त झालेला अनुभव किती मोलाचा आहे हे बघणे आवश्यक ठरेल. हा अनुभव लेखकाच्या व्यक्तिशः प्रकृतिधर्मावर, त्याच्या संवेदनशीलतेवर, त्याच्यावर झालेल्या वाङ्मयीन संस्कारांवर, तसेच अन्य सामाजिक संस्कारांवर अवलंबून असतो. तो ज्या परिस्थितीत लिहितो, ज्या युगात लिहितो त्या युगाची गरज, भाषा, ज्ञान आणि वाङ्मयीन जाण अशा कितीतरी घटकांवर तो अवलंबून असतो. अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, दया पवार, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ इत्यादी लेखकांचे लेखन त्यांच्या त्यांच्या वाटघाला आलेल्या जीवनजाणिवांतून, तसेच त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार त्यांच्या त्यांच्या अनुभवातून झालेले आहे. म्हणून 'समीक्षकाला आपल्यासमोरील लेखन-कृतीचे मूल्यमापन करीत असताना त्यामागच्या लेखकाच्या प्रकृतिधर्माचे स्वरूप विचारात घेतले पाहिजे. कलाकृतीकडून कलावंताकडे जाण्यापेक्षा कलाकृतीकडून कलावंताच्या प्रकृतिधर्माकडे जायला हवे'[१५] असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात.

आज दलित साहित्यात दोन स्वर दिसून येतात. स्वतःला जाणवणाऱ्या वेदना म्हणजे स्वतःशी संवाद आणि दुसरा स्वेतरांशी संवाद म्हणजे विद्रोहाचा. 'पहिल्या-पेक्षा दुसरा स्वर, स्वेतरांचा म्हणजे विद्रोहाचा हा अधिक तीव्र आहे'[१६] असे फडके म्हणतात.

या विद्रोही साहित्याचे मूल्यमापन करताना रूढ असलेल्या साहित्यविषयक नियमांवर ते त्याचा विचार करणे शक्य नाही, कारण हा विद्रोह वेदनेचा आहे. समाजातील अनिष्ट प्रवृत्ती, ढोंग, खोटेपणा, अंधश्रद्धा अशाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेऊन बंड करायला निघालेले हे विद्रोही साहित्य आहे. त्याच्या एका हातात क्रांती व दुसऱ्या हातात ज्ञानाची मशाल आहे. त्याला जाळू बघणाऱ्यालाच

जाळायला निघलेलं हे साहित्य आहे. त्याचा जगण्याशी, दाहक अनुभवाशी जवळचा संबंध आहे. यशवंत मनोहर 'हाक' या कवितेमध्ये लिहितात–

कधी नव्हे असे आज आभाळ भरून आले आहे.....
आणि स्मशान पेटेस्तोवर इथे
विद्रोहाचा पाऊस कोसळणार आहे.....
तुला दलिताच्या खांडववनात
मुसळधार कोसळताना पाहिले आहे.....
मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला
प्रलयंकारी सूर्य आहे.

या उद्‌गारामागचा विद्रोह लक्षात घेतला पाहिजे. त्या विद्रोहामागची वेदना व तिचे रूप जाणले पाहिजे. आपण भोगलेल्या दुःख, दैन्य, अपमान, लाचारी यांनां तो आपल्या साहित्यात विचारतो, हा त्याचा ज्वलंत, प्रलयंकारी अनुभव मराठी समीक्षेला स्वतःच्या सामर्थ्यांची व समीक्षेच्या अधुऱ्या निकषांची जाणीव करून देणार आहे.

आपले कोंडवाडयातले नरकमय जिणे किती भयानक आहे हे सांगताना दया पवार म्हणतात–

आज विषाद वाटतो, कशा वागवल्या मणामणाच्या बेडया
उन्मत्त हत्तींचा कळप असावा तशा ध्येय–आकांक्षा रुसलेल्या
शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा

अशा जीवनात हक्क मागण्याची, हक्कासाठी लढण्याची लढाऊ वृत्ती आहे हे सिद्ध करणारे नामदेव ढसाळ म्हणतात–

हे वाघा ! तू माणसालाच असे हीन केलेस
तुला वेशीबाहेरला आक्रोश ऐकू आला नाही का ?
पेटलेला माणूस दिसला नाही का ? .....
आता आम्ही कत्तलखोर होत आहोत !

रूढीचे दास्य झुगारून द्यायचे आहे. त्यासाठी आपल्या अनुभवांना जळजळीत शब्दांत बांधीत प्रस्थापितांच्या विरुद्ध आवाज उठवलाच पाहिजे, असे दलित साहित्याचे ब्रीद आहे. दलित साहित्याचा आवाज दशदिशांना घुमत राहील, अन् तो प्रस्थापितांविरुद्ध उठत राहील. तो साऱ्यांना ऐकणें भाग पडेल. म्हणूनच दलित साहित्याला आक्रस्ताळे, कंठाळे, उरबडवे अशी विशेषणें लावून त्याची कितीही अवहेलना करायचा प्रयत्न केला तरी दलित साहित्याला एक मानाचे, स्वतंत्र स्थान आहे. दलित साहित्य कुणावर आधारलेले वा आश्रित नाही. म्हणून समीक्षा करताना पारंपरिक नियम न लावता दलित साहित्याचे आव्हान समीक्षेने

स्वीकारावे. जोपर्यंत दलित साहित्याचे आव्हान मराठी समीक्षा स्वीकारणार नाही तोपर्यंत मराठी समीक्षेचे दालन समृद्ध होणार नाही.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की–

–समकालीन समीक्षेत जीवनवादी समीक्षेला जवळची अशी दलित समीक्षा आढळते. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. आंबेडकर होत. १९५६ च्या धर्मांतरानंतर दलित जनजीवनात क्रांती घडून आली व मराठी समीक्षेच्या दालनात दलित समीक्षेने प्रवेश केला.

–पारंपरिक मूल्यसंकेतांना झुगारून देऊन आणि तंत्राच्या बंधनातून मुक्त अशी दलित समीक्षा माणसाच्या जगण्याचा नवा मूल्यविचार घेऊन आलेल्या दलित साहित्याची समीक्षा करू लागली.

–दलित साहित्यात दोन स्वर दिसून येतात–स्वतःशी संवाद व स्वेतरांशी सवाद. या दोन्ही संवादांची समीक्षा होऊ लागली.

ᔕ ᔕ

३ : दलित समीक्षकांची दलित साहित्य समीक्षा

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक आहेत. आजपर्यंतच्या मराठी वाङ्मयीन इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर असे दिसून येते की, मराठीत जे जे नवीन वाङ्मयीन प्रवाह किंवा साहित्यविषयक जाणिवा आल्या त्याचे जनकत्व हे एखाद्या ललित साहित्यिकाकडे दिले गेले आहे. बाबासाहेबांनी हचा अर्थाने ललित लेखन केलेले नाही. किंबहुना त्यांनी जे वैचारिक ग्रंथ लिहिलेत ते इंग्रजी-मध्ये आहेत. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' इत्यादी त्यांनी चालविलेल्या नियतकालिकांतून त्यांनी मराठी लेखन केले आहे. त्याचे स्वरूप मात्र वैचारिक होते. सामाजिक क्रान्ती करू पाहणाऱ्या एका बंडखोराकडे दलित साहित्याचे जनकत्व जावे हाच दलित साहित्याचा लक्षणीय विशेष आहे.'[१]–अर्जुन डांगळे यांच्या या विधानावरून एक लक्षात येते की, दलित साहित्याच्या वैचारिक लेखनाला अनेक पैलू आहेत. सामाजिकता आणि विषमता याविरुद्ध उभारलेले बंड, एका नव्या जगाची निर्मिती, 'माणूस' म्हणून माणसाला जगायला हवी असलेली संधी आणि त्यासाठी परंपरेला हादरे देणारी, ईश्वराला नकार देणारी, जातीयतेविरुद्ध लढा उभारायला सज्ज झालेली मानसिकता, विद्रोह व विज्ञाननिष्ठा अशा अनेक पैलूंना घेऊन दलित साहित्य निर्माण झाले आहे, आणि हे सारे एखाद्या कलावंताने नव्हे तर एका थोर विचारवंताने, द्रष्ट्या पुरुषाने घडवून आणले आहे. म्हणून दलित साहित्याचा अभ्यास करताना या साहित्याकडे बघणारी स्वच्छ दृष्टी घेऊन आणि विचाराला समाजशास्त्रीय चिंतनाची बैठक देऊन या साहित्याचे मूल्यमापन केले पाहिजे. बाबासाहेब या दलित साहित्याचे जनक आहेत. मग गेल्या तपापासूनच याची वाढ का झाली अशी विचारणा केली जाते. दलित कलावंतांनी दलित चळवळीतील सक्रिय सहभाग म्हणून गाणी लिहिली, पोवाडे लिहिले, तमाशा–जलसा या पारंपरिक लोककलेच्या माध्यमातून त्यांनी समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. 'शिक्षण घ्या, ते माणसाला महान करणारे शस्त्र आहे' अशा भाषेत शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यापेक्षा तमाशा–जलशात

घरी नको राहू मधु शाळेत जाई
तुला किती सांगु कसं समजत नाही

अशा गाण्यातून, नाटचातून बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा व विचारमूल्यांचा आविष्कार करीत समाजजागृतीचा प्रयत्न केला. याचे कारण या समाजाचे

...२

नाते त्या काळात शिक्षणाशी, ज्ञानाशी नव्हतेच. जिथे पायाखाली पांढरी नाही, माथ्यावर आभाळ नाही आणि अंगावर वस्त्र नाही अशा परिस्थितीत या समाजाला साहित्यविषयक जाणिवा तरी कुठून कळणार? पुढे बाबासाहेबांच्या हाकेला 'ओ' देऊन हा समाज खडबडून जागा झाला, आणि सर्व सामर्थ्यानिशी आणि साहित्यानिशी तो बाबासाहेबांच्या चळवळीत सामील झाला. या चळवळीआधी आपल्या लेखणीने त्यावेळच्या सरकाराकडे आपल्या दुःखद दारुण अवस्थेची तक्रार काहींनी केली. हिंदुधर्मातील अनिष्ट चालीरीती व जातीयता पाळणाऱ्यांविषयी जे प्रहारक भाषेत लिहीत त्यांत गोपाळबाबा वलंगकर, पंडित कोंडीराम व किसन फागु बनसोड यांनी, अल्पशा प्रमाणात का होईना, साहित्यनिर्मिती केली. यानंतर, दलित जीवनाचे समर्थ चित्रण करणारा, त्यांच्या आशा-आकांक्षांना साहित्यात नवी पालवी फुटावी त्याप्रमाणे शब्दरूप देणारा एक महान कलावंत अण्णा भाऊ साठे लिहीत होता. पहिला महान दलित लेखक अण्णा भाऊच होय. त्यानंतर बाबूराव बागुलांच्या कथेने खळबळ माजविली. त्यातल्या जबरदस्त अनुभवविश्वाविषयी समीक्षकांनी खूप लिहिले. रविवार, दि. २ मार्च १९५८ रोजी, दादर मुंबई येथे भरलेल्या पहिल्या संमेलन प्रसंगी 'प्रबुद्ध भारत' चे कार्यकारी संपादक दा. ता. रूपवते आपल्या संपादकीयात लिहितात, 'या विचित्र समाजव्यवस्थेविरुद्ध दलित समाजाने सातत्याने बंड उभारले. या बंडाचा इतिहास म्हणजे दलित साहित्य होय.'[२]

अशा या दलित साहित्याची निर्मिती झपाट्याने होत असतानाच त्या निर्मितीचा विचार व त्या विचारामागची भूमिका दलित समाजातील काही विचारवंत समीक्षक मांडू लागले. नव्या जाणिवांनी भारलेले अनेक तरूण लेखक-कवी लिहू लागले. त्यांच्या लिखाणात विविध विषय येऊ लागले. केवळ सामाजिक विषमताच नाही तर आत्मपरीक्षण देखील होऊ लागले. रिपब्लिकन पक्षातील फुटीरपणा, गटबाजी, स्वार्थाचे राजकारण, स्व-समाजाविषयी वाढत चाललेली उदासीनता, मरगळलेपणा, आपसातील मतभेद, तणाव, पोटजातीचे प्रस्थ आदी प्रचलित प्रश्नांतून दाहक होत जाणाऱ्या वास्तवाचाही समाचार दलित लेखकांनी घेतला. बहुतेक सारे आपल्या कवितेनेच पुढे आले. वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, जगदीश करंजगावकर, नामदेव ढसाळ, उमाकांत रणधीर, ज. वि. पवार, दया पवार इ. कवी आपल्या वेदना-संवेदनांना शब्दरूप देत होते, तर ताराचंद्र खांडेकर, योगीराज वाघमारे, अविनाश डोळस, योगेन्द्र मेश्राम, भास्कर चंदनशिव, भीमराव शिरवाळे यांसारखे कथा-लेखक कथा-विश्व समृद्ध करीत होते.

या काळात कविता, कथा जशी फुलत होती तशीच वैचारिक आणि समीक्षणात्मक लिखाणाची प्रवृत्ती देखील वाढत होती. डॉ. म. ना. वानखडे, डॉ. भाऊ लोखंडे, दया पवार, राजा ढाले, रावसाहेब कसबे, प्रा. केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, रत्नाकर गणवीर, ताराचंद्र खांडेकर, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर,

मा. फ. गांजरे, आदींनी दलित साहित्याला वैचारिक व समीक्षणात्मक साज चढवला. या साऱ्यांच्या लिखाणातून दलित साहित्यविषयक, समाजविषयक खोल जाणिवांचे दर्शन घडते.

दलित साहित्याची निर्मिती होऊ लागली त्या निर्मितीबरोबरच दलित साहित्याची भूमिका दलित समाजातील विचारवंत मांडू लागले. 'मराठवाडा' या १९६९ च्या दिवाळी अंकात दलित साहित्याची भूमिका प्रभावीपणे मांडली गेली ती प्रस्तुत मासिकातल्या परिसंवादातून. डॉ. म. ना. वानखडे, प्रा. म. भि. चिटणीस, दया पवार, बाबुराव बागुल यांनी आपल्या लेखांतून परंपरांनाच नकार दिला व त्यामुळे अनेक मराठी समीक्षक विचारवंतानी या चर्चेला वाचा फोडली.

दलित साहित्य हे अखेर साहित्य आहे आणि म्हणून त्याचे मूल्यमापन साहित्यिक निकषातून व्हायला पाहिजे असा हट्ट चुकीचा नाही. परंतु त्याबरोबरच साहित्याच्या मूल्यमापनाचे निकष शाश्वत असतात असा मात्र ग्रह कोणा समीक्षकांनी करू नये. दलित साहित्याच्या विकासाबरोबर समीक्षेचे नवे निकषही मान्य करायला हवेत. ग्रामीण, तळागाळाच्या समाजातील, झोपडपट्टीतील, अशिक्षित, संस्कारविहीन असा माणूस दलित साहित्याचे नायकत्व पत्करतो. त्याची भाषा आणि ब्राह्मणी संस्कृतीचा वारसा सांगणारी कारकुनी किंवा मास्तरी भाषा यात बराच फरक असणारच. ज्या व्यथा–वेदनांना मराठी वाङ्मयात आजवर मज्जाव होता ते अनुभव मराठी वाङ्मयातील दलित साहित्याच्या प्रवाहात जाणीवपूर्वक पण अपरिहार्यपणे येऊ लागलेत. हे नवे अनुभव नवे आविष्कार, नवी भाषा, नव्या तिमा आणि नव्या संवेदनांच्या माध्यमासह मराठी वाङ्मयात प्रगट होऊ लागले आहेत. त्यांचे मूल्यमापन करताना भाषेचे, आविष्काराचे, प्रतिमासृष्टीचे जुने संकेत आणि निकष कुचकामी ठरू पाहत असले तर ते बाजूस सारून नव्या मूल्यांनी, नव्य निकषांनी हया वाङ्मयाची समीक्षा व्हावी ही अपेक्षा समीक्षकांकडन केली जाणे योग्यच आहे.

दलित साहित्यात प्रभावीपणे प्रतिबिंबित होते त्या जीवनातील विदारक अनुभव, त्यातील गुंतागुंत ही किती तरलतेने आणि प्रामाणिकपणे आविष्कृत होते यावरून वाङ्मयाचे मूल्यमापन झाले पाहिजे. या संदर्भात काही दलित समीक्षकांच्या दलित साहित्य समीक्षेचा विचार करणे अगत्याचे ठरते.

काही दलित समीक्षक

१) डॉ. म. ना. वानखडे

डॉ. म. ना. वानखडे यांनी औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाच्या परिसरात 'अस्मिता' नावाचे त्रैमासिक १९६७ साली सुरू केले व सर्वप्रथम दलित साहित्य, समीक्षा व साहित्यिक यांना आत्माविष्काराचे रान मोकळे करून दिले. सत्ता, संपत्ती, कीर्तीकडे पाठ फिरवून दलितांच्या उत्थानासाठी आपले आयुष्य

झोकून देणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतला महत्त्वाचा दुवा म्हणजे डॉ वानखडे होत. ते जन्माने दलित आणि संघर्षमय परिस्थितीत घडलेले ज्वलंत व्यक्तिमत्व होते. जीवनात उद्‌भवलेल्या सांपत्तिक गरजेपोटी मिळालेले वेहरे सुवर्णपदक– ही त्यांना विकावे लागले, पण पुन्हा चांदोडकर सुवर्णपदकाचे ते मानकरी ठरले. असे प्रतिभाशाली, गुणसंपन्न व भारतसरकारच्या शिष्यवृत्तीवर उच्च शिक्षण घेऊन केवळ समाजासाठीच जगावे–मरावे अशी प्रतिज्ञा घेणारे डॉ. वानखडे एक अद्वितीय व्यक्तिमत्व होते. डॉ. आंबेडकरांपासून त्यांनी स्फूर्ती घेतली व आपली प्रतिज्ञा कृतीतही उतरवली.

मराठी साहित्याचे 'दुबळेपण' त्यांना नको होते. ते 'अंग्री यँग मेन' चे साहित्य वाचत असत. एक केशवसुत सोडले तर वाकी मध्यमवर्गीयांनी मध्यमवर्गीयांसाठीच लिहिलेल्या साहित्यात मध्यमवर्गीयांचे सुखदुःख चित्रित केले जाते, ही मराठी सहित्याची परंपरा दलित साहित्याच्या उपयोगाची नाही, त्यात दलितांना 'आपलेपण' वाटावे असे काहीच नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला विचारापासून तो कृतीपर्यंत थेट पोहचविणारे ते मोठे समीक्षक होते. दुर्दैव असे की मराठी ललित साहित्याने, समीक्षेने त्यांची दखल घेतली नाही, कारण ते आंवेडकरी प्रेरणेचे व विचारांचे होते. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'सारख्या प्रतिष्ठित मासिकानेसुद्धा वानखडे यांच्याबद्दल अक्षरही लिहिले नाही– त्यांच्या हयातीत नाही अन मृत्यूनंतरही नाही. मराठी साहित्य या थोर विचारवंताला ओळखत नसेल ? त्यांची दखल घ्यावी असे मराठी साहित्याला वाटत नसले तरी दलित साहित्याच्या चळवळीतले व डॉ. आंवेडकरांचे सहकारी म्हणून त्यांना दलित समाज कधीही विसरणे शक्य नाही. या संदर्भात वागुलांनी म्हटले होते, 'मनूला काळोखात फेकले असले तरी तो मेला नाही. जिवंत जाळला तरी तो शिल्लक उरला आहे. तो अजून ग्रंथाग्रंथातून, देवळादेवळातून, मनामनातून वास करतो आहे.'[३] म्हणूनच डॉ. वानखडे यांची दखल कुणी घेतली नाही. पण मराठी साहित्याला कधीतरी ती घ्यावीच लागेल, असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात.

डॉ. वानखडे यांची वैचारिक भूमिका ठाम तितकीच स्पष्ट होती. स्वार्थासाठी भूमिका वदलणाऱ्या लोकांसारखे ते नव्हते. दलित साहित्याचे वेगळेपण नेमके कोणते हे सांगताना ते म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांनी या नागपूर शहरी आपल्या सर्वांसमवेत धम्मचक्र फिरवले. त्या क्रांतिकारक घटनेतून जे सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलन दलित समाजाच्या ठायी उत्पन्न झाले. त्याचा एक आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय. या साहित्याने शतकानुशतके दडपलेला आवाज बुलन्द केला आहे. दलितांच्या मनातील वेदना आणि विद्रोहाला साहित्यरूप दिले आहे. यामुळे मराठी साहित्यातील मरगळलेल्या, पारंपरिक प्रवाहांना एक नव

हादरा बसेल हे निश्चित.'[४] बाबुराव बागुलांच्या 'सूड' या कादंबरीची डॉ. वानखडे यांनी लिहिलेली प्रस्तावना म्हणजे दलित साहित्याच्या वेगळेपणाची व या वेगळेपणाकडे लोकांचे लक्ष जावे याची दिलेली पावती होय. 'अस्मिता लेखक मेळाव्यां'चे ते व प्रा. चिटणीस स्फूर्तिस्थान होते. आपल्या अधिकारवाणीने दलित साहित्याची व्याख्या, दलित साहित्याच्या नकाराची कारणमीमांसा, विद्रोही जाणिवा, भूमिका आणि या साहित्याचे मराठी साहित्याला न पेलवणारे आव्हान याविषयी ठामपणे तितक्याच स्पष्टपणे ते लिहितात. 'मित्रहो ! आपण लढ्यात आहोत. जिथे इतर वर्गातील लेखकांना मिळतात ती सुखे, तो गौरव, सौंदर्यसुख तुम्हाला मिळणार नाही म्हणून खेद करू नका. लढ्याच्या भाऊगर्दीत लेखकाला कसली उसंत ? लढ्यात मिळेल तीच त्याची शांती.'[५] डॉ. वानखडेंचे हे उद्‌गार कोणत्याही काळाला, कोणत्याही काळातल्या लढ्याला व तो लढणाऱ्या लढवैयांना उपयुक्त ठरतील असेच आहेत. दलित साहित्यातील आशय व अभिव्यक्तीला रूढ समीक्षामूल्ये लावणाऱ्या हट्टाग्रही पांढरपेशी समीक्षेच्या भूमिकेला उत्तर देताना ते म्हणतात, 'कलेसाठी कला हा घोष जगातील सर्व समाजात फार मोठी स्थित्यंतरे होत असताना निरर्थक वाटतो. आपल्या देशात स्वातंत्र्य, लोकशाही व शिक्षण या कारणामुळे आतापर्यंतचा मूका व दाबून टाकलेला बराच मोठा समाज जागा होत आहे. या राजकीय व सामाजिक स्थित्यंतराकडे मध्यमवर्गीय पांढरपेशा लेखकांचा बघण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा व आपुलकीचा का नाही ?'[६]

दलित साहित्याच्या रूप, आशय, अभिव्यक्तीने रूढ समीक्षापद्धतीला हादरे दिले आहेत. स्वतःच्या अनुभूतीचा कस, वेगळ्याच संवेदना–जाणिवा, जिवंत वास्तवता या निकषांवरच दलित साहित्यातील सत्याचा शोध घ्यावा यासाठी दलित साहित्य स्वतःचो समीक्षामूल्ये घडविणार आहे, यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्याविषयी लिहिताना शंकरराव खरात म्हणतात, 'सुरुवातीलाच डॉ. वानखडे 'दलित' व 'दलित साहित्या'कडे प्रखर सामाजिक, सांस्कृतिक जाणिवेतून, दृष्टिकोनातून पाहात होते. पण पुढे तें या संदर्भात आर्थिक दृष्टिकोनाकडे वळले व ते आता वर्गवादाकडे झुकलेले दिसतात. अर्थात तर्कशुद्ध कारणमीमांसा त्यात दिसत नाही.'[७] खरातांच्या या विधानात थोडी सत्यता असली तरी डॉ. वानखडे दलित चळवळीचा पाया रोवणारे अध्वर्यू होते यात शंका नाही.

डॉ. वानखडे यांचो समीक्षा मूल्यसंकल्पनात्मक आहे. ते वाङ्मयीन मूल्यांवर जास्त भर देतात. पांढरपेशा मराठी समीक्षकांच्या दृष्टिकोणावर, त्यांच्या मनोभूमिकेवर आपल्या भूमिकेतून स्वच्छ प्रकाश टाकतात. त्यांना 'कलेसाठी कला' या घोषाचा तिटकारा आहे. बदलत्या युगात मध्यमवर्गीय पांढरपेशी लेखकांनी आपला दृष्टिकोण सहानुभूती व आपुलकीचा ठेवायला पाहिजे. पण असे घडले म्हणता येत नाही. हेच त्यांचे दुःख आहे. 'मराठी साहित्यातील लोकशाहीचा विचार' या

लेखात दलित साहित्य, पांढरपेशी मराठी वाङ्मयीन टीकामूल्ये व वाङ्मयाबद्दल स्पष्टपणाची भूमिका ते पेश करतात. ते म्हणतात, 'समाज ढवळून निघत आहे. आतापर्यंतच्या त्यांच्या स्थिर सिंहासनाला भूकंपाचे धक्के बसत असल्याची जाणीव झाल्यामुळे पांढरपेशी लेखक व समीक्षक 'कलेसाठी कला' हा मंत्र अधिकच जोराने बडबडू लागले आहेत. दलित लेखकांनी या सुंदर दिसणाऱ्या 'सायरन'च्या आवाजाला भुलू नये. कला ही समाजासाठी नाही तर कोणासाठी ?'[८] असा खडा सवाल ते करतात. डॉ. वानखडे यांच्या या विधानामागे जाणवतो तो त्यांच्या वृत्तीचा ठामपणा. ते आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात, 'पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरविलेली मूल्ये, सिद्धांत, कार्य आणि सौंदर्याची साक्षेपी मूल्ये दलित लेखकाने झुगारून दिली पाहिजेत, या भूमिकेवरहुकूम त्यांनी स्वतः पांढरपेशा लेखकाची मूल्ये झुगारून दिलीत व दलित साहित्याच्या रूप-आशय-अभिव्यक्तीला महत्त्व दिले आहे. नव्यानें जागृत झालेल्या लोकांनी आपल्या 'अनुभवांना' स्वतंत्रपणें मांडावे, कारण 'स्वातंत्र्य' हीच महत्त्वाची बाब आहे. व दलित साहित्य शतकानुशतके नाकारलेल्या स्वातंत्र्याचाच पुरस्कार करते.'

डॉ. वानखडे यांची शैली मर्मग्राही आहे. त्यांची समीक्षा रोखठोक आहे. तीं छुपे वार करीत नाही, तर ती समोरासमोर मत स्पष्ट करणारी आहे. आपली भूमिका अतिशय प्रभावीपणे ते मांडतात. आपल्या जीवनानुभवाचे साचलेले थर अन् थर उलगडून दाखविण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्यांच्या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'वानखडे हे दलित साहित्याचे भाष्यकार आहेत.'[९]

२) बाबुराव बागुल

'जेव्हा मी जात चोरली' 'सूड' यातून दलितांचे साकारलेले अनुभवविश्व व बागुलांच्या विद्रोहाला जन्म देणारी वेदना युगायुगाचे अन्याय, अत्याचार, छळ, अपमान, अवहेलना घेऊन प्रगट होते. मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या विचारांशी बांधिलकी हे दलित कथेचे मुख्य वैशिष्टच घेऊन कथा-विश्वातच नव्हे तर संपूर्ण दलित साहित्यात मानाचे स्थान मिळाले आहे ते बाबुराव बागुलांना.

'भारतातील प्रस्थापित साहित्य हे हिंदू साहित्य आहे. सम्यक परिवर्तन करू शकणारी, विज्ञान आणि समाजवाद सहजपणे स्वीकारू शकणारी भारतातील क्रांतिकारक ताकद दलित समाजच आहे. दलित हे विशेषण सम्यक क्रांतीचे नाव आहे. हे साहित्य क्रांतीचा साक्षात्कार आहे.'[१०] अशी दलित साहित्याबद्दलची विचारसरणी बाबुराव बागुलांची आहे. ते म्हणतात, 'एखाद्या आत्महत्या करायला निघालेल्या कैद्याचे जीवन, त्याच्या आशा-आकांक्षा, राग, संताप, संघर्ष म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्याची उत्पत्ती मराठी साहित्याच्या वैचारिक, ललित शाखेत होत नाही तर ती अस्पृश्यतेत होते.'[११] असा त्यांचा

दृष्टिकोण आहे. त्यासाठी दलित साहित्याला समुद्राचे, उद्यानाचे, वाऱ्याचे, ताऱ्याचे नैसर्गिक स्वातंत्र्य ते मागतात; तर विश्वाच्या महाकाव्याचा नायक असलेल्या माणसाला ते एकच प्रार्थना करतात, 'माणसाच्या सर्व शक्ती स्वतंत्र व्हाव्यात म्हणजे वादळे होतील, वणवे पेटतील, प्रकाश येईल, पथ पडतील, रथ येतील, झाडावर उतरणाऱ्या पक्ष्याप्रमाणे युगे येतील.'[१२]

'दलित साहित्याची उत्पत्ती अस्पृश्यतेत होते. लोकशाहीची मानसिकता वैचारिकता आणि आदर्श जर मराठी साहित्याने व्यक्त केले असते तर दलित साहित्य जन्माला आले नसते.'[१३] असे बाबुराव बागुल म्हणतात. बाबुराव बागुल यांच्यासारखा लेखक केवळ श्रेष्ठ दलित साहित्यिक नाही तर तो कोणत्याही निकषावर घासला तरी मराठी साहित्याला भूषण ठरेल असा प्रतिभावान साहित्यिक आहे यात शंका नाही.

'सूड' ही प्रदीर्घ, विद्रोही कथा. पण हा विद्रोह इथे 'स्त्रीत्वा' विरुद्ध आहे. स्त्रीला केवळ उपभोगाची वस्तू मानणाऱ्या पुरुषी संस्कृतीला बळी पडणाऱ्या स्त्रीची अत्यंत बंडखोरी या कथेत आहे. हा दलित साहित्याचा आविष्कारच होय. ज्यांना हचा विद्रोहात रस आहे आणि आजवर उपेक्षित ठेवलेल्या, ठरलेल्या जीवनाच्या आविष्कारात आणि दलितत्वाविरुद्धच्या बंडात प्रभावीपणे सामील व्हावयाचे आहे त्या सर्वांचे स्थान दलित साहित्यात राहील– मग तो दलित असो वा दलितेतर.

जुलुमाविरूद्ध, न्यायासाठी, हक्कासाठी झगडणारे मन त्यांच्या कथेत आहे, तर 'दलित अस्मितेचा शोध आणि विद्रोही विचारांचा कोप, दलित साहित्याच्या कलात्मक प्रतिभेचा आविष्कार, समाजपरिवर्तनाचे, दलितांच्या व कामगार वर्गाच्या क्रांतीचे तत्त्वज्ञान त्यांच्या लेखनात व समीक्षालेखनात आहे.'[१४] बागुलांची विचारसरणी डावी असली तरी त्यांनी स्वार्थासाठी विचार व छावणी बदललेली नाही. त्यांच्या समीक्षालेखनाचे जाणवणारे वैशिष्टय म्हणजे ते कलाकृतीच्या आशयाच्या अनुषंगाने त्या कलाकृतीचा कार्यकारण भाव कोणता, त्यामागची भूमिका कोणती, याचा शोध घेतात. प्रल्हाद चेंदवणकरांच्या 'ऑडिट'ला प्रस्तावना देताना ते आशयाच्या अनुषंगाने त्या काव्यकृतीचे मूल्यमापन करतात. 'नव्या उत्पादनसाधनांबरोबर नवी वैचारिकता अद्याप गावागावात गेली नसल्यामुळे, तेथे अजूनही मध्ययुगीन मनःप्रवृत्ती टिकून आहे. दुर्दैव हे की ती शासनही करते आहे.' त्या 'च्यात लोकशाहीची, समाजवादाची सामाजिकता यायला हवी आहे. म्हणजे तो निदान दुभंगेल--जातीच्या आणि मध्ययुगाच्या बाहेर येईल, विसाव्या शतकाचा होईल'[१५] चेंदवणकरांना हे सारे आपल्या गावात दिसले आहे.

तो, मला मुंबईला भेटतो
हसतो, हात मिळवतो

मी त्याचा गाववाला म्हणून
माझ्याकडून तो
चहा, सिगारेट किंवा
बिर्याणीसुद्धा चापतो

पण कवी खेडयावर गेल्यावर मात्र तो त्याला 'महारडा' म्हणून टाळतो. कारण तो तेव्हा त्याच्या जातभाईत बसलेला असतो. 'ऑडिट' मधल्या या एका कवितेच्या उदाहरणाने खेडयातून अजूनही चाललेल्या जातीय संघर्षाचे चित्र उभे करणाऱ्या कवितेच्या आशयाशी संवाद साधतात, व त्यावरून दलित साहित्याची दिशा 'ऑडिट' आहे अशी ग्वाही बागुल देतात.

यशवंत मनोहरांच्या 'उत्यानगुंफा' या काव्यसंग्रहाला 'जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर लेणे' म्हणतात. पुढे ते लिहितात– 'यशवंत मनोहर यांची कविता म्हणजे अग्निप्रलय. ती रुद्रसुंदर, क्रूर, कोमल व क्रांतीसारखी भव्योदात्त आहे. ती अंगावर अग्नीचे अलंकार ल्यालेली आहे. तिच्या हातात वादळे अन् वणवे आहेत.'[१६] याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात. 'अवमानाचा, तुच्छता–तिरस्काराचा, दुःखाचा, यातनांचा वाऱ्याएवढा व्यापक पसारा. हिंदू समाज याच प्राणवायूवर जगतो. हया सर्वव्यापी विषवायूपासून थोडेसेही तोंड लपवायला एकही छत नाही, एकही पंथ नाही, संत नाही, करुणा नाही, काही नाही. फक्त बहिष्कार ! फक्त तिरस्कार![१७] हया तुच्छतेची, तिरस्काराची, अवमानाची, दुःख–यातनांची प्रतिक्रिया अंतःकरणात एका भयंकर वादळाला, एका महायुद्धाला, एका बुद्धाला, एका भयानक अभियानाला जन्म देत होती आणि डॉ. बाबासाहेबांनी इतिहास घडविला. युग घडले आणि बाबासाहेब आदर्श झाले. पुराणपुरुष झाले. प्रेरणा–प्रकाश देणारे सूर्य झाले.

सिद्धार्थ गौतम बुद्धाला दुःख, दैन्य, दास्य दिसले अन् एक महान तत्त्वज्ञान, एक जीवनमार्ग जगाला मिळाला.

मार्क्सला शोषण दिसले आणि एक समाजवादी शास्त्र उदयाला आले. जन्मापासून विजय मिळवीत त्या शास्त्राने अर्ध्या जगावर शासन सुरू केले अन् ज्याच्या कानावर पडले त्याचे मनच व्यापून वसले.

हे सारे लक्षात येताच, यशवंत मनोहर यांची कविता रुद्रसुंदर का आहे, क्रूर कोमल का आहे, क्रांतीसारखी भव्योदात्त का आहे, तो अंगावर अग्नीचे अलंकार का ल्याली आहे आणि तिच्या हातात वादळे अन् वणवे का आहेत हे मला कळले,[१८] असे बाबुराव बागुल म्हणतात.

कलाकृतीचा आशय कोणता, त्या आशयाच्या मागे कवीची वा लेखकाची कोणती भावना दडलेली आहे, त्यामागचे तत्त्वज्ञान कोणते याचा शोध बागुल घेतात, आणि हेच त्यांच्या समीक्षेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. बागुलांची समीक्षा निर्मितीनिष्ठ आहे. ती विचार निर्माण करते.

'आठवणींचे पक्षी' या प्र. ई. सोनकांबळेंच्या आत्मचरित्राचे मूल्यमापन करताना ते म्हणतात– 'आठवणींचे पक्षी धुमसणारे पंख होत' 'दास्य, दुःख, दैन्य, शोषण हे जागतिक समाजात अस्तित्वात आहेत. म्हणून प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी'तील जीवन हे जगातील श्रमजीवीचे जीवन होऊ शकते. त्यांनी सजीव केलेली भूक जगातील सर्वांना कळू शकते. तात्पर्य हे की, दलित लेखकांचे लेखन जागतिक आहे, कारण ते जागतिक विषयावरच लिहितात. ते केवळ त्यांच्या जातीचे दुःख नसते, दैन्य नसतें, तर जगभर असलेले दुःख, दैन्य, दास्य, शोषण असते.''[१९] अशा स्पष्टीकरणातून सोनकांबळेंच्या 'आठवणींचे पक्षी'ला जागतिक कीर्ती मिळेल असा आत्मविश्वासही ते प्रगट करतात. या शोध घेण्याच्या प्रवृत्तीमुळे, कलाकृतीच्या तळाशी पोहचण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे बागुलांची समीक्षा ही मूल्यसंकल्पनात्म समीक्षा ठरते.

कलाकृतीचे मूल्यमापन करताना त्यांची आस्वादकाची भूमिका असतेच, पण लेखक कलाकृतीतील जीवनमूल्यांच्या अनुषंगाने म्हणजेच आशयाच्या अनुषंगाने कलाकृतीचा कार्यकारणभाव शोधते. फ. मु. शिंदेंची समीक्षा अशीच मूल्यसंकल्पनात्मक आहे. 'दलित साहित्याच्या त्यावेळच्या वैचारिकतेला बाबुरावांनी 'जेव्हा मी जात चोरली होती' ही निर्मितीक्षम साथ देऊन, दलित साहित्याला आकार देऊन, अण्णा भाऊ, शंकरराव यांनी मांडलेली दलितांची वेदना अधिक बोलकी करून तरुण दलित लेखकांना कृतिशील केले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.'[२०] असे गौरवपूर्ण उद्‌गार बाबुराव बागुलांविषयी 'दलित साहित्य: एक अभ्यास' यात अर्जुन डांगळे काढतात.

बाबुराव बागुलांची साहित्यसंपदा म्हणजे कथा, कादंबरी, लेख, समीक्षा, स्वगत व भाषणे, इतकेच नव्हे तर कविता, नाटके, पत्रे इ. विपुल लेखन आहे. पैकी काही अजून पुस्तक वा ग्रंथरूपात यायचे आहे. ते जनतेसमोर यावेच इतके महत्त्वाचे आहे. बाबुराव बागुलांचे स्थान मोलाचे आहे, दलित साहित्यसमृद्धीत, पर्यायाने मराठी साहित्यसमृद्धीत त्यांचा मोठा वाटा नाकारता येणार नाही. त्यांची समीक्षा वा लेखन मार्क्सवादी आहे, तें मार्क्सवादी विचाराचे आहेत, असे जरी त्यांचेविषयी लिहिले, बोलले जात असले व ते त्या विचारांवर जास्त भर देत असले तरी त्यांच्या लिखाणामागे आंबेडकरी प्रेरणा आहे असे ते स्वत: स्पष्ट सांगतात व त्यांच्या लिखाणातून ते दिसूनही येते. एखादा लेखक कोणत्या प्रवाहाकडे वळतो यापेक्षा त्या प्रवाहाचा उगम कोणता हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे असे दिसते.

३) शंकरराव खरात

शंकरराव खरात दलित साहित्य विचारांच्या विविध अंगांची चिकित्सा करतात. साहित्याला जीवनामध्ये मूलत: आधार असतो. जीवनानुभवाच्या, जीवनातील भाव–भावनांच्या आविष्कारातून निर्माण होणारे वाङ्मय हे वास्तववादी व

जीवननिष्ठ असते, व्यक्तीच्या भावानुभवाच्या अभिव्यक्तीतून निर्माण होणारे वाङ्मय हे वास्तव वाङ्मय असते असा शंकरराव खरातांचा दृष्टिकोण आहे. या संदर्भातून निर्माण झालेले दलित साहित्य श्रेष्ठ साहित्य होय असे ते म्हणतात.

वाङ्मयाच्या उत्पत्तीबद्दल व स्वरूपाबद्दल ते म्हणतात, 'वास्तविक वाङ्मय-कला ही जीवनातून जन्माला येते. खरे तर साहित्य माणसाच्या जीवनातील अनुभवावर पूर्णतया आधारलेले आहे. जीवनाचा स्पर्श झाल्याशिवाय वाङ्मय निर्माणच होऊ शकत नाही. माणसाच्या अनुभवातून, भावानुभवातून अभिव्यक्ती होते, आविष्कार होतो. या अभिव्यक्तीला, तिच्या आविष्काराला, वाङ्मयकलेला लेखक नाव देतो कथा किंवा काव्य, कादंबरी किंवा नाटक. जीवनाचे अस्तित्व हे मूळ आहे, त्यातून नंतर वाङ्मय-कलाकृतीचा जन्म होतो. जीवनातून निर्माण होणारी वाङ्मय-कलाकृती म्हटली की, त्यात जाणिवा आल्या, त्याचा आशय आला, त्याचा आकार-घाट आला. साहित्यिक कलावंत त्यांच्या जीवनानुभवाला जसा येईल तसा आकार देईल. त्या साहित्यिक कलावंताच्या, व्यक्तिसमूहांच्या प्रेरणांचा, त्या कालप्रवाहाचाही साहित्यनिर्मितीवर प्रभाव पडतो व तसा त्याला रूपरंग येतो.'[२१] अशी मूल्यसंकल्पना ते दलित साहित्याची मांडतात. डॉ. गंगाधर पानतावणे श्री. शंकरराव खरात यांच्याविषयी म्हणतात, 'वैचारिक लेखनाच्या क्षेत्रात दलित लेखकांचे प्रमाण अल्प आहे. 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम', 'डॉ. बाबा-साहेब आंबेडकरांच्या सहवासात', 'डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर' व 'डॉ. आंबेड-करांची पत्रे' हे खरातांचे चार ग्रंथ. या चारही ग्रंथांत शंकररावांची समीक्षा दलितांच्या अभिनिवेशापासून मुक्त आहे.'

'साहित्यिक लेखक दैनंदिन जीवनातील सुख-दुःख, राग-द्वेष, चीड-संताप, विद्रोह-संघर्ष अशा जीवनात जगतो, अनुभवतो तेच त्याच्या साहित्यकृतीतून व्यक्त होते. वाङ्मयकला ही अशी समाजजीवनाच्या अंतरंगाशी, आतील ताणाशी एकरूप झालेली असते आणि त्यातून निर्माण होणारी वाङ्मयकला हेच खरं जीवनवादी साहित्य होय'[२३] असे खरात म्हणतात.

दलित साहित्याची खरी कसोटी सांगताना ते म्हणतात, 'दलित लेखक आपल्या विपुल अनुभवास आपल्याच मायबोलीत, मायभाषेत आविष्कृत करतो तेव्हा त्याला स्वतःचाच आकाररूप येते. वास्तविक दलित लेखक हा त्याच्या कलाकृतीच्या रूपाबद्दल, घाटाबद्दल बेफिकीर असतो, पण ती साहित्यकृती त्याच्या दलितत्वाच्या संवेदनातून निर्माण झालेली असते. दलित लेखकांची संवेदना मराठी पांढरपेशी समीक्षकाला मुळीच समजली नाही, समजत नाही. आपल्या संवेदनेतून दलित लेखक जिवंत रसरशीत अशी कलाकृती निर्माण करतो. आणि ती त्याच्या अनुभवाचा उत्कट आविष्कार ठरते.'[२४] दलित साहित्य हे आपल्या दुःखानुभवाचे चित्रण करते. अर्थात हया दुःखानुभवाचा अर्थ खोल असतो. मानवी जीवनाचे सार्थ पण भीषण नाट्य त्यात असते. त्यात अर्थसंपन्नता असते. पण या दुःखाचा वरवर

बालबोध, सोपा अर्थ लावला जातो. खरं तर त्या दु:खाच्या पोटातल्या समृद्ध अर्थाची खोली जाणून न घेता मराठी समीक्षा करणे अन्यायकारक होईल, असे त्यांचे मत आहे. व्यक्तीला जसे मन आहे, तसेच त्या व्यक्तीच्या जातीला, जाति-समहाला त्या जातीचे असे एक मन असते. आणि ती व्यक्ती त्याच्या जातीच्या संस्कारातून वागते, बोलते व जगते. जातीला व्यक्तित्व (Personality) येते. दलित व्यक्ती ही दलित समाजात विलीन झालेली असते. आणि दलित सामजालाच त्या व्यक्तीचे व्यक्तित्व येते. दलित लेखक हा साहित्याच्या क्षेत्रात आला, तेव्हा तो स्वत:बरोबर आपला दलित समाज दलितव्यक्तित्वाच्या रूपाने घेऊन आला. म्हणून दलित लेखकाची साहित्यकलाकृती कथा, काव्य, कादंबरी वा नाटच हे केवळ त्या व्यक्तीचे असून त्याच्या समाजसमूहाची ती कलाकृती असते. पण जेव्हा. साहित्य–समीक्षेच्या मूल्याचा प्रश्न येतो, तेव्हा दलित साहित्याची या दृष्टिकोणातून समीक्षा होणे आवश्यक आहे. दलित साहित्याचा हा एक निकपच आहे. या निकषाची ते अशी मूल्यसंकल्पनात्मक समीक्षा करतात.

वाङ्मयीन समीक्षक हा लेखकाच्या अनुभवाच्या तळाशी, मुळाशी जाणारा असला पाहिजे. या संदर्भातली समीक्षाच खरी समीक्षा व न्याय देणारी समीक्षा ठरते, असे त्यांचे मत आहे. जे वाङ्मय जीवनाभिमुख आहे, तेच समाजाभिमुख–लोकाभिमुख होय. ज्या वाङ्मयीन कलाकृतीला जीवनाचा आधार नाही ते खऱ्या अर्थाने वास्तववादी, जीवनवादी वाङ्मयच नाही. जीवनाशी वाङ्मयकृतीचे अतूट नाते असते. दलित साहित्य हे जीवनवादीच साहित्य आहे.

या संदर्भात दलित साहित्याची समीक्षा करताना खरात म्हणतात, 'दलित साहित्याचे जीवनाशी अतूट, अभंग नाते आहे व हेच दलित साहित्याचे खास वैशिष्टय होय. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा', 'वारणेचा वाघ', श्री. बागुलांचे 'सूर्याचे सांगाती', 'मरण स्वस्त होत आहे', नामदेव व्हटकर, हि. गो. बनसोडे, योगिराज वाघमारे, प्रा. प्रल्हाद सोनकांबळे, वामन होवाळ, प्रा. केशव मेश्राम यांच्या कथा, कादंबऱ्या आणि प्रा. गंगाधर पानतावणे, दत्ता भगत यांच्या एकांकिका म्हणजे जीवनातून जन्माला आलेल्या जीवनाभिमुख कलाकृती होत. त्या जीवनवादी आहेत.'[२५]

वाङ्मयीन कलाकृतीचे मूल्यमापन कलेच्याच कसोटीवर झाले पाहिजे, असे मत प्रा. पु. शि. रेगे व्यक्त करतात. साहित्यातील वास्तवतेलाही महत्त्व नाही असे ते म्हणतात. 'वास्तविक पाहता कोणत्याही कलाकृतीचे महत्त्वमापन करताना केवळ कलेचीच मूल्ये वापरली पाहिजेत. इतर सर्व प्रश्न अप्रस्तुत होत. त्यांना जर स्थान असेल तर ते केवळ गौण प्रकारचे होय.'[२६] या रेगे यांच्या मताचे खंडण करताना खरात म्हणतात, 'कलावादी लेखक कुठल्या थरापर्यंत जाऊ शकतात हे या विचारावरून दिसते. वास्तविक जीवनातील वास्तवता ही साहित्यकलाकृतीचा खरा जीवच असतो. तो जीवच काढला तर लेखकाची कलाकृती ही निर्जीवच

होणार. अशी निर्जीव कलाकृती ही मृगजळच होणार.'[२६]

नवकविता, नवकथेविषयी खरात म्हणतात, 'नवकथा-कवितांनी आपल्या जन्मावरोवर नवी समीक्षापद्धतीही आणली. या वंडखोर म्हणविणाऱ्या मराठी साहित्यातील लेखकांनी मराठी साहित्यात 'व्यक्तिकेन्द्री' व्यक्तिनिष्ठ, अतिव्यक्ति-वादी वाङ्मय निर्माण केले आहे. या अस्तित्ववादी लेखकांनी मराठी साहित्यात दुर्बोधता व लैंगिकवाद आणून 'अर्थशून्यवाद' आणला आहे. इथेच मराठी साहित्याचा त्यांनी शेवट केला. त्यामुळे साहित्याची त्यांनी कोंडीच केली.[२७] असे आक्षेप घेऊन खरात दलित साहित्याचा विचार मांडतात. ते म्हणतात, 'मराठी साहित्याची कोंडी केली या दृष्टीने पाहता अण्णा भाऊ साठेंची फकिरा, वैजयंता, वारणेचा वाघ, बागुलांची सूड, सूर्याचे सांगाती, विद्रोही, शंकरराव खरातांची झोपडपट्टी, मी मुक्त मी मुक्त ! पोतराज, गोंधळी, मेश्रामांची हकिकत, ढसाळांचे गोलपीठा, ज. वि. पवार यांची नाकेबन्दी, प्रल्हाद चेंदवणकरांचे ऑडीट, अर्जुन डांगळे यांचे छावणी हलते आहे, त्र्यंवक सपकाळेंचे सुरुंग हे काव्यसंग्रह आणि त्याचवरोबर इतर अनेक कथाकार, कादंवरीकार, कवी यांनी आपल्या वाङ्मयकृतीने आपला वेगळेपणा प्रस्थापित करून मराठी साहित्यिकांनी केलेली कोंडी फोडली आहे.'[२८] असे स्पष्टपणे खरात नमूद करतात. या साऱ्यांची समीक्षा रसग्राही भूमिकेतून ते करतात. त्यांची समीक्षा मूल्यांचा शोध घेताना दिसते.

दलित साहित्याची समीक्षा करताना ते म्हणतात, 'दलित साहित्यात उत्कटता असून मनाचा ठाव घेणारा व मनाला अस्वस्थ करणारा जिवंत रसरशीत-पणा त्यात आहे. दलित साहित्यातील संपन्न मायबोली, भाषासंपन्न अनुभूती, दलित संवेदना, त्याचा उत्कट रसरशीतपणा व त्यातील जिवंत वास्तवता आणि त्यामुळे त्याला आलेला वेगळा फॉर्म याने मराठी साहित्याची कोंडी फोडली आहे. दलित साहित्यातील दलित जाणिवेतून निर्माण झालेल्या आशययुक्त, प्रक्षोभक, विद्रोही परंतु परिवर्तनवादी, मानवतावादी दलित साहित्याने आपला वेगळेपणा प्रस्थापित केला आहे. हा वेगळेपणा पांढरपेशी मराठी साहित्यापेक्षा वेगळाच आहे. या दलित साहित्य कलाकृतीतूनच दलित साहित्याची समीक्षामूल्ये आपोआपच निर्माण होत आहेत. म्हणून दलित साहित्याने पांढरपेशा मराठी साहित्याची प्रस्थापित समीक्षा-मूल्ये नाकारली आहेत.'[२९]

यावरून असे दिसते की, बदलत्या कालखंडात साहित्यकृतीमापनाच्या कसोट्या एकच असू शकत नाहीत. त्यात परिवर्तन आवश्यक असतेच. काळाच्या ओघाबरोबर साहित्यात जसे परिवर्तन अपेक्षित असते, तसेच समीक्षेचा विचारही बदलणे, त्या काळानुरूप समीक्षेचे रूप असणे आवश्यक ठरते. यासाठी दलित साहित्याची वेगळी समीक्षामूल्ये असायला पाहिजेत.

दलित साहित्याचे मूल्यमापन रूढ समीक्षापद्धतीने न होता ते दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभूतीच्या व अभिव्यक्तीच्या अनुषंगाने व्हावे.

दलित साहित्याचे रूप, आशय, अनुभूती, आणि अभिव्यक्तीने रूढ समीक्षेची संकल्पनाच उध्वस्त करून टाकली आहे. म्हणून अशा साहित्याचे मूल्यमापन करताना दलित साहित्यातूनच निर्माण झालेल्या मूल्यांचा शोध समीक्षकांनी घ्यावा व या मूल्यांच्या कसोटीस उतरणाऱ्या दलित साहित्यकृतीची समीक्षा करावी.

१) अनुभूतीचा कस हे दलित साहित्यातले प्रमुख मूल्य होय. २) त्याच्या वेगळ्याच संवेदना, ३) त्याच्या दलित जाणिवा, ४) त्याच्या आशयातील जिवंतपणा, ५) वास्तवता, ६) आविष्कृत कलाकृती आणि तिचे रूप हे समीक्षा-निकषावर तपासले की या निकषांना मूल्य म्हणता येईल व या मूल्यांच्या द्वारे इतर साहित्यकृतीतील सत्याचा, आत्म्याचा शोध लागेल.

वरील विवेचनाच्या अनुषंगाने खरात यांच्या कथा-कादंबरीविश्वाचा शोध घेता येतो. त्यांच्या कथा, कादंबऱ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानच सांगत नाहीत तर कलाकृतीच्या अनुषंगाने समीक्षेची मूल्ये देखील सांगून जातात. 'हातभट्टी', 'मी मुक्त, मी मुक्त' या कादंबऱ्या आणि बहिष्कार, देवाच्या दारी या कथा पाहिल्या तर त्यात अनुभूतीची आणि अभिव्यक्तीची जुगलबंदी दिसते. व्यक्तिमनाचे व समूहमनाचे ज्वलंत प्रत्ययकारी चित्रण दिसते. 'तराळ-अंतराळ' या आत्मचरित्रात खरातांचे अनुभवविश्व साकारलेले आहे. 'साहित्यकृती प्रथम जन्म घेते, त्यानंतरच समीक्षेचा, टीका-मूल्यांचा जन्म होतो. हे प्रथम विचारात घेऊनच दलित साहित्याच्या आत्म्याशी एकरूप व्हावे लागते व या साहित्याची समीक्षा करावी लागते. याबरोबरच दलितांच्या अंतर्मनातील ताण-तणाव व दलित समाजाच्या अंतर्मनातील ताण-तणाव, दलित लेखकाची मनःप्रवृत्ती व दलित समाजाची मनःप्रवृत्ती याचाही समीक्षकाला विचार करावा लागतो. अगोदरच ठरवलेल्या, बनवलेल्या वाङ्मयीन कसोट्यांच्या साच्यात, मापात बसवून दलित साहित्याचे मूल्ममापन करता येणार नाही.'[३०] अशी आपली मते ते स्पष्टपणे मांडतात.

'दलित साहित्याला प्रेरणांचा भक्कमपणा आणि समृद्ध अनुभवाचा सच्चेपणा यांचा आधार आहे. त्याच्या आविष्कारात मोकळेपणा आहे, परखडपणा व निर्भयता आहे. आत्मतेजी दलित वाङ्मयाचा वेगळेपणा निश्चितच जाणवतो. मराठी साहित्यातील समकालीन मध्यमवर्गीय बंडखोरीपेक्षा दलित साहित्यातला विद्रोहीपणा व बंडखोरपणा कितीतरी पटीने असा आगळा-वेगळा ठरतो. लैंगिक जीवनाचे रूढ, परंपरागत संकेत याविरुद्ध केलेली बंडखोरी मराठी साहित्यात असली तरी ती दलित साहित्यापेक्षा कितीतरी कमी आहे'[३१] असे खरातांचे म्हणणे आहे, ते उचितच वाटते.

४) डॉ. गंगाधर पानतावणे

१९७२ ते १९७६ या काळात दलित साहित्य चळवळीचा घटक म्हणून निघालेले 'मागोवा' सारखे ज्वलत विचारसरणीचे मासिक पुढे 'अति डावी' भूमिका घेऊन बंद पडले आणि 'अस्मितादर्श'ने मात्र समतोल भूमिका स्वीकारली

असल्यामुळे ते सुरळीत सुरू राहिले.

सुरुवातीला 'अस्मिता' आणि आता 'अस्मितादर्श' या नावाने निघणाऱ्या त्रैमासिकाचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे हे होत. 'अस्मितादर्श' आणि पानतावणे असे समीकरणच आता झाले आहे. २७ नोव्हेंबर १९६७ ला 'मिलिंद साहित्य परिषदे'चे उद्घाटन झाले त्यावेळी ही 'अस्मिता' काढण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेप्रमाणे या मासिकाच्या पहिल्या अंकात, 'महाराष्ट्रातील सांस्कृतिक संघर्ष व वाङ्मयीन समस्या' या विषयावर दलित साहित्याची योग्य दिशा गवसेल अशी चर्चा झाली. ही चर्चा अनेक अर्थाने मोलाची ठरली. 'मागोवा' आणि 'अस्मितादर्श'च्या माध्यमातून मार्क्सवाद विरुद्ध आंबेडकरवाद हा तणाव सुरू झाला. त्या तणावामुळे एकसंध चळवळीचे दलित पँथर या एका चळवळीच्या भागात रूपांतर झाले. मार्क्सवाद विरुद आंबेडकरवाद अशा प्रकारचा एक तणाव खरे तर निर्माण केला गेला. अर्थातच हा 'दलित पँथर' या नावाच्या चळवळीच्या फुटीचा एक भाग होता व यात वैचारिकतेपेक्षा अंतर्विरोधालाच जास्त स्थान होते. अशा काळात नामदेव ढसाळ, बाबुराव बागुल, दया पवार, डॉ. वानखडे, रावसाहेब कसबे यांनी आंबेडकरी तत्त्वज्ञानाची व्यापकता व सखोलता याच 'अस्मितादर्श'मधून पटवून दिली आणि 'वादग्रस्त' मंडळींना उत्तरे दिली. ज्यांच्या लेखनाला कुठेच थारा नव्हता, ज्या तळागाळातल्या लोकांच्या दुःखाची जाणीव व्यक्त करायला दुसरे कुठलेच माध्यम नव्हते, ज्यांच्यापाशी सर्जनशीलता असूनही आपल्या साहित्यकृतींना, विचारांना व चिंतनाला प्रकट करायची संधी लाभत नव्हती अशा साऱ्यांना महत्त्वपूर्ण स्थान मिळवून देणारे व दलित लेखकाची एक नवी पिढीच्या पिढीच तयार करणारे 'अस्मितादर्श' तरुण-वृद्ध जुन्या-नव्या लेखकांचे विश्वासस्थान आहे. दलित साहित्य चळवळीला पुढे नेण्याचे काम आजही 'अस्मितादर्श' म्हणजे पर्यायाने पानतावणे करीत आहेत दरवर्षी लेखक-वाचक मेळावा आयोजित करून, तोही वेगवेगळ्या जिल्ह्यांत, आणि त्यातून चर्चा, परिसंवाद, कविसंमेलने आयोजित करून दलित साहित्याचे बळ वाढवीत आहेत, नव्हे दलित साहित्यिकांच्या यादीत नवनव्या लेखकांची भर घालीत आहेत. त्यांनी 'विद्रोहाचे पाणी सतत पेटते' ठेवून नव्या मूल्यांचा वेध घेतला आहे. 'मूकनायका'ला वाचा देऊन 'दलितांचे प्रबोधन' केले आहे. 'दलित कथेचा' शोध आस्वादकाच्या भूमिकेतून घेतला आहे. १९७६ च्या नागपूर येथील 'दलित साहित्य संमेलना'नंतर 'अस्मितादर्श'चा जनक कोण, या संबंधात पुणे, औरंगाबाद, नागपूर येथील वृत्तपत्रांतून वामन निंबाळकर (अस्मितादर्शचे माजी संपादक) यांनी वाद उपस्थित केला होता. या वादाकडे दुर्लक्ष केले तरी बाबुराव बागुल, केशव मेश्राम यांसारख्या नावारूपाला आलेल्यांनी सामाजिक जाणिवा पुढे नेल्यातच, पण डॉ. पानतावणे यांनी या जाणिवांचा पुरस्कार करणाऱ्या, या जाणिवा पुढे नेऊ बघणाऱ्या कित्येक नव्या चेहऱ्यांना प्रकाशात आणून दलित साहित्य समृद्ध केले. तें जानेवारी १९८४

मध्ये लंडनला जाऊन आलेत. त्यांचे लंडनला जाणें हेही तेवढेच महत्त्वाचे आहे कारण इथल्या दलित साहित्यिकांच्या साहित्यकृतींविषयी व इथल्या दलित साहित्य चळवळीविषयी त्यांनी तिथे आस्था आणि जागृती निर्माण केली.

विदर्भ साहित्य संघाच्या वरोरा संमेलनाचे (१९८३) ते अध्यक्ष होते. या अध्यक्षीय भाषणातून दलित साहित्य समीक्षेविषयीचा विचार मांडताना ते म्हणतात, 'साहित्याचे मूल्यमापन करताना प्रथम साहित्याचे निकषच लावले पाहिजेत. सवलतीची भाषा नको. मात्र साहित्यकृती अस्तित्वात आली की, ती सामाजिक जीवनाचे अभिन्न अंग होत असल्यामुळे तिचे मूल्यमापन स्वतंत्र सामाजिक दृष्टीने करणे अगत्याचे आहे. नव्या अंकुरांना जोपासण्याचे काम समीक्षक करीत नाहीत. नव्या बुद्धिवादी समीक्षकाने सहृदय होण्यापेक्षा आपला एक तंबू उभारून बसणेच श्रेयस्कर समजले आहे. या तंबूत समानशीलांना प्रवेश आहे. आजचा समीक्षक पान्हा चोरणाऱ्या गाईसारखा आहे. त्याला तंबूबाहेर फिरकण्याची इच्छा नाही'[३२] असे परखड उद्‌गार ते काढतात आणि 'मराठी साहित्य आणि कलेची प्रवृत्ती समजून घेण्यासाठी ही मोठी अडचणच आहे' असे मत व्यक्त करतात.

'दलित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नाही. त्यात समष्टीचे रूपही लाभते. दलित साहित्याच्या संदर्भात पारंपरिक कसोटयांचा पूर्ण विचार होणे आवश्यक आहे. केवळ आकृतिबंधाचा विचार करून दलित साहित्याला निकृष्ट ठरविणे योग्य नाही.'[३३] असे ते म्हणतात. डॉ. पानतावणे यांना रूढ समीक्षा मान्य नाही. कारण 'अभिव्यक्ती ही त्याचा अंतःकोश आहे. म्हणून रूपवादी, कलावादी समीक्षा अव्हेरली पाहिजे. दलित साहित्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे' असे ते म्हणतात.

डॉ. पानतावणेंची समीक्षा उपयोजित समीक्षा आहे. आस्वादकाच्या भूमिकेतून ते साहित्यकृतीकडे पाहतात व या आस्वादासाठी ते दलित साहित्याच्या मागे असलेल्या जीवनजाणिवांचा एका शोधकाच्या न्यायाने शोध घेतात. हा शोध घेताना त्यांना इतिहास फार मोलाचा वाटतो.[३४] ते 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या ग्रंथाच्या मनोगतात म्हणतात, 'इतिहासाशिवाय कोणत्याही चळवळीचा विचार करता येत नाही. आजचे क्रांतीकारी मानले गेलेले दलित साहित्यही याला अपवाद नाही. कोणतीही नवी चाहूल मागीलांची वाट पुसतच आलेली असते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्राही तत्त्वज्ञानातूनच जन्माला आलेले दलित साहित्य केवळ दलितांनी दलितांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे. क्रांतिविन्मुखता आणि क्रान्तिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसांचा विचार करते.'[३५]

'दलितांचे प्रबोधन' या ग्रंथात डॉ. पानतावणे दलितांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. दलितांचे सामाजिक जीवन धर्मांतरपूर्व कसे होते ? दलितांच्या सांस्कृतिक जीवनाची कोणती दिशा होती ?

दलितांच्या चळवळीचे स्वरूप कोणते होते ? दलित कार्यकर्ते कोण होते ? दलितांच्या संस्था कोणकोणत्या ? याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. कारण त्याशिवाय दलितांच्या प्रबोधनातील सत्ये बाहेर येऊ शकणार नाहीत. यासाठीच दलितांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा शोध 'दलितांचे प्रबोधन'[१६] यात ते घेतात.

'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' यात आंबेडकरी चळवळीवरोवर जन्माला आलेली कवने व लेखनातून प्रगट होऊ लागलेला विद्रोह घेऊन लोककवींनी येथील धर्मव्यवस्थेवर हल्ला चढविला. 'लिहिणे', 'गाणे' आणि 'जागवणे' हेच त्यांचे जग. अशांच्या कवनांचा आस्वादकाच्या भूमिकेतून विचार करून त्यांच्या रचनांनी साहित्याच्या प्रांतात सामाजिक स्तरावरील मूल्यांचा विचार दिलेला आहे. हा विचार किती लक्षणीय आहे, याची मोकळचा मनाने ते चर्चा करतात. ही रचना वहुतांशी प्रचारकी वाटते. पण संतकवितेत भगवद्भक्तीच्या प्रचाराशिवाय आणखी काय आहे ? मानसिक परिवर्तनाला सामोरे जाणारी दलित लोककवींची रचना हा आंबेडकरी चळवळीचा साधनइतिहास होय'[१७] असे डॉ. पानतावणे म्हणतात. यावरोवरच लोककवींच्या लेखनातून आलेला आत्माविष्कार, जीवनवादी प्रत्यंतराची भाषा आणि ती बोलणाऱ्या लोककवींचा वा आपल्या लेखनातून प्रगटलेल्या ज्वलंत ठिणग्यांचा ते परामर्श घेतात.

त्यांच्या या व इतर ग्रंथांतून एक दिसून येते की, डॉ. पानतावणे इतिहासाचा शोध घेत घेत वर्तमानाला सामोरे जातात, पण या सामोरे जाण्यामागे कलाकृतीच्या वा साहित्यकृतीच्या आस्वादकाची त्यांची भूमिका असते.

'दलित कथा'चे संपादन करताना 'या कथा सुरुवातीला पारंपरिक घाट स्वीकारणाऱ्या असल्या तरी नवा आशय ल्यालेल्या होत्या, काही स्वतंत्र चेहरा-मोहरा असलेल्या होत्या. काही प्रतिक्रियावादी होत्या तरीही जीवनसत्य प्रतिपादणाऱ्या होत्या. हे लेखनच मुळात प्रचीतीचे होते हे कसे नाकारायचे ?'[१८] असे डॉ. पानतावणे लिहितात.

दलितांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचा शोध घेताना सामाजिक चळवळी, संस्था, व्यक्तींपासून तो कवने, लोकनाटचे, आंबेडकरी जलसे, कथा, कविता, कादंबऱ्या, नाटक व समीक्षा आदींचा विचार ते आपल्या ग्रंथातून करतात.

५) अर्जुन डांगळे

एखाद्या कलाकृतीवरून हा मार्क्सवादी, हा आंबेडकरवादी, हा बौद्धवादी असे विशेषण लावणे अर्जुन डांगळचांना मान्य नाही. बाबुराव बागुल, दया पवार, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, या मंडळीवर 'मार्क्सवादी' असे लेवल चिकटविले जाते. या संदर्भात डांगळे आपली भूमिका स्पष्ट करतात, ते म्हणतात, 'प्रचलित राजकारणातील संदर्भ व घटना टाळून कलाकृतीच्या संदर्भात एखाद्या वादाचा तत्त्वज्ञान या दृष्टीने विचार केला आणि त्याच्याशी जवळीक दाखविली तर त्यात गैर असे काही नाही. दलित साहित्याच्या संदर्भातच केवळ हा वाद का ? गोळवलकर

गुरुजी किंवा रामस्वामी नायकर यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल असा का विचार केला जात नाही, याचा अन्वयार्थ लावला पाहिजे.' पुढे ते म्हणतात, 'याचे उत्तर साधे आहे. दलित साहित्याचे प्रेरणास्रोत म्हणजे आंबेडकरवादाचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस आहे. जो शोषित, पीडित, दलित आहे, ज्याचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक शोषण केले गेले आहे असा हा माणूस आहे. मार्क्सवादाचा केंद्रबिंदू देखील हाच माणूस आहे. बौद्ध तत्त्वज्ञानात देखील माणसाचा व शोषणाचा विचार आहे. स्थल-कालांनी निर्माण केलेल्या समाजव्यवस्थेच्या संदर्भात हे जरी वेगवेगळचा स्वरूपात दिसत असले तरी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा हा एकच आहे आणि तो म्हणजे माणसाची शोषणापासून मुक्ती हा होय. दलित साहित्य तर शोषणाविरुद्ध आहेच. ही तीनही तत्त्वज्ञाने परस्परविरोधी नसून ती परस्परपूरक अशीच आहेत.'[३९] इथे डांगळे मार्क्सवादाचा शास्त्रीय तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र याच्यापुरताच विचार करतात. 'सर्जनशील कलाकृतीच्या संदर्भात तत्त्वज्ञानाचा विचार करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की, कलाकृतीत आपण तत्त्वज्ञानाची सूत्रे किंवा तपशील तसाच्या तसा मांडत नाही. त्या तत्त्वज्ञानाच्या किंवा विचारांच्या बांधिलकीने कलावंताच्या दृष्टिकोनाचा किंवा जाणिवेचा पिंड पोसला गेलेला असतो. त्यातून साकार झालेली निर्मिती ही वेगळचाच स्वरूपात अवतरत असते. या निर्मितीला स्वत:चे एक व्यक्तिमत्व असते. आणि हा जो निर्मितीच्या व्यक्तिमत्वाचा हत्ती आहें त्याला आंधळे आपापल्या कुवतीनुसार आजमावीत असतात. जोपर्यंत आंधळचांना दृष्टी येत नाही तोपर्यंत हा घोळ चालू राहणार. संपूर्ण हत्ती आणि त्याचे बळ हे त्यांच्या चाचपडणाऱ्या हातांना कसे उमगणार ?'[४०]

मार्क्सवाद, आंबेडकरवाद व बौद्धवाद या तीनही वादांविषयी व त्यांच्यातल्या परस्परपूरक मूल्यांविषयी डांगळे अगदी स्वच्छपणे विचार मांडतात. यातली त्यांची भूमिका ही समन्वयाची आहे. तत्त्वज्ञानाच्या विचाराने एखाद्या कलावंताला वा लेखकाला कोणत्या वादात बसवावा, त्यासाठी कोणता नियम लावावा यासाठी अण्णा भाऊ साठे यांचे उदाहरण डांगळे देतात.

'जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भिमराव' हे लिहिणारे अण्णा भाऊ 'लाल झेंडा घेऊनि हाती, करायला इथे क्रांती, मजुरांची पिढी नवी पाऊले टाकीती, असे सुद्धा लिहितात. मग त्यांना आंबेडकरवादी म्हणायचे का मार्क्सवादी, असा युक्तिवाद ते करतात. यासाठी डांगळे यांचे मत असे आहे की दलित साहित्य निर्मितीच्या संदर्भात विचार करताना आंबेडकरवादाचा जो गाभा आहे, शोषणा-विरूद्ध बंडखोर प्रतिक्रिया आणि मानवमुक्तीचा पुरस्कार, या गाभ्याशी त्या निर्मितीच्या व्यक्तिमत्वाची नाळ जोडलेली आहे की नाही हे पाहणे म्हणजे दलित साहित्यकृतीला न्याय देणे होय. त्यासाठी सामाजिक क्रान्ती करू इच्छिणाऱ्या कलावंतानें कोणत्याही क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा विचार प्रथम करावा आणि या

विचाराने आंबेडकरवादाला किती जवळ केले आहे हे पाहावे.'[४१]

आजपर्यंत साहित्यिक, सांस्कृतिक चळवळी फक्त प्रस्थापितांसाठीच होत्या व ह्या त्यांनीच कराव्या असा पायंडा होता. झोपडपट्टीतला माणूस, तळागाळातला माणूस, त्याचे दुःख, त्याच्या वेदना, त्याचे प्रश्न हे प्रस्थापितांच्या साहित्यात समाविष्ट होण्याच्या लायकीचेच नव्हते, असा त्यांचा (गैर) समज असल्यामुळे समीक्षापद्धती साचेवंद झाली होती. माणसाच्या मूलभूत प्रश्नांची साहित्यनिर्मितीच नाही तर मग समीक्षा कोठून असणार? डांगळे या समीक्षकांची समीक्षा तपासताना म्हणतात, 'नटसम्राट', 'उध्वस्त धर्मशाळा', 'जुलूम' ही नाटके प्रस्थापित समीक्षकाच्या दृष्टीने उदात्तीकरणासाठी श्रेष्ठ दर्जाची ठरतात. पण सर्वसामान्यांची शोकान्तिका म्हणून 'सामना' चित्रपटाचे उदात्तीकरण ते करणार नाहीत.'[४२] म्हणजे तात्त्विक, गूढ भाषेत किंवा पल्लेदार वाक्ये फेकणारे मात्र मराठी समीक्षकांना श्रेष्ठ वाटतात आणि दुसरा आपल्या भाषेत दैनंदिन जीवनातल्या व्यथा सांगतो तो कमी दर्जाचा वाटतो. अशा प्रकारचे समीक्षासूत्र कलाकृतीला मारक ठरणारे आहे. त्यासाठी सामाजिक क्रान्ती करू बघणाऱ्या कलावंताने कोणत्याही क्रांतिकारी तत्त्वज्ञानाकडे झापडबंद वृत्तीने पाहू नये.'[४३] यावरून असे दिसते की कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना दृष्टी स्वच्छ ठेवावी, साहित्यकृतीमागचे क्रांन्तिकारी तत्त्वज्ञान शोधावे आणि त्याचा संबंध आंबेडकरी तत्त्वज्ञानाशी जोडावा.

दलित साहित्यातील पात्रे देखील जनसामान्यांचे प्रतिनिधित्व करतात. जनसाभिमुख विचारसरणीशी बांधिलकी स्वीकारणारा कलावंत प्रचारकीदेखील ठरविला जातो. दलित साहित्याची समीक्षा करताना डांगळे यांना वाटते की, 'मराठी समीक्षा 'ज्ञानेश्वरी', 'स्मृतिचित्रे' 'रणांगण' 'कोसला' यापलिकडे जात नाही, कारण मराठी समीक्षकांनी वास्तव जीवनाची साहित्याशी बांधीलकी स्वीकारलेली नाही.'[४४] यासाठी समीक्षेला समाजशास्त्रीय विचाराचे अधिष्ठान हवे.

दलितांनी लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य की दलितांविषयी लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य? डांगळे यांच्या मते, 'समाजातील जाति-व्यवस्था, अस्पृश्यतेसारखे तिचे भीषण स्वरूप, इथली शोषणव्यवस्था, या सगळ्यांची जाणीव होऊन तीविरूद्धची कठोर प्रतिक्रिया म्हणजे दलित साहित्य.'[४५] दलित साहित्य ही एक जात नसून जाणीव आहे. डांगळे यांच्या निवेदनातून असे दिसते की कलेची स्वायत्तता आणि परंपरेला संपूर्ण नकार या दोन गोष्टींचा पुरस्कार डांगळे करतात.

डांगळे हे स्वतः एक सर्जनशील लेखक, कवी, लघुकथाकार आहेत. दलितांच्या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी असलेले क्रियाशील कार्यकर्ते आहेत. त्यांच्या समीक्षा-विचारातून एक जाणवते हे की, समीक्षक आणि विचारवंत यांना आवश्यक असलेली सहानुभूती व तटस्थ वृत्ती त्यांच्या ठायी आहे. तिला जोपासतच ते एखाद्या कला-

कृतीचा वा विचारांचा आढावा घेतात. त्यांच्या 'दलित साहित्य: एक अभ्यास' या ग्रंथात दलित साहित्याच्या संदर्भात पुढील गोष्टींचा विचार केलेला दिसतो.

१. भारतीय समाजव्यवस्थेतील अस्पृश्यता आणि तिचे सामाजिक, सांस्कृतिक परिणाम

२. महाराष्ट्रातील डॉ. आंबेडकरांची चळवळ व इतर चळवळी

३. अस्पृश्यांनी केलेला बौद्ध धर्माचा स्वीकार

४. मराठी साहित्य परंपरेत दलित साहित्य

५. दलित साहित्याची आवश्यकता, वेगळेपण व त्या अनुषंगाने वेगळ्या साहित्य संस्था, मासिके व सम्मेलने यांची गरज

६. दलित म्हणजे कोण ?

७. नवी समीक्षामूल्ये आणि सौंदर्यमूल्ये

८. नवीन पुराणकथा

९. अनुभवातील व आविष्कारातील तोचतोचपणा

१०. कलात्मक तटस्थता

११. साहित्य आणि समाजक्रांती

१२. दलित साहित्य आणि निग्रो साहित्य

१३. बुद्ध–मार्क्स–आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान

१४. दलित साहित्य अलगतावादी नाही, मराठी साहित्य प्रवाहाचाच तो एक प्रवाह आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.[४६] याप्रमाणे दलित साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेची मीमांसा प्रस्तुत पुस्तकातील लेख, भाषणे व चर्चा या आधारे अर्जुन डांगळे करतात. ते म्हणतात. 'शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात त्याप्रमाणे दलित साहित्य ही निर्मितीशील व सर्जनशील कलावंतांची चळवळ आहे. ह्या प्रक्रियेच्या काळात ह्या सर्जनशीलतेनें सशक्त वाट चोखाळायला हवी'[४७] या संदर्भात, दलित चळवळीचे बळ कायम टिकवून धरायचे असेल तर पुढील गोष्टींचा विचार करावा असे ते सुचवितात.

१. दलित साहित्याच्या नावाखाली अतिशय आक्रस्ताळी, बटबटीत भाषेत सामाजिक अन्याय–अत्याचाराच्या कथा मांडल्या जातात. कवितेच्या संदर्भात हे विशेषत्वाने जाणवतें. असा काव्यानुभव विषण्ण करणारा ठरतो.

२. दलित साहित्याची चळवळ ही केवळ (नव) बौद्धांची व राहता तिची व्यापकता वाढायला हवी.

३. एखादी कथा किंवा कविता एखाद्या वादात बसविणे योग्य नव्हे.

४. दलित जीवनातील अनुभवाची भावनात्मक प्रतिक्रिया व्यक्त करताना तिच्या अनेक पातळ्यांच्या संदर्भात तिचा आविष्कार होणे जरूर आहे.

५. दलित साहित्यातील क्रांतिकारक जाणीव ही वैश्विक साहित्यातील क्रांतिकारक जाणिवेशी जोडली जाणे आवश्यक आहे.

६. दलित साहित्याचा केंद्रबिंदू हा शोषित पीडित असा माणूस, म्हणजेच सामान्य माणूस आहे. दलित साहित्यिकाने स्वत:ला वेगळे समजणे म्हणजे सामान्यजनांपासून स्वत:ला अलग काढणे. असा शाब्दिक भुसा काढण्याचे प्रकार घडू नयेत (हया काळात घडलेले आहेत). हे टाळण्यासाठी आपण लेखक आहोत यावरोवर आपण सामान्य माणसांपैकी एक आहोत ही भावना सतत जागृत ठेवली पाहिजे. म्हणजेच 'पोज घेणें' टाळले पाहिजे.'[४८]

डांगळे यांनी मांडलेले वरील मुद्दे कलावादी वाटण्याचा संभव आहे. परंतु ते तसे नाहीत. साहित्य आणि समाज यांचे अतूट नाते असते. समाजपरिवर्तनाच्या संदर्भात जर आपण साहित्याचा विचार केला तर आपणाला असे दिसून येईल की, समाजपरिवर्तनाचे एकमेव माध्यम किंवा साधन म्हणजे साहित्य नव्हे. ते अनेक माध्यमांपैकी एक माध्यम असू शकते व प्रत्येक माध्यमाची स्वत:ची अशी एक अंतर्भूत ताकद असते. जिवंत साहित्यातून जीवनमूल्यांचा प्रचार होणे अपरिहार्य असते. आणि हा प्रचार साहित्यातून आज करावयाचा असेल तर त्या माध्यमाची अंगीभूत ताकद ही नेमकी कशात आहे याचा नेमका विचार केला पाहिजे. तसा तो केला नाही तर केवळ साहित्यामुळे क्रांती होते हा निव्वळ भ्रम ठरेल. क्रांतीसाठी क्रांतिकारी तत्त्वज्ञान, चळवळ व क्रांतिकारी समूह असावे लागतात.'[४९] असे स्पष्टीकरण आपल्या मुद्यांच्या संदर्भात डांगळे करतात.

यावरून असे दिसून येईल की डांगळे यांची समीक्षा साहित्यशास्त्रीय सिद्धांत सांगणारी आहे. त्यांची तात्त्विक भूमिका बुद्ध, मार्क्स, आंबेडकर यांच्या सिद्धांताला अनुसरणारी आहे. डांगळे यांची लेखनशैली अगदी स्पष्ट व विचारयुक्त आहे. एखादा विचार गळी उतरवावयाचा त्यांचा प्रयत्न नसतो, तर आत्मशोधन करावे हा त्यांचा आग्रह असतो.

अर्जुन डांगळे यांनी संपादन केलेल्या 'दलित साहित्य: एक अभ्यास, या ग्रंथात महत्त्वाची चर्चा, निवडक लेख आणि भाषणांचा संग्रह त्यांनी केलेला आहे. त्यामुळे दलित साहित्याच्या मागच्या प्रेरणा अधिक बळकट व निकोप होण्याच्या, आणि दलित साहित्याचे आकलन होण्याच्या दृष्टीनें या संग्रहाला जोडलेले डांगळे यांचे त्रेचाळीस पानी निवेदन मोलाचे ठरेल यात शंका नाही. डांगळेंच्या समीक्षक प्रतिभेचा आविष्कार हे निवेदन घडवून देते. स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांचे समाजात जतन व्हावे, ते वाढीला लागावे या दृष्टीने डांगळे हयांचा विचार महत्त्वाचा आहे.

प्रस्तुत ग्रंथाला दिलेल्या प्रस्तावनेंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, द लित साहित्याचा विचार, दलित साहित्यातील अनेक प्रवाहांचे व उपप्रवाहांचे

स्वरूप स्पष्ट करणारे, त्याच्यामागील प्रेरणांचे विश्लेषण करणारे जे निवेदन या संग्रहाला जोडले आहे ते अतिशय उपयुक्त ठरले आहे.'[५०]

६) यशवंत मनोहर

आजवर ज्यांना संस्कृतीच्या गावकुसाबाहेर रोखलेले होते, ज्यांना जगण्याचेही स्वातंत्र्य नव्हते व स्वामित्वही नव्हते अशा लोकांना गर्तेतून बाहेर काढून मानाचे स्थान मिळवून देणारी व्यक्ती डॉ. आंबेडकर होत. या डॉ. आंबेडकरांना 'आपल्या ओठावरील प्रलयंकारी सूर्य' संबोधणारे यशवंत मनोहर म्हणजे विद्रोहाचा एक स्फोट होय. वेदना ही विद्रोहाची जननी आहे. ढसाळही या वेदनेला घेऊन विद्रोह पेटवितात. या दोघांची प्रवृत्ती केवळ विद्रोही समाजासाठीच विद्रोहाचे रूप घेऊन अवतरत नाही, तर विद्रोहविषय झालेल्या समाजाला उद्देशून असते.

कधी कधी त्यांचे शब्द लोण्याहून मऊ असतात, चांगल्या प्रवृत्तीचे ते स्वागत करतात. पण वाईट प्रवृत्तीसाठी त्यांच्या लेखणीची धार तेज असते, वाणी जहाल होते. मनोहरांची समीक्षाप्रवृत्ती जुन्यांना लेखन तपासायला लावणारी व नव्यांना विचार करायला लावणारी आहे. सार्त्र-मार्क्सच्या युगनिर्मात्या तत्त्वज्ञानावर ते भाळले आहेत, आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर त्यांचा जीव आहे, तर बुद्धाचा विचार ते शिरोधार्य मानतात. मनोहरांची बंडखोरी त्यांच्या कवितांतूनच नव्हे तर समीक्षालेखनातूनही जाणवते. त्यांच्या बंडखोरीला राजकीय रंग नाही तर ती अधिक मुलभूत म्हणून अस्सल आहे, लेखनाला तात्त्विक अधिष्ठान आहे.

दलित साहित्यासंबंधी स्फुट लेखन आजवर बरेच झाले आहे. त्यात काहींनी मूल्यमापनासंबंधी काही विचार मांडलेले आहेत. कोणी आग्रही मताने, कोणी अभिनिवेशाने, रसग्रहणात्मक पद्धतीने, तर आस्वादकाच्या भूमिकेतून दलित साहित्यासंबंधीचा विचार मांडलेला आहे. परंतु दलित साहित्याची मूलगामी भूमिका आणि सौंदर्यशास्त्र मांडणारी जर कोणती पहिली समीक्षा असेल तर ती यशवंत मनोहरांची होय. 'दलित साहित्य: सिद्धांत आणि स्वरूप' हा मराठी दलित साहित्यामधला हचा प्रकारचा पहिलाच ग्रंथ होय.

दलित साहित्याचे सिद्धांत व स्वरूप विशद करताना यशवंत मनोहर 'दलित' या शब्दाच्या इतरांच्या काही महत्त्वाच्या व्याख्या देतात. स्वत: ते म्हणतात, 'स्वातंत्र्य-समतेच्या-न्यायाच्या प्रेतावर पाय ठेवून केवळ स्वार्थासाठी माणुसकीची घोर बेअब्रु ज्यांनी केली ते वजा जाता उरलेले सर्व दलित होत.' 'शोषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इत्यादी सर्वच प्रकारांनी काळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे दलित होत.'[५१] या यशवंत मनोहरांच्या व्याख्येवरून एक लक्षात येते की जो शोषित आहे, ज्याचे शोषण केले गेले आहे, असा दलित कालचा आहे. आणि आजच्या दलिताचे चित्र अनात्मवादी, निरीश्वरवादी आहे, म्हणजेच आत्मा, ईश्वर त्याला

नको आहे. आंबेडकरांचे, मार्क्स चे तत्त्वज्ञान घेऊन तो नवे जग घडवायला निघालेला आहे. ज्याला परिवर्तन अभिप्रेत आहे असा माणूस 'दलित' होय.

'दलित जाणीव' स्पष्ट करताना यशवंत मनोहर म्हणतात, 'माणसाचा कलाव्यवहार असो की जीवनातला कोणत्याही प्रकारचा आविष्कार असो, त्यातून आविष्कारकर्त्यांच्या आयुष्यविशेषांनी सिद्धिलेली काही एक भूमिका व्यक्त झाल्यावाचून राहात नाही. ही भूमिका कलेतून जीवनदर्शनाच्या चित्रणाच्या माध्यमातून साकार होते. काही विशिष्ट अभिप्रायांनी जीवनव्यवहाराकडे पाहणारी, जीवन-व्यवहाराच्या विशिष्ट विभ्रमांनी विशिष्टच प्रतिक्रियांनी मोहोरणारी ही भूमिका म्हणजेच जाणीव. जाणीव म्हणजे कलेच्या संदर्भात कलावंताचे मार्गदर्शक तत्त्व असते. कलावंताला त्याच्या आयुष्यविश्वाने दिलेला डोळा म्हणजे जाणीव. ही जाणीव ज्या इतर नावांनी ओळखली जाते ती नावे अशी :

१) संवेदन–स्वभाव
२) जीवन दृष्टिकोण
३) मानसिकता

लेखक–कलावंताच्या जगात या जाणिवेचे स्थान अत्यंत मौलिक असते. ही दलित जाणीव वैशिष्टचपूर्ण आहे. ती विद्रोहात्मक, आशावादी व क्रांतिकारी आहे. ही मराठी साहित्यात स्वयंभू, स्वतंत्र व नवीन आहे. आणि संघर्ष हा तिचा प्राण आहे.'[५२] या आणि अशा अनेक वैशिष्ट्यांनी युक्त अशा जाणिवेतून निर्माण झालेले साहित्य 'दलित साहित्य' होय असे मनोहरांना सुचवायचे आहे. 'दलित साहित्याची प्रेरणा' सांगताना यशवंत मनोहर म्हणतात, 'बुद्धविचार हा क्रांति-विचार आहे, परिवर्तनाचा विचार आहे. क्रांतिविचार हा विश्वविचार आहे. विज्ञान हा क्रांतिविचार आहे. तो विश्वविचार आहे. दलित ही क्रांतिजाणीव आहे. ती विश्वजाणीव आहे. मराठीतील दलित साहित्य विश्वातील क्रांतिजाणिवेचा भाग आहे. ही क्रांतिजाणीव मराठीमध्ये आणि भारतामध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने साहित्याविष्कारी होत आहे. ह्या साहित्याविष्काराचेच दलित साहित्य हे नाव आहे.'[५३] अशी दलित साहित्याची विश्वव्यापक व्याख्या यशवंत मनोहर सांगतात.

सामाजिक बांधिलकी आणि दलित साहित्य याविषयीचा त्यांचा विचार मोलाचा आहे. ते म्हणतात, 'कला ही कलावंताच्या पोटी जन्माला येत असतें. आणि कलावंत समाजाच्या पोटी जन्माला येत असतो. प्रपंचवृक्षावर फुलणारी पुष्पलीला म्हणजे कला. पुष्पकृतींचा झाडांशी जो संबंध तोच कलाकृतीचा समाजाशी संबंध असतो. सगळीच स्वप्ने समाजात उगवतात. मानवाच्या सगळयाच इच्छा समाजात साकार होतात. म्हणून कलाकृतीच्या निर्माणाची इच्छाही सामाजिकच असते. या कलाव्यवहाराच्या बुडाशी मनुष्याची मूलभूत सामाजिक प्रवृत्तीच कार्य करीत असतें. सर्वंशीतोष्ण झरे जीवनच साहित्याला पुरवीत असते. तेव्हा कलेचा

जीवनाशी संबंध किंवा बांधिलकी असतेच. माणसाला महान करू इच्छिणाऱ्या श्रेष्ठ जीवनमूल्यांचा उद्घोष करणाऱ्या वाङ्मयीन बांधिलकीला महान बांधिलकी म्हणून जाहीर करावे लागेल.'[५४] 'ही श्रेष्ठ प्रकारची बांधिलकी श्रेष्ठ प्रकारची नैतिकताही ठरते.'[५५] असे यशवंत मनोहर पुढे म्हणतात.

अण्णाभाऊंच्या जीवनजाणीवा स्पष्ट करताना मनोहरांना स्पष्ट जाणवले ते अण्णाभाऊंचे अशोषक, सभ्य, सुसंस्कृत समाजाचे स्वप्न. या स्वप्नांनाच ते जीवन-जाणिवांचे नाव देतात. आंबेडकरवादी व मार्क्सवादी हे दोन वेगवेगळे ध्रुव नसतातच, खऱ्या आंबेडकरवाद्यालाच खरा मार्क्सवादी होता येतें व खरा मार्क्स-वादीच खरा आंबेडकरवादी असतो. या दोन खऱ्यांमध्ये वाद नसतो.'[५६] असा न्यायाच्या आणि मूल्यांच्या संबंधातून यशवंत मनोहर आपला विचार मांडतात.

दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र सूत्ररूपाने मांडण्याचा ते प्रयत्न करतात. या प्रयत्नाला ते व्यूह म्हणतात व ह्या व्यूहालाच दलित साहित्याचे सौंदर्य-शास्त्र[५७] म्हणतात. त्या सौंदर्यशास्त्राचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे आहे–

दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र

१) दलित साहित्य म्हणजे दलित कलाविश्व. या कलाविश्वात कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, एकांकिका, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, विनोदी निबंध, ललित निबंध, चित्रकला इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

२) कलागुण म्हणजे सौंदर्य कशाला म्हणायचे हे ठरविणारा विचार. या वाङ्मयप्रकारातून आस्वाद्य होणाऱ्या कलागुणांची निश्चिती करणारा विचार म्हणजे कलाविचार होय.

३) प्रस्थापितांचा कलावाद किंवा सौंदर्यशास्त्र फडके, मर्ढेकर यांच्या मीमांसेतून मुख्यत्वे साकार झाले आहे. 'काय' सांगितले या ऐवजी 'कसे' सांगितले या संदर्भात म्हणजे रचनेत कलागुण किंवा सौंदर्य असते असे हे सौंदर्यशास्त्र म्हणते.

४) रचनेच्या अंगाने 'सौंदर्य' निश्चित करणारा विचार हा रूपवादी सौंदर्यविचार होय. फडके, मर्ढेकरांचा कलाविचार हा असा रूपवादी कलाविचार किंवा सौंदर्यविचार होय. अनुभूतीची प्रकृती, तिची अर्थवत्ता किंवा मूल्यवत्ता याकडे रूपवादी कलाविचार दुर्लक्ष करतो. आशयाच्या संदर्भात, त्यातील अर्थवत्तेच्या किंवा मूल्यवत्तेच्या संदर्भात म्हणजे 'काय' सांगितले या अंगाने सौंदर्याची निश्चिती करणारा विचार हा आशयवादी सौंदर्यविचार होय.

५) दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र वरील रूपवादी सौंदर्यशास्त्राहून आशय-द्रव्याच्या आणि मूल्यगर्भतेच्या संदर्भात वेगळे आहे.

६) रस, अलंकार, रीती, वक्रोक्ती, औचित्य, परतत्त्वस्पर्श, लयतत्त्व इत्यादी कलेचे निकष भारतीय साहित्यशास्त्रात आणि नंतरही दिले गेले आहेत.

७) दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र आशय बदलून औचित्यविचाराला जागा देते.

८) औचित्यविचार हा त्याच्या अभ्यासात जिवंत असतो. तो अनुचिताचा निषेध व उचिताचे स्वागत करतो. सर्वन्यायाच्या पताका त्याने घेतलेल्या असतात.

९) अशा व्यक्तित्वघटनेच्या माणसाने केलेले अनुभवाचे सर्जन म्हणजे कला होय. हा अनुभव अर्थपूर्ण असतो. या जीवनाचे भावगर्भ आकलन प्रत्ययकारी पद्धतीने साकार झाले की कला होते, तेच सौंदर्य.

१०) कलागुण आणि मानवी मूल्ये हे एकजीव असतात. त्यात विरोध नसतो. समता, स्वातंत्र्य, न्यायमानवतावाद हा कलावंताच्या लेखनपूर्व आत्मनिष्ठेचा आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठेचा नियंत्रक झालेला असतो.

११) कलाकृती म्हणजे अशा कलावंत व्यक्तित्वाच्या संवेदना–भावनांची संघटना.

१२) कलावंत वर्गीय मर्यादांनी ग्रस्त नसतो. वर्गविहीनतेच्या म्हणजे संगतीच्या मूल्यांनी त्याची जाणीव व्यापलेली असते. अनुभव म्हणजे प्रत्यय. प्रत्यय म्हणजेच आशय. त्याच्याच आविष्काराला कला म्हणावे.

१३) दलित सौंदर्यशास्त्राचे सामाजिक लोकशाही हे सत्य होय. बहुजनहिताय बहुजनसुखाय हाच न्याय होय. आणि या सत्याचा, न्यायाचा उत्कट, प्रत्ययकारी अनुभव म्हणजे सौंदर्यानुभूती.

१४) सौंदर्य हे जीवनापेक्षा वेगळे नाही. कला ही जीवनाचीच निर्मिती होय.

१५) सामाजिक लोकशाहीवादी वृत्तीला संवाद, बहुजनहिताय बहुजनसुखाय या न्यायाचा सम्यक समतोल, आणि फॅसिस्ट मूल्यांशी, विरोध हे दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राचे अंतरंग आहे. आणि अंतरंगाशी एकरस होऊन येणारे उत्कट आविष्करण हे त्याचे बहिरंग आहे.

१६) कलेत कलावंताचे व्यक्तित्व, त्याचा अनुभवच शोधायचा असतो.

१७) कला आनंदच देते हे पूर्ण सत्य नव्हे, आणि कलेपासून मिळणारा आनंद ब्रह्मानंदसहोदर असतो हे पूर्ण असत्य आहे. कलास्वाद हा अनुभव असतो, प्रत्यय असतो. आनंददायकच असतो. असे नाही.

१८) कलेत परिवर्तन आहे. तिच्यात क्रांतिसर्जनाचे सामर्थ्य आहे. दलित सौंदर्यशास्त्राचा कलेच्या क्रांतिशक्तीवर विश्वास आहे. कलेला त्यासाठी प्रचारी होण्याचे कारण नाही.

१९) प्रस्थापितांच्या प्रभावात दलित जाणीव चुकूनही जाणार नाही, ती सतर्क राहील.

२०) कला रंजक असावीच लागते. पण रंजन फॅसिस्ट नसावे. 'रंजन म्हणजे प्रत्ययकारकता. हे रंजन सर्जक असावे, मानवतावर्धक असावे.'[५८]

अशा प्रकारचे दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र यशवंत मनोहर मांडतात. या

सौंदर्यशास्त्राचा इथे मुद्दाम थोडक्यात परिचय दिला आहे. त्याचे कारण असे की दलित समीक्षकांपैकी कुणी सौंदर्यशास्त्र मांडण्याचा प्रयत्न केलेला नाही. चर्चा भरपूर झाली. लेखही लिहिले गेलेत. पण सौंदर्यविचार असा सैद्धांतिक रूपाने प्रथमच अवतरला आहे. यशवंत मनोहरांच्या समीक्षालेखनाला हेच तात्त्विक अधिष्ठान आहे.

मनोहरांची भूमिका केवळ आस्वादकाची नाही तर ती एका चिकित्सक विचारवंताची आहे. त्यांची समीक्षा ही मूल्यसंकल्पनात्मक आहे; कारण ती दलित-साहित्याचे सौंदर्यशास्त्र मांडते, मूल्यविचार आणि मूल्यसंकल्पनांचा शोध घेते व या शोधाच्या आधारे साहित्यकृतीचा आस्वाद घेते.

यशवंत मनोहरांची शैली अगदी पल्लेदार, अलंकारिक आहे. भाषेला अलंकाराचा साज मध्ये मध्ये ते चढवतात. शब्दांना मागे धावायला लावूनच त्यांची भाषा साहित्यरूपाने अवतरते. एकामागोमाग एक शब्द यावेत अशी त्यांची संपन्न शब्दकळा आहे. उदाहरण घ्यायचेच झाले तर 'दलित साहित्याच्या नावासंबंधी' या विवेचनात ते लिहितात, 'आता दलित साहित्याच्या नावासंबंधी चर्चा करण्यात अर्थ नाही, तर त्याच्या मोहक आणि पक्क्या बांधणीच्या गावांची चर्चा व्हावी. त्या गावातील छावण्यांची आणि लावण्यांची, मिनारांची आणि चिनारांची, शिखरांची आणि मखरांची चर्चा करण्यात अर्थ नाही.'[५९] त्यांच्या भाषेच्या समृद्धीचा आणि अलंकारिक साजाचा हा नमुना आहे. 'शोषितांच्या उत्थानाचे चरित्र' या लेखात त्यांची भाषा कशी वळते पहा. बुद्धाचे उड्डाण या काळातले मोठे विद्रोही होते. एका मूलभूत युद्धाला बुद्धाने तोंड फोडले. ईश्वर–आत्मा नाकारून त्याने शोषणाच्या काळजालाच तव्यावर उभे केले होते.[६०] यशवंत मनोहरांच्या भाशाशैलीचे असे कित्येक नमुने त्यांच्या सर्व साहित्यात विखुरलेले दिसतील.

मनोहरांचे समीक्षालेखन आशा निर्माण करणारे आहे. दलित साहित्याच्या समृद्धीत मोलाची भर टाकणारे आहे. या संदर्भात वामन निंबाळकर म्हणतात, 'दलित साहित्याची मूलगामी भूमिका आणि सौंदर्यशास्त्र मांडणारा मराठीतला पहिला समीक्षक यशवंत मनोहर आहे. दलित साहित्यासंबंधीच्या समग्र प्रश्नांची चर्चा मनोहरांनी मोठ्या मर्मग्राही शैलीने केली आहे. दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची स्पष्ट रूपरेषा हा ग्रंथ प्रथमच प्रकाशात आणीत आहे.'[६१]

७) केशव मेश्राम

दलित कविता, कथा, आत्मचरित्र, कादंबरी, समीक्षा या सर्व क्षेत्रांत मानाचे स्थान मिळविणारे केशव मेश्राम दलित काव्याची अगदी सुजाणतेने समीक्षा करतात. दलित साहित्यनिर्मितीच्या मानाने दलित समीक्षेचे प्रमाण कमी असले तरी जे आहे ते अत्यंत मोलाचे आहे. दलित साहित्य मराठी समीक्षेला आव्हानात्मक ठरले आहे. तिने दलित साहित्याचे आव्हान स्वीकारावे अशी अपेक्षा आहे. मराठी साहित्यावर दिवसेंदिवस वाढणारे मराठी समीक्षेचे पोळे मधुहीन आहे. या संदर्भात

केशव मेश्राम म्हणतात, 'दलित साहित्याची समीक्षा करण्याची ताकद मराठी समीक्षकांनी दाखविली नाही. दलित साहित्याचा आस्वादही मराठी समीक्षेला घेता आला नाही वा पुरेसे आकलनही तिला करता आले नाही.'[६२]

दलित साहित्यातील चित्रित झालेल्या वा होणाऱ्या अनुभव–विश्वाने मेश्राम केवळ भारावून जात नाहीत, तर त्या चित्रित झालेल्या अनुभवाची चिकित्सा ते रसिकतेने करतात. 'समन्वय' हा त्यांचा टीका–लेखांचा संग्रह आहे. गेल्या एक–दीड तपापासून ज्या साहित्याने, विशेष करून ज्या कवितेने, मेश्रामांचे अंतःकरण विद्ध केलेले आहे त्या कवितेची प्रामाणिकपणें ते नोंद घेतात. कवितेवर मेश्राम यांचा विशेष जीव दिसतो. 'कवितेच्या शोधात मी' या लेखात ते म्हणतात, 'प्रत्येक श्रेष्ठ कविता ही कवीच्या आत्मपीडेतून आणि आत्मशोधनातून निर्माण झालेली असते.' 'कविता हा आत्माविष्कार आहे' हे सूत्र मनाशी योजून त्यांनी आजच्या कवितेबद्दल 'तिच्यात अधिकाधिक खाजगीपणा आढळतो' असा अभिप्राय नोंदविला आहे, तो खरा आहे.[६३]

कवितेवर जिवापाड प्रेम करणाऱ्या मेश्राम यांना दलित कवितेचे सामर्थ्य फार मोठे वाटते, दलित कवितेला ते आजच्या दलित साहित्याचे शक्तिकेंद्र मानतात. दलित कविता ही विशिष्ट जीवनसंदर्भ घेऊन येणारच. शतकानुशतकाचा तळागाळातील लोकांचा दबलेला आवाज, कोंडलेला हुंदका या कवितेतून प्रकट होणारच. एका विशिष्ट जीवनसंदर्भाला घेऊन दलित कविता अवतरणारच. संवेदनशील मनाचा आविष्कार त्यात होणारच.

जळलेले आयुष्य पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे
म्हणून प्रकाशाची पायवाट मी जवळ केली आहे.

अशी 'सुरुंग' पेरणाऱ्या त्र्यंबक सपकाळेंची कविता आपला मार्ग शोधणारच आहे. माणुसकीला पायदळी तुडविणाऱ्या प्रतिगामी प्रवृत्तीच्या विरोधात दलित कविता उभी राहणारच आहे. जळत्या मशाली गाव पेटवणारच. अशा कवितांची दखल केशव मेश्राम अगत्याने घेतात. पारंपरिक निकषाने दलित कवितेकडेच नव्हे एकूण साहित्याकडेच पाहणे योग्य नव्हे. कारण प्रा. केशव मेश्राम म्हणतात, 'दलित समाज ही एक जिवंत गोष्ट आहे. कोणताही खळबळणारा, परंपरा नाकारून उठलेला समाज आपल्या अस्तित्वासाठी योग्य घटकांचा शोध घेत असतो. दलित साहित्यातून उफाळून येणारा क्षोभ, व्यक्त होणारा नकार, प्रकट होणारी वेदना समजावून घेतली पाहिजे. ज्यांना समजून घ्यायचे नाही ते कलावादी लोक मात्र म्हणत राहणार की दलित साहित्य हे साहित्यबाह्य कारणांनी गाजत आहे.'[६४]

मेश्राम कवितेवर प्रेम करतात. त्यांना शीर्षक म्हणजे आत्मसंवादाची परिणती वाटते. शीर्षक न देण्याच्या आजच्या प्रवृत्तीच्या संदर्भात प्रा. मेश्राम यांचे म्हणणे असे की, शीर्षकाद्वारे एक विवक्षित दृष्टिकोण रसिकांना आपण सुचवितो.

शीर्षक हे कवितेतून व्यक्त होत असलेल्या काव्यानुभवाचे रूप सुचवीत असते. तेव्हा शीर्षक न देणे योग्य नव्हे.'

श्रीकृष्ण पोवळे, वसंत डहाके, सौ. शिरीष पै यांच्या कवितेला तें 'सदाफुली' म्हणतात, या कवितासंग्रहांकडे ते रसिकतेने पाहतात. या कवितांच्या निमित्ताने काव्यविचार मांडतात. त्यांना अभिप्रेत असलेल्या काही गोष्टी म्हणजे १) कवी-जवळ काही निष्ठा हव्यात व जिवंत आंतरिक ऊर्मी असल्याशिवाय कविता अंतः-करणाला भिडत नाही. २) प्रत्यक्ष आयुष्य आणि काव्यात्म अनुभव यांत फरक असल्याचा कृतक संकेत स्वीकारणारी कविता मागे पडली आहे.[६५]

दलित लेखकाच्या अनुभवविश्वात बुडी मारताना केशव मेश्राम यांना अनुभवाची रत्ने हाती लागतात. या अनुभवाच्या रत्नाचे तेज न पाहता आपल्याला वाङ्मयीन कसोट्यांच्या साच्यात बसविणाऱ्या मराठी समीक्षेच्या प्रवृत्ती व पद्धती-बद्दल ते म्हणतात, 'दलित लेखकाच्या अनुभवाची तरलता पकडायला मराठी समीक्षकाच्या फूटपट्ट्या कमी पडतात. साहित्य जगणाऱ्याच्या अनुभवांची चर्चा खूप झाली, पण प्रत्यक्ष लिहिल्या गेलेल्या दलित साहित्याची समीक्षा करण्याची ताकद मराठी समीक्षकांनी दाखविली नाही. सौंदर्याचे जेथे व्याकरण केले जाते, त्यांना दलित साहित्याची भीती का वाटावी ? दलित लेखकाच्या ग्रंथांवर वृत्तपत्रांतून नामवंत समीक्षक लिहिण्यास काचकूच करताहेत. ही मराठी समीक्षेची दिवाळ-खोरी आहे. दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी मराठी समीक्षा अपुरी आहे.'[६६]

पाश्चिमात्य-युरोपियन वाङ्मयातून आलेल्या मूल्य-मानदंडांनी मराठी समीक्षेत स्थान मिळविले, अढळ केले. त्यामुळे मराठीतील दलित साहित्याचा वास, गंध या देशातील मातीचाच असूनही तो ओळखण्याची कुवत अजून मराठी समीक्षेला आली नाही. ती येईल त्या दिवशी मराठी समीक्षा आपल्या मातीला अन् पाण्याला जागली असे होईल.

नारायण सुर्वे यांच्या जीवनोन्मुख कवितेचा विचार केशव मेश्राम करतात– 'भविष्याचे पाखरू माझ्या खांद्यावर आहे. आणि श्रमणारा' सूर्य सांगाती आहे असे म्हणणाऱ्या सुर्व्यांच्या कवितेतला हा महान माणूस त्याच संभाव्य चेहऱ्यानिशी येतो तो डहाके आणि अनिरूद्ध कुलकर्णीच्या कवितांतून. भावी नवकवितेचा चेहरा शोधायचा ते प्रयत्न करतात. ते म्हणतात, 'जीवनातील बकाल उघडे–वाघडेपण, भ्रष्टाचार, शिवराळपणा, उद्रेक, भणंगपणा हा नव्या कवितेचा एक प्रवाह असेल. 'ॲन्टिरोमॅन्टिक' लेखन करणें, निग्रहपूर्वक शब्दक्रम बदलवून साधेपणाने आत्मजीवन व विश्वबंध यांचा सांधा जोडणे, स्वप्न आणि वास्तव यांचे कलम करणे हा आणखी एक मार्ग होय.'[६७]

अनुभव हा कवितेत आकाराला येत असतो. अनुभवविश्व समृद्ध असल्या-शिवाय कविता 'कविता'च होत नाही. ज्याचा जसा जीवनानुभव असेल तसे त्या

कवितेचे रूप असते. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कवितेमागील प्रेरणा बदललेल्या आहेत, तिची कुतूहलाची क्षेत्रेही निराळी झाली आहेत.

सदा कऱ्हाडे यांच्या 'एका अस्पृश्याची डायरी' या कादंबरीने त्यांना आकर्षून घेतलेले दिसते. अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा अनेक तऱ्हेनी सदा कऱ्हाडे प्रस्तुत कादंबरीत विचार करतात. 'माझ्यात आता तुटलेपणाची जाणीव जोपासली जात आहे' हा या कादंबरीतील तरूण मनाचा आवाज आहे. केशव मेश्राम या लेखात म्हणतात, 'स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली तरी तर्कशुद्ध समंजसपणाने, विनवणीच्या सुरात, धमकीभरल्या इशारेवजा भाषेत ढीगभर लिहून फुले–आंबेडकर, सावरकर मातीचे झाले, पण येथे काही बदल झाला नाही.'[६८] या मेश्रामांच्या शब्दांत सत्यता किती ? मग अस्पृश्येविरूद्ध बंड पुकारू नये तर काय करावे ? नारायण सुर्वेच्या शब्दांत सांगायचे तर–

इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख
कंदील खोपटास खोवून वावरू नये, तर काय करावे ?

मेश्राम यांची काव्यसमीक्षाही त्यांच्या कवितेप्रमाणें आत्मशोधाची आहे. वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतून झालेल्या त्यांच्या जीवनप्रवासाला कवितेने जसे आपल्यात सामावून घेतले तशीच त्यांची समीक्षा कवितेची. त्यातल्या निरनिराळ्या भावानुभवांची. सुजाणतेने आस्वादकाच्या भूमिकेने आपल्या रंगात रंगवून घेण्याचे सामर्थ्य त्यांची समीक्षा बाळगते.

मेश्राम यांची शैली साधी, सोपी, सुटसुटीत असली तरी तिच्यात खळाळणाऱ्या प्रवाहाची धार आहे. ती संथपणे अवतरते व अंतःकरणात खळबळ माजवून जाते. त्यांच्या कवितेचेही हेच वैशिष्ट्य, त्यांचे शब्द लिबलिबीत नसतात. ते म्हणतात–

एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली.
तो लेकाचा फक्कन हसला–

असे शब्दांचे फटकारे कवितेतून ते मारत असले तरी इतरांच्या काव्याची समीक्षा करताना मात्र पूर्वग्रहदूषित असा कोणताच भाव ते जवळ फिरकू देत नाहीत. नव्या मूल्यांच्या संदर्भातच, जीवन–जाणिवा–नेणिवांच्या अनुषंगाने व अनुभवाच्या अंगाने ते कवितेची सुजाण समीक्षा करतात. त्यांच्या समीक्षेला आस्वादकाचे रूप लाभत असले तरी वरील तीन प्रवाहांच्या आधारे ते काव्यविचार मांडतात. 'मेश्राम यांना जाणवलेल्या या तीन प्रवाहांचे विश्लेषण व्हायला हवे.'[६९] असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात. कवितेची समीक्षा करताना मेश्राम कवीच्या आत्मपीडेचा व आत्मशोधाचा शोध घेताना दिसतात. हा शोध घेणे हा त्यांच्या काव्यसमीक्षेचा विशेष ठरतो.

८) भीमराव कर्डक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच कर्डक यांचा जलसा तीन–चार वेळा पाहिला होता. नारायणगाव येथील वेल्फेअरच्या मैदानावर त्यांनी हा जलसा पाहिला, तेव्हा बाबासाहेब अतिशय आनंदून व मन:पूर्वक बोलले होतें की, 'माझ्या दहा सभा मिटींगा आणि कर्डक मंडळींचा एक जलसा बरोबर आहे.' या उद्‌गाराने कर्डक भारावून गेले. ते म्हणतात, 'याहून माझ्या कार्याला आणखी कोणाची पावती नको.'[७०]

सत्यशोधक चळवळीचा प्रचार करण्यासाठी 'जलशा'ची योजना केलेली होती. त्याच धर्तीवर आपणही जलसे करावेत, आपल्याही अस्पृश्य समाजाला बाबासाहेबांचा संदेश सांगावा, तोही जलसारूपाने सांगितला तर या अडाणी माणसांना लवकर पटेल, त्यांची करमणूक, मनोरंजन तर होईलच पण यापेक्षा त्यांच्या मनामनात जागृती होईल, बाबांचा विचार मनात शिरेल या दृष्टीने भीमराव कर्डकांनी जलसे सुरू केले.

आंबेडकरी चळवळीत या जलशाला फार महत्त्व आहे. टाहो फोडून सांगितले तरी होऊ शकत नव्हते असे परिवर्तन जलशाच्या माध्यमातून मनामनात होऊ लागले. मुलांनी शाळा शिकली पाहिजे, मुलांना शिकवले पाहिजे, ज्ञानाशिवाय, शिक्षणाशिवाय उद्धार नाही, दारू पिणे, गंजिफा खेळणे बंद केले पाहिजे, व्यसने नकोत या साऱ्या सामाजिक परिवर्तनाला त्या काळात मुख्यत: कारणीभूत ठरली असतील बंधुमाधवांची कवनेच.

खेळ सोड, सोड, नको खेळू गंजिफा
त्याच्यामधी काय नफा, त्याच्यामधी काय नफा ?

तसेच

घरी नको राहु मधू शाळेत जाई
किती सांगू तुला कसं समजत नाही !

अशा कवनांनी भीमराव कर्डकांचे जलसे सजू लागले व जनमानसात बाबासाहेबांचे विचार रुजू लागले. या जलशांचे स्वरूप व कार्य कोणते याचे सुंदर विवेचन, नव्हे समीक्षणच, भीमराव कर्डक करतात. ते म्हणतात, 'जलसा म्हणजे अस्पृश्यांच्या माणुसकी–हक्काचा साद्यंत इतिहास होय.'[७१] आपल्या जलशांमधून जनतेला काय सांगितले, जनतेने ते कसे स्वीकारले याची नोंद मूल्यमापनात्मक पद्धतीने भीमराव कर्डक करतात.

दलित समीक्षेचे यशापयश

दलित साहित्याकडे अगदी आस्थेने वा तटस्थ वृत्तीने पाहणाऱ्या समीक्षकांनी दलित साहित्याचे मनापासून स्वागत केले, पण काहींनी मात्र अगदी विरोधकाचीच भूमिका स्वीकारली " १९६९ साली महाबळेश्वर येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य

परिषदेच्या दुसऱ्या संमेलनात दलित साहित्याविषयी व्यक्त झालेले विचार म्हणजे पुणेरी प्राध्यापकाच्या पांढरपेशा मनोवृत्तीचे ते द्योतकच ठरले''[७२] असे प्रल्हाद वडेर म्हणतात. पण दलितांनीच, दलित साहित्यिकांनीच दलित साहित्याच्या विरोधात भूमिका स्वीकारावी हे दलित चळवळीत नवे नसले तरी योग्य मात्र नाही.

दलित चळवळ राजकीय असो, सामाजिक असो, सांस्कृतिक असो की वाङ्मयीन असो, अशा प्रत्येक चळवळीला दोन तटांमध्ये विभागण्याची काही दलितांची प्रवृत्ती दिसते.

आमच्या पूर्वजांवर झालेल्या अन्याय-अत्याचारांचे किंवा आयाबहिणींवर होणाऱ्या बलात्कारांचे चित्र जर साहित्यात आले तर त्याला वास्तव म्हणावे काय, असा प्रश्न विचारणारी मंडळी आहेत. अतिरेकी चित्रण दलित साहित्याला अभिप्रेत नाहीच, पण वास्तव म्हणून जे घडले ते लिहिणे म्हणजे बदनामीकारक होते काय, याचा विचार अवश्य व्हावयास पाहिजे. यापुढच्या पिढीसाठी, भारताचा उज्ज्वल इतिहास लिहितानाच हा काळा इतिहास जर नोंदविला नाही तर काय होईल ? रणांगणावरून पळ काढणाऱ्यांचे पुतळे इतिहासाने घडवावे असे होईल. ज्यांनी संघर्ष केला, यातना सोसल्या, हालअपेष्टा सहन केल्या त्यांच्या वेदनाव्यथांचे चित्रण जर दलित साहित्यात होत असेल तर ते गलिच्छ किंवा बदनामीकारक ठरते का ? अर्थातच नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिलेल्या सगळ्या सवलतींचा भरपूर फायदा घ्यावा, आणि आंबेडकरी आंदोलनाचे जळते निखारे मात्र पदरी घेण्यास हात पुढे करू नये हा कुठला न्याय ? ही डॉ. आंबेडकरांशीच बेईमानी ठरणार नाही का ? या संदर्भात अर्जुन डांगळे आपले मत व्यक्त करताना म्हणतात, " आपल्या वैयक्तिक उत्कर्षावरोवर साऱ्या समाजाचा उत्कर्ष झाला आहे असे समजून आता आपण ब्राह्मणासारखे लिहिले पाहिजे, बोलले पाहिजे, वागले पाहिजे असे दलित ब्राह्मणांना वाटत होते. संधी मिळेल तिथे ते दलित साहित्याची टवाळी करीत होते. बागुलांच्या " पावशा " व सोनकांबळे यांच्या " आठवणींचे पक्षी " वर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. 'डी. बी.'-चा ही समाजधारणा, समाजव्यवस्था व ती बदलण्याकरिता लागणारी साधने, क्रांतिकारक लढे व चळवळी इत्यादीविषयीची मते पाहिल्यास त्यांच्या मध्यमवर्गीय मनोवृत्तीची कल्पना तर येतेच, पण त्यांच्या मानसिक नपुंसकत्वाचे देखील दर्शन घडते. याला काही सुशिक्षित वर्ग अपवाद आहे''[७२] अशा खरपूस शब्दांत डांगळे त्यांचा समाचार घेतात. याही पलीकडे जाऊन डांगळे यांना जाणवते ती या डी. बी. ची खोटी, तकलादू, वेगडी प्रवृत्ती. या प्रवृत्तीविषयी ते चीड व संताप व्यक्त करताना म्हणतात, " काही दलितेतरांचा दलित साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोण हीनत्वाचा आहे, तसाच दलितांच्याही, एका छोट्या गटाचा का होईना, आहे. विनोद म्हणजे यांच्यातील " दलित साहित्य लिहिणे म्हणजे मांगवाडे, महारवाडे माजविणे होय " अशी ज्यांची भूमिका होती,

स्वत:ला दलित साहित्यिक म्हणवून घेणें ज्यांना जातीयवादाचे लक्षण वाटत होते अशी काही मंडळी तर '.....नी दलित साहित्याला स्वत:चा असा वैशिष्ट्यपूर्ण तोंडावळा मिळवून दिला' असे स्वत:विषयी लिहवून घेताना आढळतात, आणि याहीपुढे जाऊन " दलित साहित्याची ॲथॉलॉजी देखील संपादन करतात. "[७४]

सृष्टिसौंदर्याचे, फळाफुलांचे, हिरव्याशार वनराजीचे, झरे–पहाडांचे दर्शन घडवायला दलित साहित्यिक का तयार होत नाहीत ? या प्रश्नामागची भूमिका समीक्षकांनी समजून घ्यायला पाहिजे. जगात सौंदर्यापेक्षा तुम्हाला दु:खच का दिसतात हो ? तुमच्याजवळ सौंदर्यदृष्टीच नाही का ? असले वेडे प्रश्नही विचारले जातात. समीक्षकांनी वा प्रश्नकर्त्यांनी दलितांच्या संघर्षमय जीवनात डोकावून पाहण्याचा कधी प्रयत्न केला आहे का ?

जगण्यासाठी जिथे धडपड आहे, भाकरीच्या संघर्षात हरवलेले बालपण आहे, भुकेने व्याकुळल्या मनाची तगमग आहे, लादलेल्या मातृत्वाची धगधग आहे, आई-साठी गिऱ्हाईक शोधणाऱ्या मुलाच्या जिवाची तडफड आहे, अन्यायाच्या भट्टीत जळणाऱ्यांची फडफड आहे व जातीयतेच्या नावाखाली नागवलेल्या जिवाची जळ-जळ आहे, सारे दु:ख, साऱ्या वेदना उघड्या डोळ्यांनी पाहणाऱ्या नजरेची कळकळ आहे, त्याच्या जगण्यातली ही भीषण वास्तवता नाकारता येईल का ? तान्ह्या मुलाच्या पान्ह्यासाठी अंगाशी वंदिस्त ओठांना बळेच कुठेतरी गुंतवावे लागत आहे, मातृत्व लादून पितृत्व नाकारणाऱ्या बापाचे अस्तित्व समाजात पोसत आहे, अशा या दाहक चटक्यांची आग ओठात घेऊन कुणी सौंदर्याचे गुण गावे का ? अनुभवा-तील वास्तवता व भीषणता दडवून ठेवून लेखणीला सौंदर्यासाठी राबवावे काय ? निर्सगाला लेखणी बहाल करावी काय ? अशा दाहक अनुभवातले बारकावे, कावे, देखावे शोधता आले तर ते समीक्षकानें शोधावेत, नाही असे नाही. पण त्यासाठी दलित साहित्यालाच नकार द्यावा हे योग्य नाही.

अनुभवाची व्यापकता जोपर्यंत हाती लागत नाही तोपर्यंत साहित्यकृतीच्या मातीशी इमान राखता येत नाही. त्या साहित्यकृतीतील लय, अनुभवाचा घाट, आकृतिबंध आणि अनुभवाची प्रसरणशीलता यांचे आकलनही नीट होऊ शकत नाही.

नामदेव ढसाळ, बाबुराव बागुल, दया पवार, रावसाहेब कसबे यांनी वेळोवेळी आंबेडकरी तत्त्वज्ञानाची व्यापकता पटवून दिलेली आहे. डॉ. आंबेडकरांचे बौद्ध-तत्त्वज्ञान व दलितांचे दलितविषयक जीवनाचे तत्त्वज्ञान या दोन्ही तत्त्वज्ञानांची व्यापकता, विस्तृतता व सखोलता परस्परपूरक आहे. डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुले, मार्क्स व बुद्ध या तिघांच्याही तत्त्वज्ञानाचे एकत्रीकरण करून जे 'रसायन' निर्माण केले ते 'आंबेडकरी तत्वज्ञान' होय. या तत्वज्ञानाला 'एकजीव' राहू देण्यापेक्षा त्याच्यातून मार्क्सवाद, फुले–आंबेडकरवाद वेगवेगळा काढून, चर्चा करून आप–आपसात वैर माजविण्याचे कारण काय ? डॉ. आंबेडकरांचा विचार, त्यांचे तत्वज्ञान हे राहते एका बाजूला, अन् एकमेकांच्या विषयी मत्सरग्रस्त होऊन

'आपणच काहीतरी करतो, आपल्याशिवाय साहित्य खरं नाही' असे दाखविण्याचा घातक प्रयत्न करतो. यामुळे दलित साहित्याची चळवळ व्यापक, विस्तृत होण्याऐवजी, नव्या पिढीला मार्गदर्शन मिळण्याऐवजी, आप-आपसातील मतभेदांमुळे 'भरकटणे' हेच त्यांच्या नशिबी येते. यामुळे साहित्यातील 'कूटनीती' चालविणाऱ्या लोकांचे फावते व पुन्हा दलित साहित्यामध्ये तट पडण्याची शक्यता निर्माण होते.

अर्जुन डांगळेंचे या संदर्भातील एक विधान चिंतनीय आहे. ते म्हणतात, 'आंबेडकरी तत्वज्ञानाने भारलेल्या मंडळींना पूरक असलेला एक अ-साहित्यिक गट 'दलित साहित्य विरुद्ध बौद्ध साहित्य' असा नवा वाद घेऊन पुढे आला. त्यांच्या मते 'आम्ही आता दलित नाहीत, बौद्ध झालोत, म्हणून बौद्ध साहित्य निर्माण करूया.' परंतु या मंडळींनी बौद्ध साहित्य म्हणजे काय, हे नेमके केव्हाही सांगितलेले नाही. अर्थात सर्जनशीलतेचा अभाव व निर्मितीशून्य प्रचार यामुळे हे तथाकथित बौद्ध साहित्यदेखील प्रभावहीन ठरते.'[७५] डांगळे यांच्या या विधानाचा विचार केला तर असे जाणवते की, दलित साहित्याला विरोध करून सामाजिक आशयाचे साहित्य निर्माण करणे बौद्ध साहित्यासाठी आवश्यक आहे. परंतु अशा सामाजिक आशयाच्या साहित्याची निर्मिती पाहिजे तेवढी झाली नाही, किंवहुना शून्यच झाली.

विजय सोनवणे हे 'दलित साहित्य का नको ?' या आपल्या समीक्षाग्रंथात म्हणतात, 'विचाराच्या शिक्क्याप्रमाणे, विचाराच्या छापाप्रमाणे लेखकांनी आपआपल्या छावण्या साहित्यक्षेत्रात उभारलेल्या आहेत. छावणीबाहेरील लेखकाने एखादी कलाकृती निर्माण केली असेल तर तावडतोब आदेश दिला जातो- 'त्या कलाकृतीची दखल घेऊ नको, कारण लेखक आपल्या छावणीतील नाही.' तावडतोब त्या ग्रंथावर बहिष्कार टाकला जातो. त्या ग्रंथाची समीक्षा होऊ शकत नाही. त्या ग्रंथाकडे सर्वजण दुर्लक्ष करतात. जर त्या साहित्यकृतीची मीमांसा झालीच तर ती समीक्षा त्या कलाकृतीचा मृत्युलेख ठरते. याउलट एखादी कलाकृती छावणीतील लेखकाने निर्माण केलेली असेल तर त्या कलाकृतीची इतकी वारेमाप स्तुती होते की ती समीक्षा म्हणजे जाहिरातबाजीचा उत्कृष्ट नमुना ठरते.' सोनवणे यांचा हा व्यक्तिगत अनुभव म्हणून त्यांचे म्हणणे मान्य केले, तरी संपूर्ण दलित साहित्याला त्यांचा नकार असावा हे एक कोडेच आहे. कारण, 'बौद्ध साहित्य म्हणजे सामाजिक आशयाचे साहित्य. सामाजिक धारणेला असे साहित्य आवश्यक असते. म्हणूनच विषमता संपुष्टात आली की सामाजिक समतेची धारणा सुरू होईल. या समतेचा पहिला पाईक बुद्ध आहे. आम्हाला बौद्ध धर्मातला हा सामाजिक आशय कळला आणि समतेची दिशा गवसली म्हणूनच आम्ही बौद्ध आहोत व आमचे साहित्य हे बौद्ध साहित्य आहे. दलित साहित्य हे बौद्ध साहित्याचे अविकसित रूप आहे. दलित साहित्याचे अंतिम रूप बौद्ध साहित्य आहे.'[७६] असे

विधान बौद्ध साहित्याचे समर्थक खुद्द राजा ढालेच करतात. मग हे अविकसित रूप विकसित कसे करायचे, त्यासाठी कोणती प्रक्रिया आवश्यक आहे, त्या प्रक्रियेच्या संदर्भात बौद्ध साहित्यिकांनी कोणते मोलाचे कार्य केले आहे, याचा तर काही उल्लेख हवा ना ? की फक्त विधानात्मक वाक्य फेकून द्यायचे ? बौद्ध साहित्याची आवश्यकताच प्रतिपादीत बसायचे ? दलित साहित्यिकांनी बौद्ध साहित्याकडे वळायचे म्हणजे नेमके काय करायचे ? जेथे दलित साहित्य संपते तेथे बौद्ध साहित्य सुरू होते, ते कसे होते ? किंवा अविकसित रूपाला विकसित करण्यासाठी काही नियम आहेत का ? काही पर्याय आहेत का ? असतील तर ते सुचवायला नकोत का ? किंवा नसतील तर असा आग्रह का ? आणि शेवटी अविकसित रूपाला विकसित करण्याऐवजी नकार देऊन संपवूनच टाकायचे का ? एखाद्या बीजाला नुकतेच अंकुर येऊ लागताच त्याला 'महावृक्ष हो' म्हणायचे, तसा आग्रह करायचा आणि नाही तर मग या अंकुरालाच नकार द्यायचा, संपवून टाकण्याचा प्रयत्न करायचा ही अशी सृजनप्रक्रिया बौद्ध वा दलित अशा कोणत्याही साहित्याची असली तर ती मानावी का ? ती तशी असू शकते का ? या सर्व प्रश्नांना तितकेच महत्त्व आहे जितके दलित साहित्याच्या होकाराला आहे. विजय सोनवणे म्हणतात, 'टीकाकारांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारावी. बहुजनहिताय बहुजनसुखाय हेच मीमांसेचे तत्त्व असावे.'

समीक्षेचे प्रकार सांगताना ते दोन प्रकार सांगतात– '१) समीक्षा प्रेरक असते व २) समीक्षा दुराग्रही आणि पूर्वग्रहदूषित अशी असते.'[७७] अशा प्रकारची विधाने करून आपले विचार तर्कशास्त्राच्या व अनुभवाच्या कसोटीवर तपासून घेण्यातच मानवहित आहे असे मीमांसेचे तत्त्व ते विशद करतात.

'तर्कशुद्ध अनुभवाच्या कसोटीवर घासून आपण आपले विचार व अनुभव तपासले पाहिजेत. बदलत्या विचाराचे स्वागत प्रत्येक समंजस साहित्यिकाने केले पाहिजे. पूर्वीपासूचें माझे मत जसे आहे तसेच मी आता ठेवणार आहे, असे म्हणणारा साहित्यिक परंपरावादी आहे'[७८] असे सोनवणे म्हणतात. विचारामध्ये परिवर्तन केले तरी चालेल, पण आपल्या तत्त्वांना सोडून जाणारे साहित्यिक वेगवेगळ्या छावण्या निर्माण करीत असतात. या छावण्यांमुळे साहित्यकृतीची समीक्षा 'समीक्षा' होत नाही, तर त्या कलाकृतीचा तो मृत्यूलेख ठरतो, अशी परस्परविसंगत विधाने सोनवणे का करतात ? एकीकडे समर्थन व दुसरीकडे विसंगत विधाने घेऊन नकार अशी त्यांची विसंगत भूमिका अवतरते. दलित साहित्याच्या नकाराची कारणमीमांसा विजय सोनवणे देत नाहीत. ती देण्याचा जो काही प्रयत्न आहे तो अगदीच तुटपुंजा आहे. एकीकडे 'दलित साहित्य हा विचार नवीन नाही. विद्रोहाचा विचार पूर्वीपासून आव्हानात्मक दृश्य स्वरूपात अस्तित्वात आहे हे सर्वमान्य आहे'[७९] अशी मान्यता ते स्वत: देतात, कारण ते 'ती आम्ही सुरू

केली असे म्हणणे म्हणजे बापाला मी जन्म दिला असे, गाजरे सोडून पाला खाणाऱ्या मुलाने, म्हटल्यासारखे होईल.'[८०] असा निर्वाळाही देतात व दुसरीकडे दलित साहित्यालाही नकार देतात.

यावरून असे दिसते की त्यांना संपूर्ण दलित साहित्याला नकार द्यावयाचा नाही, तर दलित साहित्यातील वैचारिक प्रवाहात घुसलेल्या विकृतीच्या, लाचारीच्या, मनोरंजनवादी गुलाबी अभिव्यक्तीला त्यांना नकार द्यावयाचा आहे. सोनवणेंची समीक्षा साहित्यनिष्ठ नसून ती व्यक्तिनिष्ठ ठरते ती याच कारणामुळे. त्यांना एखाद्या लेखकाच्या लेखनालाच नकार द्यायचा आहे असे स्पष्ट दिसते. कारण, संभोगाची तपशीलवार माहिती आणि विकृत वर्णनास भरपूर वाव असणाऱ्या साहित्यकृतीवर ते कडाडून हल्ला चढवितात. तो योग्यही आहे. दलित साहित्याच्या नावावर विकृत चित्रण कथा-कादंबऱ्यांतून होत असेल तर ते केव्हाही निषेधार्हच. 'व्यभिचार हा दलित साहित्याचा स्थायीभाव नाही. बंडखोर साहित्याची अभिव्यक्ती घाणेरडी नसावी.'[८१] हे सोनवणे यांचे मत मान्य केले तरी संपूर्णच दलित साहित्यात अशी घाणेरडी अभिव्यक्ती आहे का ? स्वतःचे अनुभव जसेच्या तसे मांडू नये तर काय दलित लेखकाने अनुभवाशी बेईमानी करावी ? याचाच अर्थ असा की बौद्ध साहित्याची धुरा सांभाळणाऱ्यांनी अलिकडे जे जे दलित साहित्य निर्माण होते आहे ते वाचलेले नाही. देशाच्या कानाकोपऱ्यातले साहित्य वाचावे आणि मग दलित साहित्याबद्दल बोलावे. अपुऱ्या वाचनाने किंवा एक-दोन लेखकांच्या कथाकादंबऱ्या वाचून वा मुंबईभोवती घिरट्या घालून देशभराच्या दलित साहित्याला नाकारू नये. 'सूचक शब्दांचा योग्य वापर केल्यानंतर कलाकृती उत्तम साधते' सोनवणे यांच्या या विधानात मात्र सत्य आहे.

'दलित साहित्य लोकशिक्षण देणारे साहित्य झाले नाही. कारण दलित साहित्य हे गरिबांसाठी मुळीच लिहिले जात नाही. दलित, गरीब, अस्पृश्य खेड्यापाड्यांत राहात आहेत. ते इतके दूर आहेत की त्या ठिकाणी दिवा नाही, पाणी नाही, राहावयास घर नाही, शाळा नाहीत, अशा परिस्थितीत दलितांचे प्रकाशित होणारे साहित्य त्यांच्यापर्यंत जाणार तरी कसे ?'[८२] विजय सोनवणे यांच्या या आक्षेपाला अगदी साधे उत्तर देता येईल. दलित साहित्याची निर्मिती न करता तमाशे आणि जलसे करावेत काय ? केवळ त्यानेच समाजप्रबोधन होऊ शकेल असे सोनवणे यांना वाटते काय ? आणि आजवर जशी वेगवेगळ्या लोकांसाठी वेगवेगळ्या परिस्थितीत साहित्यनिर्मिती झाली, जशी, बालकांसाठी किशोरांसाठी, तरुणांसाठी, वृद्धांसाठी, तसे गरिबांसाठी, श्रीमंतांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी दलित साहित्याची निर्मिती व्हावी, किंवा खेड्यातल्या, शहरातल्या, जिल्ह्यातल्या लोकांसाठी, त्यांच्या राहणीमानानुसार दलित साहित्य निर्माण व्हावे, असे तर सोनवणे यांना वाटत नाही ना ? तसे झाले तर वेगवेगळ्या लोकांसाठी निर्माण होणाऱ्या साहित्यांचे साचे तयार करावे लागतील व या साच्यांनुसार

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
निवेदन
वा. क्र. 3845
दिनांक 22/6/88
प्रवेश क्र. 97812

निर्माण झालेले साहित्य पुन्हा एका चौकटीतलेच साहित्य निर्माण होईल. या साहित्याने तरी सोनवणे म्हणतात तसे सामाजिक प्रबोधन होईल का ? तसे असेल तर मग बौद्ध साहित्याने कोणते सामाजिक प्रबोधन केले याचे उत्तर सापडू शकेल काय ? परिषदा आणि संमेलने, तीही मोठमोठ्या शहरांत वा जिल्ह्याच्या गावी घेतली जातात. जर एखाद्या दूर खेडेगावात किंवा अतिशय मागासलेल्या भागात बौद्ध साहित्य संमेलन आयोजित केले तर प्रबोधनाची सुरुवात चांगली होईल.

'दलित लेखकांनी सामाजिक जीवनाचा अभ्यास करून ते जीवन साहित्यात आणावे.'[८३] सोनवणे ही सूचना देतात ती हास्यास्पद आहे. पण साहित्यनिर्मिती अभ्यास करून होते का ? शेवटी जीवन-जाणिवांना काही महत्त्व असतेच ना ? अनुभवाशिवाय साहित्य वेगडी तकलादू होते, हे विजय सोनवणे यांना कळू नये याचे आश्चर्य आहे.

'स्वार्थासाठी दलितत्व टिकवले जात आहे'[८४] असा त्यांचा आक्षेप आहे. जातीयतेच्या नावावर भरडल्या जाणाऱ्या माणसांच्या या देशात कोणी स्वार्थासाठी दलितत्व टिकवेल असे वाटत नाही. 'दलित ही एक पदवी आहे, दलितत्व किती घृणास्पद, कारुण्यपूर्ण जीवन आहे' असेही ते म्हणतात. ह्या दलितत्वाचे कारुण्य खरं तर प्रस्थापितांना जाणवायला हवे, या घृणास्पद जीवनाची चीड तर प्रस्थापितांनाच यायला हवी, ज्यांनी चार वर्णांच्या अधिपत्याखाली असे जीवन आम्हाला बहाल केले व गावकुसाबाहेर लोटले. आमच्या पूर्वजांचे स्मरण म्हणून जर त्यांनी केलेल्या अत्याचाराचे व 'आज हे अत्याचार सहन करू शकणार नाही, तर संघर्ष करू, असे सांगणाऱ्या 'स्वतंत्र मन' लाभलेल्या माणसाचे दलितत्व 'पदवीला' कसे पोहचू शकेल ? स्वार्थासाठी म्हणजेच प्रसिद्धीसाठी 'दलितत्व' भांडवल होत असेल तर या देशातले संपूर्ण दलित प्रसिद्ध झाले असते. लेखनस्वार्थासाठी जर कुणी स्वत:ला दलित म्हणवीत असेल तर त्याच्या लेखनकला या खऱ्या राहणार नाहीत. तो काहीतरी काल्पनिक दु:ख ओढवून लिहील आणि मग अशा लिखाणाचा वा साहित्याचा समाचार घ्यायला, त्या साहित्यकृतींच्या तळाशी पोहचायला काही समीक्षक सरसावतील. अशा वेळेस सोनवणे यांनी भरपूर आक्षेपस्वातंत्र्य उपभोगावं, त्यासाठी 'दलितत्व' हे भांडवल आहे असे ठरवू नये. असे झाले तर सोनवणे काय वा या समाजातील इतर व्यक्ती काय, दलितांच्या नावावर मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या, सवलतीचे देखील भागीदार ठरू शकत नाहीत, कारण ते सुशिक्षित आहेत. भरपूर नाही पण आवश्यक तेवढा पैसा मिळवितातच ना ! मग त्यांचा उपयोग सामाजिक प्रबोधनाला होऊ द्यावा.

सोनवणे म्हणतात 'साहित्यातून आपण आपलीच टवाळी करीत आहोत ती बंद करावयास पाहिजे.' यासाठी ते नारायण सुर्वे यांच्या कवितेचे उदाहरण देतात. 'आपली आपणच टवाळी करू नये तर काय करावे ? साहित्यात असे टवाळी करण्याचे फॅड शिरले आहे व म्हणूनच सुर्वे जाहिरनाम्यात आपणच आपली टवाळी

करतात, इथे सुर्वांची कविता सोनवणे यांना कळलीच नाही. सुर्वे कोणत्या संदर्भात टवाळी करून म्हणतात याचा तपास प्रथम करावा. विजय सोनवणे यांनी दलित साहित्याला दिलेल्या नकाराची कारणमीमांसा अपुरी आहे व जी आहे ती अशी विधानात्मक, पूर्वग्रहदूषित, व्यक्तिनिष्ठ आहे.

भाऊसाहेब उर्फ टी. पी. अडसूळ यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य' या पुस्तकातूनही 'आंबेडकरी प्रेरणा+निर्मिती=बौद्ध साहित्य' असाच सूर सापडतो. बौद्ध साहित्याचे नेककेपण सांगितले गेलेले नाही, उलट अर्ध्याअधिक पानावर म. बौ. साहित्य परिषदेच्या कार्याचा वृत्तान्त, चित्रे आदींचा तपशील आहे. हरीश खंडेराव यांच्या 'डॉ. आंबेडकरी कवितेचे अंतरंग' यात दलित कवितेची सुजाण तमीक्षा आहे. ही समीक्षा महत्त्वाची आहे.

या सर्वांच्या व्यतिरिक्त ज्या ज्या अन्य दलित लेखकांनी, समीक्षकांनी वेळोवेळी समीक्षा लिहिली त्याचा उल्लेख करणेही आवश्यक आहे. दलिताचे जग: वेदना आणि शिष्टाई (ना. रा. शेंडे), डॉ. आंबेडकर आणि धम्मक्रान्ती (वसंत मून), सामाजिक एकात्मतेची वाटचाल (इ. बी. कांबळे), आंबेडकर तत्त्वज्ञान: प्रचीती आणि आविष्कार (ताराचंद्र खांडेकर), सामाजिक विचारमंथन (भाई माधवराव बागल), हिंदुधर्म आणि अस्पृश्यांचा अभ्युदय आणि बौद्ध तत्त्वज्ञान काळाची गरज (म. वि. लभाने), तसेच भाऊ लोखंडे, मा. फ. गांजरे. दया पवार, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, आदींच्या समीक्षालेखानाने मराठी दलित साहित्य-समीक्षेची क्षितिजे विस्तृत होण्यास सहाय्य झाले आहे.

दलित समीक्षकांनी कोणतीही भूमिका स्वीकारलेली असो ती आंबेडकरी प्रेरणा, प्रवृत्ती व तत्त्वज्ञानाला छेद देणारी झालेली नाही एवढे मात्र खरे.

निष्कर्ष

१) दलित साहित्याची समीक्षा करणाऱ्या समीक्षकांनी दलित साहित्याचे जनकत्व डॉ. आंबेडकरांकडे दिले आहे. ते दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत.

२) अगदी सुरुवातीच्या काळात दलित जीवनाचे समर्थ चित्रण करणारे अण्णा भाऊ साठे होत. त्या आधी डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' 'बहिष्कृत भारत', 'जनता' इत्यादी त्यांनीच चालवलेल्या नियतकालिकांमधून वैचारिक लिखाण केले. हे लिखाण म्हणजे एक प्रकारे समीक्षाच ठरते. 'बहिष्कृत भारता'-तला एक एक लेख म्हणजे समाजप्रबोधनाचा एक एक महामंत्र ठरणारा आहे.

३) बाबासाहेबांच्या चळवळीच्या प्रचारार्थ जे साहित्य निर्माण झाले ते सामाजिक विचारमंथनाला भाग पाडणारे ठरले. दलित समाज जागा होऊ लागला. या साहित्यानेच पुढे हिंदु समाजरचनेविरुद्ध, धर्मकर्मकांडाविरुद्ध, ब्राह्मणी प्रवृत्तीविरुद्ध बंड पुकारले. या बंडाचा इतिहास दलित साहित्य झाले. विद्रोह हा दलित वेदनेचा महामंत्र ठरला.

४) दलित साहित्याला अनुकल लिहिणारे कितीतरी समीक्षक आहेत. पण

प्रतिकूल समीक्षा करणारी काही मंडळी दलित साहित्य क्षेत्रामध्ये अकारण वाद निर्माण करू लागली. मार्क्सवाद, आंबेडकरवाद, बौद्धवाद माजवू लागली. बौद्धवाद सांगणारी व दलित साहित्य नाकारणारी माणसं तशी बोटावर मोजण्याइतकीच; पण आंबेडकरवाद विरुद्ध मार्क्सवाद असा तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, त्याला प्रत्युत्तरही दिले गेले.

५) दलित समीक्षकांनी आपले दलित साहित्य समीक्षेवरचे मूल्यवान विचार काही स्फुट लेखांतून व ग्रंथांतून विशद केले. दलित साहित्य समीक्षा करताना, समीक्षेच्या कसोटचा कोणत्या, मूल्यमापनाची पद्धती कशी असावी व कोणकोणत्या निकषांवर वा मूल्यविचारांवर समीक्षा करावी याविषयीचा विचार मांडलेला दिसतो.

६) साहित्यातील जाणिवा, त्यांचे नेमके रूप, वेगळेपण व दलित कलाकृती-तील वास्तवता, अनुभवाची व्यापकता व भाषेच्या, तंत्राच्या चौकटीत न बसवता केलेली साहित्यनिर्मिती आणि तिचा विचार दलित साहित्य समीक्षकांनी आपापल्या परीने मांडलेला दिसतो.

७) दलित साहित्याला अनुकूल समीक्षा आली तशी प्रतिकूलही समीक्षा केली गेली. 'दलित साहित्य नको, बौद्ध साहित्य हवे' हाही विचार घेऊन काही समीक्षक पुढे आलेत, पण हा विचार तेवढा प्रभावी होऊ शकला नाही, कारण त्याची समाधानकारक कारणमीमांसा समीक्षकांना देता आली नाही.

८) शेवटी असा निष्कर्ष निघतो की, माणसाचा व त्याच्या शोषणाचा विचार आंबेडकरवाद, मार्क्सवाद व बुद्धवाद हे तीनही 'वाद' करीत असल्यामुळे या तीन तत्त्वज्ञानांचा गाभा एकच आहे, तो म्हणजे माणसाची शोषणापासून मुक्ती. दलित साहित्य या मानवमुक्तीचा पुरस्कार करते.

९) यावरून दलित साहित्य मानवमुक्तीचा संदेश देणारे ठरते.

o o

४ : दलितेतर समीक्षकांची दलित साहित्य-समीक्षा

मराठी साहित्यात दलित साहित्याला साऱ्याच पांढरपेशा किंवा प्रस्थापित समीक्षकांनी नकार दिला असे म्हणता येणार नाही. दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवविश्वात ते वावरले नसतील, तसे जीवन त्यांच्या वाटचाला आले नसेल हे त्यांचे सद्भाग्य मानले, तरी दलित साहित्याविषयी काही मंडळींनी जाणकारपणा दाखविला आहे. अत्यंत तटस्थ भूमिकेतून, अगदी ठामपणाने, आस्थेवाईकपणें व चिकित्सक पद्धतीने या साहित्याची समीक्षा त्यांनी केली आहे. ती खूप व्यापक आहे, विस्तृत आहे असेही म्हणता येणार नाही. मात्र दलित जाणिवेच्या स्वरूपाची दलितेतर समीक्षकांनी केलेली मीमांसा महत्त्वाची नि मोलाची ठरते.

१९६९ सालच्या 'मराठवाडा'च्या दिवाळी अंकात एका परिसंवादाचे आयोजन होते, त्यात डॉ. म. ना. वानखडे, प्रा. म. भि. चिटणीस, दया पवार, बाबुराव बागुल आदींनी आपले विचार व्यक्त केले होते. या परिसंवादात प्रस्तुत लेखकांची परंपरांना धक्के देणारी विधाने होती, परंपरा नाकारण्याची त्यांची कारणमीमांसा होती. या नाकारण्याच्या वृत्तीमुळे काही धर्मपरंपरावादयांनी वादळ माजविण्याचा प्रयत्न केला व इथूनच चर्चा सुरू झाली. दलित साहित्याला विरोध करणारे दलित, दलितेतर निपजले असताना मोठ्या धैर्याने व हिरीरीने दलित साहित्याचे ज्यांनी समर्थन केले त्या समीक्षकांत वा. ल. कुळकर्णी, दि. के. बेडेकर, रा. ग. जाधव, म. भि. चिटणीस, शरदच्चंद्र मुक्तिबोध, नरहर कुरुंदकर, डॉ. भालचंद्र फडके आदींचा समावेश होतो.

काही प्रस्थापित समीक्षकांनी ढसाळ, पवार, बागुल यांच्या साहित्याचे मनःपूर्वक स्वागत केले. मात्र दलित साहित्याकडे सारेच प्रस्थापित समीक्षक चांगल्या दृष्टीने बघतात असे नव्हे. काहींनी दलितांच्या जाणीवकळा, त्या कळांमागचा संदर्भ बघण्याचे टाळले व दलित साहित्याकडे ते सवतीच्या नजरेने बघू लागले. प्रस्थापित समीक्षकांनी साहित्यकृतीच्या संदर्भात कसाही विचार केला तरी एक मात्र खरे की त्यांनी जसे 'चक्र' किंवा 'माहीमच्या खाडी'चे स्वागत केले तसेच किंवा त्याहून जास्तच बागुलांच्या कथेने त्यांना झपाटले होते. त्यांनी त्यांच्या इतर साहित्याचे देखील स्वागत केले, ते त्यातून प्रगट होणाऱ्या अनुभविश्वामुळेच. पण या अनुभवविश्वावरोबरच जेव्हा साहित्यकृतीची निर्मिती सांगण्याचा प्रयत्न होऊ लागला तेव्हा मात्र याच समीक्षकांनी त्या साहित्यकृतीवर टीकेची

झोड उठवली. या संदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात, 'काही समीक्षकांना किंवा टीकाकारांना जोपर्यंत दलित साहित्यातील किंवा बागुलांच्या कथेतील भेदक अनुभवविश्व दिसू लागले होते तोपर्यंत ती कथा किंवा ते साहित्य उच्च दर्जाचे होते. परंतु बागुल जेव्हा दलित साहित्याची, आपल्या कथावस्तूंची निर्मिती सांगू लागले, त्या निर्मितीचा उगम विशिष्ट सामाजिक परिस्थितीत आहे असे सांगू लागले, त्यांची वैचारिकता जेव्हा बदलाची भाषा बोलू लागली, परंपरा नाकारू लागली, विद्रोह–नकार–विज्ञानष्ठा या मूल्यांचा स्वीकार करू लागली, हिंदू मानसिकतेच्या विरोधात उभी राहिली तेव्हा त्यांची श्रेष्ठ कथा त्याच समीक्षकांना मूल्यहीन व प्रचारी वाटू लागली.'[1] अशा समीक्षकांना वगळले तरी ज्यांची सहानुभूती अगदी प्रामाणिक होती असेही काही समीक्षक दलित साहित्याची मन:पूर्वक मीमांसा व समर्थन करतात. त्यांच्या समर्थनामध्ये निरनिराळ्या छटा असल्या तरी दलित साहित्याचे मूल्यमापन करताना ते नव्या निकषांचा उच्चार करतात, नव्या जाणिवेशी समरस होण्याचा प्रयत्न करतात. या दलित जाणिवांचा विचार करताना काही समीक्षक कलाकृतीत व्यक्त होणाऱ्या जाणिवांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात, त्या जाणिवांशी संवाद साधण्याचा, त्यांचे रूप समजून घेण्याचा प्रयत्न करतात. ह्या प्रयत्नाला मराठी साहित्याच्या इतिहासात व दलित साहित्याच्या भविष्यात मोलाचे स्थान आहे.

या दलित जाणिवेविषयी काही दलितेतर समीक्षकांचे विचार असे–

गो. पु. देशपांडे

श्री. गो. पु. देशपांडे यांनी या दलित जाणिवेचे स्वरूप सांगताना म्हटले आहे, 'नागर संवेदनेपलीकडे एक दलित संवेदना आहे. ह्या दलित संवेदनशीलतेला जाणवणारे वास्तव स्वाभाविकपणेच भिन्न असणारे आहे. दलित साहित्याचे वेगळेपण ह्या दलित संवेदनशीलतेमुळे आहे. दलित साहित्य हा प्रकार आपण मानतो तेव्हा ह्या संवेदनशीलतेचे स्वतंत्र व स्वयंभू असे अस्तित्व मानतो मराठी साहित्यात ही संवेदनशीलता नवी आहे.'[2] अशा प्रकारे दलित जाणिवेचे निराळेपण, नवेपण सांगण्याचा प्रयत्न देशपांडे करतात.

प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

'दलित जाणीव ही समाजजाणिवेत अनुरूप परिवर्तन करू पाहणारी जाणीव आहे. म्हणून ती जशी विद्रोहात्मक तशीच मूलत: आशावादी व क्रान्तिकारी जाणीव आहे' असे जाणिवेचे रूप ते सांगतात. पुढे तिचे आणखीही एक रूप साकारतात. ते म्हणतात, 'विवक्षित सामाजिक वास्तव, त्याची सुस्पष्ट कारणमीमांसा, त्या वास्तवाच्या परिवर्तनाचा आशावादी दृष्टिकोण व त्याबद्दलची तीव्र आस्था म्हणजे दलित जाणीव होय.'[3]

प्रा. नरहर कुरुंदकर

कुरुंदकर दलित जाणिवेचे स्वरूप विशद करताना म्हणतात, 'दलित साहित्य ही मी केवळ वाङ्मयीन चळवळ समजत नाही, तर ती एक जीवनदृष्टी मानतो. प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भीतिशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे अशा भूमिकेतून निर्माण झालेली एक जीवनदृष्टी वाङ्मयात अभिव्यक्त होत आहे, त्याला मी दलित साहित्य मानतो.'[४] कुरुंदकर दलित जाणिवेतून दलित साहित्याचा वेध घेतात.

प्र. श्री. नेरुरकर

दलित जाणिवेसंबंधी प्र. श्री. नेरुरकर म्हणतात, 'दलित साहित्याच्या व साहित्यिकांच्या निष्ठा या संपूर्णपणे मानवकेंद्रित व मानवनिष्ठ आहेत. इहलोकात माणसांपेक्षा आणखी कोणतीही काल्पनिक वा ऐच्छिक वस्तू महान असू शकत नाही. जी संस्कृती, जो समाज, जे साहित्य माणसाला लहान करते, त्याला शूद्र व क्षुद्र लेखते, त्याला आर्थिक व सामाजिक अवमानित, पतित व दलित जीवन जगायला भाग पाडते त्या संस्कृतीविरुद्ध, त्या समाजाविरुद्ध, त्या साहित्याविरुद्ध ठोकलेली पहिली आरोळी, केलेली पहिली गर्जना, केलेला पहिला आक्रोश म्हणजेच दलित साहित्याचा ऐतिहासिक उठाव होय.'[५]

दलित साहित्याच्या संदर्भात प्रतिकूल-अनुकूल चर्चा होत असताना वरील समीक्षकांनी अतिशय खंबीरपणे दलित साहित्यात आपले वेगळे, नवे रूप घेऊन अवतरणाऱ्या दलित जाणिवेचे रूप अशा प्रकारे चितारले. या जाणिवांशिवाय दलित साहित्याला समृद्धी नाही. ही जाणीव ज्वलंत, दाहक, मारक, आशावादी, क्रान्तिकारक, बंडाचा झेंडा उभारणारी, बंडखोर, जिवंत, वास्तव, स्वतंत्र, स्वयंभू, सत्त्वशील अशी आहे. ईश्वराला नकार देणारी, आत्मा नाकारणारी, माणूस म्हणून जगण्यासाठी 'माणूसपण' मागणारी, स्वतंत्रतेचे व मानसिक स्वातंत्र्याचे भान असणारी, आत्मबळ जागणारी, स्वत्व कायम राखणारी, अशी ही वैशिष्ट्यपूर्ण जाणीव आहे व या जाणिवेतून जे साहित्य अवतरले आहे ते दलित साहित्य होय.

अशा या दलित साहित्याची समीक्षा करताना त्यातून दोन दिशा स्पष्ट दिसतात-एक म्हणजे साहित्यप्रकाराची मीमांसा व दुसरी या मीमांसेतून निर्माण होणारे सौंदर्यशास्त्र व सौंदर्यविचार.

साहित्यनिर्मिती ही जाणिवेतून, जीवनानुभवातून होते. हे जीवनानुभव घ्यायला जेवढे कठीण तेवढे चित्रणासाठी सोपे. कारण आवडत्या साहित्यमाध्यमातून त्याचे चित्रण करता येते. अर्थात आपआपल्या शैलीनुसारच. पण या साहित्यकृतीची समीक्षा करणे म्हणजे निर्मितीलाच आव्हान देणे ठरते. वैचारिक लेखन करताना बुद्धीला कुठेच भटकू द्यावे लागत नाही. जो विचार मांडावयाचा असतो तो बुद्धीशी व आपल्या भावभावनांशी, वृत्तींशी निगडितच असतो. शैली, भाव-

भावना, वृत्तीवरून समीक्षकांची 'भूमिका' तयार होत असते. या संदर्भात यशवंत मनोहर म्हणतात, 'वैचारिक वाङ्मयाची निर्मितिप्रक्रिया तर्कानुमानाधिष्ठित असते. ललित वाङ्मयाचीही निर्मिती ही भावनिक तर्कानुमानावरच उभी असते. विचार, भाव आणि संवेदना यांनी युक्त किंवा केवळ भावसंवेदनांनी युक्त असा अनुभव ललित वाङ्मयात कालानुरूपत्व पावू शकतो. ललित वाङ्मयात विचारही येऊ शकतो. पण तो अमूर्त पद्धतीने आलेला विचार ललित वाङ्मयात सार्थक्य पावत नसतो. वैचारिक लेखनात अमूर्त विचारांची तार्किक संघटना असते.'[६]

दलित साहित्यिकांत वैचारिक लेखन करणारे फारच थोडे लेखक आहेत. जे आहेत त्यांचे लेखन सारेच मूल्यवान विचार व दलित साहित्याची तात्त्विक भूमिका मांडणारे आहे असे नाही. काही जुजबी समीक्षण पुस्तकपरीक्षणाच्या दृष्टीने केलेल्या वृत्तपत्रीय नोंदीप्रमाणे आहे. जी मौलिक समीक्षा आहे तिच्यात म. भि. चिटणीस, रा. ग. जाधव, शरच्चंद्र मुक्तिबोध, गं. बा. सरदार, भालचंद्र फडके आदींचा समावेश होतो. दि. के. बेडेकर यांनीसुद्धा दलित साहित्याविषयी मोलाचे विचार मांडले आहेत. ते आज हयात असते तर त्यांनीही प्रामाणिकपणे दलित साहित्याची समीक्षा केली असती. दि. के. बेडेकरांचा दलित साहित्यासंबंधीचा विचार 'दलित साहित्य आणि माणुसकीची जिद्द' या भूमिकेतूनच आहे. 'दलिताचे साहित्य : जाणिवा, प्रवृत्ती आणि प्रेरणा' (दै. 'मराठवाडा' दिवाळी अंक १९६९) या परिसंवादातून त्यांनी व्यक्त केलेले विचार दलित साहित्यसमीक्षेच्या संदर्भात मोलाचे आहेत.

याव्यतिरिक्त काही लेखकांनी दलित साहित्याविषयी, दलित जाणिवेशी समरस होण्याचा प्रयत्न करीत दलित साहित्याची व्याख्या केली आहे.

पु. ल. देशपांडे

'अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल हे सर्वांत मोठे असते. सामान्यांच्या भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य होय.'[७] असे पु. ल. देशपांडे म्हणतात. त्यांच्या म्हणण्यात किती सत्यता आहे हे त्या काळात दलित साहित्यात चित्रित झालेल्या विदारक अनुभवविश्वावरून लक्षात येते. या अनुभवविश्वात दलित लेखकाचे मन, मरण, त्याच्या वेदना-संवेदना चित्रित होत असतात आणि दलित जाणिवा वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साकार होत असतात.

प्रा. नरहर कुरुंदकर

'जे आहे ते उलथून टाकण्याची जिद्द धरणारे मन, मूल्यांची कोणतीतरी कल्पना मनाशी धरणारे, नव्या जगाचे कोणतेतरी स्वप्न पाहणारे मन असते. त्या मनाला एक ताठरपणा असतो. मोडून पडलेली मने कण्हू शकतात. त्या कण्हण्याचा प्रामाणिकपणा मान्य करून आपण पुढे जातो. त्या वाङ्मयाचे कलामूल्य ठरवून

टाकतो. पण ही मने खऱ्या अर्थाने बंडखोर नसतातच. बंडखोरीला प्रस्थापित मूल्यांशी बंडखोरी एवढा एकच पदर नसतो, तर काही सार्वजनिक मूल्यांवर श्रद्धा हा दुसराही पदर असतो.'[८] असे कुरुंदकर म्हणतात. याचाच अर्थ असा की दलित लेखकाने मध्यमवर्गीय वृत्तीला नकार दिला पाहिजे असे कुरुंदकरांचे स्पष्ट मत दिसते.

डॉ. सदा कऱ्हाडे

डॉ. सदा कऱ्हाडे 'दलित कोण ?' या संदर्भात म्हणतात, 'आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्टया मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते दलित.' डॉ. कऱ्हाडेंनी दलितांचा आर्थिक दृष्टिकोणातून विचार मांडला. यात त्यांची वर्गवादी दृष्टी दिसते. शोषक आणि शोषित असे दोन वर्ग त्यात दिसतात. डॉ. कऱ्हाडे दलित साहित्याविषयी बोलताना म्हणतात, 'दलित साहित्याला पुरोगामी म्हणायला काहीच हरकत नाही. कारण मार्क्सवादी तेवढेच पुरोगामी साहित्य नव्हे. अर्थात पुरोगामी साहित्य मार्क्सवादी असू शकते यात शंका नाही. मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांचा आपण समन्वय करू शकलो तर नक्कीच समाजाला काहीतरी देऊ शकू.'[९] आंबेडकरवाद व मार्क्सवाद वेगळा मानणें चांगले नव्हे, या दोहोंना एकत्र करायला पाहिजे, असा विचार कऱ्हाड व्यक्त करतात.

वि. वा. शिरवाडकर

यांत्रिक युगामुळे निर्माण होत असलेल्या वर्गपद्धतीचे स्वरूप दृष्टीपुढे असल्या-मुळे शिरवाडकरही वर्गीय दृष्टीनेच विधान करतात. ते म्हणतात, 'ब्राह्मणांपासून बौद्धांपर्यंत सर्व जातीत कमी-अधिक प्रमाणात दलित वर्ग पसरलेला आहे.'[१०] त्यांच्या विचारांवर मार्क्सच्या वर्गवादाचा परिणाम झालेला दिसतो.

वसंत पळशीकर

शिरवाडकरांप्रमाणेच पळशीकरांचे सुद्धा तसेच मत आहे. त्यांच्याप्रमाणेच पळशीकर दलित साहित्याकडे आर्थिक दृष्टिकोनातून पाहतात. ते म्हणतात, 'दलितांमध्ये महार व नवबौद्ध आहेत तसे इतर पूर्वास्पृश्य जातीचे लोक आहेत. इतकेच नाही तर, आदिवासी व सवर्ण जातींचे लोक पण त्यात मोडतात.'[११]

वि. द. घाटे

'दलित वाङ्मय लिहायची विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नसून ती सर्वांची आहे. ज्यांना जाणिवा आहेत, ज्यांना दलितांची दुःखसमस्या समजली आहे त्या कुणालाही दलितांबद्दल लिहिण्याचा हक्क आहे. सरस्वतीच्या दरबारात कुणालाही मनाई नाही.' असे महाबळेश्वर येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संमेलनातील 'दलित साहित्य' परिसंवादात बोलताना घाटे म्हणाले होते. यावरून घाटे यांना

हे नोंदवायचे आहे की, असे लिहिलेले साहित्य 'दलित साहित्य' होईल. याच परिसंवादात भाग घेताना सुप्रसिद्ध कवी अनिल म्हणतात, 'दलितांच्या जीवनाची संवेदनशील जाणीव घेऊन लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.' पण ही संवेदनशील जाणीव मराठी ललित लेखकांच्या मनातही जन्म घेते का व घेत असली तर तिचे रूपही या जाणिवेसारखे असते का, याचा विचार ते मांडत नाहीत.

प्रा. राम शेवाळकर

'मराठी साहित्यात फक्त चार-पाच टक्के लोकांच्याच जीवनाचे चित्रण येते. आता दलित साहित्य आले. पण तें सर्व दलितांचे आलेले नाही. जागृत बौद्धजनच फक्त येत आहेत. अजून कष्टकरी आदिवासी यावयाचे आहेत. ग्रामीण भागाचे अजून चित्रण झालेले नाही.' [१२] शेवाळकरांच्या या म्हणण्यामागील एक अर्थ लक्षात येतो की, दलित लेखकांनी आपल्या अनुभवविश्वाची वाढ केली पाहिजे. आणि या अनुभवाला वास्तववादी कलात्मक आविष्कार दिला पाहिजे.

आजच्या दलित लेखकांपुढे हाच सवाल उभा आहे. त्याचा विचार व्हावा असे वाटते.

सुधीर बेडेकर

दलित साहित्य या संकल्पनेचे स्वरूप विशद करताना बेडेकर दलित साहित्याविषयी म्हणतात, 'दलित साहित्य हा अशा लोकांचा संताप, त्यांचा विद्रोह व त्यांच्या मानवतावादी दृष्टीचा उद्रेक आहे, ज्यांना इतिहासात पुन्हा जायचे नाही; कारण या देशाचा इतिहास भयानक आहे, माणूसपणाच्या प्रेतावर रचलेला आहे.' [१३] अशा प्रेतावर रचलेल्या इतिहासापासून दूर जाण्यासाठी, नवा माणूस, नवे साहित्य घडविण्यासाठी दलित साहित्य निर्माण झालेच पाहिजे, व्हायलाच पाहिजे असा सुधीर बेडेकरांचा दृष्टिकोण आहे.

दलित साहित्याविषयी दलितांबरोबरच दलितेतरांना वाटणाऱ्या जिव्हाळ्याचे प्रत्यक्ष दर्शन त्यांच्या वरील काही व्याख्यांवरून, त्यांच्या मौलिक विचारांवरून लक्षात येते. त्यांनी दलित साहित्याची चर्चा अत्यंत समंजसपणे केली आहे. नव्याचे स्वागत केलेच पाहिजे या भूमिकेतून केली आहे. याउलट काही दलितेतरांची समीक्षा मात्र पूर्वग्रहदूषित आहे. काहींची दृष्टी अगदी मत्सराची, द्वेषाची आहे. याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे महाबळेश्वर येथे १९६९ साली झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या दुसऱ्या विभागीय संमेलनात दलित साहित्यावर व्यक्त केलेले पांढरपेशी वृत्ती जोपासणारे विचार व वेगवेगळ्या ठिकाणी या साहित्यावर घेतले गेलेले, घेतले जाणारे आक्षेप होय. दलित साहित्याविषयी तात्त्विक भूमिका न मांडता, त्याच्यातल्या गुणदोषांची (साहित्यकृतीत अभिव्यक्त झालेल्या पात्रांची, घटनांची इ.) चर्चा न करता दलित साहित्याची वेगळी चूल कशाला, दलित साहित्याने पूर्व इतिहासाचा काळा कोळसा का उगाळावा, आदि

प्रश्न उपस्थित केले जातात, आणि या प्रश्नांची उत्तरे दलितांबरोबर काही दलितेतर समीक्षकही देऊ बघतात. अशा काही समीक्षकांच्या समीक्षेविषयी विचार करणे आवश्यक ठरते.

काही ठळक दलितेतर समीक्षक

दलित साहित्यविषयक वैचारिकता आणि चिंतनशीलता, दृष्टीची व्यापकता अन् विचारांची सखोलता, दलित साहित्याची भूमिका अन् दलित जाणिवेची शब्दकळा यांचा परामर्श ज्या दलितेतर समीक्षकांनी घेतला आहे त्यांच्या समीक्षेला मराठी दलित साहित्य समीक्षेत तितकेच मोलाचे स्थान आहे, जितके दलित समीक्षकांचे. यांपैकी काही समीक्षकांनी आपल्या वेगळ्या दृष्टिकोणातून या साहित्याची समीक्षा केली आहे. उदा. मार्क्सवादी, साम्यवादी, पुरोगामी भूमिकेतून समीक्षा केली आहे. त्यांचा विचार अवश्य मोलाचा ठरतो.

१) डॉ. म· भि. चिटणीस

१९२० सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आंदोलनातले एक निष्ठावंत कार्यकर्ते व दलितमुक्ती लढ्यातले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी म्हणून डॉ. म. भि. चिटणीसांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. तसेच दलित समीक्षेच्या क्षेत्रात आपल्या विचारांची भर घालणारे एक श्रेष्ठ समीक्षक म्हणूनही त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले व बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हा सोहळा नागपूरला तेथील दीक्षाभूमीवर लाखो लोकांच्या उपस्थितीत झाला. या धम्मचक्र प्रवर्तनाच्या दिनी चिटणीसांचे 'युगयात्रा' हे नाटक लाखो लोकांनी पाहिले, वाखाणले. चिटणीसांचा दलितांविषयीचा कळवळा, त्यांचा जिव्हाळा, त्यांची दलित समाजाकडे स्वच्छ मनाने बघण्याची दृष्टी 'युगयात्राने' सिद्ध करून दिली आहे.

'ज्या धर्मात माणूस म्हणून जगता येत नाही त्या हिंदू धर्माच्या नावाने रडत बसण्यापेक्षा ज्या धर्मात प्रज्ञा, शील, करुणा आहे, शिस्त, संघटना, सौजन्य आहे, त्याचा स्वीकार करावा' या बाबासाहेबांच्या मताचा त्यांनी पुरस्कार केला. या मतासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. औरंगाबाद येथील 'अस्मितादर्श' मेळाव्याचे उद्घाटन करताना ते म्हणतात, 'ज्या लेखकाचे अनुभवविश्व समाजात उगम पावते आणि ज्याचे श्रेय आणि प्रेय समाजाशीच अविच्छिन्नपणे निगडीत आहे त्या पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य लेखकाला आपल्या धर्मप्राप्त दर्जाची जाणीव आत्माविष्कारातही रहावी, यात नवल ते काय ? विशेष हा की, ही जाणीव त्यांच्या लेखनाला एक वेगळेच परिमाण व धार देते. त्यांचा आत्माविष्कार व्यक्तिनिष्ठ न राहता समष्टिनिष्ठ होतो'[१४] असा विचार ते बोलून दाखवितात. 'दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांची नाळ ही समाजाशी जोडलेली असते. म्हणून त्या अनुभवांचे आकलन करताना सामाजिक दृष्टिकोणच स्वीकारला पाहिजे. त्याशिवाय त्या अनुभवांची जाण आपल्याला होऊ शकत नाही. दलित

लेखकाचे अनुभवविश्व सर्वथा स्वतंत्र व वेगळे आहे. प्रस्थापितांच्या अनुभवांपेक्षा ते निराळे आहेत. दलितांना आजही येणारे अनुभव, जातीयतेचे दाहक चटके, आर्थिक दृष्टचा मागासलेपण सांगणाऱ्या इतर कोणत्याही समाजाच्या वाटचाला न येणारे, अनुभवाला न येणारे आहेत. म्हणूनच दलित म्हणजे केवळ आर्थिकदृष्टचा मागासलेला, मग तो कोणत्याही समाजाचा–वर्गाचा असो, अशी जी व्याख्या केली जाते ती चूक ठरते. आर्थिकदृष्टचा मागासलेपणापेक्षा जातीच्या नावावरून रूढी-मुळे, संस्कारामुळे येणारे अनुभव कितीतरी दाहक असतात.' या संदर्भात चिटणीस म्हणतात, [१५] 'अस्पृस्यतेच्या रूढीमुळे दलितांना शतकानुशतके आलेले व आजही येणारे अनुभव आणि त्यांची माणुसकीच प्रश्नांकित करणारे कटू अनुभव, त्यांच्या भावनिक प्रतिक्रियेची तीव्रता ही आर्थिकदृष्टचा दलित असणाऱ्यांच्याही कधीच वाटचास येणार नाही. म्हणून दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे, नकाराचे, विद्रोहाचे रूप सर्व बाजूंनी नीट समजावून घेतल्याशिवाय ते कलात्मक कसोटचांना उतरत नाही, असा निर्णय देणें म्हणजे त्या साहित्यावर अन्याय करणारे ठरेल.'[१६]

डॉ. आंबेडकरांनी दलितांतून नवा माणूस घडवलेला आहे. मरगळलेल्या मनामनात संजीवनी ओतली आहे. 'माणूस' म्हणून जगण्याचे एक नवे भान दिले आहे. अशा जागृत माणसाचे साहित्य मराठी समीक्षेला आव्हान देत आहे. अशा परिस्थितीत या साहित्याकडे पाहण्याची जी पारंपरिक रूढ दृष्टी आहे ती बदलली पाहिजे. म्हणून प्रा. चिटणीस म्हणतात, 'मराठी समीक्षा हे मराठी साहित्यात वाढलेले बांडगूळ आहे.'[१७]

दलितांच्या जीवनजाणिवा अभिव्यक्त करण्यासाठी नव्या भाषेची व नव्या रूपाची आवश्यकता आहे, असे चिटणीसांना वाटत होते. अस्पृश्यतेचे ओझे नाहीसे करा म्हणजे मन आणि वाङ्मय स्वच्छ होईल, असे ते अस्मितादर्शच्या चर्चेत सहभागी होताना म्हणतात. दलित साहित्याची समीक्षा सुजाणपणे करताना चिटणीस म्हणतात, 'दलित साहित्याची प्रेरणा साम्यवादी प्रेरणेपेक्षा वेगळी आहे. सामाजिक लोकशाही, समाजपरिवर्तन, जातिवर्णभेदाचे निर्मूलन यांना त्यांच्या तात्कालिक साच्यात प्राधान्य लाभतें. साम्यवाद आणि समाजवाद यात एकजिनसी समाजाचे अस्तित्व धरलेले आहे असे मत डॉ. आंबेडकर मांडत असत. यावरून असे दिसते की, दलित साहित्य व साम्यवादी प्रेरणा निराळचा आहेत.'[१८]

कोटचावधी लोक सामाजिक गुलामगिरीत जगत असताना, दैन्यात आणि दारिद्रचात खितपत असताना तो प्रतिष्ठित लेखकांच्या कलाकृतीचा विषय होऊ नये याचे वैषम्य त्यांना आहे. प्रत्येक जात ही जणू काही स्वतंत्र जगासाठी स्वयंपूर्ण आहे. म्हणूनच साहित्यिकांची अनुभूती आपापल्या जातीच्या मर्यादेपलिकडे जात नाही अशी खंतही ते व्यक्त करतात. प्रस्थापितांच्या मक्तेदारीला आव्हान म्हणजे इथली लोकशाही शासनपद्धती. पण हचा आव्हानाच्या विस्तृत, विराट स्वरूपाच्या जाणिवेला प्रस्थापित साहित्यिकांनी कधीच जाणले नाही. ते फक्त राजकीय

क्षेत्रातील जातीयतेविषयी लिहितील, तीव्रतेने बोलतील. परंतु ही जातीयतेची भावना बोथट करण्याचे कार्य यापूर्वीही त्यांनी केले नाही व आताही त्यांच्या हातून ते घडत आहे असे दिसत नाही. 'सामाजिक परिवर्तन घडविण्यात साहित्याचा फार मोठा वाटा असतो. वर्तमान आणि भावी सामाजिक तणावाची चाहूल त्यांच्या संवेदनक्षम मनाला अगोदरच लागते. जगातील साहित्याचा हा अनुभव आहे आणि आपल्या साहित्यात हे घडत नाही, याचे कारण आपल्या मनावरची जातिव्यवस्थेची पकड होय.'[१९] असे स्पष्ट तितकेच निर्भीड मत ते व्यक्त करतात व या संदर्भात दलित साहित्याची चर्चा करतात.

दलित साहित्यात येणारा विद्रोह व नकार अवाजवी व अतिरेकी आहे, असे समजणाऱ्यांसाठी ते स्पष्टपणे म्हणतात, 'हिंदू धर्मातील अन्यायाचे ओझे अद्यापि त्यांच्या पाठीवर आहे आणि जोपर्यंत बौद्ध धर्म स्वीकारूनही यांच्या पाठीवरील अन्यायाचे ओझे हलके होण्याऐवजी वाढतच राहिले तर त्यांच्या जाणिवांत बौद्ध धर्माच्या प्रभावापेक्षा हिंदू धर्म व संस्कृतीची प्रतिक्रियात्मक चीडच अधिक होत राहील.'[२०] या उद्‌गारांमागे चिटणीसांची मार्मिकता दिसून येते. या विधानाने दलित साहित्यावर आक्षेप घेणाऱ्या दलितेतर टीकाकारांचे तसेच दलित साहित्य नको म्हणणाऱ्या दलितांचेही डोळे उघडले जातील.

दलितांच्या जीवनजाणिवा व्यक्त करायला नव्या भाषेची, नव्या रूपाची गरज त्यांना भासत नाही. कारण 'दलित समाज हा वांशिकदृष्ट्या दलितेतर समाजाहून वेगळा नाही. त्याची भाषा, संस्कृती हीसुद्धा समानच आहे. फरक एवढाच की त्या संस्कृतीपासून तो दीर्घकाळ वंचित ठेवला गेला होता. आता त्या संस्कृतीची सर्व दालने मोकळी झाली असताना भाषा व संस्कृतीसंबंधी दुरावा न मानता त्यांचाच वारसा तो पुढे चालू ठेवील.'[२१] असे कारण ते भाषा व नव्या रूपासंबंधी देतात.

"Poem for its own sake" असे म्हणणाऱ्या टीकाकाराची भूमिका चिटणीस मान्य करीत नाहीत. कारण देताना ते म्हणतात, "गुलाबाचे फूल म्हणून आपण त्याचे सौंदर्य ग्रहण करू शकतो तसे कवितेच्या वा कलाकृतीच्या बाबतीत नाही, कारण काव्यात शेवटी अर्थ असतो, ज्या वेळेस आपण कवितेचं appreciation करतो त्यावेळेस कवीच्या मनात निर्मितीच्या वेळेला जी भूमिका असते त्याची स्पष्टास्पष्ट वलये म्हणा, संस्कार म्हणा निर्माण होत असतात व मगच ती आपल्या मनावर ठसते."[२२] चिटणीसांची समीक्षा आस्वादकाची आहे. आस्वादासाठी कलाकृतीचे आकलन व्हावे लागते. तरच मूल्यमापन करणे जमते अशी त्यांची भूमिका आहे. त्यांच्या समीक्षेचे वैशिष्ट्य म्हणजे दलित साहित्याचे त्यांनी मनापासून स्वागत केले आहे. दलित साहित्याने त्यांच्या समीक्षेला बळ दिले आहे या भावनेतून ते दलित साहित्याकडे बघतात. सद्यः परिस्थितीत राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव नाही.

त्यासाठी दलितांनी दलितांच्या जीवनावरोबरच मुसलमान व महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्रेतर प्रदेशातील आपल्या देशबांधवांचे चित्रण करावे अशी इच्छा ते प्रकट करतात. यावरुन त्यांची साहित्याची कल्पना ही विश्वव्यापक आहे असे दिसते.

चिटणीस रुपवादी (Formalist) टीकापद्धतीबद्दल म्हणतात– 'पाश्चात्य वाङ्मयात Formalist critics चा वर्ग निर्माण झाला. T. S. Eliot च्या वेळेपासून Formalist किंवा contextualist टीका निर्माण झाली. या टीकाकारांनी जीवनाचा कलाकृतीशी संबंध नाही असे प्रतिपादण्यास सुरवात केली.' या चिटणीस यांच्या विचाराला पुष्टी दिली डॉ. वानखेडे यांनी. त्यावर वा. ल. कुलकर्णी म्हणतात, 'Formalist टीका टोकाला गेलेली टीका होती.' महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या : एक चर्चा [२३] यातून वरील विचार त्यांनी मांडलेले आहेत.

२: प्रा. वा. ल. कुळकर्णी

महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेने आपले दुसरे साहित्य संमेलन महाड येथे दिनांक १३ व १४ एप्रिल १९७० रोजी आयोजित केले होते. या ऐतिहासिक ठरलेल्या संमेलनाचे उद्घाटन प्रा. वा. ल. कुळकर्णी ह्यांनी केले. अर्वाचीन साहित्याविरुद्ध दलित साहित्यिकांनी बंड करावे असे उद्घाटनाच्या भाषणात ते म्हणाले.

दलित लेखक, कवींच्या वाङ्मयनिर्मितीचे स्वरुप स्पष्ट करताना 'अस्मिता जागृत होणे ह्याचा अर्थ पददलितांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होणे. मला समाजात स्थान आहे हे लोकांनी मान्य केले वा न केले तरी मी स्वतःच्या पायावर निश्चित उभा राहू शकेन, एवढेच नव्हे, तर सामाजिक प्रतिष्ठेची जी स्थानें आहेत ती स्थानेदेखील प्राप्त करुन घेण्याचा मला पूर्णपणे अधिकार आहे आणि मी तो निश्चितपणे माझ्या कर्तृत्वाने प्राप्त करून घेऊ शकेन अशा प्रकारचा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होईल तसतसे या दलितांच्या साहित्यनिर्मितीला खरेपणा प्राप्त होईल व या साहित्याचे स्वरूप Revolting राहील,' [२४] असा आशावाद वा. ल. कुळकर्णींनी व्यक्त केला आहे. दलित साहित्याचे सामर्थ्य निर्णयात्मकरीत्या सांगता येणार नाही असे ते म्हणतात, पण स्वरूपाची अपेक्षा व्यक्त करतात. दलितांच्या लेखनामध्ये अजूनही प्रतिष्ठित वर्गाचे जे साहित्य आहे त्या साहित्याची मल्ये, त्यांचे आदर्श, त्यांचे norms हे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, स्वीकारण्याची प्रवृत्ती आहे. उदाहरण देताना ते म्हणतात, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांच्या लेखनामध्ये ज्या वर्गाने एका विशिष्ट प्रकारचे अनुभव घेतलेले आहेत त्यांचे हे लेखन आहे ही जाणीव प्रभावीपणें व्यक्त होत नाही. त्यांच्या प्रकृतीत काही विशेष फरक दिसत नाही. त्यांचे लिखाणात थोडा बुजरेपणा आहे. अजून पुरेसा आत्मविश्वास नाही. हा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. 'बेहत्तर आहे माझे लेखन जे आहे ते वाङ्मयीनदृष्टचा श्रेष्ठ दर्जाचे ठरो वा न ठरो, त्याची मला पर्वा नाही' [२५] ही वृत्ती यायला पाहिजे असे ते या चर्चेत म्हणतात.

दलित साहित्याची समीक्षा करताना थोडी प्रखर भूमिका स्वीकारली असेल तर दलित साहित्याविषयी आस्था बाळगून, त्याचे मनःपूर्वक स्वागत करून दलित साहित्याला मारक ठरणाऱ्या काही प्रवृत्तींचा समाचार घेतला आहे. 'ज्या लिखाणामध्ये ओबडधोबडपणा असला तरी जिवंतपणा आहे त्या लिखाणाची अनास्था होत नाही. त्या लेखनावर लोक तुटून पडतील, परंतु त्याच्याकडे कानाडोळा करू शकत नाहीत एवढे मात्र खरे'[२६] असे ते म्हणतात.

मराठीमध्ये जी एक Formalist टीका होती किंवा Contextual टीका होती ती एका आत्यंतिक टोकाला गेलेली टीका होती. ती थोडीशी प्रतिक्रियात्मकच टीका होती. ती सामाजिक बंडखोरीच्या दृष्टीने नव्हे संकुचितदृष्टचा वघत होती. टीका ही वाङ्मय समाजाला हिताची आहे किंवा नाही हचाचा सुद्धा विचार करीत नव्हती. बंडखोरी अहितकारक आहे असेच त्या समाजाला वाटत होते. कथा–कांदवऱ्यांतील विषय समाजाच्या नीतीला पोषक आहे की नाही हा प्रश्न त्यांच्यापुढे असे. याची प्रतिक्रिया म्हणजे Formalist किंवा Contextual टीका. ही प्रतिक्रिया जरी झालेली असली, तरी आजची टीका अनुभूतीचा कस काय आहे यालाच निश्चित महत्व देते असे त्यांना वाटत होते व ते या चर्चेत स्पष्टपणे सांगत होते.

वा. ल. कुळकर्णी यांनी आपल्या समीक्षेला केवळ अनुभूतीच्या कसाकडे वळविले नाही तर त्यांनी अनुभूतीवरोबर अभिव्यक्तीलाही महत्त्वाचे मानले आहे. अनुभूती आणि अभिव्यक्ती हचांच्यात अभिन्नत्व असल्याचे ते मानतात. अनुभूती आणि अभिव्यक्ती यांचा वेगवेगळा विचार करताच येत नाही, आणि असा वेगवेगळचा दृष्टीने विचार करून किंवा केवळ अनुभूती वा केवळ अभिव्यक्तीलाच निश्चित महत्त्व देऊन जर समीक्षा होत असेल तर ती 'फसलेली टीका' होय असे ते आपले स्पष्ट मत व्यक्तवितात. अशी टीका मराठीमध्ये मूळ धरू शकणार नाही असा इशाराही देतात. उदाहरणादाखल, मर्ढेकरांनी 'खेडचातील रात्र' हचा कवितेचे केलेले परीक्षण याच अनुभूती–अभिव्यक्तीच्या वेगळेपणातून केले आहे. पण असली टीका काही टिकणार नाही, कारण तीमध्ये aesthetic approach तंत्रात्मक वनला आहे आणि त्यामुळे ललित कृतीतले सगळे सौंदर्यच त्यातून निसटून गेले आहे. तंत्र फक्त लक्षात राहते. ही टीका मराठीमध्ये तग धरील असे वाटत नाही. पददलित समाजाच्या नवीन लेखकांनी form चा विचार करू नये. या लेखकांना response मिळणार नाही, तो मिळेलच' असे ते म्हणतात.

पुढे ते म्हणतात, 'ज्ञानेश्वर, तुकाराम या दोघांचा वैचारिक व वाङ्मयीन वारसा मानायला हरकत नाही, कारण यांनी जरी आपल्या दृष्टीने पुरेसे बंड केले नसले तरी त्यांच्या काळाच्या मानाने ते वंडखोर होतेच हेही जाणून घेतले पाहिजे.' Myth चा अर्थ सांगताना ते म्हणतात की 'Myth म्हणजे Part memory, आणि ही मेमरी तुम्ही नवीन निर्माण करू शकत नाही. एक मात्र खरे की त्यांच्या नाकारलेल्या Myths कोणत्या व त्यांना जवळच्या वाटणाऱ्या

Myths कोणत्या याचा विचार केला पाहिजे. उदा. शंबूकाची Myth विसरणे अशक्य की जिथे रामसुद्धा पेचात आलेला आहे. किंवा विश्वामित्राची Myth घ्या, तो म्हणतो–मी का म्हणून ब्रह्मर्षी नाही ? विश्वामित्र प्रतिसृष्टी निर्माण करतो आहे, म्हणून या Myth मध्ये अजून सामर्थ्य आहे. या दृष्टीनें दलित लेखकाने रामायण–महाभारताकडे पहायला पाहिजे. पण तो का पहात नाही हेच कळत नाही, असे वा. ल. कुळकर्णी म्हणतात. परंपरागत मूल्यांविरुद्ध बंड करून उठलेल्या दलित लेखकांनी आनंद साधलेंप्रमाणे debunking केले तरी चालेल. त्यांच्या नवीन दृष्टीतून नवीन interpretation ते करतील आणि ते पाहिजेच आहे, असे कुळकर्णी म्हणतात.

त्यांच्या या वरील चर्चेतून एक स्पष्ट दिसते की दलित साहित्याच्या संदर्भात त्यांचे विचार अतिशय मूल्यवान आहेत. दलित साहित्याची ते मूल्य-संकल्पनात्मक समीक्षा करतात. त्यांनी अनुभूतीचा कस आणि अभिव्यक्तीचा सोस या दोन्ही गोष्टींना आपल्या समीक्षेमध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे. ते याकडे दुर्लक्ष करीत नाहीत. त्यांनी केलेल्या लिखाणामध्ये वा चर्चेमधून त्यांनी आपले दलित साहित्यासंबंधीचे विचार निर्भीडपणे मांडलेले आहेत.

'नवसाहित्याच्या आरंभकाळी स्वागतशील वृत्तीने त्याची पाठराखण करून वाङ्मयीन वातावरण तयार करणारे टीकाकर म्हणून वा. ल. कुळकर्णी यांच्याकड पहावे. मराठी टीकेवर परिणाम करणाऱ्या मोजक्या टीकाकारांपैकी ते एक आहेत. 'घटकश: चिकित्सा करणाऱ्या साहित्यकृतीच्या विश्लेषणात्मक पद्धतीला संश्लेषणात्मक विचारांचे नवे वळण देणारा आणि ती पद्धती मराठीत रुजवून स्थिर करणारा टीकाकार म्हणुन वा. ल. कुळकर्णीचे नाव घ्यावे लागेल'[२७] असे डॉ. सुधीर रसाळ म्हणतात ते योग्यच आहे.

साहित्याकडे साहित्य म्हणून पाहण्याची त्यांची भूमिका आहे. त्यांची मांडणी कलावादी आहे, पण उपयोजनात जीवनवादाची बीजे आहेत. साहित्यकृतीच्या संदर्भात ते म्हणतात, 'स्वतंत्र, स्वयंपूर्ण, संदर्भनिरपेक्ष व अनन्यसाधारण अशी साहित्यकृती असते. तिची अनुभूती आणि अभिव्यक्ती ही एकात्म असते. अशा कलामूल्यांद्वारे साहित्याची समीक्षा करताना अनुभवाची अर्थपूर्णता व तद्द्वारे घडणारे गंभीर जीवनदर्शन इकडेही ते लक्ष पुरवितात. म्हणूनच त्यांची मांडणी जरी कलावादी असली तरी जीवनवादाची पेरणी ते उपयोजनात करताना दिसतात. त्यांची दलित साहित्याची समीक्षा ही सर्वज्ञ समीक्षकाची नसून रसज्ञ समीक्षकाची आहे. ते दलित साहित्यकृतीचाही शोध तेवढ्याच नम्रपणे घेताना दिसतात.

'साहित्य आणि समीक्षा' याविषयीचो त्यांची मीमांसा 'वाङ्मयातील वादस्थळे' 'वाङ्मयीन मते, मतभेद', 'साहित्य आणि समीक्षा' आदी ग्रंथांतून साकारलेली दिसते,

तात्त्विक समीक्षा करताना नियतकालिकांचाही अभ्यास ते करताना दिसतात. कारण वा. म. जोशी, श्री. कृ. कोल्हटकर, न. चि. केळकर यांच्या साहित्यविषयक कर्तृत्वाचा आढावा त्यांनी आपल्या दलित साहित्याची मूल्यसंकल्पनात्मक टीका करताना घेतला आहे. ते म्हणतात, 'साहित्याच्या व साहित्यविचाराच्या अनेक वर्षांच्या डोळस अध्ययनानंतर ज्या मूल्यांनी साहित्याचे मापन करावयाचे ती मूल्ये डोळ्यांसमोर थोडीफार तरळू लागतात, नाही असे नाही, परंतु त्याचे स्वरूप इतर वजनामापासारखे स्थिर व निश्चित नसते, जे जाणवत असतानाच प्रत्येक नव्या कलाकृतीच्या संदर्भात ते अधिक स्पष्ट करून घेण्याची एकसारखी आवश्यकता भासत असते. खरे म्हणजे हा मूल्यांचा शोध, हा मूल्यविचार कधीच संपत नाही, तर त्यावर आगंतुक व कसल्यातरी अनिष्ट विचारांची वा कल्पनांची धूळ साचण्याची शक्यता असते. त्याला एक प्रकारचे निर्जीवत्व व यांत्रिकत्व येण्याची भीती असते. तसे झाल्यास त्याचे प्रयोजन संपले असे म्हणणें बरे. कारण अशा आखीव-रेखीव व ठरीव नियमांनुसार केलेला वाङ्मयविचार हा जसा वाङ्मयाच्या मूल्यमापनाला उपकारक ठरत नाही तसाच तो वाङ्मयासंबंधीची आपली समजही अधिक निर्दोष करीत नाही. साहित्य ही अशी अखंड विकासक्षम चिद्वस्तू आहे. तेव्हा तिचे नियमन व्हावे कसे? म्हणूनच साहित्याचे, साहित्य-समीक्षेचे काटेकोर शास्त्र निर्माण होऊ शकत नाही. तत्संबंधीचे मोजमाप करण्यास उपयोगी पडणारी कायमची सोयीस्कर अशी कोष्टके तयार होत नाहीत. ही कोष्टके तयार होताच हाती लागते ते साहित्याचे कलेवर.'[२८] दलित साहित्यातील मूल्यांचा शोध असा कलाकृतीच्या अनुषंगानेच करावा लागेल हे मूल्यविचार कधीच संपणारे नाहीत. फक्त त्यावर आगंतुक आणि अनिष्ट विचारांची धूळ साचू उकते. त्यासाठी जिवंत व रसरसलेले साहित्य कलाकृतीतूनच समीक्षामूल्य घडवीत असते.

दलित साहित्याला ही दलितत्वाची जाणीव, सामाजिक जाणीवच मूळ आधार ठरते. त्यात 'माणूस' हा केंद्रस्थानी आहे आणि माणसाची गुलामीतून मुक्ती हा त्याचा मूळ पाया आहे. त्यामुळेच दलित साहित्यातून प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध संताप, विद्रोह उफाळून येतो. त्या विद्रोहाच्या, संतापाच्या मागची भूमिका जाणकार समीक्षकानें शोधावी अशी अपेक्षा कुळकर्णी व्यक्त करतात.

३) रा. ग. जाधव

रा. ग. जाधव हे दलित साहित्याची मीमांसा अतिशय गंभीरपणे व तटस्थ वृत्तीने करतात. त्यांच्या चिकित्सक दृष्टीची साक्ष म्हणजे त्यांचे समीक्षाग्रंथ होत. दलित साहित्याचा आढावा घेणारा ग्रंथ 'निळी पहाट' होय. त्यांच्या लेखनाविषयी डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, '१९६७ तें १९७७ पर्यंतच्या काळात श्री. जाधव यांनी केलेले लेखन म्हणजे त्यांच्या चिंतनाचा परिपाकच होय. एका अर्थाने हे सर्व लेख दलितांची चळवळ आणि वाङ्मयीन चळवळ यांच्या सर्वंकष

व्याप्तीचा स्थूल नकाशाच आपल्यासमोर ठेवतात. मराठी साहित्यक्षेत्रात दलित साहित्याची आद्यचर्चा देण्यात प्रा. जाधवांनी एक प्रकारचे औचित्य दाखविले आहे.'[२९]

आपले दुःख, आपल्या व्यथा-वेदना आपण आपल्याच भाषेत मांडायला पाहिजेत. मीही माणूस आहे, मलाही माणूस होऊन जगायचे आहे या जाणिवेचा जन्मही याच काळातला होय. या जाणिवेतूनच कविता व नंतर कथा फुलत गेली. हे फुलणें म्हणजे केवळ मोगऱ्याचा घमघमाट व जाई-जुईचे नाजुकपण नव्हते, तर त्या फुलण्यात वेदनेचा रंग व विद्रोहाचा गंध होता. ही फुले अंगार पेटवणारी, अंगार बरसणारी पळसफुले होती. या फुलांचा जन्म ज्यांनी नाकारला त्या मनूच्या समाजाला आणि मनुप्रणीत समाजप्रवृत्तीला धिःकारण्यासाठीं या फुलांनी आपल्या वेदनेला व विद्रोहाला शब्दरूप बहाल केले, या शब्दरूपाचे स्वागत 'दलित साहित्य' म्हणून झाले. प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, 'मनुप्रणीत समाजाविरुद्ध विद्रोहाची भूमिका घ्यावी असे दलित लेखकांना वाटते, तर माझ्याजवळ वेगळे असे सांगण्यासारखे आहे असे त्यांना वाटते. आणि म्हणूनही त्यांना जे उत्कटतेने जाणवले ते लिहिले. अवघ्या सांस्कृतिक वारशाला नाकारून तो वारसा कायमचा नष्ट करण्यासाठी दलित कविमन एका बाजूने धडपडत आहे, तर दुसऱ्या बाजूने काही-तरी नवीन जीवनरचना करण्यासाठी ते तळमळत आहे. आत्मपीडनाचा सूर आत्मोद्धाराशी जुळलेला, तर परपीडनाचा सूर परिवर्तनाशी सांधलेला असे काहीसे रूप, स्वरूप दलित जाणिवांना आले आहे.'[३०]

दलित साहित्याच्या या जिवंत प्रवाहाचे वेंगळेपण ते अगदी स्पष्ट तितकेच साधार सांगतात. ते म्हणतात, 'दलित काव्यात 'मी' हा नेहमीच 'आम्ही' बनतो. चोखामेळा 'चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा' असे म्हणत होता तेंव्हा तो समूहाचीच वेदना व्यक्त करीत होता. पांढरपेशा मध्यमवर्गीय लेखक 'मी'लाच गोंजारीत राहतो आणि असे गोंजारीत राहण्याने कलात्मक साहित्य निर्माण होतें अशा भ्रमात राहतो. त्याला समहमनाची व्यथा हलवीत नाही. त्यामुळे आपल्या कोशात गुरफटलेल्या पांढरपेशांचा गोतावळा नित्य वाढतो आहे. दलितेतरांना सर्वंकष निषेधाचा उच्चार आजवर करता आलेला नाही.' या संदर्भात प्रा. जाधव म्हणतात, 'दलित साहित्याचा जन्म दलित स्वातंत्र्याच्या गर्भातून झाला हे खरे आहे. लिहिणें व बोलणे ही एका विशिष्ट समाजाची मिरास होती. पण स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर नव्याने जागे झालेले समाजमन बोलू लागल्याची साक्ष दलित साहित्य देऊ लागले.'[३१] नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर यांच्यासारख्या कितीतरी दलित लेखकांच्या विद्रोहाची प्रकृती काय, कशी व का असे प्रश्न निर्माण करणारी ठरली. विद्रोही साहित्याचे अवतरण विद्रोही समाजासाठीच केवळ नसून विद्रोहविषय झालेल्या समाजमनाला उद्देशूनही झाले आहे.

'नव्या दलित कलाक्षेत्रास अजून रूप यावयाचे आहे. पण त्याची बीजे मात्र

रुजू लागतील.'[१३] असे प्रा. जाधव म्हणतात. नियतकालिकांतून (अस्मितादर्श निकाय, आदी) दलित तरुणांच्या चित्रकलेची नवी नवी रूपे व्यक्त होताना दिसतात, याचे त्यांना समाधान आहे. 'निळी पहाट' मधील तत्त्वचर्चा दलित समीक्षेत मोलाची भर टाकणारी आहे. ते म्हणतात, 'दलितांचे जग हे भीषण, भयानक, अपमानास्पद घटनांनी भरलेले आहे. या जीवनात देहभानाने ते अडकून पडलेले आहेत. कधी सहानुभाव, कधी सहानुभूती याद्वारा ते जीवन मनोमन संवेदून त्याची साहित्यचित्रे काढण्याचे अवघड कार्य दलित लेखक करीत आहेत.'[१३]

दलित साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, नाट्य आणि समीक्षेचाच नव्हे तर दलित कलेचाही विचार प्रा. जाधव 'निळी पहाट' मधून करतात. दलित समीक्षेविषयी ते लिहितात, 'नवोदित दलित साहित्याच्या समग्र परिशीलनातून कदाचित जीवनवादी साहित्यविचारांचा नेटका प्रपंच उभा करता येईल. म्हणूनच कलावाद, सौंदर्यवाद, यांच्या शास्त्रीय कसोट्यांना उतरणारे स्वतंत्र सौंदर्यशास्त्र ही दलित साहित्याची निकड नसून सत्य, शिव आणि सौंदर्य यांच्या कसोट्यांना उतरणारा जीवनवादी साहित्यविचार हीच त्याची आजची गरज आहे. किंबहुना मराठी समीक्षेला श्रेष्ठ असा जीवनवादी साहित्यविचार देण्याचे ऐतिहासिक कार्यच दलित साहित्यसृष्टीला करावयाचे आहे.'[१४]

दलित साहित्याला गरज आहे स्वच्छ वैचारिक अधिष्ठानाची, साहित्यिकांपेक्षा निष्ठावंत विचारवंतांची. या संदर्भात त्यांचे म्हणणे आहे की, 'बौद्ध विचारप्रणाली मनोमन रुजविण्याचे व दलित मने दृढ करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य दलित समाजीय विचारवंतांनी केले पाहिजे.'[१५]

युगानुयुगापासून प्रस्थापितांनी केलेल्या अपराधांची ग्वाही मराठी विद्रोही दलित साहित्य देते. या ग्वाहीची दखल मोठ्या मनाने मराठी साहित्याने घ्यावी. केवळ तटस्थ, अलिप्त राहून दलित साहित्याची चळवळ बस्त्यात बंदिस्त करण्याचे कारस्थान उपयोगाचे नाही. चळवळीच्या रूपाने दलित आणि प्रस्थापित या उभय वर्गांत आचारविचारांची देवाण-घेवाण व्हावी आणि साहित्याच्या रूपाने त्या देवाण-घेवाणीला भावनात्मक जिव्हाळा व ओलावा प्राप्त व्हावा अशी अपेक्षा रास्तच आहे. 'उभयतांच्या आचारविचारांची देवाण-घेवाण झाली नाही तर तो विद्रोहाचा विद्रोह ठरेल.'[१६] असा इशाराही प्रा. जाधव देतात.

उपयुक्ततावादी भूमिकेतून कोणत्याही दलित कलाकृतीचे मोजमाप करता येणार नाही. कारण दलित कलाकृती ही अस्सल जातिवंत जाणिवाकृती आहे. ती कारागिरी नाही. कारागिरी वाङ्मय 'मागणी तसा पुरवठा' या स्वरूपाचे असते, याची डोळस जाणीव समीक्षकांना हवी. नाहीतर रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे 'प्रभावी टीकाकार व भलावणीकार समीक्षक हे दोघेही अनिष्ट ठरतील.'[१७] आणि त्यांच्या या अशा धोरणामुळे दलित साहित्याची दिशाच हरवून जाईल.

कोणत्याही एका साच्याने किंवा मापाने दलित कलाकृतीचे मोजमाप करता

येत नाही. त्यातील विविध रंग, रूप, गंधाच्या विचाराबरोबर दलित लेखकाच्या व समाजाच्या पिंडाचा, व्यक्तित्वाचा, त्याचप्रमाणे त्यांच्या जीवनानुभवाचा आविष्कार त्या कलाकृतीत राहील. या सगळ्याचा विचार समीक्षेत होणे अपरिहार्य असते. व्यक्ती व समाज, काल व परिस्थिती यावर समीक्षेतला बदल अवलंबून असतो. म्हणूनच प्रा. जाधव म्हणतात, 'दलित साहित्याला प्रभावी समीक्षकाची गरज आहे. आपल्या समाजाची भाषा व भावना जाणणारा आणि त्याच्याशी मनःपूर्वक समरस होणारा टीकाकार दलित साहित्यिकाला फार मोठी प्रेरणा देऊ शकेल. प्रचारी टीकाकार अतिस्तुतीने व भलावणीकार समीक्षक औपचारिकतेने साहित्याचा खेळखंडोबाच करणार यात शंका नाही. समीक्षक ही अत्याधुनिक साहित्यक्षेत्रातील एक अत्यावश्यक संस्था आहे. दलित समाजात आज अनेक व्यासंगी लोक आहेत. त्यांनी सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेने दलित साहित्यिकांना समजावून घेतले पाहिजे. दलित साहित्यातील आशय–आकाराचे प्रश्न जाणून घेतले पाहिजेत आणि समतोल चिकित्सेद्वारा दलित लेखकांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने मार्गदर्शन केले पाहिजे.'[३८] असे समीक्षकांविषयीचे आपले मत प्रा. जाधव स्पष्ट करतात.

दलितेतर समीक्षकांना ते जसा इशारा देतात तसेच दलित समीक्षकांनादेखील ते खडसावतात, 'पूर्वकाळ आम्ही विसरू इच्छितो व तुम्ही त्याची जाणीव करून देता. आम्हाला पूर्वायुष्याविषयी लिहायला सांगता.'[३९] असे म्हणणारे लोक जेव्हा जाधवांना भेटतात तेव्हा त्यांना ते निक्षून सांगतात, 'जुन्याकडे वळणे पुष्कळदा अनिवार्य असते. नव्याचे आव्हान स्वीकारता आले नाही किंवा नव्याचे आकलन करता आले नाही की जुन्याकडे वळावे लागते. जात चोरण्यापेक्षा जीवनाकडे निकट गमन करणाऱ्या दलित साहित्यिकांचीच खरी गरज आहे.'[४०] असे ते स्पष्टपणे सांगतात.

कोणत्याही साहित्यातील गतिमानतेचा शोध घेताना त्या साहित्यकृतीमागील मूल्यगर्भ जाणिवांचा अभ्यास करावा लागतो. माणसाच्या इतर प्रवृत्तींप्रमाणेच नव्या वाङ्मयीन प्रवृत्तीचा शोध जुन्या वाङ्मयीन प्रवृत्तीच्या अनुषंगाने घेण्याचा प्रयत्न प्रा. जाधव करतात. सांस्कृतिक अभिव्यक्ती ही फारच कठिण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची कल्पना नसणाऱ्या लोकांना आजच्या दलित समाजाचे कोणतेच प्रश्न यथार्थपणे समजणार नाहीत. तसेच त्या प्रक्रियेचे अज्ञान खुद्द दलितांनाही असणे शक्य आहे. त्यामुळेच दलित साहित्याला नकार दर्शविणारी दलित मंडळीच पाहायला मिळतात. परंतु जोपर्यन्त या अटळ प्रक्रिया पार पाडता येणार नाहीत तोपर्यंत दलित साहित्याची सिद्धता ठरणार नाही.

या संदर्भात प्रा. जाधव म्हणतात, 'दलित साहित्याचा प्रश्न हाही या समाजाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीच्या प्रयत्नांपैकी एक प्रयत्न आहे. ज्या शब्दांनी हा प्रश्न प्रत्यक्षात मांडलेला आहे त्या शब्दांचा काथ्याकूट करण्यात स्वारस्य नाही.

पुस्तकी पांडित्य आणि कसरती यापेक्षा अधिक व वास्तविक अर्थ अशा काथ्याकूटात नाही. जी एक आकुल सांस्कृतिक मन:स्थिती आजचा दलित समाज अनुभवत आहे त्या मन:स्थितीचे हा प्रश्न म्हणजे दुसरे बोधचिन्ह आहे.'[४१] पण या बोधचिन्हाच्या अटळत्वासाठी प्रदीर्घ काळाची तपस्या आवश्यक आहे, कारण कोणत्याही समाजाची साहित्यिक अभिव्यक्ती नावारूपास आणण्यासाठी काही पिढ्या खर्ची घालाव्या लागतात हे निर्विवाद सत्य आहे.

दलित व दलितेतर समाजातील लोकांविषयी बोलताना ते म्हणतात– 'दलित समाज हा संक्रमणावस्थेत आहे. ही अर्थसंपृक्त वस्तुस्थिती ज्या दलित व दलितेतर समाजियांना समजावून घ्यावयाची नाही त्यांना 'दलित' या सोयीसाठी वापरलेल्या विशेषणाची कोणतीही विशेष्ये आकलन होणार कशी? आजच्या दलित व दलितेतर समाजांत सारख्याच तोलामोलाचे सामाजिक व वाङ्मयीन अभ्यासक आहेत. दोहोतहीं वादपटू व्यक्ती आहेत. साहित्यिक आहेत. समीक्षक आहेत. ते विरुद्धपक्षीय असले तरी त्यांच्या विचारांची मूस तत्त्वत: एकसारखीच आहे.'[४२]

दलित समाज व साहित्य यांची निग्रो समाज व साहित्याशी सांगड घातली जाते ती जाधवांना मान्य नाही व तशी ती कुणालाही नसावी असे त्यांना वाटते. कारण मान्यतेचा भाबडा होकार देऊन निग्रो साहित्य व दलित साहित्य यांचे अनन्यसाधारण ऐक्य वा सुसंगती दाखविणे त्यांना नको आहे. निग्रो समाज हा स्वत:ची निश्चित आदिम व सांस्कृतिक परंपरा असलेला समाज आहे. अमेरिकेतील निग्रो समाज ही त्या परंपरेला छेद देऊन गेलेली परंपराखंडनाची एक दुर्दैवी आपत्ती आहे. देशत्यागाने निग्रो समाजाने संस्कृतित्याग केला हे म्हणणे योग्य नाही. येथील दलित समाज निग्रो समाजाशी कसा तुल्य ठरतो, हे मला तरी समजलेले नाही. दलितांची सामाजिक समस्या निग्रो समाजापेक्षा व्यापक व वेगळी आहे, स्वेतरांच्या सांस्कृतिक पडछायेत हा समाज शतकानुशतके जगत राहिला. निग्रोंची आभासमुक्ततेची जाणीव प्राधान्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरूपाची आहे, तर दलित समाजाचा भ्रमनिरास प्राथमिक मानव्याचा आहे. आपण माणूसच नव्हतो अशा आशयाचे हे भासभंजन आहे, म्हणूनच समाज म्हणून व निग्रोंच्या विद्रोही निषेधी साहित्यासारखे साहित्य म्हणून दलितांच्या समाजाचे व साहित्याचे प्रक्षेपण करणे अप्रयोजकपणाचे आहे'[४३] अशी तीव्र प्रतिक्रिया प्रा. जाधव व्यक्त करतात.

दलित साहित्याचे वेगळेपण शोधायचे असेल तर दलित साहित्याच्या साहित्यकृतीचा तळ गाठावा लागेल व हा तळ गाठण्यासाठी एक भावविशुद्ध मन लागतेच, पण तेवढे सामर्थ्यही लागते. हे सामर्थ्य असे निग्रो समाजाच्या व साहित्याच्या अभ्यासासाठी वाया घालविण्यापेक्षा बुद्धजीवनाचा व पाली साहित्याचा अभ्यास केला पाहिजे. जुन्या Myths नाकारताना नव्यांचा जन्म व्हायला पाहिजे. त्यासाठी दलित साहित्याने नव्या मराठी धर्मग्रंथांची निर्मिती करावी.

दलित साहित्याच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या आणखी एका मुद्याविषयी

प्रा. जाधव चर्चा करतात. सामाजिक व साहित्यिक प्रश्न यांची गल्लत करण्याचा मोह काही लोकांना होतो, तो योग्य नव्हे. दलितांचे सामाजिक प्रश्न सामाजिक पातळीवर समाज सोडवीत असतो. आणि त्यांचे साहित्यिक प्रश्न साहित्यिक पातळीच्या स्वावलंबी वातावरणात दलित साहित्यिकालाच सोडवावे लागतात. दलित साहित्यिकांची वाट ही 'मोगरा फुलविणारी नाही तर ती अंगारफुलांची आहे.' त्या वाटेवर लौकिक सुखस्वप्नांना फुलवणारा ऋतू नाही, तर या स्वप्नांचे दान मागणारा फकीर अटळपणे थांबला आहे. दलित साहित्यिकांनी हया अटळ नियतीला सामोरे जायला पाहिजे.

प्रा. जाधव नवकाव्याची समीक्षा करतात. वास्तवतावादी साहित्य, वाङ्मयीन व्यक्तिमत्व, ऐतिहासिक साहित्य आदींचा जिव्हाळयाने अभ्यास करतात. नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेयांचा प्रामाणिकपणे शोध घेतात.

प्रा. रा. ग. जाधवांच्या समीक्षेचे स्वरूप अशा प्रकारे मूल्यसंकल्पनात्मक आहे. त्यांच्या समीक्षेचे वैशिष्टय म्हणजे त्यांची समीक्षा सृजनशील साहित्याचे आकलन व आस्वादन करते आणि त्यातून गवसणारा साहित्यविचार मूल्यरूपाने, एका तर्कसंगत विवेकाचे स्वरूप घेऊन प्रकटतो. म्हणूनच ते समीक्षाप्रणालीचे प्रयोजन सांगताना म्हणतात, 'सृजनशील साहित्याचे आकलन, आस्वादन करणे आणि त्यातून गवसणारा साहित्यविचार यांना एका तर्कसंगत विवेकाचे स्वरूप देणे म्हणजे दलित समीक्षा करणे होय व हेच त्या समीक्षेचे वैशिष्टय आहे.'[४४]

दलित साहित्याची समीक्षा दोन अर्थाने केली जाते. याविषयी प्रा. जाधव म्हणतात, 'दलित साहित्यसमीक्षेचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे कविता, कथा, कादंबरी, नाटक यांसारख्या विविध साहित्यप्रकारांत दलित साहित्यिक जी निर्मिती करीत आहेत त्या निर्मितीची मीमांसा करणे, आणि दुसरा अर्थ म्हणजे या प्रकारच्या मीमांसेतून जो वाङ्मयविषयक तत्त्वविचार निष्पन्न होतो तो सुसूत्र करून त्याच्या आधारे एकूणच वाङ्मयाबद्दलचा दृष्टिकोण विशद करणे. कोणत्याही प्रकारची साहित्यसमीक्षा अशा उभयविध प्रक्रियेतून संसिद्ध होत जाते.'[४५]

त्यांच्या उत्कृष्ट समीक्षालेखनशैलीची उदाहरणे म्हणजे त्यांचे विविध विषयांवरील असलेले समीक्षाग्रंथ होत. प्रा. जाधवांच्या समीक्षालेखनाची वैशिष्टये त्यांच्या लेखनातूनच प्रकट होतात. नव्या समीक्षकांमध्ये त्यांचा विशेष बोलबाला आहे तो त्यांच्या बौद्धिक सामर्थ्याला व संयमाला ओलांडून जाणाऱ्या तल्लख, प्रवाही, काव्यात्म संवेदनशीलतेमुळेच. मानवी मनाची, मानवी जीवनाची, भावभावनांची खरी कदर करणारी 'कद्रदान' प्रवृत्ती त्यांची आहे.

ते म्हणतात, 'समाजापुढे साहित्यकृती आली की तिला अनेक सामाजिक संदर्भ प्राप्त होतात. नवजात बालकाला ज्याप्रमाणे कुटुंब, समाज, देश अशा क्रमाक्रमाने, हळुहळू पण अटळपणे एक स्वत्व (आयडेंटिटी) प्राप्त होत जातें, त्याचप्रमाणे अभिव्यक्त झालेल्या साहित्यकृतीलाही सांस्कृतिक घटकांनी स्वत्व प्राप्त

होते. या स्वत्वाचा शोधबोध करून घेणे हेच समीक्षेचे कार्य आहे. अक्षरेपक्षी जीवनाला मूल्य आहे, या धारणेतूनच साहित्यकलेचे मूल्य निष्पन्न होते. नव्या समीक्षकानेच केवळ नव्हे, तर कोणत्याही समीक्षकाने याचे भान ठेवले पाहिजे.'

प्रा. जाधवांची समीक्षा म्हणजे मराठी साहित्याला व दलित साहित्याला समृद्ध करणारे वैभव होय, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

४) प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

दलित कवितेतील मूल्यगर्भ जाणिवेचा शोध घेणाऱ्या समीक्षकांपैकी मुक्तिबोध हे एक आहेत. दलित साहित्याचा विचार ते कलात्मक शक्यतांच्या दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न करतात. दलितांच्या या वाङ्मयीन चळवळीला चांगली किंवा वाईट असे काहीतरी म्हणण्यापेक्षा प्रथम ती चळवळ का उद्भवली किंवा त्यातून अभिव्यक्त झालेले प्रश्न का निर्माण झाले याचा शोध समीक्षकांनी घ्यावा, असे त्यांना वाटते.

अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ आर्थिक प्रगतीने किंवा स्कॉलरशिप मिळू लागल्याने संपला असे नाही. अस्पृश्यांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढलेले आहे, आणि ते शहरांत कमी असले तरी खेडे विभागात जास्त आहे. वरिष्ठ वर्गाचे जमीनमालक व कनिष्ठ वर्गाचे जमीनहीन शेतकरी या दोघांतील संघर्ष क्रूर रूप धारण करतो. आर्थिक हितसंबंधाच्या जोडीला वर्णश्रेष्ठत्वाचा अभिमान, सूडाची भावना अधिक प्रज्वलित करतो. या गरीब मजुरांवरचे अन्याय, अत्याचार वाढीला लागले आहेत. जाळपोळ, लुटालूट, अंधश्रद्धा, आदींमुळे व वर्णश्रेष्ठत्वाच्या अतिरेकी अभिमानामुळे अत्याचार होतच आहेत. आज दलित शिकले, चांगल्या हुद्यांवर असले तरी त्यांचा दलितपणा विसरायला हा अभिमानी समाज तयार नाही. अर्थात् याला अपवाद आहेत. दलितांना छळणारे, पिळणारे, शोषण करणारे लोक जेव्हा या दलितांवर अत्याचार करतात तेव्हा या दलितपणालाच आव्हान देणाऱ्यांना सामाजिक क्रांती घडवून आणावीशी वाटते. यातून काही पुरोगामी लेखकांनी फक्त आर्थिक लढ्यांवर लक्ष केंद्रित करून मार्क्सवादी भूमिकाच रेटून नेली. त्यामुळे भारतीय तळजीवनाचा वास्तव व स्वयंस्फूर्त उद्गार बाहेर येऊ शकला नाही व श्रेष्ठ दर्जाचे पुरोगामी वाङ्मयही तयार झाले नाही. म्हणूनच 'पुरोगामी लेखकांची चळवळ, महाराष्ट्रापुरतेच बोलायचे झाले तर, कलावंतांची स्वतःची स्वयंस्फूर्त अशी चळवळ होऊ शकली नाही, आजची दलित वाङ्मयाची चळवळ ही मात्र स्वतः लेखकांनी व कवींनी स्वयंस्फूर्तीने चालवलेली चळवळ आहे. ती निर्मात्यांची चळवळ आहे'[४७] असे शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात.

दलित वाङ्मयाची जाणीव मूल्यगर्भ आहे. 'स्वातंत्र्य' हा दलित वाङ्मयाच्या जाणिवेचा गाभा आहे, पण दलित वाङ्मयाची जाणीव ही निर्मात्यांची जाणीव म्हणून लक्षात न घेतल्यामुळे आक्षेप घेतला जातो तो असा– 'कलेच्या कसोटीस उतरेल ते खरे वाङ्मय व या कसोटीस न उतरणारे कोणतेही वाङ्मय असो, ते निकृष्टच. म्हणून कलेच्या दृष्टीने पाहता हे दलित वाङ्मय निरर्थक आहे.' असा

आक्षेप घेणे मुळातच चूक आहे, असे मुक्तबोध म्हणतात. कादंबरी, काव्य, कथा इ. क्षेत्रात दलित लेखकानी स्वतःच्या अनुभूतींचा रूपे शोधली पाहिजेत. अतिव्यक्तिवादी कलारूपापेक्षा ती भिन्न स्वरूपाचोच असणार. आपल्या जाणिवाबाबत दलित लेखक जसे जागरूक आहत तसेच त्याना आपल्या काव्य, कादंबरी, कथा इत्यादींच्या रूपाबद्दल जागरुक राहावे लागेल. रूप आणि आशय हे कलाकृतीत वेगळे नसल्यामुळे अतिव्यक्तिवादी कलात्मक रूपांचा, अंतरचनेचा तो स्वीकार ठरेल.'[४८] उदा. अण्णाभाऊच्या कादंबऱ्यावर रजनप्रधान कादंबऱ्याचा पगडा बसू लागला होता, तसेही होऊ शकेल.

पुढे ते म्हणतात, 'दलित लेखकाची जाणीव बाह्य जीवनातील व मनोजीवनातील विसगतीचा प्रत्यय आणून देणारी आहे. मूल्यगर्भ व प्रामाणिक आहे. कोणी सांगावे, अस्सल भारतीय जीवनाचे समर्थ चित्र कदाचित त्यामुळे रेखाटले जाऊ शकेल. भारतीय मानवतेचा तो एका पातळीवरील उद्गार आहे. पुरोगामित्वाला विरोध करणारी ही जाणीव नसून त्याचाच तो एक स्वतंत्र उन्मेष आहे.'[४९]

मुक्तिबोधांच्या समीक्षेच वैशिष्ट्य हे की ते साम्यवादी दृष्टीने दलित साहित्याकड बघतात. 'जीवन आणि साहित्य' या ग्रंथात वाङ्मयाकडे पाहण्याचा जी अलौकिक दृष्टी होती ती बदलली जाऊन आता वस्तुनिष्ठपणे पाहण्यात येऊ लागले. वाङ्मयकृतीच्या आकलनाला त्यामुळे एक नवा अर्थ येऊ लागला, आस्वादाच्या प्रक्रियेत बदल होऊ लागला, असे समीक्षेवरून दिसते. ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे केली गेलेली समीक्षा विशिष्ट कालखंडात विशिष्ट प्रकारचेच साहित्य का निर्माण होते याची समीक्षा करू लागली. त्या काळातील समाजजीवन, सामाजिक परिस्थिती आणि साहित्य यांची सांगड घातली जाऊन साहित्याकडे बघण्याची समाजशास्त्रीय दृष्टी त्यामुळे लाभली. पुरोगामी साहित्य चळवळीतील समीक्षेने जीवनवादी समीक्षेस बळकटी तर आणलीच, पण तिला एक प्रकारची प्रतिष्ठा देखील मिळवून दिली.'[५०] असे अर्जुन डांगळे म्हणतात. ही प्रतिष्ठा मिळवून देण्यात व साहित्याकडे बघण्याची एक विशिष्ट दृष्टी देण्यात गं. बा. सरदार, मुक्तिबोध, बेडेकर आदींचा महत्त्वाचा वाटा आहे.

मुक्तिबोध दलित साहित्याची तात्त्विक चर्चा गंभीरपणाने करतात, तरीही त्यांनी या साहित्याचे मूल्यमापन करण्यामागील भूमिका मार्क्सवादी आहे.

कलावादी मीमांसा ज्या काळात मराठी समीक्षेला व्यक्तिवादी, मर्यादित स्वरूपाची व रूपवादी बनविण्याच्या प्रयत्नात होती त्या काळात मुक्तिबोध आणि बेडेकरांनी जीवनवादी समीक्षेचा पुरस्कार केला व साहित्य आणि समाज यांचे नाते अतूट ठेवण्याचा विचार सतत जागृत ठेवला. यादृष्टीने मुक्तिबोधांच्या समीक्षेला मोलाचे स्थान आहे.

कलावंताच्या प्रतीतीतून उमलणारी चैतन्याकृती म्हणजे कला होय. या

कलानिर्मितीत आशय हा आकृतिरूप असतो व आशयरूपात ही आकृती विरून जात असते. आशय आणि आकृती यांत द्वंद्व असते. कलास्वातंत्र्य, आशय, अभिव्यक्ती यांची अभिन्नता आणि आकृतितत्त्वाची अपरिहार्यता मुक्तिबोध मानतात. तरीही कलाकृतीच्या मूल्यमापनाच्या कसोट्या म्हणून ते त्यांचा निर्देश करीत नाहीत. सामाजिक प्रगतीशी आणि मानवी मनोव्यापाराशी कलावंत समरस झालेला असतो. ह्या समरसतेतून त्याला येणारी अनुभवाची प्रतीती तो कलाकृतीत चित्रित करतो. ही प्रतीती जेवढी सखोल व व्यापक तेवढी त्याची कलाकृती श्रेष्ठ असे मुक्तिबोध म्हणतात.

मर्ढेकरांच्या सृष्टीसौंदर्याच्या विचारांचा प्रतिवाद म्हणजे 'सृष्टी, सौंदर्य व साहित्यमूल्य' हा मुक्तिबोधांचा समीक्षाग्रंथ होय. जीवनसत्य कलारूपात प्रतीत व्हावे, पण का व्हावे, याचे प्रतिपादन ते करताना दिसत नाही.

दलित साहित्याची समीक्षा करताना मात्र ते वस्तुनिष्ठ भूमिका स्वीकारतात. या भूमिकेमध्ये मार्क्सवादी छटा मिसळलेल्या दिसतात. 'कलेच्या कसोट्या कोणत्या का असेनात, दलित लेखकांची भूमिका ही निर्मात्याची भूमिका आहे. त्यांना आस्था वाटते ती त्यांच्या जाणिवांबद्दल. या जाणिवा रेखीव व मूल्यगर्भ अशा आहेत व त्यामुळे त्यांना आपले अनुभव विशुद्ध जीवनानुभवाच्या पातळीवर म्हणजेच कलात्मक पातळीवर आणणें अधिक शक्य आहे.'[५१] असे मुक्तिबोध म्हणतात. कलेच्या इतिहासात कलेच्या बदलणाऱ्या रूपाबरोबरच कलेच्या कसोट्या-देखील बदलू लागतात त्या कशा, या संदर्भात मुक्तिबोध सांगतात, 'समाजशास्त्रनिष्ठ समीक्षक वाङ्मयाकडे वेगळ्या दृष्टीने पाहतो. त्याचा भर व्यक्तिमनापेक्षा भोवतालच्या परिस्थितीवर असतो. त्या परिस्थितीनें व्यक्तिमन आकारास येते आणि म्हणुन व्यक्तिमनाने निर्मिलेल्या कलाकृतीमध्ये त्या परिस्थितीचे चित्रण होते, असा त्यांचा दावा. व्यक्ती आणि सष्टी ह्यांच्या अभेदय तत्त्वावर ही समीक्षा उभारलेली असते.'[५२] म्हणून दलित साहित्यामध्ये ज्या परिस्थितीचे चित्रण होते त्या परिस्थितीने व्यक्तिमन घडविले जाते. या व्यक्तिमनाकडून जी निर्मिती होते ती विशुद्ध असते व अशा या विशुद्ध कलाकृतीची समीक्षा ही व्यक्ती आणि समष्टीवर आधारित असते, असा मुक्तिबोधांचा दृष्टिकोण आहे.

५) प्रा. गं. बा. सरदार

प्रा. सरदार दलित साहित्यातील विविध प्रवृत्तींचा शोध घेतात. ज्ञाननिष्ठेचा संबंध समाजपरिवर्तनाशी जोडून विविध विचारांचा व विविध जाणिवांचा शोध घेतात. कोणत्याही विचाराची चिकित्सा, विचारांचे आदानप्रदान, विचारांची घुसळण हीच ज्ञान वाढविण्यासाठी उपयुक्त आहे हे विचारात घेऊन खोट्या आग्रहामागे किंवा खोट्या अहंकारामागे ते जात नाहीत. ते लिहितात, 'प्रत्येक माणसाच्या मनावर पूर्वसंस्कारांची, परंपरागत मूल्यसरणीची छाप असतेच असते. मग त्याला त्याची जाणीव असो वा नसो. तेव्हा सतत आत्मपरीक्षण करून स्वत:चे

पूर्वग्रह जाणून घेणें, आपली विचारसरणी कोणत्या वर्गाच्या हितसंबंधांना पोषक आहे ते शोधून पाहणें हाच पूर्वग्रहांवर मात करून ती शास्त्रीयदृष्टचा आत्मसात करण्याचा एकमेव उपाय होय.'[५३]

शास्त्र वाढलेले आहे, विस्तृत, व्यापक स्वरूपाचे झालेले आहे. या शास्त्राच्या वाढीने नव्या रचनेकडे, नव्या साहित्याकडे पाहण्याची दृष्टी समीक्षकाला यावयास पाहिजे होती. पण असे घडले नाही. शब्दचिकित्सा आणि अर्थनिर्णय हीच दोन महत्त्वाची शास्त्रीय समीक्षेची शोधसाधने असे समजणाऱ्यांना नव्याचे स्वागत करावेसे वाटत नाही. अशांविषयी सरदारांना खेद आहे. शास्त्राच्या वाढीबरोबर शास्त्रीय दृष्ठी वाढविणारे आणि जुन्या धर्मग्रंथांची पाने शोधत शब्दचिकित्सा व अर्थनिर्णय करण्यात दंग असणारे विद्वान हे सरदारांच्या दुःखाचे कारण होत.

'मनुष्याची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे' ही जाणीव होऊ लागली तेव्हाच नव्या समाजकारणाचा आरंभ झाला. जातिभेदाचे मूळ या समाजात खोलवर रुजलेलें आहे व ते नष्ट करण्यासाठी एखादी वैचारिक प्रक्रिया आवश्यक आहे. भारताचा इतिहास हा एका अर्थाने जातिलढ्यांचाच इतिहास आहे, हे काळानें सांगितले आहे. अशा या काळाचे गूढ प्रा. सरदार ऐतिहासिक पद्धतीने उकलण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात, 'समाजपरिवर्तनाला काही लोकांचा जो विरोध होतो, त्यात मानसिक कोतेपणाबरोबर स्वार्थीपणाचाही भाग असतो. तेंव्हा पुष्कळदा बाह्य परिस्थिती बदलल्याखेरीज सर्वसामान्य लोकांच्या विचारात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे शक्य होत नाही.'[५४] संतवाङ्मय हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असला तरी दलित साहित्याची ते निर्भीड चर्चा करतात. 'संतसाहित्याला धारेवर धरणारे साहित्य दलित साहित्यच होय. संतांनी पारमार्थिक क्षेत्रात समतेचा प्रवाह आणून सोडला तरी आज त्यांचे दुबळेपण टीकेचा विषय झालेले आहे.'[५५] असे तें स्पष्टपणें कबूल करतात. सरदारांची भूमिका अभिनिवेशी, दुराग्रही नाही. दलित साहित्य आपली स्वतःची जागा शोधील, असा आत्मविश्वास ते व्यक्त करतात. या संदर्भात गं. बा. सरदार म्हणतात, 'दलित आणि दलितेतर हे जरी एकाच समाजातील घटक असले तरी वस्तुतः त्यांची जगे अगदी भिन्न आहेत, गावकुसाबाहेर जे पिढ्यान्पिढ्या दलित म्हणून जन्मले आणि दलित म्हणूनच मृत्युमुखी पडले त्यांच्या दुःखाची जात वेगळी आहे.'[५६]

दलितांच्या दुःखाची जाण ते शोधू पहातात. सहानुभूतीचे आणि प्रत्यक्ष अनुभूतीचे आकलन होऊन त्यानुसार दलित साहित्यविषयक वैचारिकलेखन होण्यासाठी ते दलितांचे मनोगत समजून घेण्याची जिद्द बाळगतात. दलित साहित्याचा स्वतंत्र विचार का, त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन काय, असे विचारणाऱ्यांना ते म्हणतात, 'भारतीय समाज एकात्म बनला तर मग दलित वाङ्मयाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन उरणार नाही. मराठी साहित्याच्या मोठ्या प्रवाहात ते सहजपणे विलीन होऊन जाईल. दलित वाङ्मयाचे व चळवळीचे अंतिम उद्दिष्टच मुळी

दलितपण समूळ नष्ट करणे हे आहे व त्यासाठी दलित व श्रमिक साहित्यातील लेखकांना आपल्या वाङ्मयाला तपस्येच्या बळावर मराठी साहित्याचा कायापालट घडवून आणावा लागेल.'[५७] पुढे याच मुंबई मराठी संघाच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात, 'दलितत्व नाकारणे हीच दलित साहित्याची भूमिका आहे. ही भूमिका दलित साहित्याच्या जन्मप्रक्रियेशी सुसंगत आहे.'[५८] या साहित्याकडे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून ते पाहतात. साहित्याकडून निरागस आनंदाची त्यांना अपेक्षा नाही, याचे कारण निरागसतेचा अनुभव जीवनामध्ये त्यांना कधी आलाच नाही. दारिद्र्य, उपासमार, अन्याय, अत्याचार याची शल्ये सतत सलत राहणाऱ्या समाजातील या संवेदनशील तरुणांना केवळ कलावादाची उपपत्ती मानवण्यासारखी नाही.

जळलेले आयुष्य पुन्हा
निखाऱ्यासारखे फुलवायचे
म्हणून प्रकाशाचा पायवाट
मी जवळ केली आहे.

हे मानसिक परिवर्तन त्यांना महत्त्वाचे वाटते आहे. दलित वाङ्मयात कदाचित साहित्यगुण कमी असतील, पण नव्याने जाग आलेल्या माणसाची तीव्र संवेदनशीलता व मुक्त भावनोद्रेक त्यात काठोकाठ भरून राहिला आहे. त्यात दुबळेपणाला थारा नाही. मनुष्यत्वाची विटंबना झाल्यास मग ती कुठेही व कुणाच्याही बाबतीत होवो, माणुसकीची चाड असणाऱ्या प्रत्येकाला तिची चीड आली पाहिजे. समाजातील जास्तीत जास्त लोकांत ही व्यापक सहानुभूती, ही अन्यायाची चीड निर्माण करणं हे दलित वाङ्मयाचे वास्तविक कार्य आहे. व्यक्ती आणि समाज यांचे नाते सरदारांना अतूट वाटते. लेखकाचे समाजाशी असलेले नाते जेव्हा तुटते तेव्हा साहित्याच्या वाढीची प्रक्रिया थांबते व ते साहित्य एकांगी होते. समाजाशी नाते किंवा बांधिलकी जेव्हा असते तेव्हा एक मूलभूत क्रांतिकारक जीवननिष्ठा जन्मते. दलित साहित्य मराठी साहित्याचा कायापालट घडवून आणील असा त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे.

डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'प्रा. सरदार हे दलित साहित्याचे निर्भीड भाष्यकार आहेत. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे एक शस्त्र आहे. अन्यायाने कितीही चीड आली तरी केवळ चीड येण्यामुळे परिस्थिती बदलत नाही. म्हणून सरदारांचे म्हणणे आहे की, दलित लेखकांनी सभोवतालच्या वास्तवाचे सतत चिंतन व विश्लेषण करून त्याची घडण आणि विकास यांचे नियम जाणून घेतले पाहिजेत.'[५९] साहित्याकडे बघण्याची अशी एक समाजशास्त्रीय दृष्टी सरदारांची होती. 'त्यांनी आपल्या समीक्षेने जीवनवादी समीक्षेस बळकटी तर आणलीच, पण तिला एक प्रकारची प्रतिष्ठादेखील मिळवून दिली.'[६०] 'डांगे, सुखटणकर, गं. बा. सरदार, मुक्तिबोध आदी साम्यवादी समीक्षकांनी मराठी साहित्याकडे बघण्याची एक

विशिष्ट दृष्टी दिली हे नाकारून चालणार नाही.'[११] सरदारांनी तत्त्वाची तडजोड कधीही स्वीकारली नाही. सरदार जे बोलत व जे लिहीत त्यामागे एक तत्त्वनिष्ठा असे. ते म्हणतात, 'ज्ञानोपासना हा केवळ बौद्धिक व्यापार नसून समग्र मानवी जीवन उजळून टाकणारी ती एक दुर्दम्य प्रेरणा आहे.' म्हणून आपल्या भूमिकेचे पावित्र्य राखण्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास जो तयार असेल तोच खरा नैष्ठिक विचारवंत होय. अशी माणसं पाहिली की, 'दुरितांचे तिमिर नाहीसे होईल'[१२] असे भालचंद्र फडके म्हणतात.

वैचारिक निष्कर्षाकडे आकर्षित करून घेणारी त्यांची वृत्ती आहे. 'साहित्यातील सामाजिकता' या लेखात 'वाङ्मय हे सामाजिक जीवनाचे एक प्रमुख अंग आहे.' हे आपले मध्यवर्ती प्रतिपादन पटवन देण्यासाठी प्रा. सरदार आपल्या शैलीला कसे खुलवितात हे पहाण्यासारखे आहे. त्यांच्या प्रत्येक विधानामागे चिंतन आणि अनुभव शरीररक्षकासारखे उभे असलेले दिसतात. त्यामुळे सरदार यांच्या शब्दांना एक ठाम व दृढ भूमिका दिसते. विचार प्रकट करायला अनावश्यक शब्द ते वापरत नाहीत. आवश्यक शब्दच तेवढे घेतात. आपल्या विचारांना अंगांगाने खुलविण्यासाठी शब्दांना विशिष्ट आकार देतात. आशयाशी बेईमानी नसल्यामुळे सरदार यांची शैली कधीच विचारांवर कुरघोडी करीत नाही. काही लेखकांचा आशय शब्दांच्या ओघात वाहून जातो. काही लेखकांना शब्दांना पूर्णपणे विचारात दाखल करता येत नाही. पण त्यांचा आशय, अभिव्यक्ती ही एकत्र नांदताना दिसतात. दलित साहित्याकडे पाहण्याची व त्याचे विश्लेषण करण्याची त्यांची दृष्टी स्वतंत्र चिकित्सक आहे. ती तशी फार कमी समीक्षकांत असते.

त्यांच्या संदर्भात निर्मलकुमार फडकुले म्हणतात, 'बौद्धिक अहंगंडानें पछाडलेल्या शब्दपंडितांचा स्वत:चा तोल गेलेला असतो. प्रज्ञा आणि सहृदयता यांच्या मिलाफातून ज्यांच्या शब्दांना जीवनकळा आली आहे, असे लेखक–विचारवंत आज हवे आहेत. सरदार यांच्या व्यक्तित्वाकडे लक्ष गेले की अशा व्यक्ती महाराष्ट्रात आहेत याची प्रसन्न जाणीव होते. मनाला आधार वाटतो.'[१३]

६) डॉ. भालचंद्र फडके

दलित साहित्याची समीक्षा करताना डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'दलित, जीवनमूल्ये ही अखेर माणसाच्या माणूस असणाऱ्या प्रतिष्ठेची, श्रेष्ठतेची ग्वाही देतात. याचा प्रत्यय दलित कला व दलित साहित्य यांचा आस्वाद घेताना येतो.'[१४] दलित साहित्याकडे अगदी आस्थेनेच नव्हे तर जिव्हाळ्याने लक्ष देणारे, दलित जातीत जन्माला न येता दलितांच्या दु:खाचे जागृत आत्मभान असणारे, जातिव्यवस्थेविरुद्ध, वर्गव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भूमिका ठामपणे स्वीकारणारे व डॉ. आंबेडकरांच्या धम्मचक्र सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी असलेले डॉ. फडके हे दलित साहित्याचे केवळ भाष्यकारच नव्हेत तर प्रमुख समीक्षक आहेत. ऋणनिर्देश व्यक्त करताना ते म्हणतात, (दलित साहित्य: वेदना व विद्रोह) 'या पुस्तकाचे

लेखन एका विषण्ण मन:स्थितीत केले आहे. लेखन करता करता धैर्य आणि सामर्थ्य लाभले.' ' मनोगता'तून ते सांगतात, ' भारताच्या सामान्य जनतेला प्रत्यही अपमान सोसावा लागतो, अन्याय सोसावा लागतो. आज अन्याय, अपमान, अप्रतिष्ठा मी सोशीत असता माझ्या मनात विचार आला की या दलित जाती–जमातींनी शतकानुशतके अन्याय, अपमान कसा सोसला असेल ? त्यांची वेदना शोधावी, असे मला वाटले. ज्या वेदनेतून विद्रोहाचा जन्म झाला आहे. त्याचे स्वरूप जाणून घ्यावे असा विचार कितीतरी दिवस मनात घोळत होता. डॉ. बाबासाहेबांचे ' दीक्षाग्रहणा'च्या वेळचे यतिरूप जवळून पाहिले होते. त्यांच्या विचारांचे चिंतन करीत होतो.'[१५] या चिंतनातूनच ' दलित साहित्य: वेदना व विद्रोह ' याचा उदय झाला. दीक्षाभूमीवरील सोहळा ' याचि देही याचि डोळा ' पहाणाऱ्या फडक्यांना आंबेडकरांचे विचार पटले होते. नव्याने निर्माण होऊ पहाणाऱ्या दलित साहित्याविषयी आपण लिहायलाच पाहिजे, दलित साहित्याला आपण न्याय दिला पाहिजे, असे त्यांना वाटले. असे करताना आपण काहीतरी खूप नवे सांगतो आहो अशी त्यांची भावना मुळीच नव्हती. ते म्हणतात, ' दलित साहित्याच्या निमित्ताने जो नवा मराठी प्रवाह मराठी साहित्यात आला त्याचे स्वरूप मराठी वाचकांसमोर मांडावे अशी माझी योजना आहे. आमच्याकडे जे मृतवाङ्मयाचे संशोधन वा अभ्यास करतात ते श्रेष्ठ समजले जातात किंवा सूचिपर्णी विद्वान तरी प्रतिष्ठा मिळवतात. जिवंत वाङ्मयाचा अभ्यास करताना एक अपूर्व आनंद मिळतो. नव्याने येणाऱ्या प्रवाहाची उपेक्षा करून चालणार नाही. दलित साहित्याचा प्रवाह हा जिवंत, जीवनदायी प्रवाह आहे. तो आमच्या मरगळलेल्या, कोंडलेल्या मराठी साहित्याला ' जीवनरस ' देईल.'[१६]

मराठी साहित्याला एक विशिष्ट चौकट लाभलेली आहे. त्यामुळे हे साहित्य कोंडलेले आहे, तसेच ते मरगळलेले देखील आहे, तेव्हा या मृतवत साहित्याला संजीवनी देणारे साहित्य दलित साहित्यच ठरणार आहे, अशी अपेक्षा ते व्यक्त करतात, तर ' सत्ताधीशांनी माझ्यावर केलेल्या अन्यायामुळे व मी सोसलेल्या ताणामुळे एक लाभ झाला, आणि तो म्हणजे ' उपेक्षा ' या बुद्धप्रणीत वृत्तीचा स्वीकार सहज करता आला. दलित साहित्याने कशाचीही पर्वा न करता निर्भयपणे पुढे जायला पाहिजे, आता येणारे नवे युग हे दलित साहित्याचे आहे.'[१७] असा आशावाद प्रकट करतात.

' मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया ' या म्हणीप्रमाणे दलित जीवनाविषयी बऱ्याच मराठी लेखकांनी लिहिले आहे. पण दलितांच्या वाटयाला आलेल्या दु:खाला, दैन्याला, दास्याला, श्री. म. माटे यांच्यासारखा अपवाद वगळता, कोणीही लेखनविषय केलेले नाही. दलित साहित्याविषयी स्वागताची भाषा बोलणाऱ्यांनीही दलित साहित्याची समीक्षा हात राखूनच केली आहे. भालचंद्र फडके मात्र या दलितांच्या जाणिवेशी, सुख–दु:खांशी, अपमान–अवहेलनेशी

समरस झालेले दिसतात. दलित कविता, कथा, कादंबरी व नाटचाचे वृत्तिगांभीर्याने, जाणीवपूर्वक विश्लेषण करतात. दलित साहित्याविषयी विरोधी भूमिका घेणाऱ्यांविरुद्ध त्यांची तक्रार नाही. किंवा त्यांच्यावर दलितांनी किंवा इतर कुणी आक्षेप घेतला किंवा त्यांच्या आत्मीयतेला 'कोरडी' ठरविण्याचा प्रयत्न केला तरी ते स्पष्टीकरण देत नाहीत. जिथे आवश्यक आहे तिथेच समर्थन करतात.

दलित साहित्याची अनेकजण चर्चा करीत असतानाच दलित साहित्याची भूमिका समजावून सांगत फडके म्हणतात, 'या सर्व चर्चेला एक व्यवस्थित रूप द्यावे आणि दलित लेखकांनी कविता, कथा, कादंबरी, नाटक इ. क्षेत्रात जी महत्त्वाची भर घातली त्याचा आढावा घ्यावा असा प्रयत्न आहे.'[१८] फडके यांच्या या मनोगतातूनच 'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह' हया ग्रंथाची का व कशी निर्मिती झाली ते कळते. दलित साहित्याचा संपूर्ण आढावा घेण्याचा प्रस्तुत ग्रंथात प्रयत्न आहे. दलित साहित्यविषयक संदर्भग्रंथ म्हणून प्रस्तुत ग्रंथाला महत्त्व आहे.

'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह' यात फडके इतर दलित लेखकांच्या दलित साहित्याविषयीच्या व्याख्या विस्तृतपणे देतात. ते म्हणतात, दलित 'साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा एक मूल्यवान अनुभव आहे. त्या अनुभवाची आदिप्रेरणा आहे 'स्वतंत्रता'. या स्वतंत्रतेचा अनुभव दलितांना आला तो बाबासाहेबांच्या धर्मांतरानंतर.'[१९] दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांच्या अनुभव घेण्याच्या शक्तीतच फरक आहे. दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक आहे, तर दलित लेखकाचा अनुभव संवेदनात्मक असतो. दलित लेखकांचे लेखन हा एक जिवंत अनुभव आहे. उलट दलितेतर लेखकाने जे हिहिले ते तितके उत्कट नसणे, जिवंत नसणें स्वाभाविकच आहे. म्हणून दलित साहित्यात आकारास येते ते दलितांचे जग. दलित साहित्यातील 'दलितपणा अमुक एका जातीतील लेखकाने लिहिले यात नसतो किंवा समूहाचे जीवन निवडले यातही नसतो, तर तो दलितपणा माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करण्यात आहे, त्याला महान म्हणण्यात आहे.'[२०] या विधानाने दलित व दलितेतर लेखकांच्या साहित्यकृतीत स्पष्ट होत असलेल्या जाणिवांचे मूल्यमापन होते. दलितांच्या वेदनेचे आदिरूप चोखामेळा यांच्या अभंगांतून सापडत असल्याचे ते सांगतात. चोखामेळ्याच्या अभंगांत बुडी मारून ते वेदनांचा शोध घेतात व त्या वेदनांची सांगड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेदनेशी घालून देतात. 'दलित साहित्याचे स्वरूप: विद्रोह, नकार आणि दुःख' त्यामागची पार्श्वभूमी ते विशद करतात.

दलित कवितेचे मूल्यमापन करताना त्यांनी आस्वादकाच्या भूमिकेतून कवितेचा आस्वाद घेतला आहे. ते म्हणतात, 'समाजमनातील हल्लकल्लोळ या कवितेतील हेलकावा आणि लय बनतो. समाजातील घडामोड कवितेची घडामोड घडविते. कारण या कवितेची पाळेमुळे जीवनाच्या तळाशी साचलेल्या विषमतेत आणि सांस्कृतिक दुभंगलेपणात खोल लपलेली आहेत. ही कविता एकाच भाविक विश्वात

व्यक्त होत असली तरी तिचे अनुभवक्षेत्र प्रांतिक मर्यादेत न सामावणारे असेच आहे.'[७१] कवितेविषयी इतकी सृजाण प्रतिक्रिया आणखी कोणती असावी ? 'मृतकाळातल्या वेदना व्यक्त करीत ती वर्तमानाला सामोरी जाईल आणि जिवापाड जपलेली सोनेरी स्वप्ने सत्यसृष्टीत उतरवून दाखवील' अशा आशावादही ते व्यक्त करतात.

दलित कवितेची नवी रूपे सूर्वे, दसाळ, निंबाळकर, पवार आदींच्या कवितेतून ते शोधतात. त्या रूपांचा विचार काव्यसमीक्षेच्या संदर्भात करीत असले तरी डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आणि बुद्धाच्या तत्त्वज्ञानाच्या शक्तीमळे दलित कवितेचे रूप कसे तेजाळले याचा विचार ते करतात. आंबेडकरांच्या व बुद्धतत्त्वज्ञानाला येऊन मिळालेल्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचाही विचार मांडतात व या तीनही तत्त्वज्ञानांच्या एकत्रीकरणाने दलित कवितेचे वादळी रूप चितारतात. दया पवार, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, त्र्यंबक सपकाळे, ज. वि. पवार आदींची दलित कविता घराघरातून सूर्य पेटत असल्याची ग्वाही देते. ती पीडितांचे दुःख वेचते तशीच सामाजिक विषमतेवर घाव घालते, म्हणून तिने आत्मपीडक वा परपीडक होऊ नये अशा इशारा देत 'अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म' हया दलित कवितेच्या स्वप्नाला ते महत्त्व देतात.

दलित साहित्याची समीक्षा करताना त्यांची वृत्ती रसिक समीक्षकाची आहे. कोणत्याही कलाकृतीच्या मागच्या प्रेरणा व तिचे स्वरूप मळात जाऊन पहाणे, तसेच दलित लेखकांच्या विविध लेखनाचे समीक्षण विशेष आस्थेने करणे हे त्यांच्या समीक्षेचे वैशिष्ट्य होय.

दलित कथा–कादंबरीचाही ते परामर्श घेतात. दलित कथेचा परामर्श घेताना ते म्हणतात– 'दलित कथेचा घाट पारंपरिक मराठी कथेचा असला तरी त्या कथेतून घडणारे दर्शन अतिशय वेगळे आहे. दलित कथेतून प्रामुख्याने त्या समाजाचे दुःख आणि त्यांची चीड व्यक्त होत आहे. दलित कथेला एक दिशा आहे. तिला तिची स्वतःची गती आहे. म्हणून दलित कथेची जडणघडण कशी झाली ते पाहिले पाहिजे.'[७२] त्यांनी अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल आदींच्या संपूर्ण कथाविश्वाचाही समाचार घेतला आहे. त्या कथांकडे त्यांनी त्या काळातल्या प्रेरणांचा शोध घेऊन, कथा कशी घडली या भूमिकेतून तिचे मूल्यमापन केले आहे. त्याचप्रमाणे दलित कादंबरीची समीक्षा करताना त्यांनी आपले मत स्पष्टपणे नोंदविले आहे. ते म्हणतात, 'दलितांची कविता, दलितांची कथा चित्त वेधून घेते, पण दलितांची कादंबरी फारशी विचार करण्यासारखी नाही. अर्थात याला काही अपवाद आहेत. (सूड) बाबुराव बागुल, (हकीकत व जटायू) केशव मेश्राम, (फकीरा) अण्णाभाऊ साठे इ. थोडे अपवाद वगळले तर दलित लेखकाचे कादंबरी–लेखनादर्श फडके–खांडेकर प्रणीत कादंबरीचेच आहेत असे वाटते.'[७३]

दलित रंगभूमी एक नवे आव्हान आहे. 'माझे लेखन वाङ्मयीनदृष्ट्या श्रेष्ठ असो वा नसो, त्याची पर्वा न करता मी या मनाचा वेध घेणारच' अशी प्रतिज्ञा करून दलित लेखकांनी नाटकं लिहावीत असे ते सुचवितात. प्रस्तुत समीक्षा-ग्रंथाचा लेखनकाळ लक्षात घेतला तर (सूर्यास्त) हेमन्त खोब्रागडे, (उत्सव, जयक्रांती) प्रभाकर दुपारे, (विद्रोहाचे पाणी पेटले आहे) इ. मो. नारनवरे, (शहर, मूकता) अमर रामटेके यांनी अलिकडे लिहिलेल्या नाटकांनी दलित रंगभूमीच्या अपेक्षा वाढविल्या आहेत हे निश्चित.

'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' या समीक्षाग्रंथात फडके एक दोन मृत्यलेख लिहितात, केशव मेश्राम, गं. बा. सरदार, रा. ग. जाधव आदींच्या लेखनाचा परामर्श घेतात. मेश्रामांच्या कवितेची सुजाण समीक्षा करतात. यानंतर 'मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन' या ग्रंथात 'आरंभी लिहिणाऱ्या स्त्रियांचे लेखन कौतुकपर्व' काळातले होते, ते आता संपले आणि त्यांचे लेखन कसाला लावून पाहण्याचा कालखंड सुरू झाला आहे' अशी सुरवात करून, 'एखाद–दुसरा अपवाद वगळला तर मराठी लेखिकांचे अनुभवविश्व अतिशय मर्यादित, क्षुद्र आणि थिटे आहे' असे भालचंद्र फडके म्हणतात. 'स्वत:ला विसरल्याशिवाय, स्वत:च्या अंत:कोशातून बाहेर पडल्याशिवाय मरगळलेल्या मराठी साहित्यात स्त्रीलेखिका कोणतेच रसरशीत चैतन्य भरू शकणार नाहीत'[७४] असेही पुढे ते म्हणतात. या संदर्भात मराठी लेखिकांच्या लेखनाचे, समग्र साहित्य-प्रकाराचे चिंतन करता करता काही चिंताही व्यक्त केल्या आहेत. अर्थात, यातही या ग्रंथाचा लेखनकाळ पाहिला तर अलिकडच्या काही लेखनाची, काही जळत्या निखाऱ्यांची दखल त्यांना घेता आली असती. पण असे घडले नाही. अपेक्षा करायला मात्र हरकत नसावी. दलित रेखाटनांचा परामर्श त्यांनी घ्यायला हवा होता. भ. मा. परसवाळे, दासू भगत, दिलीप सूर्यवंशी, श्रीधर अंभोरे आदींचा विचार अपेक्षित होता. असे असले तरी फडके यांनी दलित साहित्याची नव्याने ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. कथा, कविता कादंबरी नाटय, आत्म-चरित्र आदि प्रकारांची सत्यासत्य भूमिकेतून चर्चा केली आहे. मूल्यमापन केले आहे. दलित साहित्याचे वेगळेपण, दलित साहित्याच्या जाणिवा व दलित साहि-त्यातील वेदना, विद्रोह, नकार, भवितव्य सांगताना त्यांनी कुठेच तोंडदेखलेपणा वा तोंडपुजेपणा केलेला नाही. वेळप्रसंगी मराठी साहित्याने व लेखकानें कोणती भूमिका स्वीकारायला हवी होती, त्यांच्या समीक्षापद्धतीत कोणते दोष आहेत, आणि दलित साहित्याचे मूल्यमापन करण्यासाठी कोणती दृष्टी हवी याचे विश्लेषण व अगदी समर्थपणे तितकीच आपल्या भूमिकेवर अटळ राहून फडके यांनी, कोणतेही तिरस्काराचे वा प्रहाराचे धोरण न स्वीकारता, दलित साहित्याचे समर्थन केले आहे. स्वागत केले आहे.

या सर्व कारणांमुळे भालचंद्र फडके दलित साहित्याचे मर्मग्राही टीकाकार, सामर्थ्यशाली समीक्षक, आंबेडकरी चळवळीतले एक हितचिंतक ठरतात.

त्यांच्या समीक्षेची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे ते कोणत्याही वादात न पडता सरळ सरळ साहित्याकृतीच्या अंतरंगालाच हात घालतात. तिचें आकलन झाले की आस्वादकाच्या भूमिकेतून तिचें मूल्यमापन करतात. तिची वैशिष्ट्ये सांगतात. दलितांचे दुःख समजून घेणारा, दलितांच्या वेदनेचा शोध घेणारा असा समीक्षक दलित साहित्याला लाभावा हे अतिशय महत्त्वाचे आहे. काही तरी नवे मूलगामी मी सांगतो आहे, असा त्यांचा मुळीच दावा नाही. 'पण दलित साहित्याच्या निमित्ताने जो नवा प्रवाह मराठी साहित्यात आला त्याचे स्वरूप मराठी वाचकांपुढे मांडण्यासाठी मी हा प्रपंच केला'[७५] असे जरी नम्रपणे स्वत:विषयी ते नोंदवीत असले तरी त्यांचा हा प्रयत्न दलित साहित्याच्या समीक्षेत भूषणावह आहे.

निष्कर्ष

१) दलित साहित्याच्या निर्मितीबरोबर समीक्षकांनी दलित साहित्याची भूमिका, अनुभवविश्व, वास्तवता याच्या अनुषंगाने समीक्षा करायला सुरवात केली.

२) या समीक्षकांपैकी साऱ्यांनीच दलित साहित्याला नकार दिला नाही, तर त्यातल्या काही जाणकार, आस्थेवाईक, चिकित्सक समीक्षकांनी ठामपणे दलित साहित्याचे समर्थन केले, स्वागत केले व समीक्षाही केली.

३) डॉ. म. भि. चिटणीस, वा. ल. कुळकर्णी, रा. ग. जाधव, शरच्चंद्र मुक्तिबोध, गं. बा. सरदार आदींचा या दलितेतर समीक्षकांत प्रामुख्याने समावेश होतो.

४) वेगवेगळ्या विचारप्रवाहांतून का होईना, दलित साहित्य हे जीवननिष्ठ साहित्य आहे, तो मराठी साहित्याला निर्मळ व समृद्ध करणारा प्रभावी झरा आहे, याच भूमिकेतून या समीक्षकांनी समीक्षा केली.

५) या समीक्षकांनी दलित साहित्याची व्याख्या केली, नेमके वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न केला, आणि त्यातून निष्पन्न झालेल्या विचाराचे अत्यंत स्पष्टपणे व तटस्थपणे प्रतिपादन केले.

६) दलितेतर समीक्षेने मराठी साहित्यात मोलाची भर घातली, मराठी साहित्य समीक्षेच्या कथा रुंदावण्यास मदत केली हे निश्चित.

७) दलित साहित्यसमीक्षेवर आरोप–प्रत्यारोप झाले, आक्षेप घेतले गेले, त्यांचे खंडनही केले गेले.

o o

५ : समारोप

आतापर्यंत दलित साहित्यावरील समीक्षालेखनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

द्वितीय महायुद्धोत्तर समाजजीवनात फार मोठा बदल झाला, साहित्य हे समाजजीवनाचा आरसा असल्यामुळे समाजजीवनाचे चित्रण या साहित्यातून होत गेले. या साहित्यालाच 'समकालीन साहित्य' असे नाव मिळाले व या साहित्याची समीक्षा 'समकालीन समीक्षा' ठरली.

प्रस्थापित साहित्याचे गंभीरतेने पुनर्मूल्यांकन करणें, अधिक विस्तृत पण समर्पक वाटणाऱ्या नव्या साहित्य–संकल्पनांचा शोध घेणे, विखुरलेल्या स्फुट समीक्षाविचारांची सूत्रबद्ध मांडणी करणे, आणि त्याच्या आधारे जुन्या किंवा नव्या साहित्यकृतीच्या जाणिवा–उणिवांची, सामर्थ्य–मर्यादांची उकल करणे ही समीक्षेची आजची महत्त्वाची दिशा होय.

साहित्यकृती, साहित्य–समस्या, साहित्य–व्यवहार यांचे आकलन, आस्वादन व मूल्यमापन म्हणजेच समीक्षा होय.

जन्माला येणाऱ्या कोणत्याही साहित्यकृतीचे स्वत:चे काही नियम असतात. त्या नियमांनुसार तिचे समीक्षण करावे अथवा व्हावे या भावनेला याच काळात दृढता मिळाली. साहित्यविचारात लेखकाच्या त्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणांना व भूमिकेला महत्त्वाचे स्थान मिळून या भूमिकेतूनच साहित्यकृतीचा आशय घडत गेला. या भूमिकेला अनुसरूनच आजची मराठी समीक्षा दोन ठळक प्रवाहांनी प्रवाहित झालेली दिसते.

१) सौंदर्यवादी समीक्षा, २) जीवनवादी समीक्षा.

१) सौंदर्यवादी समीक्षा ही विशेष प्रभाव असलेली, गाजलेली समीक्षा होय. या समीक्षेचा आजच्या केंद्रवर्ती साहित्यनिर्मितीशी आणि आस्वादनाशी जवळचा संबंध आहे. मर्ढेकर युगाने मराठी साहित्यात कलावादी भूमिकेला वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त करून दिले आणि मराठी समीक्षेत एक क्रांती केली.

२) साहित्यनिर्मिती करणाऱ्या कलावंताचा संबंध लोकजीवनाशी व सर्व-सामान्य जीवनाशी असावा लागतो. कारण साहित्य हे समाजजीवनापासून वा समाजवास्तवापासून दूर राहू शकत नाही, समीक्षेलाही साहित्याचे सामाजिक स्वरूप लक्षात घेतल्यावाचून पूर्तता येऊ शकत नाही. परंतु एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन कलेच्या नियमानुसार करता येतें, कारण कलानिर्मितीची प्रेरणा व्यक्तिगत मानली तर तिच्यातून जन्माला येणारी कलाकृती मात्र सामाजिकच असते. जीवनवादी समीक्षा लिहिणाऱ्यांवर वेगवेगळ्या वादांचा परिणाम झाला

असला (उदा. मार्क्सवाद, गांधीवाद) तरी त्यांची समीक्षा मूलत: जीवनवादीच ठरते.

समकालीन दलित साहित्य व दलित समीक्षा

जीवनवादी समीक्षा म्हणूनच दलित साहित्यसमीक्षेकडे पाहता येईल, कारण दलित साहित्य समीक्षा ही जीवनवादाला जवळची समीक्षा आहे. पण ती इतके वेगळे रूप घेते की तिच्या या वेगळ्या रूपाचा स्वतंत्र विचार करावा लागतो. ही समीक्षा लेखनकृतीचा समाजाशी असलेला संबंधच शोधत नाही, तर कलाकृतीत अवतरलेल्या जीवनमूल्यांचेही विश्लेषण करते.

जीवनमूल्यांच्या काचातून कलेला सोडविण्याचा प्रयत्न कलावादी समीक्षक करतात, तर कलामूल्यांना जीवनवादाशी जोडण्याचा प्रयत्न जीवनवादी समीक्षकाचा असतो. कोणत्याही साहित्यकृतीमागे काही जीवनमूल्ये असतात. या जीवनमूल्यांशिवाय कलाकृती घडणे अशक्य व तिचा आस्वाद घेणेही अशक्य. या संदर्भात दलित साहित्यात एक अनोखे अनुभवविश्व साकार झालेले असते. असे अनुभवविश्व दलित साहित्याविना अन्यत्र कुठे साकारलेले दिसणार नाही.

चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेमुळे जनावरांपेक्षाही हीन जीवन मूकपणे जगणाऱ्या या मूकनायकाला भाषा दिली तो दलित साहित्याने व या निर्मितीमागील प्रेरणास्थान होत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

दलित साहित्याचे स्वरूप

दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा एक मूल्यवान अनुभव आहे व त्याची प्रेरणा आहे 'स्वतंत्रता'. या स्वतंत्रतेचा अनुभव दलितांना आला तो डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतरानंतर. हा स्वतंत्रतेचा मूल्यवान अनुभवच दलित साहित्याचा गाभा होय. शतकानुशतके भोगाव्या लागलेल्या दु:खाचा व त्यांच्यावर केल्या गेलेल्या अन्यायाचा हा कबुलीजवाबच होय. अशा या दलित साहित्याने मराठी समीक्षेला आव्हान दिले आहे. आशेची समृद्ध जाणीव आणि प्रकाशाला सामोरे जाण्याची जिद्द घेऊन हे साहित्य नव्या रूपाने पुढे आले आहे.

दलित साहित्य म्हणजे काय ?

सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान इत्यादींनी ग्रासलेल्या दलित वर्गाला रानटी, दुष्ट परंपरा, अंधश्रद्धा, दैववाद, देवभोळेपणा, गुलामगिरी या सर्वांविरुद्ध बंड उभारायला, लढा देण्याला, माणूसपण मिळवण्यासाठी जूने जग जाळायला सिद्ध करणारी जाणीव म्हणजे दलित जाणीव ! आणि या जाणिवेतून दलित जीवनाचे घडणारे दाहक, भेदक दर्शन म्हणजे दलित साहित्य. या दलित साहित्याची व्याख्या वेगवेगळ्या पद्धतीने केली असली तरीही सर्वांनी 'माणूस' हे प्रमुख केंद्रस्थान मानलेले आहे.

दलित समीक्षा

दलित साहित्याची समीक्षा करताना, दलित साहित्यात व्यक्त झालेला अनु-

भव किती मोलाचा आहे हे बघणे आवश्यक आहे. हा अनुभव प्रत्यक्ष लेखकाच्या व्यक्तिगत प्रकृतिधर्मावर, त्याच्या संवेदनशीलतेवर त्याच्यावर झालेल्या वाङ्मयीन संस्कारांवर, तसेच सामाजिक संस्कारांवर अवलंबून असतो.

वाङ्मयीन परंपरेला, पारंपरिक वाङ्मयीन मूल्यांना आणि वाङ्मयीन आदर्शांना दलित लेखकाने नाकारले आहे. तो अनुकरणप्रिय नाही. त्याला कुणाचेही अनुकरण नको आहे. त्याचा अनुभव जसा आहे तसाच, त्याच शब्दांत तो सांगणार. आपले अनुभव आपल्याच ओबडधोबड भाषेत दलित लेखक मांडतो आहे. हा त्याचा अनुभव, त्याचा दृष्टिकोण, त्याच्या लेखामागची जाणीव, त्याची भूमिका, लेखनाचा विषय, मांडावयाचा आशय हा मराठी साहित्यात प्रथमच दलित साहित्याच्या रूपाने अवतरला आहे. त्याचे स्वागत मराठी समीक्षकांनी पूर्वग्रहदूषितपणा टाकून देऊन केले पाहिजे, असे त्यांना वाटते.

दलित लेखकाने पांढरपेशा साहित्यपरंपरा टाकून दिल्या आहेत. ज्या सामाजिक मूल्यांवर या साहित्याच्या परंपरा आधारित आहेत त्या मूल्यांनाच त्याने नकार नोंदविला आहे. दलित साहित्याला स्वत:चा एक 'फॉर्म' आहे. त्याचे मल्यमापन करताना 'फॉर्म' चा विचार करून दलित साहित्याचे मूल्यमापन व्हावे अशी अपेक्षा दलित साहित्य समीक्षा व्यक्त करते.

दलित साहित्याची निर्मिती झपाट्याने होत असतानाच त्या निर्मितीचा विचार व त्यामागची भूमिका दलित समाजातील काही विचारवंत समीक्षक मांडू लागले. नव्या जाणिवांनी भारलेले अनेक तरुण लेखक-कवी लिहू लागले. केवळ सामाजिक विषमतेवरच नाही, तर आत्मपरीक्षणदेखील होऊ लागले. रिपब्लिकन पक्षातील फुटीरपणा गटबाजी, स्वार्थाचे राजकारण, स्वसमाजाविषयी वाढत चाललेली उदासीनता, मरगळलेपणा, आपसातील मतभेद, तणाव, पोटजातींचे प्रस्थ आदी प्रचलित प्रश्नांतून दाहक होत जाणाऱ्या वास्तवाचाही समाचार दलित लेखकांनी घेतला. बहुतेक सारे आपल्या कवितेनेच पुढे आलेत. या काळात कविता जशी फुलत होती तशीच वैचारिक आणि समीक्षणात्मक लिखाणाची प्रवृत्तीदेखील वाढत होती. डॉ. म. ना. वानखडे, भाऊ लोखंडे, दया पवार, राजा ढाले, रावसाहेब कसबे, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, रत्नाकर गणवीर, ताराचंद्र खांडेकर, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर आदींनी दलित साहित्याला वैचारिक व समीक्षणात्मक साज चढविला.

दलित साहित्याची भूमिका दलित विचारवंत मांडू लागले. दलित साहित्य हे अखेर साहित्य आहे आणि त्याचा विचार साहित्यिक निकषातून व्हायला पाहिजे, परंतु दलित साहित्याच्या विकासाबरोबर समीक्षेचे नवे निकषही मान्य करायला हवेत, असे परखड मतही ते नोंदवू लागले.

दलित साहित्याला अनुकूलतेने समीक्षा करणारे दलित समीक्षक लाभले तसेच दलित समीक्षेवर आक्षेप घेणारे व दलित साहित्याला नकार देणारे अपवादात्मक

एक-दोन दलित समीक्षकही लाभले. 'बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर साहित्य दलित का म्हणावे ?' असा विचार सांगून दलित साहित्याची हेटाळणी करणारा दलित समीक्षकही दलित साहित्याला लाभला.

काही दलित समीक्षकांनी आंबेडकरवाद की मार्क्सवाद असा मुद्दा उपस्थित केला. पण माणसाचा व त्याच्या शोषणाचा विचार आंबेडकरवाद, मार्क्सवाद व बुद्धवाद करीत असल्यामुळे या तीनही तत्त्वज्ञानाचा गाभा एकच आहे, अन् तो म्हणजे माणसाची शोषणापासून मुक्ती. दलित साहित्य मानवमुक्तीचा पुरस्कार करते, एवढे भान ठेवून दलित साहित्याची समीक्षा करावी लागते.

या समीक्षकांत वा. ल. कुळकर्णी, दि. के. बेडेकर, रा. ग. जाधव, शरच्चंद्र मुक्तिबोध, म. भि. चिटणीस, भालचंद्र फडके, रा. भि. जोशी, आदींचा समावेश होतो. या समीक्षकांनी दलित साहित्य-समीक्षेचे क्षेत्र उंचावले यात वाद नाही. काहींनी अतिशय तटस्थ भूमिकेतून, काहींनी सुजाणपणे, तर काहींनी मूल्य-संकल्पनात्मक भूमिकेतून दलित साहित्याची समीक्षा केली.

प्रतिकूल समीक्षा करणाऱ्यांत भालचंद्र नेमाडे, विद्याधर पुंडलिक, बाळकृष्ण कवठेकर आदी होत. यांच्या काहींच्या भूमिका पूर्वग्रहदूषित, हट्टाग्रही व व्याजप्रश्न निर्माण करणाऱ्या, तसेच विधानात्मक स्वरूपाच्या आहेत. या आक्षेपकांच्या आक्षेपांना रा. ग. जाधव, डॉ. चिटणीस, शंकरराव खरात, डॉ. म. ना. वानखडे यांनी उत्तरे दिली आहेत. (श्री. कवठेकरांच्या मतांची चिकित्सा परिशिष्टात केली आहे.)

समकालीन साहित्यात दलित साहित्याचे स्थान नेमके कोणते हे शोधण्या-साठी दलित साहित्यातून प्रकट होणाऱ्या अर्थसंपृक्त दलित जाणिवांचा प्रथम शोध घ्यावा लागेल. केवळ वाङ्मयीन चळवळीच्या दृष्टीने दलित साहित्याकडे न पाहता दलित साहित्य म्हणजे जीवनदृष्टीच होय असा पुरस्कार दलित साहित्यिक करतात. दलित जाणिवा या दलित साहित्याच्या ऐतिहासिक उठावात सामील होणाऱ्या शूर शिपायांसारख्या असतात.

दलित साहित्याचे आकलन, आस्वादन व मूल्यमापन करताना दलित कलाकृतीच्या तळाशी जाऊन पोहचणारी व त्या तळातून मूल्यांचे मोती वेचून आणणारी वृत्ती समीक्षकांची हवी. दलित साहित्याची समीक्षा करताना समीक्षकांनी कालसापेक्ष संवेदनवृत्तीच्या अनुरोधाने ही समीक्षा करावी. त्यासाठी दलित साहि-त्यातील संवेदनरीती समजावून घेणे जरूरी आहे.

दलित समीक्षकातली तटस्थता, सुजाणता, मूल्यसंकल्पनात्मक समीक्षेचे कसब पारखून घेऊन दलित समीक्षेचे यशापयश ठरविले जाऊ शकते. यासाठी दलित समीक्षेचे स्वरूप, कार्य आणि सिद्धांत याची चर्चा व्हावयास हवी. दलित समीक्षेचे निकष वेगळे आहेत, ती रूढ मराठी समीक्षेपेक्षा कितीतरी वेगळी आहे, कारण दलित साहित्यच वेगळे आहे. दलित साहित्याचे निराळेपण मान्य केले की

दलित समीक्षेचे निराळेपणही लक्षात येते.

हरवलेल्या वाङ्मयीन वाटांच्या शोधात ही समीक्षा असते. कारण दलित साहित्य दलितांच्या हरवलेल्या वाटांचे मार्गदर्शक आहे. दलित समीक्षा म्हणजे मैलाचा दगड आहे, जो साहित्याची नेमकी दिशा, वाटचाल कुठून कशी करावी हे सांगायला पुढे येतो. उत्सुक असलेली ती एक धगधगनी अंगारवाट होय, जिच्या ढिगातले काही निखारे इतरांच्या पदरात देऊन त्यांच्या वाटा प्रकाशमान करता येतात. 'दलित साहित्य' असा शब्दप्रयोग न करता 'बौद्धसाहित्य' हा शब्दप्रयोग व्हावा, आपण बौद्ध झालोत तेव्हा बौद्धांचे बौद्ध साहित्य असावे, असा आग्रह दलित साहित्याला विरोध करणारी काही मंडळी करतात. तो चुकीचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान जास्त व्यापक आहे, विस्तृत आहे.

बुद्ध, फुले, मार्क्स या तीनही विचारवंतांच्या तत्त्वज्ञानातून डॉ. आंबेडकरांचे एक संपूर्ण तत्त्वज्ञान घडलेले आहे. या आंबेडकरी तत्त्वज्ञानाची व्यापकता समजून घ्यायला पाहिजे. दलितांचे दलितविषयक जीवनाचे तत्त्वज्ञान व बौद्ध तत्त्वज्ञान हे परस्परपूरक आहेत.

स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही स्वप्ने पाहणाऱ्या या दलित साहित्याच्या आणि साहित्यिकांच्या दिशा प्रकाशमान झाल्या आहेत. दलित साहित्याने समीक्षकांना व रसिकांना आत्मपरीक्षण करायला शिकविले आहे. दलित साहित्य आजच्या युगाचे महान तत्त्वज्ञान आहे. दलित साहित्य या यंत्रयुगाचे तंत्रज्ञान आहे. दलित साहित्य दलितांच्या मूर्तिमंत इतिहासाची साक्ष आहे. भोगलेल्या यातनांचा आलेख आहे, तर जागलेल्या मनाचा हुंकार आहे. दलित साहित्य म्हणजे दलितांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीचा संगर आहे, तर युगानुयुगाच्या मुक्या मनाचा जागर आहे. त्यात दुःखाच्या सौंदर्याची जाण आहे. गावकुसाबाहेरच्या उपेक्षित मनाची तान आहे. झिडकारलेल्या व नाकारलेल्या माणसांचे जागे झालेले भान आहे, तर डॉ. आंबेडकरांच्या मुक्तिलढ्याचा तो प्राण आहे.

अथांग सागरातल्या ओंजळीने सागरालाच दान द्यावे, स्वयंज्ञान्याने ज्ञानालाच ज्ञान द्यावे, खुद्द प्रकाशानेच प्रकाशाला प्रकाश द्यावा, खुद्द वटवृक्षानेच आपल्या फांद्या सिचाव्यात, स्वप्नांनीच स्वप्नांना मूर्त रूप द्यावे, कर्तृत्वानेच कर्तव्याला जागे करावे, आशेने आशेला गोंजारावे, आभाळाने आभाळालाच कवेत घ्यावे व दिशांनी दिशांनाच कवटाळावे, असे दलित साहित्य म्हणजे या मराठी साहित्याचे प्रगत रूप आहे.

० ०

परिशिष्ट : १

दलित साहित्य : काही आक्षेप

दलित साहित्याचे स्वागत, समर्थन काही दलितेतरांनी केले असले तरी काही आक्षेपसुद्धा काहींनी या साहित्यावर घेतले आहेत. त्यांचाही विचार होणे आवश्यक आहे. या आक्षेपांना वेळोवेळी दलित व दलितेतर समीक्षकांकडून उत्तरे दिली गेली आहेत. काहींचे आक्षेप पूर्वग्रहदूषित, काहींचे व्याज असले तरी दलित साहित्यसमीक्षेत त्यांचा विचार करणे आवश्यक ठरते. दलित समीक्षा निव्वळ कार्य-प्रवण नसून ती विचारप्रवण आहे. पण या 'विचारप्रवणतेमधून मराठी समीक्षा-क्षेत्रातील साचेबंद आकृतिवादाचे प्रस्थ कमी होण्यास मदत झाली. सौंदर्यशास्त्रांच्या तात्त्विक चर्चेचा दिखाऊ सोसही मागे पडण्यास साहाय्य झाले.'[७६] असे प्रा. रा. ग. जाधव म्हणतात. दलित साहित्याच्या संदर्भात बऱ्याच लोकांकडून अनेक आरोप, अनेक गैरसमज आणि आडाखे बांधले जात होते.

१) बाळकृष्ण कवठेकर

'दलित साहित्याने परंपरा नाकाराव्यात' या संदर्भात बाळकृष्ण कवठेकर म्हणतात– 'दलित साहित्याने परंपरेला नकार देऊ नये. दलित साहित्य पुराणांचा किंवा धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास करण्याऐवजी क्रांतिकारी इतिहासाचे अध्ययन आणि चिंतन करून त्यातून नवीन शोधून काढणे इष्ट समजते. दलित साहित्यिकांना सीतेचा त्याग करणारा राम हा कसा काय परवडणार? या संदर्भात असा एक प्रवाह आहे, 'दलित साहित्यिकांनी बौद्ध धर्माचा अभ्यास केला पाहिजे' असे सांगणारा. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला बौद्ध धर्म हा विज्ञाननिष्ठ अशा भूमिकेतला आहे. ते स्वत: बुद्धवचन आणि त्यानंतरचा बौद्धधर्म यांमध्ये फरक करतात. बुद्धानंतर बौद्ध धर्मात जे कर्मकांड आणि अनाचार माजले त्याला पोषक अशा वाङ्मयाचा ते स्वीकार करीत नाहीत. म्हणून आंबेडकरी प्रेरणा मानणाऱ्या दलित साहित्यिकांनाही त्याचा विचार करता येत नाही.

२) डॉ. भालचंद्र नेमाडे

दलित साहित्य हे जातीयवादाचे लक्षण आहे असे 'कोसला'कार डॉ. भाल-चंद्र नेमाडे म्हणतात. ते पुढे असेही म्हणतात की, 'असे दालन मराठी साहित्यात उघडण्याची शक्यता नाही. मराठी साहित्यात अशा दालनाची आवश्यकताही नाही.'[७७] नेमाडे यांच्या त्या विधानाचा फोलपणा सिद्ध झालेला आहे. दलित साहित्याने मराठी साहित्य समृद्ध केले आहे, यात शंकाच नाही.

३) प्रा. वा. ल. कुळकर्णी

'जुन्या साहित्यातील दोषांबरोबर गुणांकडेही लक्ष दिले पाहिजे. दलित

साहित्याच्या लिखाणात बुजरेपणा आढळतो, तो जावयास हवा '७८ असे वा. ल. कुळकर्णीचे मत होते. अर्थात ते त्यांनी ज्या काळात व्यक्त केले त्या काळात ते योग्यही असेल, नाही असे नाही. पण आज दलित लेखकामधला बुजरेपणा गेलेला आहे. तो अगदी खुल्या दिलाने, त्याला जे जाणवले ते, लिहितो आहे.

४) विजय सोनवणे

'दलित जातीत जन्माला आलेल्यांचे साहित्य म्हणजे दलित साहित्य की दलितांविषयी लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य ?'७९ असे विजय सोनवणे विचारतात. पण दलित साहित्याचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंत समीक्षकांनी या प्रकारची भूमिका कधीच घेतली नव्हती. 'दलित ही एक जात नसून ती 'जाणीव' आहे. ही जाणीव समाजशास्त्रीय दृष्टिकोणामुळे अधिक प्रगल्भ आणि शास्त्रीय होत जाते. म्हणूनच ती विद्रोह, नकार आणि विज्ञाननिष्ठा या सूत्राशी बांधली जाऊन अंतिमत: क्रांतिकारी होते.'८० असे अर्जुन डांगळे म्हणतात.

५) यादवराव गांगुर्डे, टी. पी. अडसूळ

आपण स्वत:ला 'दलित' का म्हणून म्हणवून घ्यायचे ? 'दलित' हा शब्दच मुळी अपमानकारक आहे, असा विचार दलितांतील 'सुरक्षित' सुशिक्षितांमध्ये आढळतो. परंतु दलित साहित्याच्या संदर्भात 'दलित' हा शब्द पारंपरिक अर्थाने घेतलेला नसून त्या शब्दाला एक नवा आशय प्राप्त झालेला आहे, दलित म्हणजे शोषित, पीडित असा समाज, क्रान्तिकारी समूह, या नव्या आशयाने व व्यापक अर्थाने या शब्दाचा विचार करावा.

६) विद्याधर पुंडलिक

विद्याधर पुंडलिक आक्षेप घेताना म्हणतात, 'दलित साहित्यामागील प्रेरणा अधिक जिवंत आणि खऱ्या आहेत. त्यामागे हिंदुसमाजरचनेतील भयानक विषमता आणि अन्यायाबद्दलची धगधगीत भाजून काढणारी चीड आहे. परंतु समाजातील न्याय आणि अन्याय यातून निर्माण झालेल्या अनुभवाला स्वयंभू किंवा श्रेष्ठ सौंदर्यमूल्य नाही. सामाजिक न्याय हे महान मूल्य आहे, परंतु तेसुद्धा शेवटी बाकीच्या आणखी महान मूल्यांपैकी एक आहे. दलित साहित्य हे दलित म्हणून कलेचे वेगळे निकष मागू शकत नाही. त्याचे मूल्यमापन कलेच्या स्वयंभू आणि स्वतंत्र कसोट्यांवरच पारखावे लागेल.' ('मागोवा' दिवाळी अंक, १९७३, पृ. ९१)

दलित साहित्यकृतीच्या मूल्यमापनाला किंवा समीक्षेलाही पुंडलिक यांची भूमिका घातकच ठरते. त्यांची वरील भूमिका समीक्षा म्हणून हट्टाग्रही आहे. पांढरपेशा लेखकाने वा समीक्षकाने हेहाळणी म्हणून या विषयाकडे, साहित्याकडे बघू नये. सत्तालालसा माणसाला माणसापासून दूर नेणारी असते. ती राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वा साहित्यिकही असते. जुन्या परंपरागत चौकटीत वावरणारे साहित्य चौकटीप्रिय असते. त्याला चौकटी सोडून वावरावे असे वाटत नाही. आपल्या

कूपमंडूक वृत्तीमुळे साहित्याच्या प्रांतात देखील त्यांची वृत्ती अशी संकुचित, मर्यादित व चाकोरीबद्ध असते. अशा साहित्याची वाढ होत नाही. रिकेट्स् झालेल्या रोग्याप्रमाणें हया साहित्याची वाढ खुरटते. त्यामुळे वाङ्मयीन मूल्ये कोणती व सामाजिक मूल्ये कोणती या चक्रातच ते चक्रावून जातात व या दोहोंची गल्लत करू लागतात. असे समीक्षक ना कलाकृतीचे मूल्य सांगू शकतात, ना स्वत:चे मूल्यविषयक विचारदेखील. प्रा. पुंडलिकांच्या बाबतीत हेच घडलेले दिसून येते.

त्यांच्या या भूमिकेला उत्तर देताना डॉ. म. ना. वानखडे म्हणतात, 'कलेसाठी कला हा घोष जगातील सर्व समाजात फार मोठी स्थित्यंतरे होत असताना निरर्थक वाटतो. आपल्या देशात स्वातंत्र्य, लोकशाही व शिक्षण या कारणांमुळे आतापर्यंत मुका व दाबून टाकलेला बराच मोठा समाज जागा होत आहे. या राजकीय व सामाजिक स्थित्यंतराकडे मध्यमवर्गीय पांढरपेशा लेखकांचा बघण्याचा दृष्टिकोण सहानुभूतीचा व आपुलकीचा आहे असे म्हणता येणार नाही. समाज ढवळून निघत असताना आपल्या आजपर्यंतच्या स्थिर सिंहासनाला भूकंपाचे धक्के बसत असल्याची जाणीव झाल्यामुळे पांढरपेशी लेखक व समीक्षक 'कलेसाठी कला' हा मंत्र अधिकच जोराने बडबडू लागला आहे. दलित लेखकांनी या सुंदर दिसणाऱ्या 'सायरनच्या' आवाजाला भुलू नये' असे डॉ. म. ना. वानखडे वरील प्रश्नाला उत्तर देताना म्हणतात. ('मराठवाडा', दिवाळी अंक, १९६९, पृ. ६)

निष्कर्ष

१. मराठी साहित्यात दलित साहित्याला साऱ्याच दलितेतरांनी नकार दिलेला नाही. अनुकूल मतांबरोबरच प्रतिकूल मतेही प्रदर्शित केली गेली.

२. दलितांच्या अनुभवविश्वात ते वावरले नसतील, दलितांचे जीवन त्यांच्या वाटयाला आले नसेल, परंतु दलितेतर समीक्षकांनी दलित साहित्याची समीक्षा प्रामाणिकपणे तितक्याच जाणकारपणे केली आहे.

३. वा. ल. कुळकर्णी, बेडेकर, जाधव, मुक्तिबोध आदींनी आपापल्या परीने आपापल्या समर्थनाद्वारे दलित समीक्षा क्षेत्रात दलित साहित्याची बूज राखली.

४. भालचंद्र नेमाडे, जयवंत दळवी, विद्याधर पुंडलिक, बाळकृष्ण कवठेकर आदींनी दलित साहित्यावर आक्षेप घेतले.

५. पूर्वग्रहदूषित, व्याजप्रश्न अन् केवळ विधानात्मक समीक्षा असे त्यांच्या समीक्षेचे स्वरूप राहिले.

६. या आक्षेपकांच्या आक्षेपांना रा. ग. जाधव, चिटणीस, डॉ. वानखडे आदींनी उत्तरे दिलीत.

७. कवठेकरांच्या समीक्षेतील व्याजप्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न आहे.

परिशिष्ट : २

प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांची दलित साहित्य समीक्षा

'दलित साहित्य : एक आकलन' या पुस्तकाच्या 'मनोगता' त प्रा. बाळ. कृष्ण कवठेकर म्हणतात, 'प्रस्तुत पुस्तक म्हणजे दलित साहित्याचा इतिहास नव्हे- विशिष्ट कालखंडात निर्माण झालेल्या सर्वच्या सर्व दलित साहित्यकृतींचा आढावा घेणे, हेही या पुस्तकाचे उद्दिष्ट नाही. तर विविध भूमिकांचा परामर्श घेऊन स्वत:ची भूमिका मांडणे आणि प्रमुख दलित साहित्यिकांनी केलेल्या साहित्यनिर्मितीचा विचार करणे हे या पुस्तकाचे उद्दिष्ट आहे.' (पृ. १४)

प्रस्तुत पुस्तकात दलित साहित्यिकांनी आणि साहित्यविमर्शकांनी मांडलल्या दलित साहित्यविषयक भूमिकांचा परामर्श घेण्यापेक्षा त्या भूमिकांचे खंडन करण्याचाच प्रयत्न कवठेकरांचा दिसतो. एकदा पूर्वग्रह दूषित भूमिका स्वीकारली की, इतरांच्या भूमिकांचा विचार करता येत नाही. अविधायक स्वरूपाची टीका म्हणजे परामर्श नव्हे. परामर्श घेताना त्या साहित्यकृतीमागची प्रेरणा कोणती, ती प्रेरणा निर्माण झाली की करावी लागली, आणि का, या प्रश्नांचा शोध घ्यावा लागतो. या प्रश्नांची उत्तरे मिळू लागली की मग साहित्यकृतीचे आपोआप आकलन होत जाते. हे आकलन आस्वादनाच्या पातळीवरून होते व मग त्या साहित्यकृतीचे मूल्यमापन करता येते. यालाच विस्तृत रूपाने साकार केले की तो परामर्श ठरतो, कवठेकरांना अभिप्रेत असलेला 'परामर्श' हा दलित साहित्य समीक्षेच्या बाबतीत अविधायक स्वरूपाची टीका ठरतो. कवठेकरांच्या 'दलित साहित्य: एक आकलन'- मधील पुढील उतारे पहा–

१) नकार आणि विद्रोह या भूमिकांनी दलित साहित्याच्या स्वरूपाबरोबरच समीक्षेवरही विचित्र परिणाम केला आहे. (पृ. १४)

कोणत्याही कलाकृतीत आविष्कृत झालेले तंत्र समीक्षेवर विचित्र परिणाम करण्यापेक्षा समीक्षामूल्यांच्या घडणीत हातभार लावण्याचे कार्य करीत असतें. या संदर्भात अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म यासोबतच वर्णव्यवस्थेचा मृत्यु आणि लोकशाहीचा जन्म हा दलित साहित्याचा मंत्र आहे, व या मंत्रानुसार दलित साहित्यात प्रगटणारी वेदना वा विद्रोह साहित्यकृतीचे तंत्र आहे. असे तंत्र साहित्यकृतीचे मूल्यमापन करायला हातभार लावते. ते विचित्र परिणाम करीत नाही. अन् झालाच तर तो वर्णव्यवस्था पाळणाऱ्यांच्या विचित्र मनोवृत्तीवर व्हावा. पण हे अभिप्रेत असूनही असे घडत नाही व पुन्हा पुन्हा विद्रोह पेटवावा लागतो. नकार नोंदवावा लागतो.

२) 'दलित साहित्यिकाने नव्या पुराणकथांच्या निर्मितीचा प्रश्नही विचारात

घ्यायला पाहिजे.' (पृ. १५)

हिंदू पुराणकथा दलितांना आपल्या वाटत नाही. कारण त्या कथा दलितांवर अन्याय करणाऱ्या आणि त्यांना पायदळी तुडविणाऱ्याच असतात. अशा पुराणकथांविषयी वा त्यांच्या निर्मितीविषयी दलित साहित्यिकाने का विचार करावा ?

३) पुराणकथा म्हणजे समाजमनाला पडलेली युगव्यापी स्वप्ने असतात, हे विधान अलंकारिक नव्हे तर मानसशास्त्रीय सत्य आहे. (पृ. १५)

कवठेकर म्हणतात, तसे हे विधान मानसशास्त्रीय सत्य असेल तर माणसाच्या मनोव्यापारातले काही अंशच स्वप्नरूप असतात, यालाही मानसशास्त्रीय आधार आहेच. माणसाच्या दैनंदिन व्यवहारातल्या काही गोष्टी मनात तशाच राहतात, त्या ठसतात. नंतर स्वप्नव्यापाराने पुन्हा प्रकट होतात. (मनी वसे ते स्वप्नी दिसे' ही म्हणही याच संदर्भातली आहे.) हे मानसशास्त्रीय सत्य नाही काय ? असे असले तर पुराणकथांनी माणुसकी नाकारणारे, शंबूकाचा वध करणारे, एकलव्याचा अंगठा मागणारे स्वप्न पाहावे, स्वप्नांनी चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेची स्वप्ने पाहावीत, माणूस म्हणून मनुष्यत्वाचे मूल्य नाकारणारे स्वप्न पहावे व हेच स्वप्न युगव्यापी म्हणून समाजमनाला पडत असेल तर त्या स्वप्नांचे स्वागत करण्यासाठी पुराणकथांचा आधार घ्यावा का ? कवठेकर म्हणतात–पुराणकथांची निर्मिती जाणीवपूर्वक होत नसते.

कवठेकरांचे हे म्हणणे सपशल चुकीचे आहे. पुराणकथांची काय, पण कोणत्याही कथांची 'निर्मिती' होत असते. कथा आकाशातून टपकत नाही किंवा जमिनीतून उगवत नाही. प्रश्न असतो पुराणकथांच्या हेतूंचा. हा हेतू जर चांगला नसेल, त्या पुराणकथा ह्या हिंदुसंस्कृतीत पूर्णपणें भिनलेल्या असतील, जातिद्वेषात मुरलेल्या असतील, जा संस्कृतीत माणसाला जनावरापेक्षाही हीन जिणे जगावे लागत असेल व त्यात अजूनही बदल घडत नसेल तर या पुराणकथांना नकारच द्यावा लागेल. कारण हिंदू संस्कृतीची पाळेमुळे दृढ करणाऱ्या या पुराणकथा आहेत. या कथांमधल्या शोषिताला दलित साहित्याने हृदयात कोरले आहे, हे कवठेकरांना ठाऊक नाही काय ? शोषिताला स्वीकारून शोषक संस्कृतीला समाजाला नाकारले आहे, तर त्यात एवढे वावगे का वाटावे ?

उदा. पुराणातली 'कालियामर्दन कथा.' या कथेत कृष्ण कालियाच्या वंशाचा नाश करतो. म्हणजे नागराजाचे संपूर्ण कुटुंबच उध्वस्त करतो. आणि तेही संस्कृतीच्या रक्षणासाठी म्हणे ! यमुनेला सतत पूर असताना आणि इतर डोहांतही भरपूर पाणी असताना श्रीकृष्णाने कालिंदीच्या डोहातल्या कालियालाच त्याच्या कुटुंबासमवेत ठार का केले असावे ? कालिया आपल्या राज्यात सुखासमाधानाने नांदत होता. नात्यागोत्यात हसत होता. त्याने बाहेरच्या जगाला उपद्रव केलाच नव्हता. असे असताना यमुनेतल्या गायी पाण्यासाठी डोहावर जातील व मरून पडतील, या केवळ भ्रमापोटीच कृष्ण कालियाला जीवनातूनच हद्दपार करतो. यावरून

असे दिसते की, आर्य आणि अनार्य हा झगडा सतत सुरू होता. तो रहावा यातच भूषण वाटत होते. असे असताना स्पृश्य-अस्पृय संघर्ष वाढविणाऱ्या या संघर्षाला अबाधित राखणाऱ्या पुराणकथा जर कोणत्या समाजमनाची युगव्यापी स्वप्ने होत असतील तर त्या स्वप्नांना दलितांनी नकार न द्यावा, तर काय स्वागत करावे ? स्पृश्याने अस्पृश्याला चिरडून टाकण्याचे स्वप्न जर या समाजमनाचे असेल तर अशा स्वप्नांना, पुराणकथांना नकारच दिला पाहिजे.

(४) नकार आणि विद्रोह या श्रेष्ठ साहित्यनिर्मितीच्या चिरकालिक प्रेरणा असू शकत नाहीत. तात्कालिक संदर्भ गळून पडले की, नकार आणि विद्रोह लूळे पडतात. नकार आणि विद्रोह यांच्याकडून त्याने मानवतेकडे जाणे अत्यंत आवश्यक आहे. माणसाने माणूस म्हणून जगणे व इतरांनाही जगू देणे म्हणजे मानवतावाद. ही भूमिका दलित साहित्याने समजून-उमजून स्वीकारली, तर संदर्भांनी घेरलेल्या दुःखापलिकडे असलेल्या माणसांच्या सनातन दुःखाची आणि जगण्यासाठी चाललेल्या त्याच्या सनातन संघर्षाची त्याला जाणीव होईल. (पृ. १६)

ज्या समाजव्यवस्थेने, ज्या समाजातील साहित्यानें स्वतःच ही भूमिका समजून-उमजून नाकारली ती दलित साहित्यानेच स्वीकारावी असा कवठेकरांचा आग्रह का ? हा आग्रह खोटा आणि अवाजवी आहे. माणसाने माणूस म्हणून जगणे आणि इतरांनाही जगू देणें हा मानवतावाद प्रथम कवठेकरांच्याच समाजाने नाकारला होता आणि आजही नाकारीत आहे. माणसाला माणूस म्हणून जगायला मिळावं हे मुळी दलित साहित्याचं स्वप्न आहे. मग त्याला मानवतावाद समजणार-उमजणार नाही काय ?

'संदर्भांनी घेरलेल्या दुःखापलिकडे असलेल्या सनातन दुःखाची आणि जगण्यासाठी चाललेल्या त्याच्या सनातन संघर्षाची त्याला जाणीव होईल.' असे विधान कवठेकर करतात. दारिद्र्य, अज्ञान, विषमता, जातीयता ही सनातन दुःखे नव्हेत का ? दलित साहित्याने मानवतावादाचा पुरस्कार करावा आणि मराठी साहित्याने केवळ स्वप्नरंजनच करावे काय ?

माणस म्हणून ज्या समाजाला आजवर जगायला मिळाले नाही, त्याला कधी जगताच आले नाही, तो इतरांना माणूस म्हणून जगायला काय शिकविणार ? पण जो माणूस म्हणून जगत असताना माणसावरच अत्याचार करीत होता त्याने तरी इतरांना 'माणूस' म्हणून समजले होते का ? आणि असे जर नसेल तर कवठेकरांनी मानवतावाद प्रथम हिंदू संस्कृतीलाच शिकवावा, नंतर दलित साहित्याची गोष्ट करावी. मराठी साहित्याने या भूमिकेचा विचार केला तर माणूस संदर्भांनी घेरलेली दुःखे विसरेल कदाचित व सनातन दुःखाची आणि संघर्षाची जाणीवही होईल कदाचित. पण केवळ ही भूमिका स्वीकारूनच नव्हे तर या भूमिकेशी स्वतःला बांधून घेऊन इतरांच्या म्हणून स्वतःच्या वेदना व्यक्त करीत जेव्हा तो विद्रोहाने पेटून उठेल तेव्हाच त्याला मानवतावाद सांगता येईल, अन्यथा

नव्हे. पूर्वजांच्या भोगलेल्या यातनांचा इतिहास म्हणजे दलित साहित्य होय. न्याय, समता, स्वातंत्र्य, जीवन हयांच्याशी द्रोह करणाऱ्या सर्व व्यवस्थेविरुद्ध विद्रोह मांडणारे दलित साहित्य होय. त्याने वेदनेला, विद्रोहाला व नकाराला च टाळले तर प्रेरणाच शिल्लक राहात नाही, आणि प्रेरणा नसेल तर ते साहित्य मृतप्रायच होईल.

(५) दलित साहित्यिकांनी व्यक्ती म्हणून आणि साहित्यिक म्हणून दलित-त्वातून शक्य तितक्या लवकर मुक्त होणे आवश्यक आहे. दलितत्व ही दलितांना अत्यंत दुःखदायक आणि दलितेतरांना लांच्छनास्पद अशी बाब आहे. (पृ. १६)

जोपर्यंत या देशातून दलितत्व हद्दपार होत नाही तोपर्यंत 'दलितत्व' हा शब्द इथे कायमच चिकटून राहणार आहे. अश्वत्थाम्याच्या कपाळावरील चिरंतन भळभळणाऱ्या जखमेचं रूप म्हणून दलितत्व वास करीत असताना त्यातून लवकर मुक्त व्हावे कसे ? जोपर्यंत जातीयतेचे समूळ उच्चाटन होत नाही, जातीयतेच्या नावावर जोपर्यंत माणसाचा होत असलेला छळ थांबत नाही, तोपर्यंत दलितत्व टिकून राहणार आहे. ती बाब दलितांना दुःखदायक ठरण्यापेक्षा दलितेतरांना अधिक लांच्छनास्पद आहे. कवठेकरांना हे दुःख त्राटावे यात नवल ते काय ?

दलितांनी आपला भूतकाळ जोपासलाच पाहिजे. सभोवतालचे सामाजिक वास्तव शोधलेच पाहिजे. असे जर झाले नाही तर दलित न्यूनगंडाने पछाडतील. मानसिक नपुंसकत्व त्यांचे ठायी येईल. आपल्या कोशात गुरफटून जगण्याची व इतरांची पर्वा न करण्याची बेपर्वाई त्यांच्या ठायी येईल. ते दलित ब्राह्मण होतील. स्वतःच्या अस्तित्वाची जाण जोपर्यंत दलितांजवळ आहे तोपर्यंत त्यांची वाटचाल प्रगतीकडेच राहील. पण जेव्हा भूतकाळ विसरला जाईल तेव्हा प्रगतीची पावलेच रोखली जातील. कवठेकरांना हेच अपेक्षित आहे काय ?

साधे सरळ नाकाच्या रेषेसमोर जगणे म्हणजे जगणे नव्हेच. आणि असे जगणे दलितांसाठी नाही. त्यांनी संघर्षच केला पाहिजे, जे मागून मिळत नाही ते हिसकावूनच घेतले पाहिजे, असा इतिहास असताना संघर्ष सोडून षंढत्व पत्करावे आणि दलितत्व नाहीसे करतो म्हणावे, याला काही अर्थ नाही. कवठेकरांना दलितत्व नाकारून किंवा नाकारायला लावून त्यांना 'दलित ब्राह्मण' तर घडवायचे नाहीत ना ? दलितांमध्येच जातीयवाद तर पेरायचा नाही ना ? दलित मंडळी (एक-दोन) तसा प्रयत्न करतात. दलित साहित्य त्यांना बदनामीकारक वाटते. गलिच्छ वाटते. त्यासाठी ते नकारही नोंदवितात. पण जेव्हा प्रसंग आला तेव्हा 'दलित साहित्याला आम्हीच तोंडवळा मिळवून दिला' असाही दावा ते करतात. त्यांच्या या मनोवृत्तीचा आम्ही निषेधच करतो. त्यांच्या या ब्राह्मणी प्रवृत्तीचा आम्ही समाचारच घेत असतो.

दलितत्व जर कवठेकरांना लांच्छनास्पद वाटते तर दलित साहित्याचे त्यांनी खुल्या मनाने स्वागत करावे. 'दलितत्वा' ला नाहीसे करू पाहण्यासाठी स्वतःला दलित मुक्तिलढ्यात झोकून द्यावे. या दलित मुक्तिलढ्याचा सामाजिक समतेच्या

आषाडीवर गेल्या दीडशे वर्षांपासून पराभवच झालेला आहे. स्वत:च्या घरचा हौद महात्मा फुले खुला करतात, आणि जिथे गाई–म्हशीसुद्धा डुंबू शकत होत्या अशा चवदार तळघाच्या पाण्यासाठी डॉ. आंबेडकर लढा देतात त्या काळापासून तो आजपर्यंत देहूली–बेलछीसारखी हत्त्याकांडे घडतात. पोचिरामाचे हातपाय तोडून त्याला जिवंत जाळले जातें. कारण त्याला दलितत्व नको असते, समता हवी असतें. या आजपर्यंतच्या इतिहासाची छाननी कवठेकरांनी केली काय ? हा इतिहास तपासला काय ? दलितांची आजही होणारी मानहानी, त्यांच्यावरील अत्याचार, अन्याय, स्त्रियांवरचे बलात्कार आणि सिरसगावात काढली गेलेली स्त्रियांची नग्न धिंड याच्या विरोधात कवठेकरांनी शब्द तरी लिहिला काय ? स्वत:च्या लेखणीला त्यांच्या वेदनेचा स्पर्श तरी होऊ दिला काय ? किंवा कुणा ' दलितत्व लांच्छनास्पद ' म्हणणाऱ्यांनी हे सगळं थांबावं यासाठी पुढाकार घेतला काय ? असे जर झाले नाही तर हे दलितत्व छातीवर मिरवण्याची बाब लांच्छनास्पद का ठरावी ? ' दलितत्वाची जाणीव ' ही दलित साहित्याचा मूळ आधार ठरते. त्यात माणूस हा केंद्रस्थानी आहे आणि या माणसाची गुलामीतून मुक्ती हा त्याचा पाया आहे. हा पाया पोखरून काढला तर दलित साहित्य प्रभावहीन ठरेल. असा दलितत्वाचा खून करायचा आणि दलितेतर मनोवृत्तीचा समाचार घेण्यापेक्षा ' दलितत्व लांच्छनास्पद ' म्हणून मोकळं व्हायचं ही कुटिल नीती समीक्षकाची नसावी. स्वत:चे पृथकत्व वा निरपराधित्व सिद्ध व्हावे व स्वत:च्या समाजानें दलितांवर केलेल्या अत्याचारांच्या कृष्णकथा दडपून टाकाव्यात यासाठीचा तर हा खटाटोप नव्हे ?

या दलितांच्या दु:खाची जाण ठेवून कोणी दलितेतर वा दलित लिहू लागला, तर त्याला ' स्वजातीवर दुगाण्या झाडणारा हास्यास्पद प्रकार ' म्हणावे ? दुगाण्या या स्वजातीयांवरच झाडल्या जातात. या शब्दाची अर्थकळा ही स्वजातीयांनाच कळते.

६) दलितत्व हा भांडवलाचा विषय होऊ शकत नाही. (पृ. २)

कवठेकरांच्या समाजाने ज्या दलितांना दारिद्र्य, दु:ख, दैन्य, हालअपेष्टा' अज्ञान यांच्या पलीकडे कोणतं भांडवल जमवूच दिलं नाही, ना ज्यांच्याजवळ यापेक्षा आणखी काही राहिले अशा समाजाने ज्ञानाचे, विचाराचे, माणूस म्हणून जगण्यासाठी लढण्याचे, नीती आणि आत्मभानाच्या प्रतीतीचे मूल्य साहित्यात टिकविण्यासाठी या साऱ्यांच्या सोबतीला जुने दलितत्वाचे भांडवल केले तर त्यात बिघडण्यासारखे काय झाले ?

' दलितत्व ' हा तुच्छतेचा, तिरस्काराचा, सहानुभूतीचा आणि दयेचा विषय होऊ शकत नाही. दलितांनी केलेली प्रगती व डॉ. आंबेडकरांनी त्याला माणूस म्हणून दिलेले नवे आत्मभान त्याच्या पाठीशी आहे. एखाद्या महापुरुषाची प्रेरणा भांडवलाचा विषय होत नाही, तो माणूस घडविण्याचा विचार असतो. तसेच स्वत:च्या भूतकाळाचे नित्य स्मरण ठेवणे म्हणजे ' दलितत्वा ' ची जाणीव ठेवणे

हाही भांडवलाचा विषय नव्हे. बदलत्या परिस्थितीबरहुकुम स्वत:मध्ये इतके आमूलाग्र परिवर्तन करावे की जुना चेहराच दिसू नये. पण ही शेवटी समाजाशी, कुटुंबाशी, इतकेच नव्हे तर स्वत:शीही बेईमानी ठरेल. नव्या चेहऱ्याआड जुना चेहरा दडलेला असतो व नव्या चेहऱ्याला तो मार्गदर्शक ठरतो. आपला प्रवास संपला म्हणुन जाता जाता कोणी मैलाचे दगड उपटून फेकत नाहीत. उलट, आपला प्रवास संपला तरी इतरांसाठी ते मार्गदर्शक ठरत असतात, हे त्याला भान असते. दलित साहित्यातील दलितत्वाचे तसेच आहे हा मैलाचा मार्गदर्शक दगड नाहीसा करून दलित लेखकाने इतरांचे मार्ग चुकवावेत असे कवठेकरांना वाटते काय ?

७) दलितेतर समीक्षकांची भूमिका आणि सहानुभूती दलित साहित्यिकांनी घातक आणि त्याज्य मानली पाहिजे. (पृ. ४)

दलितेतर समीक्षक हा प्रवृत्तीने बदललेला असेल, त्याची दलित साहित्याकडे पाहण्याची दृष्टी विशुद्ध असेल, तो साहित्यकृतीची केवळ स्तुतीच करीत नाही तर गुणदोषांची चर्चाही करत असेल, तर त्या दलितेतर समीक्षकाविषयी दलित साहित्यिकांनी ही भूमिका का स्वीकारावी ? आणि कवठेकरांनाही ते घातक का वाटावे ?

शेवटी झगडा हा जातीविरुद्ध नसतोच, तो प्रवृत्तीविरुद्ध असतो. वैचारिक मतभेदासाठी आपण नातं तोडत नसतो. जातीबाहेर जात नसतो. (इथे मनुष्यत्व ही जात अभिप्रेत आहे.) वैचारिक भूमिका थोडीशी वेगळी असली आणि तरीही ती आंबेडकरी विचारधारा प्रमाण मानणारी असली, तर दलितेतरांची समीक्षादेखील तितकीच मोलाची ठरते जितकी ती दलितांची. म. भि चिटणीसांसारखी माणसं डॉ. आंबेडकरांना सहकारी म्हणून लाभली, ही जिवाला जीव देणारी माणसं दलितेतरच होती ना ? मग ही घातक कशी ठरतात ?

८) साहित्याने कोणत्याही वादाशी बांधिलकी पत्करणे योग्य नव्हे, कारण त्यामुळे साचेबंद, वास्तवविन्मुख झापडबंद, आणि आडाखेवजा साहित्याचे उत्पादन होऊ लागते, (पृ. ५)

कोणत्याही वादाशी बांधिलकी न पत्करता जीवनाशी समांतर राहावे हेच हितावह आहे, असे एकीकडे कवठेकर सुचवितात अन् दुसरीकडे दलितत्व ही दु:खद बाब आहे असेही म्हणतात. याचा अर्थ असा की, दलित साहित्यिकांनी मार्क्सवाद, आंबेडकरवाद, बौद्धवाद हितावह म्हणून सांगावे आणि दुसरीकडे दलितत्वाच्या विरुद्ध भूमिका मांडावी. या तिन्ही वादांचे वैचारिक तत्त्वज्ञान समानच आहे. मात्र कोणत्याही वादात गुरफटून लेखक आंबेडकरी तत्त्वज्ञानास विसरत नाहीत. त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्थान डॉ. आंबेडकरच होत. डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी ते प्रामाणिक आहेत. उदा. बाबुराव बागुल किंवा यशवंत मनोहर मार्क्सवादी विचारसरणीचे आहेत, म्हणून दलित साहित्यिकांमध्ये ते समाविष्ट होत नाहीत किंवा

त्यांचे साहित्य दलित साहित्य ठरत नाही काय ? जीवनाशी समांतर अशी रचना वास्तवाला धरून असेल तर ती कलाकृती, कवठेकर म्हणतात तशी, साचेबंद आडाखेवजा ठरूच शकत नाही.

९) दलित संवेदना दलितांच्या लढ्याशी निगडित झाली पाहिजे. लढ्याच्या बरोबरीने या संवेदनेची स्पंदनें निर्माण झाली पाहिजेत, तरच त्या संवेदनेतून निर्माण होणारे साहित्य दलित संवेदनेचा खराखुरा आविष्कार करणारे ठरेल. ही भूमिका सामान्यांकडून टाळ्या घेणारी असली तरी दलित साहित्याचे अंतिम हित साधणारी नाही. (पृ. ७)

आपण जसे जीवन जगलो, जे जगलो, त्याचे जसेच्या तसे चित्रण न करून आपल्या अनुभवांशी प्रतारणा केली तर त्या कलाकृतीतील जीवनमूल्येच नाहीशी होऊन जातील. या जीवनमूल्यांशिवाय कलाकृतीला अर्थ उरणार नाही, महत्त्व राहणार नाही. स्वत:च्या हक्कांसाठी लढा देणारे मन व या मनाच्या संवेदना या परस्परनिगडितच असतात. त्या एकमेकांपासून दूर राहूच शकत नाहीत. अशा कलाकृतीत लढ्याच्या सुराबरोबर संवेदनेची स्पंदने निर्माण झाली तरच ती साहित्यकृती खराखुरा आविष्कार करणारी ठरेल कवठेकरांच्या म्हणण्याप्रमाणे ही भूमिका टाळ्या घेणारी नाही.

वैचारिक बांधिलकी 'जीवनमूल्य' ठरते तेव्हा ती समाजाशीही निगडित असते. साहित्यकृतीमागचे जीवनमूल्य समाजशास्त्रीय असताना तिला केवळ कलेच्या क्षेत्रात झापडबंद का ठरवावे ? असे झाले तर त्या साहित्यकृतीमागे असलेले कला-मूल्य पारंपरिक दृष्टीला सोडून जाणीवमूल्यांच्या संदर्भात तिचा विचार करायला पाहिजे. म्हणजे एखादी वैचारिक बांधिलकी पत्करणारा लेखक शेवटी जीवना-नुभवाच्या जवळच असतो. मग जीवनानुभवापासून आणि वास्तवापासून दूर न जाणारा पण वैचारिक बांधिलकीही स्वीकारणारा लेखक, कवठेकर म्हणतात त्याप्रमाणे, घातक कसा ?

दलित लेखकाची संवेदना लढ्याशी बांधली गेली पाहिजे या भूमिकेत, कवठेकर म्हणतात त्याप्रमाणे, धोका नाही. त्यांना जर धोका दिसत असेल तर तो त्यांच्या दृष्टीचा तर परिणाम नव्हे ? दलिताला कुठलीही गोष्ट संघर्षाशिवाय मिळाली नाही. त्याने स्वत:च स्वत:ला घडविले आहे. मात्र त्यासाठी त्याला भरपूर मोल द्यावे लागले आहे. हयाला इतिहास साक्षी आहे. असे असताना दलित लेखकाच्या संवेदना, जाणिवा लढ्याशी बांधल्या गेल्या तर तो धोका कसा ठराबा ?

कवठेकरांची भूमिका दुटप्पी, दुराग्रही व केवळ परंपरा जोपासणारी आहे.

१०) ते पुढे म्हणतात, 'साहित्य हे अशा चळवळीचे साधन होणे हा एक असाच भयंकर धोका आहे.' (पृ. ७)

कवठेकरांना साहित्यातल्या धोक्यापेक्षा स्वत:चे प्रस्थापितत्वच धोक्यात येते आहे असे तर वाटत नाही ना ? दलित मुक्तिलढ्याचे प्रभावी साधन साहित्य होय. 'बहुजन', 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' यातील वैचारिक लेखांनी चळवळीतली माणसं घडविली नाहीत काय ? लेखणीसारखे प्रभावी हत्यार नाही, ती दुधारी तलवार आहे, असे बाबासाहेब म्हणायचे. जोपर्यंत रूढ परंपरांना जोपसणारा वर्ग, जातीयता–अस्पृश्यता पाळणारा अंडरग्राउंड समाज या भारतात आहे तोपर्यंत चळवळ ही चालणारच. जोपर्यंत अमानवीपणा आहे, मनुष्यत्वाला नकार आहे, तोपर्यंत साहित्य हे साधन होणारच. त्यावर कवठेकरांनी तात्कालिकतेचा, परिस्थितिसापेक्षतेचा आणि क्षणभंगुरतेचा शाप कितीही कोरला तरी आंबेडकरी प्रेरणेने जागृत झालेला माणूस लेखणी हातात घेणारच, स्वत:वरचा अन्याय नोंदविणारच. मराठी साहित्याला भोगावा लागणारा क्षणभंगुरतेचा शाप तर कवठेकरांना त्रस्त करीत नाही ना ? हा शाप ते दलित साहित्याच्या मस्तकी मारू बघतात का ? रानडे, आगरकर, लोकहितवादी, फुले यांच्यापासून साहित्य हे चळवळीचे साधन झाले आहे व या चळवळी क्षणभंगुर झाल्या नाहीत. दलित साहित्याविषयी खोटा जिव्हाळा तर कवठेकरांना दाखवायचा नाही ना ?

हजारो वर्षांपासून दलितांना दलित ठेवून आता त्यांच्या 'दलितत्वा'ला भांडवल म्हणून संबोधणे हा कवठेकरांचा गुन्हा काय कमी आहे ? दलित लेखक आताच लिहू लागलेला आहे. त्यांनी केलेले गुन्हे इतके काही भयंकर नाहीत. पण लेखणीचे स्वामित्व ज्यांना हजारो वर्षांपासून बहाल होते त्यांनी दलितदु:खांना चित्रित न करण्याची प्रवृत्ती मात्र निश्चित लांच्छनास्पद आहे, सगळ्यात मोठा गुन्हा आहे.

११) साहित्यिकांची चळवळीशी, तिच्यातून निर्माण होणाऱ्या वैचारिकतेशी असलेली बांधिलकी त्यांचा वैचारिक विकास खुंटवणारी ठरत असते. कारण ती त्यांना विचाराचे तयार साचे पुरवत असते. कळत न कळत लेखक ते स्वीकारतात आणि स्वत:भोवती वैचारिक कोंडवाडे निर्माण करतात. (पृ. ८)

वैचारिकतेशी असलेल्या बांधिलकीचे स्वरूप व्यापक विस्तृत असेल तर ती वैचारिकतेचा विकासच करते. कवठेकर म्हणतात त्याप्रमाणे ती वैचारिक वाढ खुंटवीत नाही आणि त्यामुळे वैचारिक कोंडवाडेही निर्माण होत नाहीत. यासाठी कवठेकरांनी दिलेले उदाहरण अत्यंत हास्यास्पद आहे. ते म्हणतात, 'रामायणातील शंबूकाच्या कथेवर दलितांना जवळच्या अशा लेखकाने वीस–पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका नाटकात लावलेला त्या कथेचा अन्वयार्थ आणि आज दया पवार व अन्य दलित कवी यांनी लावलेला अन्वयार्थ यातील तोचतोपणा या दृष्टीने मुद्दाम पहाण्यासारखा आहे' (पृ. ८) कवठेकरांचे हे विधान रूढ, परंपरावादी ठरीव साच्याच्या समीक्षेचे द्योतक वाटते. दलित साहित्याचे वैशिष्ट्यच हे आहे की, व्यक्तिजीवनातून समाजजीवनाचे दर्शन घडविणे. अशा या दलित साहित्याच्या मुळाशी, तळाशी न जाताच रूढ चौकटीतून दलित साहित्यासंबंधी आक्षेप घेणे

म्हणजे वरवर समीक्षा करून विधाने फेकणे होय.

जोपर्यंत कवठेकर यांच्या प्रवृत्तीची माणसं या समाजात वावरतील तोपर्यंत शंबूकाचे उदाहरण दिले जाईल. सामाजिक कृतीमध्ये 'तोचतोपणा' असेल तर ती कृती नाहीशी व्हावी यासाठी तीच ती उदाहरणे आवश्यक आहेत. ती दिली जाणे म्हणजे तोचतोपणा किंवा वैचारिक कोंडवाडा नव्हे. सनातन प्रवृत्तीला जोपासणारे लोक शंबूकाची आठवण आजही वारंवार करून देणारी कृत्ये करत असतील तर त्याला दलित समाज वा साहित्यिक काय करणार? असे लोकच स्वत:ला वैचारिक कोंडवाड्यात कोंडून घेतात, त्यात स्वत:ला सुरक्षित समजतात व त्या सुरक्षित जागेवरून 'एक आकलन'सारख्या रूपाने छुपे हल्ले करतात.

१२) दलित साहित्य हे जीवननिष्ठ आहे. खरे तर सर्वच साहित्यकृती या जीवननिष्ठ असतात. हरिभाऊंची 'पण लक्षात कोण घेतो?' ही कादंबरी जीवननिष्ठ नाही असे आपण म्हणणार आहोत काय, असा प्रश्न ते उपस्थित करतात. पुढे ते म्हणतात, कसल्याही राजकीय वा सामाजिक जाणिवा व्यक्त न करणारी मनोहरांची कविता ही कनिष्ठ नाही असे आपणात म्हणता येईल काय? (पृ. ९)

दलित साहित्य हे जीवननिष्ठ आहे. ते व्यक्तिजीवनातून निर्माण होत असले तरी समाजमनाचे, जीवनाचे दर्शन घडवीत असते. 'पण लक्षात कोण घेतो?' ही कादंबरी सामाजिक आहे. त्यातला विषय 'विधवांचा प्रश्न' ही सामाजिकच आहे. तो हरिभाऊंनी अतिशय चांगल्या तऱ्हेने हाताळला, यात वाद नाहीच. त्या काळात, त्या परिस्थितीत असा प्रश्न साहित्यातून मांडावा ही एक सामाजिक क्रान्तीच आहे. हरिभाऊंची यमू ही परिस्थितीला सामोरी जात नाही, तर ती पराभव पत्करते. दलित साहित्य हे पराभवाचे साहित्य नाही, ते बंडखोर आहे. त्यातले नायक, नायिका परिस्थितीला सामोरे जाऊन संघर्ष करायला उभे ठाकतात. ते पराभव पत्करत नाहीत, परिस्थितीला शरण जात नाहीत. परिस्थितीवर मात करून जगतात, इतरांना जगायला शिकवितात. 'पण लक्षात कोण घेतो?'ही कादंबरी सामाजिक असली तरी जीवननिष्ठ नाही. त्यामुळे कवठेकरांनी कितीही उदात्तीकरण केले तरी सर्वसामान्यांच्या पांढरपेशी जीवनाचेच ते चित्र आहे, दलितांचे नाही. दलित स्त्रीला त्या काळातही 'विधवांचा प्रश्न' नव्हता, त्या सरळ 'पाट' लावीत असत. सती जाण्याचे तर सोडाच, पण मूलाबाळांसाठी त्या स्वत: कष्ट उपसत असत. याच दृष्टीने 'यमू' ही 'दलित स्त्री' ठरत नाही. हे सत्य कवठेकरांनी पडताळून पाहायला पाहिजे. कवठेकर मनोहरांच्या कवितेला ती राजकीय–सामाजिक जीवनाची कविता नाही असे म्हणतात. आपल्या कवितेत मनोहर म्हणतात,

मी तुडवीन इथला ऐतिहातिक काळाबाजार
शतकाशतकांनी रचलेला सैतानी चरित्रकोश
फाडून फेकून देईन विश्वाच्या पार

मी असे दुर्दैवी स्फुरण आहे....
ज्याला ते जालीम पाप म्हणतात (मी इथल्या दिशांच्या)

किंवा

ते ग्रीष्म माझे वैरी आहेत
ज्यांनी इथे प्रामाणिकपणा रुजू दिला नाही
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही (वैरी)

किंवा

काळचा गोऱ्या साऱ्या । वाळल्या पोटांनी ।
बेहिशेबी वन्ही । व्हावे आता ॥ (वन्ही)

या व इतर कविता किंवा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतनकाव्य' वाचले तर मनोहरांच्या राजकीय–सामाजिक कवितांचा पुरावा कवठेकर उपलब्ध करू शकतील. दलित साहित्य जीवननिष्ठ आहे असे म्हणण्यामागे व्यापक भूमिका आहे. दलितांचे जीवन सदाशिवपेठी जीवनापेक्षा निराळे आहे, म्हणून दलितांची जीवन-मूल्येही वेगळीच आहेत. या वेगळ्या जीवनमूल्यजाणिवा घेऊन अवतरलेले दलित साहित्य हे वेगळेच आहे.

१३) जीवनानुभवातील बंडखोरी अपरिहार्यपणे साहित्यात येणे आणि विचारांना पटलेली बंडखोरी जीवनानुभवावर लादणे या दोन गोष्टी भिन्न होत. (पृ. ९)

कोणत्याही अनुभवाशिवाय धारणा किंवा विचार आकाराला येत नाही. हा अनुभव जितका जहाल, दाहक तितका विचार स्फोटक असतो. या विचाराला स्वतःसाठी वाहून घेतल्याशिवाय बंडखोर वृत्ती येत नाही. या विचारांना कुणावर लादले जाऊ शकत नाही. असे जर झाले तर पोकळ विद्रोह लक्षात येतोच व ती बंडखोरी न राहता घुसखोरी ठरते. स्वतःशी व स्वेतरांशी संवाद साधणारे साहित्य देखील अशी बंडखोरी मान्य करत नाही. जे विचारात असते ते जीवनात व कृतीत अवतरते. अनुभवातून विचारात, विचारातून जीवनात आणि जीवनातून कृतीत असा प्रवास या बंडखोरीचा असतो. तसे नसेल तर ती बंडखोरी दंभखोरी ठरते.

१४) दलित साहित्यालाच नव्हे तर, एकूण दलित जीवनालाच अनिष्ट ठरण्याची शक्यता असलेल्या या नकाराचा त्यांनी पुनर्विचार करावा. (पृ. १३)

दलित साहित्य हे पारंपरिक Myths नाकारते, कारण याच परंपरेने या दलितांना गुलाम बनविलेले होते. मग दलित साहित्य या गुलाम बनविणाऱ्या परपरांना नकार देणार नाही काय ? ईश्वराला नकार देणार नाही काय ? वर्षानुवर्षे खंडोबा, मेसाई मरामाई, खेकसाई, यल्लम्मा, पेलम्मा अशा छत्तीस कोटी देवदेवतांची पूजा करूनही, व्रतवैकल्ये करूनही या दलितांचा उद्धार

करण्यासाठी कोणता देव धावला नाही. कोणी देवाने हिंमत दाखविली नाही. ज्याने हिंमत दाखविली, जो धावून आला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दलितांचा 'देव' झाला. मग या दलितांनी स्वत:ला शेंदूर फासून घेणाऱ्या देवाला नकार देऊ नये तर काय करावे ?

१५) दलितत्वातून लवकर मुक्त व्हावे ! (पृ. १६)

कवठेकरांनी स्वत:चे मतपरिवर्तन बदलत्या काळानुसार करून आपली ही वृत्ती टाकून द्यावी. नव्याचे हृदयपूर्वक स्वागत करावे व जिथे 'बेलछी', 'देहूली' घडते, जिथे 'सिरसगाव' लाजेने मान खाली घालते तिथल्या सडक्या मनोवृत्तीच्या विरोधात उभे ठाकावे. त्याने 'दलितत्व' दूर होण्याला खरेच मदत होईल.

१६) दलित साहित्याला भवितव्य आहे का ? (पृ. १७)

जोपर्यंत अन्याय, अत्याचार थांबणार नाहीत, मानवी मूल्यांची जोपर्यंत अजूनही लूट केली जाते, ती पायदळी तुडविली जातात तोपर्यंत या दलित साहित्याचे भवितव्य असे बंडखोरच राहील. त्यातला विद्रोह कमी होणार नाही, व पुढेमागे या देशातून दलितत्व गेले (तो सुदिनच समजावा !) तरी त्याचा इतिहास पानापानावर नोंदविला गेलेला असणार एवढे मात्र निश्चित.

दलित साहित्यात अवतरणारा दलित व्यक्तीचा प्रश्न व दलित समाजाचा प्रश्न एकच आहे. या प्रश्नाचे रूप एकच आहे आणि हाच दलित साहित्याचा वेगळेपणा होय.

१७) नकार देण्याच्या या साऱ्या प्रकारातील विनोद हा की पांढरपेशा संस्कृतीचा आणि साहित्याचा निषेध करणारे, त्याला नकार देणारे बहुसंख्य दलित साहित्यिक शहरी आहेत. पांढरपेशांचे जीवन जगत आहेत. (पृ. १७)

कवठेकरांना कोणताच बदल जाणवत नाही की काय ? इथे यांत्रिकीकरणामुळे, दुसऱ्या महायुद्धानंतर शहरात, माणसात, साहित्यात सांस्कृतिक बदल झालेला आहे. हा बदल अपेक्षितच आहे. पण माणसाच्या अंत:करणात बदल झाला आहे का ? माणसाची माणसाकडे पहायची दृष्टी बदलली आहे का ? नाही. तसे जर असते तर कवठेकरांना असे व्याजप्रश्न उपस्थित करण्याची जरूरी भासली नसती. शिक्षणामुळे माणूस, तोही दलित माणूस, बदलला म्हणजे काय ? तो प्रेरणा विसरला काय ? आपल्या गावातल्या मातीला, पाण्याला विसरला काय ? अर्थात मुळीच नाही. तो स्वत: सुधारला असला तरी त्याच्या मनाची पाळेमुळे त्याच्या गावच्या मातीतच रुतलेली आहेत. आणि गाव तरी बदलला का ? तिथली माती बदलली का ? अजूनही महारवाडा गावकुसाबाहेर आहेच. अजूनही तेलीपुरा, कुणबीपुरा, महारपुरा आहेच. अजूनही वठठ्यांचा पाणवठा, कुणब्यांचा, महारांचा वेगळा आहेच. अजूनही एका गावाची दोन गावे-एक प्रस्थापितांचे व दुसरे विस्थापितांचे, एक सवर्णांचे व एक दलितांचे-आहेतच. या वास्तवता नाकारून दलित साहित्यिक वा लेखक जगूच शकत नाही.

जो गाव विसरतो, जो माती विसरतो त्याला समाज विसरतो. असा एखादा अपवाद असू शकतो, नाही असे नाही. पण शेवटी तो त्या मातीचाच असतो. मग दलित साहित्यिक शहरी आहेत व पांढरपेशे जीवन जगत आहेत याचे दुःख कवठेकरांनी बाळगू नये.

दलितांनी दलितांसारखेच, पूर्वीसारखेच राहावे असे कवठेकरांना अपेक्षित आहे का ? दलितांनी पांढरपेशी जीवन जगणे हा या देशात गुन्हा आहे का ? दलित साहित्याला प्रस्थापित पांढरपेशी समीक्षामूल्ये लागू पडणार नाहीत. व्यक्तीच्या जीवनातील अनुभवाला, अनुभूतीला जेव्हा कलाकृतीतून कलात्मक आकार मिळतो तेव्हा यात कलात्मकता व वास्तवता एकजीव झालेल्या असतात. वास्तविक जीवनातून कलात्मकता वेगळी काढता येत नाही. यासाठी या दोहोंचे अतूट संबंध मान्य केलेच पाहिजेत. म्हणून साहित्यात समीक्षकाने लेखकाच्या कलाकृतीच्या, अनुभूतीच्या तळागाळाशी जाऊन सत्याचा शोध घेतला पाहिजे.



संदर्भ टीपा

प्रकरण : १ ले

१) वा. सी. मर्ढेकर, 'वाङ्मयीन महात्मता' मुंबई, १९४१, पृ. ४४.

२) वसंत दावतर, संपा. लेखक, 'मर्ढेकर युगातील मराठी टीका' मराठी टीकाकार, मुंबई, १९६६, पृ. ३९.

३) कित्ता, पृ. ४२–४३.

४) गंगाधर गाडगीळ, 'खडक आणि पाणी' मुंबई. १९६१ पृ. ५९.

५) कित्ता, पृ. ९१–९२.

६) माधव आचवल, 'किमया' १९६५.

७) वि. स. जोग, 'मार्क्सवाद आणि मराठी समीक्षा' नागपूर, १९८१, पृ. १४६.

८) कुसुमावती देशपांडे, 'मराठी वाङ्मय समीक्षा : सौंदर्याची नवप्रतीती' पासंग, नागपूर, १९५४, १–४.

९) कित्ता, पृ. ३–४.

१०) कित्ता, पृ. १४७.

११) दि. के. बेडेकर, 'साहित्यः निर्मिती आणि समीक्षा' मुंबई, १९५४, पृ. ४, ९.

१२) कित्ता, आवृत्ती २ री, १९६६, पृ. ७-८.

१३) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'नवी मळवाट' (प्रस्तावना) दुसरी आवृत्ती मुंबई, १९६४, पृ. ४१, ४९.

१४) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'काही निबंध' नागपूर, १९६३, पृ. ४४.

१५) द. ग. गोडसे, 'पोत' मुंबई, १९६३ पृ. ५५.

१६–१७) व. दि. कुळकर्णी, 'साहित्यविचार' (प्रदक्षिणा) ६ वी आवृत्ती पुरवणी, पुणे, १९७६, पृ. ३७३, ३७४.

१८) वसंत दावतर, 'पंचवीस वर्षांतील वाङ्मयीन वाद' (अस्मिता महाराष्ट्राची(मुंबई, १९७१, पृ. ४३६.

१९) नरहर कुरुंदकर, 'पायवाट' पुणे, १९७४, पृ. १९२.

प्रकरण : २ रे

१) भालचंद्र फडके, 'दलित साहित्यः वेदना व विद्रोह' पुणे, १९७७, पृ. २५.

२) म. ना. वानखडे, 'दलित वर्गांच्या जाणिवा, प्रवृत्ती व प्रेरणा' मराठवाडा दिवाळी अंक १९६९ पृ. १२.

३) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह' पुणें, १९७७, पृ. २७
४) राजा ढाले, 'दलित साहित्य आणि संस्कृती' जातक वर्ष १ ले, १ मार्च १९७७, पृ. १३.
५) शंकरराव खरडकर, प्रास्ताविक भाषण, दलित साहित्य संमेलन, १९७६,. नागपूर.
६) कित्ता, पृ. ७१.
७) म. ना. वानखडे, अध्यक्षीय भाषण दलित साहित्य संमेलन, नागपूर, १९७६.
८) कित्ता, पा. ४.
९) म. भि. चिटणीस, 'युगयात्रा' औरंगाबाद, १९५५, पा. १ (प्रास्ताविक),
१०) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य:वेदना व विद्रोह' पुणे, १९७७.
११) म. ना. वानखडे, अध्यक्षीय भाषण, दलित साहित्य संमेलन, नागपूर, १९७६.
१२) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य:वेदना व विद्रोह' पुणे, १९७७, पा. १७५.
१३) वा. ल. कुळकर्णी, 'महाराष्ट्रातील आज, उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या' 'अस्मितादर्श' अंक १, औरंगाबाद, १९६७ पा. ८.
१४) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य: वेदना व विद्रोह' पुणे, १९७७ पा. १७५.
१५) कित्ता, पा. १७६.
१६) कित्ता, पा. १७७.

प्रकरण : ३ रे

१) अर्जुन डांगळे, संपा. 'दलित साहित्य–एक अभ्यास' मुंबई, १९७८, पा. ३, (निवेदन).
२) दा. ता. रूपवते, संपादकीय. 'प्रबुद्ध भारत' मुंबई २ मार्च १९५८.
३) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' औरंगाबाद, १९८०, पा. ८२.
४) म. ना. वानखडे, अध्यक्षीय भाषण, दलित साहित्य संमेलन, नागपूर, १९७६.
५) कित्ता, पा. ३.
६) कित्ता, पा. ३.
७) शंकरराव खरात, 'दलित वाङ्मय : प्रेरणा व प्रवृत्ती' पुणे, १९७८, पा. २७.
८) म. ना. वानखडे, 'मागोवा' दिवाळी अंक, १९६९, पा. ६.
९) म. ना. वानखडे, अध्यक्षीय भाषण, दलित साहित्य संमेलन, नागपूर, १९७६.
१०) बाबुराव बागुल, 'सिंहगर्जना' दिवाळी अंक, मुंबई, १९७५.
११) बाबुराव बागुल, अध्यक्षीय भाषण, महाबौद्ध साहित्य परिषद) महाड, १९७१.

१२) बाबुराव बागुल, ' दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान ' नागपूर, १९८१ पा. १२.
१३) कित्ता, पा. १२.
१४) मधुकर ताकसांडे, संपादकीय, ' दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान ' नागपूर, १९८१, पा. १३.
१५) बाबुराव बागुल, ' दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान ' नागपूर, १९८१, पा. ११९.
१६) यशवंत मनोहर, ' उत्थानगुंफा ' पा. १३४.
१७) कित्ता, पा. १३६.
१८) बाबुराव बागुल, ' दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान ' पा. १३६.
१९) आठवणींचे पक्षी, पा. १६२.
२०) अर्जुन डांगळे, (निवेदन), ' दलित साहित्य: एक अभ्यास ' मुंबई, १९७८. पा. ११.
२१) शंकरराव खरात, ' दलित वाङ्मय: प्रेरणा व प्रवृत्ती ' पुणे, १९७८ पा. १५३.
२२) गंगाधर पानतावणे, ' विद्रोहाचे पाणी पेटले आहे ' नागपूर, १९७६ पा. १६८.
२३) कित्ता, पा. १५४.
२४) कित्ता, पा. १८४.
२५) पु. शि. रेगे, छांदसी, पा. २९.
२६) शंकरराव खरात, ' दलित वाङ्मय प्रेरणा–व प्रवृत्ती ' पुणे, १९७८, पा. १९४.
२७) कित्ता, पा. १९७.
२८) कित्ता, पा. १९७.
२९) कित्ता, पा. १९८.
३०) कित्ता, पा. १७६.
३१) कित्ता, पा. १८०.
३२) गंगाधर पानतावणे, अध्यक्षीय भाषण ३४ वे विदर्भ साहित्य संमेलन, वरोरा, १९८२, पा. ६.
३३) कित्ता, पा. २०.
३४) गंगाधर पानतावणे, ' अस्मितादर्श ' ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९७४, पा. ९१.
३५) गंगाधर पानतावणे, ' विद्रोहाचे पाणी पेटले आहे ' (मनोगत) नागपूर, १९७६, पा. ७.
३६) गंगाधर पानतावणे, ' दलितांचे प्रबोधन ' औरंगाबाद, १९६८, पा. ५.
३७) कित्ता, पा. ६.

३८) कित्ता, पा. ७.
३९) अर्जुन डांगळे, संपा. ' दलित साहित्य: एक अभ्यास ' (निवेदन) मुंबई, १९७८, पा. ३४.
४०) कित्ता, पा. ३४.
४१) कित्ता, पा. ३४.
४२) कित्ता, पा. ३५.
४३) कित्ता, पा. ३८.
४४) कित्ता' पा. ४१.
४५) कित्ता, पा. ४१.
४६) कित्ता, पा. २९.
४७) कित्ता, पा. ३०.
४८) कित्ता, पा. ३०.
४९) कित्ता, पा. ३१.
५०) लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रस्तावना, ' दलित साहित्य: एक अभ्यास ' मुंबई, १९७८, पा. २.
५१) यशवंत मनोहर, ' दलित साहित्य: सिद्धान्त आणि स्वरूप ' नागपूर १९७८, पा. ३.
५२) कित्ता, पा. ८.
५३) कित्ता, पा. ५९.
५४) कित्ता, पा. ६३–६४.
५५) कित्ता, पा. ६४.
५६) कित्ता, पा. १२२.
५७) कित्ता, पा. १२३.
५८) यशवंत मनोहर, ' दलित साहित्य: सिद्धांत आणि स्वरूप ' नागपूर, १९७८, पा. १२३, १२४, १२५.
५९) कित्ता, पा. २७.
६०) कित्ता, पा. ४८.
६१) वामन निंबाळकर, (प्रकाशकीय) ' दलित साहित्य: सिद्धांत आणि स्वरूप ' नागपूर, १९७८, पा. ७.
६२) भालचंद्र फडके, ' दलित साहित्य: वेदना व विद्रोह ' पा. १७२.
६३) भालचंद्र फडके, ' दलित साहित्याची प्रकाशयात्रा, पा. १२४.
६४) भालचंद्र फडके, द. सा. प्रकाशयात्रा ' दलित कवितेची सुजाण समीक्षा ' पा. १२२.
६५) केशव मेश्राम, ' समन्वय ' केशवसुतांची काही शीर्षके ' पुणे, १९७९ पा. ५२,

६६) केशव मेश्राम, 'अस्मितादर्श', मार्च-एप्रिल, पा. ३४
६७) केशव मेश्राम, 'समन्वय', पुणे १९७९, पा. ३५
६८) कित्ता, पा. ३५
६९) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याची प्रकाश यात्रा' पा. १२२
७०) भीमराव कर्डक, 'आंबेडकरी जलसे-स्वरूप व कार्य'
७१) कित्ता, पा. ६
७२) प्रल्हाद वडेर, 'महाबळेश्वर सम्मेलनातील गारठा' सत्यकथा, जानेवारी १९७१, पा. १५
७३) अर्जुन डांगळे, 'दलित साहित्य: एक अभ्यास' (निवेदन) पा. ११
७४) कित्ता, पा. २०
७५) कित्ता, पा. २५
७६) राजा ढाले, 'बौद्ध साहित्य सम्मेलन' अधिवेशन १४ वे, १९७६, अध्यक्षीय भाषण, पा. ४
७७) विजय सोनवणे 'दलित साहित्य का नको?' मुंबई १९७९ पा. ३, ४
७८) कित्ता, पा. ५
७९) कित्ता, पा. ९
८०) कित्ता, पा. १०
८१) कित्ता, पा. २१
८२) कित्ता, पा. २३
८३) कित्ता, पा. २५
८४) कित्ता, पा. २६

प्रकरण ४

१) अर्जुन डांगळे, 'दलित साहित्य-एक अभ्यास' मुंबई १९७८, पा. १७
२) गो. पु. देशपांडे, 'दलित जाणीव', सत्यकथा, मार्च १९७३ पा. ९
३) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'निकाय' दिवाळी अंक १९७६, पा. ५२
४) नरहर कुरुंदकर, 'निकाय' एप्रिल १९७६, पा. ५९
५) प्र. श्री. नेरुरकर, 'माय मराठी' ऑगस्ट १९७५, (दलित साहित्य विशेषांक), पा. २८
६) यशवंत मनोहर, 'दलित साहित्य: सिद्धान्त आणि स्वरूप' नागपूर १९७८, पा. १२
७) पु. ल. देशपांडे, दलित साहित्य संमेलन १९७६, नागपूर, स्मरणिका पा. २०
८) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य: वेदना व विद्रोह' पुणे १९७७, पा. ८०
९) सदा कन्हाडे, 'सत्यकथा' जुलै १९७०, 'दलित साहित्याच्या निमित्ताने.'

१०) वि. वा. शिरवाडकर, ' मराठवाडा ' दिवाळी अंक १९६९, पा. ९
११) वसंत पळशीकर, ' समाज प्रबोधन पत्रिका ' जाने.–फेब्रु. १९७०, पा. २८
१२) राम शेवाळकर, ' साहित्य मेळावा ' राजाराम वाचनालय, सीतावर्डी, नागपूर (अध्यक्षीय भाषण) २१–१२–७५
१३) सुधीर बेडेकर ', ' हजार हातांचा ऑक्टोपस.'
१४) म. भि. चिटणीस, ' अस्मितादर्श मेळावा ' औरंगाबाद १९७४, (उद्घाटन-पर भाषण)
१५) कित्ता
१६) कित्ता
१७) म. भि. चिटणीस, ' आज–उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या ', अस्मितादर्श मार्च–एप्रिल १९७७, पा. १३
१८) म. भि. चिटणीस, ' अस्मितादर्श मेळावा ' महाड येथील भाषण, १९७१
१९) कित्ता
२०) कित्ता
२१) कित्ता
२२) कित्ता
२३) ' अस्मितादर्श ', मार्च-एप्रिल १९७७
२४) वा. ल. कुळकर्णी, ' महाराष्ट्रातील आज–उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या ' अस्मितादर्श चर्चा, प्रथमांक १९६७
२५) कित्ता
२६) कित्ता
२७) सुधीर रसाळ, ' साहित्य समीक्षा प्रदीप ' कोल्हापूर १९८२, पा. ७७
२८) वा. ल. कुळकर्णी, ' समाज प्रबोधन पत्रिका ', जुलै–ऑगस्ट १९७०, पा. ७१
२९) भालचंद्र फडके, ' दलित साहित्याची प्रकाशयात्रा ', औरंगाबाद १९८०, पा. १२४
३०) कित्ता
३१) रा. ग. जाधव, ' निळी पहाट ', वाई १९७८, पा. ४५
३२) कित्ता पा. ५७
३३) कित्ता पा. ६०
३४) कित्ता पा. ८९
३५) कित्ता पा. १९
३६) कित्ता पा. ३८
३७) रा. ग. जाधव, लेख–दलित साहित्य: मराठीचे एक आशास्थान, ' आम्ही ' ऑगस्ट–सप्टेंबर १९७३, पा. ८
३८) कित्ता पा. ८

३९) रा. ग. जाधव, 'निळी पहाट' वाई १९७८, पा. ३८
४०) कित्ता पा. २१
४१) रा. ग. जाधव, 'नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये', 'दलित साहित्याचा दृष्टिकोण' पुणे १९७१, पा. २
४२) कित्ता पा. ३
४३) कित्ता पा. ३
४४) रा. ग. जाधव, 'दलित साहित्य समीक्षा' नवसमीक्षा-संपादक गो. म. कुलकर्णी, पुणे १९८२, पा. २१७
४५) कित्ता पा. २१७
४६) रा ग. जाधव, 'नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये' पुणे १९७२, पा. ७०
४७) अर्जुन डागळे (संपा.), 'दलित साहित्य: एक अभ्यास 'मधून मुक्तिबोध यांचा लेख 'दलित साहित्य', पा. १२६
४८) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'जीवन आणि साहित्य'
४९) कित्ता
५०) अर्जुन डांगळे (संपा.) 'दलित साहित्य: एक अभ्यास' मुंबई १९७८, पा. १३
५१) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'अस्मितादर्श' दिवाळी अंक १९७१, पा. ४
५२) शरच्चंद्र मुक्तिबोध, १६ वे मराठी साहित्य संमेलन, गोरेगाव (मुंबई) अध्यक्षीय भाषण
५३) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याचो प्रकाशयात्रा 'मधून 'द. सा. ची तटस्थ मीमांसा' पा. ८५
५४) कित्ता पा. ८६
५५) कित्ता पा. ८७
५६) कित्ता पा. ८०
५७) गं. बा. सरदार, मुंबई मराठी साहित्य संघ संमेलन, मुंबई १९७५ अध्यक्षीय भाषणातील काही भाग
५८) कित्ता
५९) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' पा. ८८
६०) अर्जुन डांगळे, 'दलित साहित्य: एक अभ्यास '(निवेदन) मुंबई १९७८, पा. १३
६१) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' मुंबई १९८०, पा. ८४
६२) कित्ता पा. ८३
६३) निर्मलकुमार फडकुले, संपादकीय-प्रबोधनातील पाऊलखुणा, पुणे १९७८ पा. २४
६४) भालचंद्र फडके, 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' पा. १२५
६५) भालचद्र फडके, 'दलित साहित्य: वेदना व विद्रोह' पुणे १९७७ (मनोगत) पा. ६

६६) कित्ता पा. ६
६७) कित्ता पा. ७
६८) कित्ता पा. ६
६९) कित्ता पा. २५
७०) कित्ता पा. २७
७१) कित्ता पा. ११२, ११३
७२) भालचंद्र फडके, ' द. सा. वेदना व विद्रोह 'मधून ' दलितांची कथा : स्वरूप व विचार ' पा. १८०
७३) भालचंद्र फडके, ' द. सा.: वेदना व विद्रोह 'मधून ' दलितांची कादंबरी ' पा. २०८
७४) भालचंद्र फडके, ' मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन ' (प्रास्ताविक) पुणे १९८०, पा. १५
७५) भालचंद्र फडके, ' दलित साहित्य: वेदना व विद्रोह ' पुणे १९७७, पा. ७
७६) रा. ग. जाधव, ' नवसमीक्षा ', संपा.–गो. म. कुलकर्णी, पुणे १९८२ मधून दलित समीक्षा पा. २२५
७७) भालचंद्र नेमाडे, ' दलितांचे साहित्य: जाणिवा, प्रवृत्ती आणि प्रेरणा ' दै. मराठवाडा–दिवाळी अंक १९६९, पा. ५०
७८) वा. ल. कुळकर्णी, दै. मराठवाडा–दिवाळी अंक १९६९

संदर्भग्रंथ

१) बा. सी. मर्ढेकर – 1) Arts and Man–1937
२) वाङ्मयीन महात्मता–१९४१
३) सौंदर्य आणि साहित्य–१९५५
२) पु. शि. रेगे – १) छांदसी–१९६२
३) गंगाधर गाडगीळ – १) खडक आणि पाणी–१९६०
२) साहित्याचे मानदंड–१९६२
३) खाडिलकरांची तीन नाटके–१९७३
४) पाण्यावरची अक्षरे–१९७९
५) आजकालचे साहित्य–१९८०
४) माधव आचवल – १) रसास्वाद : वाङ्मय आणि कला–१९७२
२) जास्वंद–१९७४
५) द. भि. कुळकर्णी – १) महाकाव्य स्वरूप आणि समीक्षा–१९६६
२) पहिली परंपरा–१९७३
३) दुसरी परंपरा–१९७४
४) ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद–१९७५

५) तिसऱ्यांदा रणांगण–१९७६
६) पार्थिवतेचे उदयास्त–१९७७
७) चार शोधनिबंध–१९७७
८) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र: पुन:स्थापना–१९८२

६) कुसुमावती देशपांडे – १) पासंग–१९५४
२) मराठी कादंबरीचे पहिले शतक भाग १–२ (१९५३ व १९५६)

७) दि के. बेडेकर – १) सुमित्रानंदन पंत–१९४८
२) साहित्य.निर्मिती व समीक्षा–१९५४
३) साहित्यविचार–१९६४
४) केशवसुतांची काव्यदृष्टी–१९६६
५) समाजचिंतन–१९६९
६) आधुनिक मराठी काव्य: उदय, विकास आणि भवितव्य–१९६९
७) अणुयुगातील मानवधर्म–१९७१
८) अस्तित्ववादाची ओळख–१९७२
९) विचारयात्रा–१९७५

८) शरच्चंद्र मुक्तिबोध – १) काही निबंध–१९६३
२) जीवन आणि साहित्य–१९७२
३) सृष्टी, सौंदर्य व साहित्यमूल्य–१९७७

९) द. ग. गोडसे – १) पोत–१९६३
२) शक्तिसौष्ठव–१९७२
३) शतिमानी–१९७६
४) लोकधाटी–१९७९
५) मातावळ–१९८१
६) समन्देतलाश–१९८१

१०) नरहर कुरुंदकर – १) रूपवेध–१९६४
२) पायवाट–१९७४
३) धार आणि काठ–१९७५

११) डॉ.म.ना. वानखडे – १) संपादित: दलितांचे विद्रोही वाङ्मय–१९८१

१२) बाबुराव बागुल – २) दलित साहित्य. आजचे क्रांतिविज्ञान–१९८२

१३) शंकरराव खरात – १) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर–१९६६
२) दलित वाङ्मय: प्रेरणा व प्रवृत्ती–१९७८

१४) डॉ.गंगाधर पानतावणे १) विद्रोहाचे पाणी पेटले आहे–१९७६
२) मूल्यवेध–१९७७
३) दलितांचे प्रबोधन–१९७८
४) मूकनायक–१९७९

५) दलित कथा–१९८१
६) वादळाचे वंशज-१९८२

१५) अर्जुन डांगळे – संपादित: दलित साहित्य: एक अभ्यास–१९७८
१६) डॉ. यशवंत मनोहर– १) दलित साहित्य:सिद्धान्त आणि स्वरूप–१९७८
२) स्वाद आणि चिकित्सा–१९७८
१७) केशव मेश्राव – १) समन्वय–१९७९
२) विद्रोही कविता–१९७८
१८) भीमराव कर्डक – आंबेडकरी जलसे: स्वरूप व कार्य–१९७८
१९) प्रा.वा.ल. कुळकर्णी– १) वाङ्मयातील वादस्थळे–१९४६
२) वाङ्मयीन मते आणि मतभेद–१९४९
३) साहित्य आणि समीक्षा–१९६३
४) वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण–१९६७
५) शोध आणि बोध–१९६७
२०) रा. ग. जाधव – १) नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये–१९७२
२) विचारशिल्प (संपादित)–१९७५
३) साहित्य आणि सामाजिक संदर्भ–१९७५
४) आनंदाचा डोह–१९७६
५) वाङ्मयीन निबंध : स्वरूप व साधने–१९७७
६) वाङ्मयीन आकलन–१९७७
७) निळी पहाट–१९७८
८) निळे पाणी–१९८२
२१) प्रा. गं. बा. सरदार– १) संतसाहित्याची राजकीय–सामाजिक कामगिरी–१९६५
२) प्रबोधनातील पाऊलखुणा–१९७८
३) संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती १९८२(आ. ४)
२२) डॉ. भालचंद्र फडके – १) दलित साहित्य:वेदना व विद्रोह–१९७७
२) दलित साहित्याची प्रकाशयात्रा–१९८०
३) मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन–१९८०
२३) टी. पी. अडसूळ – डॉ. आंबेडकर प्रेरणेचे साहित्य–१९७७
२४) बाळकृष्ण कवठेकर – दलित साहित्य: एक आकलन–१९८१
२५) अ. अ. कुलकर्णी – प्रदक्षिणा–१९७६
२६) गो. म. कुलकर्णी – नवसमीक्षा (ह. श्री. शेणोलीकर गौरवग्रंथ) १९८२
२७) भीमराव कुलकर्णी – अस्मिता महाराष्ट्राची–१९७१
२८) हरीश खंडेराव – आंबेडकरी कवितेचे अंतरंग–१९८१
२९) गोखले–जोगळेकर – मराठी टीकाकार–१९७९
३०) प्र. न. जोशी – आधुनिक मराठी वाङ्मयाचा विवेचक अभ्यास
३१) वसंत दावतर – मराठी टीका–१९६६
३२) बिजय सोनवणे – दलित साहित्य का नको ? १९७९

नियतकालिके :– अस्मितादर्श, आम्ही, निकाय, मराठवाडा, मागोवा, समाज प्रबोधन पत्रिका.

REFBK-0026674

प्रा. डॉ. ज्योती बाबुराव लांजेवार

नागपूरच्या श्री बिंझाणी नगर महाविद्यालयात गेल्या बारा वर्षांपासून अध्यापन. 'दिशा' काव्यसंग्रह १९८२ मध्ये प्रकाशित झाला. मराठी साहित्याला वाहिलेल्या अनेक सुप्रसिद्ध नियतकालिकांतून काव्य, वैचारिक व समीक्षालेखन. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा १९९१–९२ चा वासंती गाडगीळ पुरस्कार. अनेक कवितांचे भारतीय भाषांत व रशियन भाषेत भाषांतर. भारतातील अनेक विद्यापीठांत त्यांच्या काही कविता अभ्यासक्रमात समाविष्ट.